# कृष्ण सखा माझा

२

श्रीपरमानंदस्वामी



ई - पुस्तक : कृष्ण सखा माझा भाग-२

लेखन : श्रीपरमानंदस्वामी (श्री. अविनाश मोरेश्वर लिमये)

संपर्क : ०२२-२४३६ १५१४ | ९९६९८ ७६८५०.

संपादन : सचिन काकडे, मुंबई.

ई - प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

हक्क : सौ. अनुपमा अविनाश लिमये
१३, नवलकर बिल्डिंग, न.चि. केळकर रोड,
दादर, मुंबई ४०० ०२८.

www.esahity.com
esahity@gmail.com
eleventh floor, eternity
eastern express highway
thane, 400604.

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.


- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे .
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहेतसे न केल्यास . .कायदेशीर कारवाई होऊ शकते

©esahity pratishthan®2016

# समर्पण

सगुण प्रेमभक्तिचा आनंददायी मार्ग दाखविणाऱ्या
सद्गुरुनाथ श्रीअवधूतस्वामी यांच्या पवित्र चरणी
त्यांच्याच कृपेने लाभलेले हे भक्तिभावाचे सुमधूर फळ,
सप्रेम समर्पण.

- श्रीपरमानंदस्वामी



# पुस्तक परिचय

नारदऋषी आणि लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडत जाणारे हे कृष्णाचे गोकुळापर्यंतचे जीवनचरित्र अतिशय बोधप्रद आहे. कृष्णचरित्र हे अनेक चमत्कारांनी भरलेले आहे, असेच नेहमी वर्णन केले जाते. परंतु, श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेले हे कृष्णचरित्र वाचताना, त्या प्रसंगांमधील तर्कसंगतता वाचकांना विचार करायला लावणारी आहे. ते वाचताना हे प्रसंग असेच घडले असणार असेच वाटते. उदाहरणार्थ,

कृष्ण सखा माझा - भाग एक मधील कृष्णाची बंदीशाळेतून मुक्तता, यमुनेला आलेला पूर, नंदराजाच्या कन्येला घेऊन वसुदेवाचे मथुरेला येणे इत्यादीमधील चमत्कारांपेक्षा त्यामधील तर्कसंगत विचार मनाला भावतात आणि बुद्धीलाही पटतात. तसेच 'चमत्कार' या विषयाबद्दल नारद व लक्ष्मी यांचा संवादही वाचकांना विचार करायला लावणारा आहे.

कृष्ण सखा माझा - भाग दोन मध्ये कृष्णाच्या बाललीला तसेच कृष्ण व पेंद्या यांच्यातील सख्यत्व श्रीपरमानंदस्वामी यांनी अतिशय सुंदरपणे रंगविले आहे. कृष्णचरित्रामध्ये 'गोपीवस्त्रहरण' या नावाने प्रचलित असलेल्या प्रसंगाचे (जो लोकांच्या दृष्टीने अजूनही कृष्णावरील टीकेचा एक विषय ठरलेला आहे) श्रीपरमानंदस्वामी यांनी केलेले वर्णन (गोपिकांचे लज्जारक्षण) वाचताना तेच त्या प्रसंगातील वास्तव आहे असेच जाणवते. तसेच बाजाराला जाणाऱ्या गवळणींची दह्या-दूधाची मडकी फोडण्याच्या प्रसंगातील वास्तविकताही जाणवते.

कृष्ण सखा माझा - भाग तीन मध्ये राधा-कृष्ण यांची प्रथम भेट, त्यांच्या भेटींमध्ये घडणारे प्रसंग व त्यांचे एकमेकांशी होणारे संवाद, त्यांच्या भेटींमधील अडचणी इत्यादींमधून राधा-कृष्ण यांच्यातील सर्व नात्यांच्या पलिकडे असलेले भक्तिभावाचे संबंध जाणवतात. तसेच गोवर्धन

पूजन आणि मुसळधार वृष्टीचे संकट यांमधून पुन्हा एकदा चमत्कारांपलिकडील वास्तविकताच लक्षात येते.

कृष्ण सखा माझा - भाग चार मधील राधा-कृष्ण यांच्यातील प्रेमभक्तिभावाचे संबंध वाचताना भक्तिमार्गाचे श्रेष्ठत्व मनावर ठसते. तसेच कालिया मर्दनाचाही प्रसंग अतिशय वाचनीय आहे.

कृष्ण सखा माझा - भाग पाच मध्ये अक्रूराचे आगमन, राधेचा कृष्णाला भावपूर्ण निरोप, कृष्णाचे मथुरेकडे प्रयाण, कृष्णरूप राधा, कृष्णजयंती सोहळा असे अतिशय भावपूर्ण प्रसंग वाचायला मिळतात.

‘कृष्ण सखा माझा’ या ग्रंथाचे मुखपृष्ठही अतिशय सुंदर असून, ते श्रीपरमानंदस्वामी यांच्या संकल्पनेतूनच साकार झालेले आहे. राधा व कृष्ण यांच्यातील सख्यत्व तर यातून जाणवतेच, पण त्याचबरोबर ते एकमेकांच्या अतिशय जवळ असूनसुद्धा ते एकमेकांकडे पहात नाहीत, तर कृष्ण स्वतः स्वतःतच रमलेला आहे आणि राधा कृष्णप्रेमात रमलेली आहे हे जाणवते. दोघांनीही हातात धरलेली एकच मुरली हे राधा-कृष्ण यांच्या ऐक्यत्वाचेच प्रतीक आहे. एकूणच भक्तिमार्गाबद्दल असलेले गैरसमज दूर करणारा हा ग्रंथ आहे.

‘ई साहित्य प्रकाशन’ यांनी हा सुंदर ग्रंथ पाच भागांमध्ये वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे मान्य केले, याबद्दल त्यांना धन्यवाद!

सौ.प्रतिमा प्रविण आठवले

# भाग-२

## अनुक्रमणिका -


९. गर्गमुनींचे आगमन

१०. नामकरण संस्कार

११. लडिवाळ कृष्णाच्या बाललीला

१२. यमुनाकाठचा गोपाळकृष्ण

१३. मुरलीधर कृष्ण

१४. कृष्णाचा परमसखा पेंद्या

१५. प्रेमाचे सख्य व भक्तिचे ऐक्य

१६. स्त्री-पुरुष द्वैत

१७. गोपिकांचे लज्जारक्षण

१८. वासनात्मक प्रेमातून ईश्वरी प्रेमाकडे




## गर्गमुनींचे आगमन

इकडे नंदाच्या राजवाड्यात मात्र खऱ्या अर्थाने आनंदाचा जल्लोश सुरू झाला होता. नंद व यशोदेचे पहिलेच अपत्य असल्यामुळे त्यांच्या मुखावर साहजिकच कृतकृत्यतेचे भाव भरून राहिलेले दिसत होते. पुत्रप्राप्तीचा आनंद नंद व यशोदा परस्परांकडे वारंवार पाहून, पण काहीही न बोलता अनुभवत होते. त्याच आनंदाचे प्रतिबिंब राजवाड्यातील सर्वांच्याच चेहऱ्यावर दिसत होते आणि त्याच आनंदाचे पडसाद सर्वांच्याच बोलण्यातून कानावर येत होते. सर्वांच्याच ठिकाणी यशोदा व तिच्या पुत्राचेच एकीएक व्यवधान लागून राहिलेले होते. त्या उभयतांच्या विश्रांतीची व स्वास्थ्याची काळजी घेणे, काही ना काही तरी निमित्त काढून यशोदेच्या महालात वारंवार जाणे आणि त्या सुंदर व गोंडस बाळाचे मुख प्रेमाने न्याहाळणे, त्याला कुशीत घेऊन कौतुकाने आपल्या छातीशी धरणे, त्याच्याशी लाडे लाडे बोलणे आणि त्या बाळाच्या मुखावरील विविध पण निरागस भावाचा आनंद मनमुराद अनुभवणे याचा सर्वांनाच जणु नादच लागल्यासारखे झाले होते. मुख्य म्हणजे यापासून नंदही स्वतःला वेगळा ठेवू शकत नसल्यामुळे तोही यशोदा व त्याच्या पुत्राच्या या कौतुकाच्या सोहळ्यात पूर्णपणे सहभागी झाला होता. परंतु आपले कर्तव्यकर्म मात्र न विसरता तो उत्कृष्टपणे पार पाडत होता.

सर्व गोकुळवासीयांचे रक्षण, स्वास्थ्य व सुख याची काळजी तर तो योग्य प्रकारे घेत होताच, पण त्यात आता पित्याच्या कर्तव्यकर्माची आनंददायी भर पडली होती. पुत्रजन्माच्या निमित्ताने नंदाठायीचा पितृभाव जागा झाला. त्या भावाचे त्याला विशेष सुख जाणवत असे. पुत्राचे रक्षण, पोषण, संगोपन याचबरोबर त्याच्यावर योग्य संस्कार करण्याची जबाबदारीही आता नंदाला जाणवू लागली. याच दृष्टीने त्या पुत्रावरील प्रथम व महत्त्वाचा संस्कार म्हणजे त्याचे 'नामकरण' करणे हाच होता. त्याचाच विचार नंदाच्या मनात प्रकर्षाने घर करून राहिला होता. आपल्या पुत्रावर विधीयुक्त नामाचा संस्कार होणे अत्यंत आवश्यक व उचित आहे हे तो जाणून होता आणि म्हणून तेच एकीएक व्यवधान त्याच्या मनाच्या ठिकाणी लागून राहिले होते. परंतु ते नामकरण निश्चितपणे कसे करावे, जेणेकरून ते धर्माला धरून आणि राजघराण्याच्या परंपरेला व वैभवाला साजेसे व शोभेसे असेल हे त्याला ठाऊक नव्हते. परंतु एवढे मात्र त्याला निश्चितपणे वाटत होते की आपल्या पुत्राला ऋषीमुनींसारख्या थोर व्यक्तींचे आशीर्वाद लाभावेत. कारण ऋषिमुनींचे अंतःकरण हे ईश्वरी अनुभवामुळे अत्यंत शुद्ध व पवित्र असते यावर नंदाची पूर्णपणे श्रद्धा होती. ऋषिमुनींची दृष्टी, त्यांचे बोलणे, त्यांच्याकडून सहजपणे व निर्हेतुकपणे घडणारी सर्व कर्मे यातून त्यांचेठायीचे एकीएक ईश्वराचेच माहात्म्य व त्याचेच निर्व्याज प्रेम प्रकट होत असते, हे नंद पूर्णपणे जाणून होता. परंतु हे सर्व निश्चितपणे कसे करावे व कसे साधावे अशा काळजीच्या मनःस्थितीत नंद असतानाच, अचानकपणे थोर महात्मा गर्गमुनी यांचे राजवाड्यात आगमन झाल्याची वार्ता सेवकाने धावतच येऊन नंदाला सांगितली. ती वार्ता ऐकली मात्र, एकदम नंदाचे मन काळजीमुक्त झाले. त्याच्या मनाला अगदी हलके हलके वाटू लागले. एवढेच नव्हे, तर त्याचे मन हर्षभराने फुलून आले आणि तो लगबगीने गर्गमुनींच्या दर्शनासाठी त्यांच्या जवळ येऊन

पोहोचला. अत्यंत समाधानाने त्याने गर्गमुनींना आपल्या अंतर्गृहात नेले आणि त्यांना उच्चासनावर बसवले. प्रथम त्याने गर्गमुनींना आदरपूर्वक साष्टांग प्रणिपात केला आणि दोन्ही कर जोडून त्यांच्या सन्मुख उभा राहिला. गर्गमुनींनी आपला उजवा कर वर करून नंदाला आशीर्वाद दिला असता नंद अतिशय नम्रतेने गर्गमुनींशी बोलू लागला.

''हे मुनिवर्य, तुम्हाला माझे पुन्हा पुन्हा प्रणाम आहेत. तुमच्या सारख्या महात्म्यांचे चरण माझ्यासारख्या पामराच्या घराला आज लागत आहेत हे खरोखरी माझे भाग्यच आहे. तुमचे आशीर्वाद नित्य आमच्या पाठीशी आहेत म्हणूनच आम्ही आमचे जीवन सुखाने व समाधानाने जगत आहोत. खरे तर आम्हीच तुमच्या दर्शनासाठी व मार्गदर्शनासाठी तुमच्या चरणी नित्य यावयास हवे. परंतु आमच्यासारख्या सामान्य प्रापंचिकांना ते शक्य करता येत नाही ही आमची मनोदुर्बलताच आहे. परंतु तरीही आमचा राग न धरता तुम्ही आमच्यावर दया करता ही तुमची कृपाच होय. तुमच्या आशीर्वादानेच मला व यशोदेला पुत्रप्राप्ती झाली आहे हे तुम्हाला सांगण्यास मला अतिशय आनंद होत आहे. अशा आनंदाच्या प्रसंगी तुमचे येथे झालेले आगमन हे तर आमच्या भाग्याचे फळ आहेच, पण या तुमच्या येण्यात काहीतरी दैवी योगायोगही आहे अशी माझी पूर्णपणे खात्री आहे. माझ्या पुत्राचे नामकरण, त्याचे जातक इत्यादी सर्व आपल्या शुभाशीर्वादाने व आपल्याच शुभहस्ते व्हावे अशीच त्या परमेश्वराची इच्छा दिसत आहे असा माझा तरी दृढ विश्वास आहे. तरीही आपण कृपा करून आमच्या जीवनातील हा अत्यंत आनंददायी प्रसंग शुभकारक व मंगलमयही करावा अशी आपल्या चरणी विनम्रभावे मी प्रार्थना करीत आहे.''

नंदाच्या नम्रभावाच्या बोलण्याने गर्गमुनींना संतोष झाला व त्यांच्या मुखावर स्मित हास्य दिसू लागले. कृपापूर्ण दृष्टीने ते नंदाकडे बराच वेळ पहात राहिले. त्यानंतर त्यांनी आपले नेत्र मिटून घेतले तर त्यातून जलधारा वाहू लागल्या. अश्रूंनी पाणावलेले आपले नेत्र थोड्या वेळाने त्यांनी पुन्हा उघडले आणि नंदाला उद्देशून प्रेमळ वचने ते बोलू लागले.

''हे भाग्यवान नंदा, खरोखरीच तुझ्या भाग्याला पारावारच नाही. तुझे भाग्य किती थोर आहे याची कल्पना तुलाच काय, पण दुसऱ्या कोणालाही करता येणे केवळ अशक्यच आहे. हे नंदा, तुला मी अत्यंत गुह्य गोष्ट सांगत आहे ती तू लक्षात ठेव आणि तुझ्यापाशीच ठेव. दुसऱ्या कोणालाही ती गोष्ट चुकूनही सांगू नकोस. तुझ्या घरी आलेला हा पुत्र सामान्य नसून साक्षात नारायणाचाच तो अवतार आहे. धर्माचे रक्षण व अधर्माचे नाशन करण्याच्या आपल्या ब्रीदाला जागण्यासाठीच तो नारायण मानवरूपाने अवतरला आहे. कंसासारख्या दुराचारी व उन्मत्त अशा राक्षसी वृत्तीच्या जनांचे निर्दालन करून सत्प्रवृत्तीच्या जनांना रक्षण व आधार द्यावा आणि या भूलोकी शांती समाधानाचे राज्य स्थापावे हाच उद्देश व हेच कार्य या अवताराचे आहे. तेव्हा अशा या अद्भूत बालकाचे पालन पोषण करण्याची संधी हे नंदा, तुला लाभली आहे हे तुझे खरोखरीचे परमभाग्यच आहे. या निमित्ताने नारायणाच्या अवतारकार्याला सेवाभावाने सहाय्यभूत होऊन केवढेतरी पुण्यकर्म तुझ्या गाठीला बांधले जाईल. त्याचे फळ म्हणून तुला भूलोकीच्या सर्व सुखांची व ऐश्वर्याची प्राप्ती होईल आणि तुझे जीवन धन्य होऊन राहील.''

गर्गमुनींच्या बोलण्याने आश्चर्य पावलेला नंद थोडावेळ स्तब्धच राहिला. त्याच्या मनाला थोडीशी अस्वस्थताही जाणवू लागली. गर्गमुनींशी काय व कसे बोलावे अशी द्विधा स्थिती त्याच्या मनाची झाली. परंतु त्याने आपल्या मनाला सावरले आणि दोन्ही हात नम्रपणे जोडून गर्गमुनींशी बोलू लागला.

''हे मुनिवर्य, आपली थोरवी माझ्यासारखा सामान्य मनुष्य तो काय जाणणार आणि त्याविषयी ते काय बोलणार? कारण माझ्या समजुतीच्या व आकलनशक्तिच्या पलीकडील त्या सर्व गोष्टी आहेत. नारायणाच्या अवताराचे तुम्ही सांगितलेले रहस्य हे केवळ तुम्हीच जाणू शकता. कारण परमेश्वरी सत्तेतील त्याचे संकल्प व संकेत जाणण्याची अंतःकरणाची अवस्था तुम्हाला त्या परमेश्वराशी ऐक्य पावल्यानेच प्राप्त झाली आहे हे मला निश्चितपणे माहीत आहे. पण मुनिवर्य, आपण आणखी एक गोष्टही निश्चितपणे जाणत असणार जी मी आपल्याला सांगू शकलो नाही. ती गोष्ट प्रकट करण्याचे खरे तर मला अजून धैर्यच होत नाही. पण आता मात्र तुम्हाला सर्व काही मोकळेपणाने सांगणे अत्यंत आवश्यकच आहे. कारण तरच माझ्या द्विधा मनाला स्थैर्य व शांती प्राप्त होईल.

परमेश्वराचा अवतार म्हणून तुम्ही ज्याचा निर्देश करीत आहात तो हा पुत्र माझ्या व यशोदेच्या पोटी जन्माला आलेला नसून, तो खरे तर वसुदेव व देवकी यांच्या पोटी कारागृहात जन्माला आलेला पुत्र आहे. कंसाच्या भयाने वसुदेवाने त्याला महत्‌प्रयासाने व पराक्रमाने मथुरेतून येथे गोकुळात आणून माझ्या स्वाधीन केले आहे. हे रहस्य आम्हा दोघांशिवाय तिसऱ्या कोणालाही, म्हणजे अगदी यशोदेलाही माहीत नाही. योगायोगाने त्याचवेळी यशोदाही प्रसूत झालेली असून ग्लानीतच होती. दुर्दैवाने तिने एका मृत बालिकेला जन्म दिला होता आणि ते तिलाही ज्ञात नव्हते. तेव्हा एकीकडे मित्रकर्तव्य आणि एकीकडे प्रिय पत्नी यशोदेवरील दुःखद प्रसंगातून तिचे सांत्वन करण्यासाठी मी व वसुदेवाने परस्पर विचाराने व संमतीने यातून हा मार्ग शोधून काढला. वसुदेवाच्या या पुत्राला मी आमचा पुत्र म्हणून येथे ठेवून घेतले आणि आमच्या मृत कन्येला वसुदेवाच्या स्वाधीन केले. त्या अभागी कन्येला वसुदेव पुन्हा मथुरेला परत घेऊन गेला. पुढे त्याचे व तिचे काय झाले हे मला समजू शकलेले नाही. परंतु यशोदा व सर्वजण मात्र पुत्रप्राप्तीच्या आनंदात अगदी बुडून गेलेले आहेत. मलाही आनंद झालेलाच आहे व मीही सर्वांच्या आनंदात सहभागी झालेलो आहे. परंतु तरीही माझ्या मनाच्या कोपऱ्यात कोठेतरी अस्वस्थता आहे असे मला जाणवत आहे. एकीकडे या बालकाकडे बघून माझ्या ठिकाणी पुत्रप्रेम तर निश्चितपणे जागृत होत आहे. परंतु त्याचवेळी मी या मुलाचा खरा पिता नाही अशीही भावना माझ्या मनाला कुठेतरी सलत आहे. माझ्याकडून या बालकाचे पालन-पोषण निश्चितपणाने व अत्यंत प्रेमाने तर घडेलच, पण त्या प्रेमात पितृप्रेमाचा थोडासा अभाव असेल की काय, अशी शंका उगाचच माझ्या मनाला सतावीत आहे.

हे मुनिवर्य, मी या मुलाचा केवळ पालक आहे की पिताही आहे, असा जो संदेह माझ्या मनात निर्माण झालेला आहे तो आपण आपल्या प्रेमळ ज्ञानवचनांनी दूर करावा अशी प्रार्थनाच मी आपल्या चरणी करीत आहे. तरी तशी कृपा आपण माझ्यावर करावी.''

नंदाचे भावनापूर्ण बोलणे ऐकून गर्गमुनींची मुद्रा गंभीर झाली. आपले नेत्र बंद करून ते काही काळ स्वस्थच राहिले. परंतु थोड्या वेळाने त्यांनी आपले नेत्र उघडले व आपल्या प्रेमळ दृष्टीने ते नंदाकडे पाहू लागले. त्या दृष्टीतील प्रेमच जणू शब्दरूपाने त्यांच्या मुखातून प्रकट होऊ लागले.

''हे नंदा, तुझ्या मनाची द्विधा स्थिती मी समजू शकतो. तशी ती होणेही अगदी साहजिकच आहे. त्यात तुला कोणत्याही प्रकारे दोष देता येणार नाही. कारण निर्माण झालेली परिस्थितीच त्याला कारणीभूत आहे हेही खरेच आहे. त्यामुळे माझ्या ठिकाणी तुझ्याविषयी पूर्ण अनुकंपा आहे. तू माझ्याशी तुझे मन मोकळे केलेस हेही चांगले झाले. कारण त्यामुळे तुझ्या मनावरील ताण थोडा तरी सैल झाला असेल. परंतु तो मनावरील ताण पूर्णपणे जाऊन मन खऱ्या अर्थाने मोकळे होणे व सबळ होऊन रहाणे हे अत्यंत आवश्यक आहे. तेच खरे महत्त्वाचे आहे. त्यासाठी मी जे तुला आता सांगत आहे ते नीट लक्षपूर्वक व श्रद्धेने श्रवण कर.

हे नंदा, मी तुला पुन्हा एकदा सांगतो, की खरोखरीच तुझ्या व यशोदेच्या भाग्याला पारावार नाही. अनेक जन्मींची तुमची पुण्याईच फळाला आली म्हणूनच हा नारायणाचा अवतार तुमच्या येथे आलेला आहे हे अगदी सत्य आहे. आता या अवतारी बालकाचा जन्म तुमच्या पोटी झालेला नसून, तो वसुदेव व देवकी यांचा पुत्र आहे असे जे तू मला सांगितलेस ते ऐकून मला तरी काही विशेष आश्चर्य वाटलेले नाही. अर्थात थोडेसे नवल मात्र जरूर वाटले. परंतु ही एक नारायणाचीच लीला प्रकट झालेली आहे हे मी जाणून असल्यामुळे, त्या नवलाईचे रूपांतर माझ्या ठिकाणी त्या लीलेचा आनंद होण्यातच झाले. तेव्हा या अवतारी बालकाचा जन्म वसुदेव व देवकीच्या पोटी झालेला आहे हे मला आधीपासून ठाऊक असण्याचे कारणही नाही आणि माझ्यासाठी ते आवश्यकही नाही. आत्ताच्या या घडीला व क्षणाला हा बालरूप नारायण तुझ्या घरी आहे हेच माझ्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. हीच त्याची लीला मला पहायची आहे, त्यात थोडावेळ सहभागीही व्हायचे आहे आणि त्या लीलेचा आनंद कायमचा अनुभवायचा आहे. तसाच तूही या नारायणाच्या लीलेचा आनंद घेण्यासाठी मनापासून सादर हो बरे!

आता तुला मी एक महत्त्वाची गोष्ट सांगतो ती नीट ऐक व लक्षात घे. मातापित्यांचे कर्तव्य केवळ मुलांना जन्म देणे एवढ्यापुरतेच मर्यादित नाही. त्या मुलांचे पालन-पोषण करणे, त्यांना योग्य तऱ्हेने वाढवणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्यावर योग्य संस्कार करणे यामुळेच मातापित्यांच्या कर्तव्यकर्माची खऱ्या अर्थाने पूर्ती होत असते. पिता असण्याबरोबरच पालक असणे हेही अत्यंत महत्त्वाचे आहे. पिता एक वेळ आपल्या अपत्यांचा पालक असू शकणार नाही, पण पालक हा मात्र खऱ्या अर्थाने नेहमीच पिता असतो. कारण पितृधर्माचे पालन पालकाकडूनच होत असते.

तेव्हा हे नंदा, याच पितृधर्माचे पालन करण्याचे भाग्य तुला लाभलेले आहे आणि ते तुझ्याकडून निश्चितपणे व प्रेमाने घडेल याची मला खात्री आहे. या बालकाला पाहिल्याबरोबरच तुझ्या ठिकाणी पुत्रस्नेह अगदी सहज निर्माण झाला हे तुझ्या ठिकाणच्या पितृप्रेमाचेच लक्षण आहे. खरे तर, या शुद्ध व नैसर्गिक प्रेमाला कुठल्याही नात्याच्या प्रेमाचे नाव देणे आवश्यकच

नाही. प्रेम हे प्रेम आहे. त्याला नाते हे केवळ निमित्त कारण आहे. परंतु नात्यापेक्षाही प्रेमाचे संबंधच महत्त्वाचे असतात. संबंध केवळ नात्यापुरते नसतात, तर ते नात्यापरते असतात. नात्याचे प्रेम बदलू शकते परंतु संबंधाचे प्रेम मात्र कायम वाढत असते. त्यामुळे ते संबंध अधिकाधिक दृढ व घनिष्ठ होत असतात. म्हणूनच हे नंदा, तू या पितृधर्माला जाग, म्हणजे खरे तर या प्रेमधर्मालाच जाग. त्यामुळे प्राप्त परिस्थितीतील तुझे कर्तव्यकर्म अगदी मोकळेपणाने घडेल. तुझ्या मनावर कोणताही ताण व दडपण तर येणार नाहीच, परंतु कर्तव्यपूर्तीचा खरा आनंद तुझ्या मनाला अनुभविता येईल.''

एवढा वेळ नारदाच्या मुखातून वहाणाऱ्या वाणीच्या ओघात तन्मयतेने श्रवण करणारी लक्ष्मी मनातून मात्र सावधही होतीच. त्यामुळे तिने मध्येच हात जोडून नारदाला त्याचे बोलणे थांबवण्यासाठी विनंती केली. नारदानेही आपले बोलणे थांबवले व तो लक्ष्मीकडे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागला असता लक्ष्मी उत्स्फूर्तपणे बोलू लागली.

''हे नारदा, तुझी खरोखरीच कमाल आहे. नारायणाचे सगुण चरित्र वर्णन करण्याच्या ओघात तू अनेक विषयांची जी गुंफण करीत असतोस ना, त्याला खरेच कशाचीही तोड नाही. प्रत्येक विषय उत्स्फूर्तपणेच प्रकट होत असतो हे तर ऐकताना लगेचच लक्षात येते. त्या त्या विषयाचे आगळेपण व वेगळेपणही जाणवत असते. तरीही ते ते विषय चालू कथाप्रसंगापासून जराही अलग न वाटता, त्या त्या स्थानी मूळ सूत्राला धरून तर असतातच, पण अत्यंत शोभूनही दिसतात हे महत्त्वाचे. त्या विषयांची उत्स्फूर्तता एवढी असते की त्यात जराही योजनाबद्धता जाणवत नाही, तरीही ते विषय सुसूत्र व सुसंबद्ध असतात आणि यातच त्याचे सौंदर्य साठवलेले आहे असे मला वाटते.

आताच बघ ना! विषय कृष्णजन्माच्या मंगलदायी व शुभकारक वेळेचा आहे. पण त्याचवेळी या मधून नंदाच्या मनाच्या कोपऱ्यात कुठेतरी नकळतपणे दबून राहिलेल्या नाजूक भावनेलाही तुझ्या वाणीचा स्पर्श होतच आहे. का नंदाच्या मनातील भावना तुझ्या अंतःकरणाला स्पर्श करते आहे आणि त्यातून तुझ्या वाणीचा ओघ अचानक त्याची दिशा बदलतो आहे हे मला समजत नाही. पण नंदासारख्या एरव्ही विशेष प्राधान्य नसणाऱ्या व्यक्तिच्याही साध्या व छोट्याशा भावनेलाही तुझ्या अंतःकरणात व म्हणूनच बोलण्यात स्थान मिळते आणि ती व्यक्ती व तिची भावना एकदम मोठ्या झाल्यासारख्या दिसतात. खरे तर, यातच तुझ्या अंतःकरणाचा मोठेपणा मला दिसतो व तुझी थोरवी मला अधिकच जाणवते.

हे नारदा, नंदाच्या निमित्ताने तू सांगितलेला विषयही खरेच बोधदायी व नित्याच्या जीवनाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा आहे. खरे कर्तव्यकर्म काय? कर्तव्यकर्म व भावना यांची सांगड काय आणि ती कशी घालायची? कर्तव्याची पूर्ती व भावनेची पूर्ती यथार्थपणे कशी साधायची? इत्यादी प्रश्न सामान्याच्या मनात सुप्तपणे नेहमीच वास करीत असतात. त्यामुळेच सामान्याच्या मनावर कसला ना कसला तरी ताण कायमच असतो आणि तो ताण त्याला ना धड कर्तव्याच्या पूर्तीचे समाधान लाभू देतो, ना धड भावनेच्या पूर्तीचे सुख लाभू देतो. अशा द्विधा मनाच्या अवस्थेमुळेच शांती व स्थैर्यापासून मन नेहमीच वंचित रहाते आणि बाह्यांगाने सर्व जीवन व्यवस्थित चालताना दिसत असूनही, मन आनंदाचा अनुभव मात्र कधीच पूर्णपणे घेताना दिसत नाही. या कर्तव्याच्या घोळातून व भावनेच्या गुंत्यातून मनाला सोडवण्यासाठी

गर्गमुनींसारख्या थोर महात्म्यांच्या मार्गदर्शनाचीच जरुरी आहे. नंदाला भाग्याने तसा लाभ झाला व तो मोकळा झाला हे मात्र चांगले झाले. त्यामुळे पुढील कृष्णचरित्रात मनापासून सहभागी होण्यासाठी नंद मोकळा झाला, त्याचे माहात्म्य वर्णन करायला हे नारदा, तू मोकळा झालास आणि मुख्य म्हणजे त्या वर्णनाचा श्रवणानंद घेण्यास मीही मोकळी झाले'' असे बोलून लक्ष्मी अत्यंत मोकळेपणाने हसली आणि नारदानेही तेवढ्याच मोकळेपणाने हसून लक्ष्मीला प्रतिसाद दिला.

परंतु कोणतीही गोष्ट केवळ हसण्यावारी नेण्याचा नारदाचा स्वभाव नसल्यामुळे नारद पुन्हा गंभीर झाला आणि लक्ष्मीशी बोलू लागला.

''हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी बरोबर आहे. कारण केवळ भावनात्मकता ही मनाला दुर्बल करते, तर केवळ कर्तव्यपूर्तता ही मनाला कोरडी तर करतेच, पण वेळप्रसंगी मनाला कठोरही करू शकते. म्हणूनच भावनेला कृतीची जोड हवी, तर कर्तव्यामध्येही भावनेचा ओलावा हा हवाच हवा. आता मुख्य प्रश्न असा शिल्लक रहातोच, की हे सर्व विषय बुद्धीला जरी पटले तरी मनाला ते कसे पटावेत अथवा कसे मानवावेत? कारण खरी अडचण ही मनाचीच आहे. आणि या मनालाच योग्य दिशेने वळवणे हे मोठ्या मोठ्या ज्ञानवंताना व तपस्व्यांनाही जमणे कठीण होऊन रहाते. याच दृष्टीने कृष्णावताराचे माहात्म्य हे अनन्यसाधारण आहे. कारण भावना व कर्तव्य यांची ही सांगड फक्त ईश्वराच्या सगुण प्रेमभक्तिनेच सहज साधली जाते हे सत्य व गुह्यच कृष्णाच्या चरित्राने प्रकट झाले.

अशी ईश्वरी प्रेमाची सांगड कृष्णाच्या जीवनात तर होतीच, कारण तशी ती सांगड मुळात त्याच्या अंतःकरणात होती. परंतु यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याच्यावरच्या प्रेमाने त्याचीच भक्ती ज्यांच्याकडून घडली, त्या त्याच्या भक्तांच्या ठिकाणीही ही सुंदर सांगड साधली गेली. सगुण प्रेमभक्तिच्या आनंदाने त्यांचे अंतःकरण सदा सर्वकाळ भरलेले राहिले आणि त्याच आनंदाने त्यांचे जीवन त्यांच्याकडून जगणे घडले. म्हणूनच कृष्णचरित्राचे माहात्म्य हे या नारायणाच्या सर्व अवतारांपेक्षा आगळे वेगळेच राहिले, एवढेच नव्हे तर या सृष्टीच्या इतिहासातही चरित्राचे विशेषत्व कायम होऊन राहिले. तेव्हा हे लक्ष्मी, अशा ज्याच्या प्रेमामुळे व अशा ज्याच्यावरील प्रेमाने अनेक सामान्य जीवांच्या ठिकाणचा कर्तव्यकर्म व भावना यातील गुंता सुटला आणि त्यांचे प्राप्त जीवन ते सबलतेने व समाधानाने जगू शकले, त्या कृष्णाचे पुढील चरित्रच आपण अवलोकन करूया. त्या कृष्णचरित्रातील प्रेमाचे रसपान करून तृप्त होऊया आणि मनमुराद आनंद अनुभवूया, कारण हेच श्रेय व प्रिय आहे.''

*****

# नामकरण संस्कार

''हे श्रवणप्रिय लक्ष्मी, गर्गमुनींच्या बोलण्याचा योग्य तो परिणाम नंदाच्या मनावर झाला. त्याच्या मनातील कल्पनांचा पूर्ण निरास झाला आणि मनातील उठलेल्या भावनांचा कल्लोळही पूर्ण शांत झाला. त्याच्या मनातील उमेद पुन्हा जागी झाली आणि त्याचे मन पुन्हा उत्साहपूर्ण झाले. कृतज्ञता भावाने त्याने पुन्हा एकदा गर्गमुनींना साष्टांग प्रणिपात केला व आपले दोन्ही कर जोडून तो गर्गमुनींशी नम्रभावाने बोलू लागला.

''हे मुनिवर्य, मी आपल्या कृपेला जराही पात्र नसता आपण माझ्यावरती कृपा केलीत हीच आपली थोरवी आहे आणि हेच माझे भाग्य आहे. आपण मला जे अत्यंत प्रेमाने मार्गदर्शन केलेत, त्याने तर मला आपल्या अंतःकरणातील निरपेक्ष प्रेमाचे दर्शन घडलेच, पण त्याचबरोबर माझ्या मनाला त्याच्याच ठिकाणी अकारण निर्माण झालेल्या काल्पनिक गुंत्यातून सुटण्याचाही मार्ग दिसला. माझ्या दृष्टीने हेच महत्त्वाचे आहे. कारण तुमचे माहात्म्य कितीही जाणवले तरी जोपर्यंत माझे मन मोकळे होत नाही व मोकळे रहात नाही, तोपर्यंत तुमचे माहात्म्य तुमच्याठायीच रहाते आणि माझी व्यथा माझ्यापाशीच रहाते. पण आता मात्र माझे मन पूर्णपणे मोकळे झालेले आहे व माझ्या या पुत्राच्या प्रेमाने पूर्ण भरून राहिले आहे. त्याच प्रेमाने माझ्याकडून त्याच्या विषयीचे सर्व कर्तव्यकर्म अत्यंत आपलेपणाने घडेल. त्यामुळे ते कर्तव्यकर्म योग्य तर असेलच, पण माझ्यासाठी आनंदाचेही असेल.

हे मुनिवर्य, माझी आपणांस आणखीन एक प्रेमाची विनंती आहे. या नवजात बालकावरील नामकरणाचा विधिपूर्वक संस्कार आपणाकडून व्हावा अशी माझी अगदी मनापासूनची इच्छा आहे. आपल्यासारख्या थोर महात्म्यांच्या शुभ व पवित्र हस्ते या बालकावरील त्याच्या जीवनातील प्रथम व महत्त्वाचा संस्कार होणे हे अत्यंत उचित आहे असे मला अंतःकरणापासून वाटत आहे. तरी आपण तशी कृपा करावी अशी आपल्या चरणी प्रार्थना करतो.''

नंदाचे बोलणे ऐकून गर्गमुनींच्या मुखावर प्रसन्नतेचे हास्य झळकले. त्यांनी आपले नेत्र मिटून घेतले व ते स्वस्थ बसले. क्षणार्धात त्यांच्या नेत्रातून अश्रुधारा पाझरू लागल्या. ईश्वरी संकेत तर त्यांनी जाणलाच, पण त्याचबरोबर घडत असलेल्या ईश्वरी लीलेचा आनंदच त्यांनी अधिक अनुभवला. त्याच आनंदाने ते नारायणाच्या सगुण प्रेमाच्या भक्तिखेळात सहभागी होण्यासाठी अत्यंत उत्सुक व आतुर झाले. आपले नेत्र त्यांनी पुन्हा उघडले आणि नंदाकडे पाहून संमतीदर्शक मान डोलवली.

गर्गमुनींच्या सूचित प्रतिक्रियेने नंदाचा उत्साह अधिकच वाढला. तो लगबगीने यशोदेच्या महालात गेला. तेथे आपल्या तान्हुल्याला हृदयाशी धरून मातृवात्सल्याचा आनंद पूर्णपणे अनुभवीत असलेल्या यशोदेला नंदाने पाहिले आणि त्यालाही प्रेमाचे भरतेच आले. गर्गमुनींचे झालेले आगमन व त्यांच्याशी झालेले नवजात बालकाच्या नामकरण

संस्काराविषयीचे सर्व बोलणे नंदाने यशोदेला कळीत केले. ते ऐकून यशोदेलाही आनंद झाला आणि आपल्या व आपल्या पुत्राच्या भाग्याच्या जाणिवेने तिचेही मन भरून आले. आपल्या पुत्राला कुशीत धरून यशोदा लागलीच उठून उभी राहिली. नंदाने तिचा हात आपल्या हातात धरला आणि त्वरेने तो तिच्यासह गर्गमुनींच्या समोर येऊन उभा राहिला.

सर्वप्रथम नंदाने उच्चासनावर बसलेल्या गर्गमुनींची षोडषोपचारे पूजा केली आणि अत्यंत नम्रभावाने त्यांना प्रणिपात केला. त्यानंतर यशोदेने आपल्या पुत्राला नंदाकडे सुपुर्द केले आणि तिने स्वतःही गर्गमुनींची यथासांग पूजा करून त्यांना आदरपूर्वक वंदन केले. गर्गमुनींनी नंद व यशोदा या उभयतांना प्रेमपूर्वक शुभाशीर्वाद दिले असता त्या उभयतांच्या मुखावर धन्यतेचा भाव भरून राहिला. नंदाने पुढे येऊन आपल्या हातातील त्या बालकाला प्रथम गर्गमुनींच्या चरणांवरती थोडावेळ ठेवले आणि नंतर उचलून त्याला गर्गमुनींच्या हाती दिले. नारायणाच्या अवतारातील त्या निरागस व गोंडस बालरूपाला पाहून गर्गमुनींचेही मन मोहून गेले आणि त्यांचेही प्रेमस्वरूप अंतःकरण सगुणरूपाच्या प्रेमाने भरून आले. त्यांनी त्या बालरूप हरीला आपल्या हृदयाशी धरले. त्याचे मस्तक प्रेमाने कुरवाळून त्याचे अवघ्राण केले. त्या बालकानेही आपले इवलेसे नेत्र उघडून गर्गमुनींकडे प्रेमाने एकटक पाहिले आणि आपली नाजूक जिवणी उलगडून स्मितहास्य केले.

त्या बालरूपाच्या मोहक दर्शनाने गर्गमुनींच्याही सर्व वृत्ती मोहरून गेल्या आणि त्यांचे मन पूर्णपणाने त्याच्याकडे आकर्षिले गेले. ते बालक हा या नारायणाचा अवतार आहे ही जाणीव ठेवूनही, गर्गमुनींनी स्वतःला त्या सगुण रूपाच्या प्रेममायेपासून दूर न ठेवता त्या प्रेममायेत पूर्णपणे झोकून दिले. त्यांनी आपल्या ओठांनी त्या बालकाच्या गालावर व भाळावर वारंवार हळुवारपणे स्पर्श केला. अशा तऱ्हेने सगुण प्रेमाच्या रसपानाने गर्गमुनी तृप्त झाले. त्या बालरूपाने जणु गर्गमुनींच्या ठायीचा निर्गुण आनंदच आज सगुण झाला होता आणि निराकार प्रेम साकार झाले होते. त्या अत्यंत हर्षभरित अवस्थेत त्यांनी आपले ओठ त्या बालकाच्या उजव्या कानाजवळ आणले आणि अस्पष्ट आवाजात ते काहीतरी बोलू लागले. त्यांची कृती सर्वांना दिसत होती, पण त्यांचे शब्द मात्र कोणालाच ऐकू येत नव्हते. थोडावेळ असाच गेला असता गर्गमुनींनी आपली दृष्टी सर्वांवर फिरवली आणि मंद हास्य केले. सर्वांच्या नजरेतील कुतुहल व उत्सुकता त्यांनी जाणली आणि त्यांच्या मुखातून हळुवारपणे एकेक शब्द बाहेर पडू लागला.

‘‘हे नंदा, हे यशोदे, तुमच्या भाग्याला तर खरेच पारावार नाही. परंतु माझ्याही एवढ्या काळच्या तपश्चर्येचे व ज्ञानसाधनेचेच फळ जणु आज मला भाग्याने प्राप्त होत आहे. आपल्याच ठायी आत्मरूपाने असलेल्या ईश्वराचे ज्ञान अनेक साधनांद्वारे करून बुद्धीचा निश्चय होणे आणि तपश्चर्येने चित्तशुद्धी करून त्या ज्ञानाचे रूपांतर स्वतःच्या अंतरात जाणिवेच्या रूपाने धारण करणे हे तर महा कर्मकठीण आहेच. परंतु याच जाणिवेतून सगुण प्रेमाची भूक निर्माण होणे हे तर जवळ जवळ अशक्यप्रायच आहे. पण तेच शक्य होऊ शकले ते केवळ त्या परमात्म्याच्या सगुण रूपामुळेच होय, हे मात्र त्रिवार सत्य आहे. त्याच अबाधित सत्याचा अनुभव घेण्याची संधी मला लाभली हे तर माझे परमभाग्यच आहे. आजकालच्या काळात जेथे सामान्यांना अशी तपश्चर्या व अशी ज्ञानसाधना करणे हे बाह्यांगाने आणि त्यांच्या दुर्बल मनोवृत्तीमुळे शक्य नाही, तेथे

परमात्म्याचे असे सगुण रूपच त्यांच्या सहाय्याला येऊ शकेल.  असेच सगुण प्रेम निर्माण करण्याचे अद्भूत कार्य तुमच्या या पुत्राच्या रूपाने त्याच्या पुढील सर्व जीवनात घडणार आहे.

हीी माझी केवळ भविष्यवाणी नसून ही माझ्या अंतःकरणातून सहज स्फुरणारी उक्ती आहे.  पुढे अनेकांचे भवितव्य व जीवन घडवण्यास कारणीभूतच नव्हे, तर प्रत्यक्ष सहाय्यभूत होणाऱ्या या बालकाचे भविष्य वर्तवण्याचे मला तर कारणच नाही आणि ते मला शक्य होणार नाही.  परंतु एवढे मात्र निश्चितपणे जाणवत आहे की आपल्या रूपाने, गुणाने व प्रेमाने हा सर्वसामान्यांचीही मनोवृत्ती स्वतःकडे पूर्णपणे आकर्षित करून घेईल आणि त्यांच्या ठिकाणी खऱ्या प्रेमाची भूक निर्माण करील.  एवढेच नव्हे, तर आपल्या खऱ्या प्रेमाने सर्वांच्या ठायीच्या प्रेमभूकेचे शमन करून त्यांना तृप्त व समाधानी करील. संसारतापाने तप्त झालेल्या जीवांवर आपल्या प्रेमाचा वर्षाव करून त्यांची मने निववील व शांत करील आणि त्यांना जीवन जगण्याचा उत्साह व जीवन जगण्याचे कारण देऊन त्यांच्या बाह्यांगाच्या सामान्य जीवनालाही अर्थ प्राप्त करून देईल. आपल्या प्रेमाने त्या जीवांना सदैव तृप्त व आर्त ठेवून त्यांना संसारभावापासून मुक्त ठेवेल.  त्यामुळे संसारातील मोह, आसक्ति, भय इत्यादी बाधक गोष्टींचा त्या जीवांवर केव्हाही व काहीही परिणाम तर होणार नाहीच, परंतु सदैव त्याच्या प्रेमाने युक्त होऊन राहिल्यामुळे त्या ईश्वराची भक्ती त्यांच्याकडून त्यांच्या नकळतपणे व सहजतेने घडत राहील.  या भक्तिभावानेच जीवनात अत्यंत दुष्प्राप्य असलेले आनंदानुभवाचे फळ त्या जीवांना सहज प्राप्त होईल आणि त्यांच्या जीवनाचे सर्वार्थाने सार्थक होईल.

तेव्हा अनेक जीवांची मने व वृत्ती स्वतःकडे आकर्षून घेऊन त्यांना संसारापासून दूर करण्यासाठी व आनंदाच्या अनुभवाच्या मार्गाकडे वळवण्यासाठीच ज्याचे जीवनकार्य आहे, अशा या बालकाचे नामकरण मी ''**कृष्ण**'' या नामाभिधानाने करीत आहे.  यासारखे उचित नाव हेच आहे.  हेच नाव त्याच्या वृत्तीचे व त्याच्याकडून घडणाऱ्या कार्याचे प्रतिक आहे आणि त्याच्या प्रत्यक्ष जीवनानेच हे नाव सार्थ व यथार्थ ठरणार आहे.''

गर्गमुनींच्या मुखातून उत्स्फूर्तपणे प्रगटत असलेला त्यांचा वचनौघ अचानक आवरला गेला.  त्यांनी त्या बाळकृष्णाला पुन्हा एकदा आपल्या हृदयाशी धरून त्याचे मुख कुरवाळले आणि त्याला यशोदेच्या स्वाधीन केले.  आपल्या आसनावरून उठून त्यांनी आपले दोन्ही कर उंचावून नंद, यशोदा व सर्वांनाच आशीर्वाद दिले.  आपले नेत्र मिटून घेऊन त्यांनी क्षणभर आपले दोन्ही कर जुळवले आणि कोणालाही काही समजण्याच्या आधीच त्वरेने त्या महालातून, त्या राजवाड्यातून, त्या परिसरातून बाहेर पडून गर्गमुनी पुन्हा दिसेनासे झाले.

घडलेल्या प्रसंगाने अतिशय आनंदित झालेले नंद व यशोदा बराच काळ तसेच स्तब्ध होऊन राहिले.  प्रसंगातील बाह्यांगाचा अनुभव जरी संपला होता तरी त्यातील भावपूर्णता अजूनही त्यांच्या मनाठायी उरली होती.  त्या अवस्थेतून त्यांचे मन बाहेर येण्यासाठी तयारच होत नव्हते आणि म्हणूनच तसा मुद्दाम प्रयत्नही त्या उभयतांनी केला नाही.  परंतु काही वेळाने त्या भावपूर्णतेच्या ठायीचाच कर्तव्याचा भावही त्यांच्या मनात जागा झाला आणि ते अगदी सहजपणाने देहभानावर आले.

उभयतांनी परस्परांकडे प्रेमाने पाहून स्मितहास्य केले. परस्परांवरील आधीच असलेल्या गाढ प्रेमामध्ये आता या पुत्रप्रेमाची भर पडली होती. त्यामुळे साहजिकच त्यांचे परस्परांवरील प्रेम अधिक उत्कट होऊन राहिले होते. त्यांच्या पुत्राच्या पुढील जीवनाविषयी जे काही गर्गमुनींनी सांगितले होते त्याचाच विचार त्या उभयतांच्या मनात प्रामुख्याने घर करून राहिला होता. गर्गमुनींच्या सांगण्याचा पूर्ण अर्थबोध जरी त्यांना झाला नव्हता, तरी एक मात्र त्यांच्या चांगलेच लक्षात आले होते, की त्यांचा पुत्र हा कोणी सामान्य जीव नव्हता. तर अनेक सामान्य जीवांच्या कल्याणाचे कार्य त्याच्या पुढील जीवनात त्याच्याकडून घडणार आहे, एवढेच नव्हे तर, सामान्य जीवांच्या कल्याणाचे कार्य हेच त्याचे पुढील सर्व जीवन असणार आहे. पण अशा या आपल्या पुत्राचे जीवन आपण कसे घडवायचे, त्यासाठी आपण काय करायचे, त्यासंबंधीचे आपले कर्तव्यकर्म आपण कसे पार पाडायचे, इत्यादी अनेक प्रश्न त्यांच्याही मनात सहजपणे येत होतेच. परंतु त्या प्रश्नांचे कोणतेही दडपण मनावर येऊ न देता स्वस्थ मनाने व निश्चिंतपणे नंद व यशोदा तान्हुल्या कृष्णाला घेऊन आपल्या अंतःपुरात गेले.

गर्गमुनींनी तर नामकरण केले होतेच, परंतु राजवाड्यातील व सर्व गोकुळवासीयांसाठी त्यांच्या पुत्राच्या नामकरणाचा सोहळा करणे अत्यंत आवश्यक होते. सर्वांनाच आनंदात सहभाग देऊन तो आनंद त्यांना अधिक वाढवायचा होता आणि सर्वांसमवेत लुटायचा होता. त्यामुळे साहजिकच तेच एक व्यवधान उभयतांच्या ठिकाणी प्रकर्षाने लागून राहिलेले होते. त्यासाठी त्यांनी पुत्रजन्मानंतरचा बारावा दिवस हा शुभकारक म्हणून निश्चित केला. त्याच दिवशी बाळाला समारंभपूर्वक पाळण्यात ठेवण्याचे व त्याचे गर्गमुनींनी केलेले नामकरण प्रकट करण्याचेही निश्चित ठरले. हे शुभ वर्तमान सर्व गोकुळवासीयांना जातीने कळविण्यात आले. सर्वांनाच त्या समारंभाचे प्रेमपूर्वक व आग्रहाने आमंत्रण देण्यात आले. नंद व यशोदा यांचे सर्वच गोकुळवासीयांशी एवढे स्नेहसंबंध होते की खरे तर कोणालाही वेगळ्या आमंत्रणाची जरुरी नव्हतीच. परंतु नंदाने आपलेपणापोटी सर्वांनाच स्वतः जातीने वैयक्तिक आमंत्रण पोहोचवले. या आपलेपणाचा अर्थातच सर्वांना अतिशय आनंद झाला. त्याच आनंदाचा भर व जोर सर्व गोकुळातच दिसू लागला. सर्वांनी आपापली राहती घरे स्वच्छ करून त्यास नवीन रंगरंगोटी केली. सर्वांनी आपापल्या घरांपुढे रंगीत रांगोळ्या काढल्या. एवढेच नव्हे, तर आपल्या घरासमोरील रस्तेही गोमयाने संमार्जित केले आणि त्यांनाही रंगबिरंगी रांगोळ्यांनी सुशोभित केले. दरवाजासमोर मंगलदायी अशा गुढ्या उभारण्यात आल्या व तोरणे लावण्यात आली. गोकुळातील सर्व रस्ते, उपरस्तेही फुलांच्या माळांनी सजविण्यात आले.

प्रत्यक्ष नामकरणाच्या समारंभाच्यावेळी तर सर्व स्त्री-पुरुष, आबालवृद्ध नागरिक सुंदर वस्त्रे परिधान करून व अलंकारांचा साज लेवून नंदाच्या राजवाड्याकडे समूहा-समूहाने निघाले. त्यांच्या हातात अनेक सुवासिक फुलांनी भरलेल्या परड्या आणि मंगलाक्षतांनी भरलेली सुबक नक्षीकाम केलेली तबके होती. मार्गाने जात असताना त्यांच्याकडून आनंदाने व उत्साहाने मंगलाक्षतांची उधळण व फुलांची पखरण सहजपणे होत होती. जणु गोकुळातील सर्व रस्तेही नूतन बालकाचे अभिनंदन करण्यासाठी सजून सज्ज झाले होते. सर्वांचाच उत्साह त्यांच्या ठिकाणी मावत नसल्यामुळे ओसंडून नुसता वहात होता. अशा या सर्वांच्या उत्साहाच्या व आनंदाच्या सरिता नंदाच्या राजवाड्यातील प्रांगणात येऊन मिळाल्यावर तर तेथे

जणु आनंदाचा सागरच उचंबळलेला भासू लागला.  सर्व नागरिकांचे हे प्रेम व आपलेपणा पाहून नंदाला तर भरूनच आले. त्याने आपले दोन्ही हात जोडून उंचावले आणि सर्वांचा भाव त्याला पावल्याची पावतीच त्याने सर्वांना दिली.

विविध रंगाच्या पानाफुलांनी सजवलेला तो परिसर अनेक सुगंधांनी दरवळून राहिला होता.  मंगल वाद्यांच्या स्वरांनी सर्व आसमंतच भारून गेला होता.  सर्वत्र लावून ठेवलेल्या मंगलदीपांच्या मंगल प्रकाशात अवघा परिसरच उजळून राहिलेला होता.  राजवाड्यातील सेवकांनी अनेकरंगी फुलांनी सजवलेला चांदीचा पाळणा सर्वांनाच दिसेल अशा तऱ्हेने सज्जात आणून ठेवला.  सर्वांचीच उत्सुकता शिगेला पोहोचून राहिलेली असतानाच, आपल्या सुकुमार व नाजूक अशा बाळाला घेऊन यशोदेचे तेथे आगमन झाले.  आपल्या हृदयाशी धरलेल्या बालकाला तिने नम्रतेने नंदाच्या स्वाधीन केले आणि नंदाला कमरेत वाकून व दोन्ही हात जोडून नम्रतापूर्वक नमस्कार केला.  तिने सर्व नागरिकांनाही दोन्ही हाताने अभिवादन केले आणि सर्वजण आपलेपणाने आल्याचा आनंद व्यक्त केला.  नंदानेही आपल्या बाळाला वात्सल्यभावाने आपल्या उराशी धरले. थोडावेळच आपले नेत्र त्याने मिटून घेतले आणि प्रेमाश्रूंनी भरलेल्या नेत्रांनी व भरल्या भावाने तो एकेक शब्द हळुवारपणे पण स्पष्टपणे उच्चारित बोलू लागला.

''हे माझ्या अत्यंत प्रिय गोकुळवासीयांनो, आपण सर्वजण आज माझ्या व यशोदेच्यावरील अत्यंत प्रेमाने व आपलेपणाने येथे आलात म्हणून मला झालेला आनंद सर्वप्रथम मी आपणा सर्वांना प्रेमपूर्वक अभिवादन करून व्यक्त करतो. आपले आभार मानण्याच्या औपचारिकतेत मी मुळीच अडकू इच्छित नाही.  तसे मला जमणारही नाही.  कारण तशा औपचारिकतेची आपल्या प्रेमाच्या नात्यात मुळीच आवश्यकताही नाही.  केवळ 'मी तुमचा राजा व तुम्ही माझी प्रजा' एवढेच आपले नाते नसून, आपले संबंध हे व्यक्तिगत पातळीवरही आहेत.  म्हणूनच आपल्या संबंधात आपुलकी आहे. एवढेच नव्हे, तर परस्परांच्या सुखदुःखाच्या प्रसंगात भावनेने सहभागी होण्याचा एक प्रकारचा प्रेमाचा हक्कही आपल्या उभयतांच्या संबंधात सहजपणे सामावलेला आहे.  त्याच प्रेमाच्या हक्काने तुम्ही सर्वजण आज आमच्या पुत्रप्राप्तीच्या आनंदात सहभागी होण्यासाठी आलात याबद्दल पुन्हा एकदा कृतज्ञता मात्र जरूर व्यक्त करतो.

सर्वच जण माझे व यशोदेचे अभिनंदन करीत आहेत.  ते जरी बरोबर असले तरी यथार्थ मात्र नाही.  खऱ्या अर्थाने आमचा हा पुत्रच अभिनंदनास योग्य आहे.  कारण त्याचा मध्यरात्री जन्म झाल्यानंतर लगेचच म्हणजेच दुसऱ्याच दिवशी सकाळी महान तपस्वी व अत्यंत थोर अशा गर्गमुनींचे अचानक आमच्या गृही आगमन झाले.  आमच्या पुत्राच्या जन्माची जणु त्यांना पूर्वसूचनाच जाणवली असावी असे मला तरी वाटते.  नव्हे, माझी तर तशी खात्रीच आहे.  त्यांच्या येण्याने आम्हाला साहजिकच अत्यानंद झाला व अगदी कृतकृत्य वाटले.  परंतु जेव्हा त्यांनी आमच्या नवजात पुत्राला आशीर्वाद देऊन त्याला आपल्या हृदयाशी अत्यंत प्रेमाने धरले आणि एवढेच नव्हे, तर त्याचे सुंदर व सुयोग्य असे नामकरणही केले, तेव्हा तर आम्हाला केवढी तरी धन्यताच जाणवली.  गर्गमुनींसारख्या महात्म्यांच्या कृपेला आम्ही व आमचा पुत्र प्राप्त झालो

हे आमच्या सर्वांचे महद्भाग्यच होय. हे भाग्य तुम्हा सर्वांचेही आहे. म्हणूनच आमच्यावरील झालेल्या या कृपेचा आनंद मी तुमच्यापर्यंत पोहोचवीत आहे.

आमच्या पुत्राचे नामकरण करताना त्याच्याविषयी जे कौतुकाचे व गौरवाचे उद्गार गर्गमुनींकडून उत्स्फूर्तपणे निघाले तेच मी आपणा सर्वांना सांगत आहे. ''हा मुलगा आपल्या सुंदर रूपाने व गुणाने सर्वांनाच मोहवून टाकील. आपल्या प्रेमपूर्ण वागण्याने व बोलण्याने सामान्यांचीही मने आपल्या स्वतःकडे आकर्षून घेईल. आपल्या अद्भूत पराक्रमाने सर्वांचा रक्षणकर्ता व आधारस्तंभ होऊन राहील. आपल्या ज्ञानाने बुद्धीमंताना तर तो चकित करीलच, परंतु मतिमंद अशा सामान्यांनाही त्यांच्या कल्याणाचा मार्ग सुलभ करून ठेवील. एवढेच नव्हे, तर आपल्या स्वानंदी जीवनाने अनेकांच्या हृदयात प्रेमभक्तिचे राज्य स्थापन करून त्यांचे जीवनही आनंदाचे करून ठेवील. म्हणूनच अश या विशेष चरित्राने प्रगट होणाऱ्या बालकाचे **'कृष्ण'** असे नामकरण करण्याचा मला होणारा आनंद हा विशेष आहे.''

नंदाच्या भावपूर्ण शब्दांतून प्रगटणारा गर्गमुनींचा भाव सर्वांच्याच कानाद्वारे मनापर्यंत पोहोचत होता आणि सर्वांच्याच मनाची अवस्था अगदी सहजपणे भावपूर्ण होत होती. नंदाच्या मुखातून त्याच्या पुत्राचे अत्यंत आकर्षक नाव 'कृष्ण' असे प्रगट झाले मात्र, सर्वांचाच भाव कळसाला पोहोचला आणि त्याचे उत्स्फूर्त प्रगटीकरण करतालीच्या प्रचंड नादाने आणि 'कृष्ण, कृष्ण' अशा सततच्या घोषाने झाले. आधीपासूनच वाजत असलेल्या मंगलदायी सनईच्या सुरांनी वरचा स्वर लावला, तर आनंददायी चौघड्याने आपल्या लयीचा वेग वाढवला. त्या नादाचे निनाद सर्व परिसरात दुमदुमून राहिले आणि आनंदाची अभिव्यक्ति गगनाला जाऊन भिडली.

नंदाने आपल्या हृदयाशी धरलेल्या बाल कृष्णाला आपल्या हातांनी फुलांनी सुशोभित केलेल्या चांदीच्या पाळण्यात ठेवले आणि त्या पाळण्याची रेशमाची दोरी यशोदेच्या हातात दिली. जणु कृष्णाचे पालन पोषण करण्याची जबाबदारीच नंदाने यशोदेच्या हाती सोपवली आणि तो यशोदेकडे पाहून अत्यंत प्रेमाने मोकळेपणे हसला. यशोदेनेही त्याच प्रेमाने नंदाला हास्यपूर्वक प्रतिसाद दिला आणि हळुवारपणे हातातील दोरी हलवून ती त्या पाळण्याला अलगदपणे झोके देऊ लागली. तेथे उपस्थित असलेल्या पुरोहितांनी नंद व यशोदा या उभयतांकडून समयोचित अशी देवतांची पूजा व आवश्यक ती धर्मकृत्ये करवून घेतली आणि वेदमंत्रांच्या उच्चाराने नंद, यशोदा व बाळकृष्णाला उत्तमोत्तम आशीर्वाद दिले. अनेक सुवासिनींनी यशोदेची ओटी भरून तिचे अभिष्टचिंतन केले. अनेक स्त्रिया यशोदेच्या व बाळकृष्णाच्या कौतुकपर रचलेली गीते वैयक्तिकपणे व सामूहिकरीत्या गाऊ लागल्या. जमलेल्या सर्व उपस्थितांनी आपल्या हातातील मंगलाक्षता व कोमल फुलांची उधळण करून सर्व वातावरणच अत्यंत मंगलमय, सुवासिक व प्रसन्न करून ठेवले. विविध अंगाने व रंगाने आपला आनंदाचा भाव व्यक्त करणाऱ्या या सर्वांमध्ये एक गोष्ट मात्र सामाईक होती आणि ती म्हणजे सर्वांच्याच नेत्रातून भरून वाहणारे प्रेमाचे व आनंदाचे अश्रू!''

सर्व गोकुळवासीयांच्या भावपूर्ण अवस्थेचे वर्णन करीत असताना नारदाचीही तशीच भावपूर्ण अवस्था झालेली होती. किंबहुना, नारदाच्या अंतःकरणाची भावपूर्ण अवस्था झालेली असल्यामुळेच त्याच्याकडून गोकुळवासीयांच्या भावपूर्ण अवस्थेचे शब्दांकन सहजपणे होत होते. अंतःकरणाच्या प्रेमस्वरूप अवस्थेमुळे नित्य आनंदाचा अनुभव घेत असलेल्या अंतःकरणातच काहीतरी प्रसंगाचे निमित्त होऊन भावपूर्णता अगदी सहजपणे निर्माण होते आणि त्याची पूर्तताही कोणत्या तरी माध्यमाद्वारे अगदी तेवढ्याच सहजतेने होत असते. हेच त्या आनंददायी प्रेमस्वरूप अवस्थेचे रहस्य आहे आणि हेच त्या अवस्थेचे विशेषत्व आहे.

नारदाची ही अशी अवस्था लक्ष्मी केवळ पहात व ऐकतच नव्हती, तर नारदाच्या त्या भावपूर्ण अवस्थेचा स्पर्श लक्ष्मीच्या मनालाही होत होता आणि तिचेही मन सहजच भावपूर्ण होत होते. नारद व लक्ष्मी दोघेही एकमेकांकडे अश्रूपूर्ण नेत्रांनी बराच वेळ पहात स्वस्थच बसून राहिले. परंतु शेवटी न राहवून त्या नीरव शांततेचा भंग लक्ष्मीच्या भावपूर्ण शब्दांनी होऊ लागला.

''हे नारदा, खरोखरीच भावपूर्णता ही काही एक वेगळीच चीज आहे. त्या अवस्थेचे वेगळेपण काही न्यारेच आहे. कुठल्याही शब्दांनी त्या भावपूर्णतेचे यथार्थ वर्णन होऊच शकत नाही. तरीही त्या भावपूर्ण अवस्थेत शब्दांचे सहाय्य हे घ्यावेच लागते. परंतु येथे शब्द हे भाव प्रगट करण्याचे साधन न होता ते भावाचे माध्यम म्हणूनच येतात. म्हणूनच शब्दांद्वारे काही प्रमाणातच भाव व्यक्त होऊनही शब्दातीत अनुभव हा वेगळाच रहातो. तोच मनाला जाणवणे हेच अत्यंत महत्त्वाचे आहे, नाही का? कारण तसा तो अनुभव मनाला आधी जाणवला आणि भावला तरच तो अनुभव घेण्यासाठी मन तयार होईल. होय ना, नारदा?''

लक्ष्मीच्या बोलण्यावर स्मितहास्य करून नारद लगेच उद्गारला, ''हे लक्ष्मी, त्यामुळे मन तयार होईल हे तुझे म्हणणे बरोबर आहे. परंतु प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी मनाची तयारी व्हायला मात्र बराच काळ जावा लागतो. कारण ही तयारी सर्व बाजूंनी होणे आवश्यक असते आणि त्यालाच वेळ लागतो. अनुभवाची अनेक अंगे असतात. सर्वांगाने मिळूनच एक अनुभव होत असतो. मनाला मात्र सुरुवातीला अनुभवाचे एखादेच अंग कळते व भावते आणि तेवढाच एकांगाचा अनुभव घ्यायला ते मन लगेच तयार होते. परंतु अनुभवाची अनेक अंगे जेव्हा मनाला दिसू लागतात व जाणवू लागतात तेव्हाच मन डगमगते. त्याचा निश्चयही हळुहळू डळमळू लागतो आणि अनुभव घेण्यासाठी मनाने केलेली तयारीही कमीच पडू लागते. अशा वेळी पुन्हा सावरण्यासाठी व अनुभव घेण्यास सज्ज होण्यासाठी मनाच्याठायी एकतर अलोट श्रद्धा हवी किंवा अपार प्रेमच हवे. अलोट श्रद्धा ही त्या मनाला त्याच्या मार्गापासून कशानेही व कोणालाही दूर लोटू देत नाही, तर अपार प्रेम त्या मनाला सर्व प्रसंगातून व मनाच्या सर्व अवस्थेतून पार करून नेते. त्यामुळे मन अनुभव घेण्याच्या मार्गाला दृढ धरून ठेवते व त्या मार्गाने पुढे पुढे अनुभवाप्रत जाण्याचा मनाचा निश्चयही अधिकाधिक ठाम होत रहातो.

हे लक्ष्मी, आता श्रद्धा व प्रेम या दोन्ही गोष्टी जरी एकमेकांना पूरक असल्या तरी त्यामध्ये एक मुलभूत फरक आहे. श्रद्धा ही स्वतः न पाहिलेल्या व स्वतः न अनुभवलेल्या, परंतु दुसऱ्याने प्रत्यक्ष अनुभवलेल्या गोष्टींवर ठेवावी लागते. त्यामुळे बऱ्याच वेळा अश्रद्धा निर्माण होण्याची शक्यता अधिक असते. तर काहीवेळा त्या श्रद्धेचे रूपांतर केवळ अंधश्रद्धेत होऊन रहाते. एक गोष्ट नीटपणे लक्षात ठेव, की अश्रद्धा व अंधश्रद्धा हे दोन्ही मनाचे दोषच आहेत. कारण अश्रद्धेने मनात संशय व विकल्प निर्माण होऊन ते मनाला ग्रासून टाकतात, तर अंधश्रद्धा ही मनाला दुर्बल व निष्क्रिय करून प्रत्यक्ष स्वतः अनुभव घेण्यापासून परावृत्त करते. मनाच्या या दोन्ही अवस्थेत मनाकडून काही प्रयत्नही घडू शकत नाही, मग पराक्रम घडणे तर दूरच राहिले. खरे तर, मनाच्या या अवस्थेतून बाहेर येण्यासाठी त्याच्याकडून प्रत्यक्ष पराक्रम घडणे हेच आवश्यक असते आणि नेमके तेच मनाला शक्य होत नसते. परंतु ही अशक्य व असंभव वाटणारी गोष्ट केवळ प्रेमानेच शक्य व संभव होत असते हे अगदी खरे आहे. कारण प्रेमाचा तो गुणधर्मच आहे. खऱ्या प्रेमाचे ते लक्षणच आहे.

हे लक्ष्मी, मनाच्या ठिकाणी प्रेम हे मात्र त्याने स्वतः पाहिलेल्या, स्वतः ऐकलेल्या, त्याला स्वतःला जाणवलेल्या आणि त्याने स्वतः अनुभवलेल्या गोष्टींविषयीच निर्माण होत असते. अर्थात हे प्रेम साहजिकच भावनात्मक व म्हणून काहीसे काल्पनिकच असते. त्यामध्ये 'स्वतः' या 'मीपण'वाचक संज्ञेला प्राधान्य व मुख्यत्व असते. त्यामुळे मनाच्याठायी एक प्रकारचा भावनेचा हट्टच असतो. त्यामध्ये दुसऱ्याच्या भावनेचा व अनुभवाचा एकतर विचार होत नाही किंवा त्याला महत्त्व दिले जात नाही. हा मनाचा हट्टीपणाच काही वेळा त्याला स्वतःलाच आणि बऱ्याच वेळा त्याच्या प्रेमाच्या गोष्टीला व व्यक्तिलाही त्रासदायक ठरत असतो. ते लक्षात आल्यावर मनाला वाईट जरूर वाटते. पण पुन्हा मनाच्या भावनात्मक अवस्थेचा जोर वाढून मन पुन्हा मूळ अवस्थेला येते.

तेव्हा भावनात्मकता हा जरी प्रेमातील दोष दिसला, तरी तो दोष नसून खरे तर ती प्रेमातील कमतरता असते आणि म्हणूनच ती कमतरता भरून येण्याची शक्यता अधिक असते. केवळ व्यक्तिगत प्रेमानेच हे शक्य होऊ शकते हे अगदी सत्य आहे. कारण व्यक्तिगत प्रेमामध्ये जवळीकता व मोकळेपणा हे दोन अत्यंत मोठे व महत्त्वाचे गुणधर्म आहेत. या जवळीकतेमधूनच प्रेमाच्या व्यक्तीची अनेक अंगे जाणवू लागतात आणि या मोकळीकतेमुळेच प्रेमाच्या व्यक्तीशी मनमोकळेपणाने बोलून स्वतःचे मन नेहमी मोकळे सोकळे राखता येते. एवढेच नव्हे, तर त्यातून प्रेमाच्या व्यक्तीविषयीचे प्रेम अधिकाधिक वाढत रहाते आणि त्या प्रेमातून येणारे मनोबळ मनाला निःशंक व निःसंशय करीत रहाते. शंका, संशय याने पूर्ण रहित व प्रेमभरीत असलेली मनाची अवस्था हीच मनाची शुद्ध अवस्था होय. या मनाच्या शुद्ध व प्रेममय अवस्थेतूनच मनामध्ये शुद्ध म्हणजेच प्रेमाचेच विचार नेहमी येत रहातात. प्रेमाचीच शुद्ध दृष्टी मनाला प्राप्त होते. त्यामुळे मन सदैव स्थिर, शांत व समाधानी अवस्थेत रहाते. ही मनाची अवस्था म्हणजेच त्या मनाची प्रत्यक्ष स्वतः अनुभव घेण्याची झालेली तयारी होय. परंतु त्यासाठी त्या मनाला अशी त्याच्या आत्यंतिक प्रेमाची आणि त्याच्यावर खऱ्या अर्थाने अत्यंत प्रेम करणारी व्यक्ती मात्र भेटली पाहिजे.''

नारदाच्या मुखातून खऱ्या प्रेमाचे माहात्म्य श्रवण करता करता लक्ष्मीला त्याचा भावार्थही जाणवत होता. त्यामुळे नारदाचे सांगणे पूर्णपणे सांगून होण्याच्या आतच लक्ष्मीच्या मुखातून पटकन सहजोद्‌गार निघाले,

''अरे नारदा, अशा प्रेमाच्या व्यक्तिची तर सर्वसामान्यांना सर्ववेळीच जरुरी आहे. परंतु असे निःस्वार्थी व विशुद्ध प्रेम देणारी व भावनात्मक म्हणून दुर्बल असलेल्या प्रेमाचाही स्वीकार करणारी व्यक्ती मात्र केवळ असामान्यच असणार. कारण ईश्वरस्वरूपाच्या अनुभवात नित्य असणाऱ्या व म्हणून सदैव अंतःकरणाठायी प्रेमस्वरूप असणाऱ्या व्यक्तिच्या बाबतीतच केवळ हे शक्य आहे. अशा प्रेमस्वरूप अवस्थेतील महात्म्यांची भेट ही सामान्यांना फक्त भाग्यामुळेच घडू शकेल. गोकुळवासी जनांचेही असेच महद्‌भाग्य कृष्णाच्या रूपाने उदयाला आले आणि त्यांना कृष्णाच्या प्रेमस्वरूप अवस्थेचा लाभ झाला. होय ना, नारदा? कृष्णचरित्रातील हे प्रेममूळ आता माझ्या अगदी पक्के लक्षात आले आहे. तेच मी माझ्या मनात अत्यंत दृढपणे धरून ठेवीन. त्यामुळे कृष्णचरित्राचा खरा आनंद मला पूर्णपणे अनुभवता येईल याची मला अगदी खात्री आहे. तेव्हा हे प्रेमीभक्त नारदा, कृष्णगुणकथांचे गायन तू आता सलगतेने करीत रहा बघू!''

लक्ष्मीच्या बोलण्याने आनंदित झालेल्या नारदाठायीचे आधीच दाटलेले सगुण प्रेम भरभरून वाहू लागले आणि शब्दांद्वारे मोकळे होऊ लागले.

''हे लक्ष्मी, तू खरोखरीच अभिनंदनास पात्र आहेस. कारण नारायणाच्या सगुण चरित्राचे हे प्रेममूळ ज्याच्या अंतरात खोलवर पक्केपणाने असेल त्याच्याकडूनच त्या सगुण चरित्राची श्रवणभक्ती घडणार आणि त्यालाच प्रेमरसाने परिवक्व असे आनंददायी फळ सेवन करावयास मिळणार. त्या फळ सेवनानेच तो भाग्यवान सदा सर्वदा तृप्त राहूनही, त्याची प्रेमरस सेवनाची तहान मात्र वाढतच रहाणार. माझ्याकडून घडणाऱ्या या सगुण चरित्राच्या गायनाचेही मूळ या प्रेमातच आहे. प्रेमसूत्रानेच हे सगुणचरित्ररूपी वस्त्र माझ्याकडून विणले जात आहे. जरतारी नक्षीकामाने भरजरी झालेले हे वस्त्र म्हणूनच अत्यंत विलोभनीय व रमणीय असे होऊन रहाते. मनाला आकर्षित करणारे, बुद्धीठायी त्याच्या सत्यत्वाचा निश्चय करणारे आणि चित्ताठायी त्या चरित्राचा स्वानुभव घेण्याचा ध्यास लावणारे असे हे सुंदर व सुरेख महावस्त्र भक्तिभावाने या नारायणालाच जेव्हा अर्पण केले जाते तेव्हा तर या वस्त्राचीच शोभा अधिकच वाढून रहाते.

हे लक्ष्मी, सर्व विश्वालाच आपल्या ठिकाणी केवळ लीला म्हणून धारण करणारा हा नारायण गोकुळात बालरूप धारण करून कृष्णरूपाने अवतरला आणि त्याच्या बाललीला गोकुळात प्रकट होऊ लागल्या. त्याचे सुमधुर व सुरस वर्णन हेच एकीएक सुश्राव्य आहे. त्या चरित्राचे गायन व श्रवण दोन्ही एकदमच माझ्याकडून घडणार आणि माझा आनंद केवळ द्विगुणित नव्हे, तर शतगुणांनी सतत वाढत रहाणार. तुझ्याकडूनही श्रवणभक्ती घडेल आणि त्यातूनच तुलाही तुझ्या आनंदाचा अनुभव घेण्याचा भक्तिमार्ग दृष्टोत्पत्तीस येत राहील. त्या भक्तिभावाने पुढे पुढे, म्हणजेच तुझ्याच अंतःकरणात नित्य वास करून असणाऱ्या या नारायणाच्या जवळ जवळ जाण्याचे भावबळ तुझ्याठायी निश्चितपणे निर्माण झालेले आहे.

कारण त्यासाठी अत्यावश्यक असलेले या नारायणाचे तू अनुभवलेले सगुण प्रेम तुझ्या ठिकाणी पूर्णपणे जागे झालेले आहे. ही सगुण प्रेमाची जागृतीच तुला भक्तिमार्गाने जाण्याची स्फूर्ती व शक्ति देत राहील. असो.

हे लक्ष्मी, कृष्णजन्म व त्याचा नामकरण सोहळा यामुळे निर्माण झालेले जल्लोशाचे वातावरण बराच काळ झाला तरी जरी ओसरले नाही, तरी सामान्यांचे नित्याचे जीवन पुन्हा सुरळीतपणे व व्यवस्थितपणे चालू झाले. त्यामुळे त्यांचा उत्साह त्या सोहळ्यापुरताच मर्यादित राहिला व केवळ त्या स्मृतीतच ते रमून राहिले. परंतु काहीजणांच्या मनात मात्र त्या बाळकृष्णाविषयी एक प्रकारचे आकर्षण व प्रेमाची भावना निर्माण होऊन राहिली. त्यामुळे त्यांचे नंदाच्या राजवाड्यातील जाणे येणे वाढू लागले. काही ना काही तरी कारण काढून ते राजवाड्यात वारंवार जात असत आणि त्या निमित्ताने कृष्णाचे मोहक रूप पाहून नेत्रसुख घेत असत. त्याला आपल्या हाताने उचलून घेऊन हृदयाशी धरीत आणि कृष्णाच्या सर्वांगाच्या स्पर्शाचे सुख अनुभवीत. हे सुख अनुभवून त्यांना थोडावेळ समाधान जरूर मिळत असे, पण त्यांची तृप्ती मात्र होत नसे. त्यामुळे पुन्हा पुन्हा नंदाच्या राजवाड्यात येऊन कृष्णाला कमीत कमी पहाणे तरी त्यांना क्रमप्राप्तच होत असे.

इकडे राजवाड्यात प्रत्यक्ष रहाणारे मात्र अधिक भाग्यवान ठरले. कृष्णाच्या बाललीला प्रत्यक्ष पहाण्याची, एवढेच नव्हे, तर त्यात प्रत्यक्ष सहभागी होण्याची संधी राजवाड्यात सेवेसाठी असलेल्या सर्वच गोपगोपींना प्राप्त झाली होती. त्यांनीही त्या संधीचे सोनेच केले. आपली हातातली कामे लवकर लवकर उरकून किंवा वेळप्रसंगी बाजूलाही करून कृष्णासाठी काहीतरी करण्याचीच ओढ त्यांना जास्त असे. कृष्णाला उगाचच उचलून घेणे, त्याला प्रेमाने खेळवून हसवणे, त्याला स्नान घालणे, त्याला छान छान कपडे घालणे, त्याला दागिन्यांनी सजवणे, त्याला दूध पाजणे, त्याला भरवणे अशा एक ना दोन तर अनेक निमित्तांनी कृष्णाच्या जवळ जाण्याची व रहाण्याची त्या गोपगोपिकांच्याठायी एक प्रकारची अहमहमिकाच लागलेली दिसत असे. त्यातूनही स्त्रीसुलभ अशा नैसर्गिक भावनेमुळे गोपिकांच्याठायी ही भावना साहजिकपणे जास्तच होती. त्यांना तर कृष्णापासूनचा बाह्यांगाचाही दुरावा जराही सहन होत नसे. आणि यात त्यांचा तर काहीच दोष नव्हता. कृष्णाचे रूप व व्यक्तिमत्त्वच तसे सामान्यांच्या मनालाही भुरळ पाडणारे असेच होते.

परंतु हे लक्ष्मी, यातूनच एक गंमतही होऊ लागली. सर्वांच्या या अशा कृष्णावरील प्रेमामुळे खुद्द यशोदा मातेच्याच वाट्याला कृष्ण अगदी कमी येऊ लागला. तिच्या ठिकाणी नैसर्गिकरीत्या निर्माण झालेले कृष्णाविषयीचे प्रेम व वात्सल्यभाव याचा अनुभव घेण्याची संधी तिलाच कमी मिळू लागली. त्यामुळे एकीकडे तिची तळमळ होत असे, तर दुसरीकडे आपला कान्हा हा सर्वांच्या आवडीचा झाला आहे याचे तिला कौतुक वाटत असे. म्हणून मग ती काहीवेळा सर्वांना लटके रागावून त्यांच्या गराड्यात पडलेल्या कृष्णाला त्यातून सोडवून आपल्याजवळ घेऊन बराच वेळ हृदयाशी घट्ट धरून ठेवीत असे. कृष्णही आपल्या बालसुलभ भावाने तिच्याकडे मिश्किल नजरेने पाहून तिच्या स्तनाला आपल्या दोन्ही हातांनी धरून यथेच्छ दुग्धपान करीत असे. त्याच्या या अवखळ कृतीने यशोदेचे सर्वांगच मोहरून येत असे आणि तिचा पान्हा पूर्णपणे मोकळा होत असे. बराच वेळ झाला तरी कृष्णाची दुग्ध सेवन करण्याची तृप्ती ती कशी तर होतच नसे. परंतु त्या दुग्धपानाने

कृष्णाच्या हालचालींना अधिकच जोर येई.  तो आपल्या हातांनी यशोदेला अधिकच बळकटपणे धरून आपल्या पायांनी तिच्या अंगावर जास्तच भार देई.  कृष्णाच्या या दांडगाईमुळे झालेल्या कष्टांनी यशोदा अधिकच सुखावत असे.  कृतककोपाने ती कृष्णाला आपल्यापासून दूर करी खरे, परंतु कृष्णाच्या मुखावरील निरागस व खट्याळ भाव पाहून पुन्हा त्याला आपल्या कुशीत घट्ट धरी आणि त्याच्या कपाळावर व गालांवर आपले ओठ पुन्हा पुन्हा ठेवून कृष्णावर प्रेमाचा जणु वर्षावच करीत असे.

*****



# लडिवाळ कृष्णाच्या बाललीला

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने सर्वांच्या लाडाने व कौतुकाने आणि मुख्यतः यशोदेच्या प्रेमाने संगोपन होत असलेला कृष्ण दिवसेंदिवस वाढत होता. त्याच्या वाढीचा वेग हा निसर्गाच्या नियमापेक्षाही जास्तच होता हे एक दिवस अकल्पितपणे यशोदेच्या लक्षात आले. द्रुत गतीने वाढणारा कृष्ण खरे तर त्याच्या नेहमीच्या पाळण्यात मावेनासा झाला होता. परंतु यशोदेच्या हे लक्षातच आले नाही. कारण तिच्या मनात सामान्य बालकांच्या वाढीचेच गणित पक्केपणाने बसलेले होते. पण एकदा काहीतरी कामात गर्क असल्याचे निमित्त होऊन यशोदेकडून कृष्णाकडे दुर्लक्ष झाले. त्याच्या भुकेची वेळ टळून गेली तरी यशोदेकडून कृष्णाला दुग्धपान करणे घडले नाही. झाले, कृष्णाने एकच आकांत मांडला. साध्या रडण्याने यशोदेचे लक्ष वेधले जात नाही हे लक्षात आल्यावर कृष्णाने आपल्या रडण्याचाही वरचा सूर लावला. एवढेच नव्हे, तर आपल्या दोन्ही पायांनी पाळण्याला एवढा जोराचा रेटा दिला की तो सर्व पाळणाच कोलमडून पडला. झालेल्या मोठ्या आवाजाने यशोदा धावतच तेथे आली असता तिने पाहिले, की पाळणा तर पूर्णपणे मोडलेलाच होता. कृष्णाला कितपत दुखापत झाली हे पहाण्यासाठी तिने कृष्णाला वर उचलून घेतले, तो कृष्णाचे रडणे थांबले होते आणि तो यशोदेकडे पाहून स्मितच करीत होता. यशोदेला उद्देशून जणु तो म्हणत होता, 'हे माते, आता तरी तुझ्या ध्यानात आले का, की मी मोठा झालो आहे आणि या पाळण्यात मावणे शक्य नाही!' कृष्णाचे हे नजरेचे बोलणे फक्त यशोदेनेच जाणले आणि तिने तो मोडलेला पाळणा कायमचाच मोडीत काढून कृष्णाला मोठ्या व प्रशस्त शय्येवरती ठेवण्यास सुरुवात केली.

आता मोकळेपणा मिळाल्यामुळे कृष्णाच्या हालचाली अधिकच वाढल्या. उपडे वळणे व रांगणे हे तर त्याचे केव्हा सुरू झाले हे कोणालाच कळले नाही. घरभर फिरत असताना वाटेत आलेल्या कोणत्याही वस्तूच्या अडथळ्याला तर तो जुमानताना दिसतच नसे. त्या अडथळ्यांना वळसा घालून पुढे जाणे तर त्याला कधीच मान्य नसे. ते अडथळे आपल्या हातांनी किंवा पायांनी बाजूला करून किंवा वेळप्रसंगी त्यांची मोडतोड करूनच तो पुढे जात असे. त्यावेळचे त्याच्या मुखावरील विजयी हास्यभाव मात्र अगदी पहाण्यासारखे असत. एक पाय गुडघ्यात दुमडून रांगण्याच्या त्याच्या अनोख्या पद्धतीने तर तो सर्वांच्याच थोडासा चेष्टेचा व मौजेचा विषय होऊन राहिला होता. मनसोक्तपणे रांगत फिरत असताना क्वचित कोणी जर त्याला मध्येच उचलून घेतले तर तो रडून एवढा आकांत करीत असे, की त्याला त्वरित खाली ठेवणे सर्वांना भागच पडत असे. खाली ठेवल्यावर मात्र लगेचच मिश्किलपणे हसत तो पुन्हा मोकाट सुटलेल्या वाऱ्याप्रमाणे स्वतःच्याच नादात भरधाव रांगायला सुरुवात करी. रांगता रांगता तो कधी एखाद्या बसलेल्या व्यक्तीच्या सभोवार रांगत असे तर कधी स्वतःभोवतीच फिरत असे. अशा या खोड्यांमुळे कृष्ण सर्वांचा अधिकच लाडका होऊ लागला.

आणि एक दिवस कृष्णाचे रांगणे अचानकपणे संपले. कशाच्या तरी आधाराने उभा रहाता रहाता तो एकदम जो चालू लागला तो जणु धावूच लागला. आता मात्र कृष्णाला कशाचेही बाह्यांगाचे बंधन राहिले नाही आणि तो राजवाड्यातच

नव्हे, तर राजवाड्याच्या बाहेरही मुक्तपणे संचार करू लागला. दरवाजे, उंबरठे, पायऱ्या इत्यादींचा अडथळा असा त्याच्यासाठी उरलाच नाही. कारण त्यांचे त्याला भानच नसे. परंतु त्या सर्वांचे भान असलेल्या यशोदेची काळजी मात्र आता अधिकच वाढली. कृष्णाच्या अशा बिनधास्त वावरण्याची यशोदेला मात्र धास्ती वाटत असे आणि तिच्या काळजाचे ठोकेच चुकू लागत. कृष्णाची मस्ती जशी अधिकाधिक वाढू लागली तशी यशोदेची धास्तीही अधिकाधिक वाढू लागली. कृष्णाला आवर घालताना यशोदेचीच काय, तर सर्वांचीच दमछाक होत असे. परंतु कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभावच असा होता की एकतर त्याचा कोणाला राग येतच नसे आणि त्यातूनही आला तर तो राग फार काळ टिकूच शकत नसे.

कृष्णाच्या सुंदर, देखण्या व गोजिरवाण्या रूपाने सर्वांच्याच नेत्रांना अगदी सहजपणे सुख होत असे. आपल्या नेत्रांच्या कटाक्षाने जेव्हा कृष्ण सर्वांकडे पहात असे तेव्हा त्याच्या नजरेतील प्रेमाचे गोड व निरागस भाव पाहून सर्वांच्याच मनाला भूल पडत असे. कृष्णाच्या मुखावरील लोभस हास्य पाहून तर सर्वांचीच दृष्टी त्याच्या मुखावर खिळून रहात असे. आपल्या सुकोमल चरणांनी दुडुदुडु धावणाऱ्या कृष्णाला पाहून आणि त्याचे लडिवाळ बोलणे ऐकून सर्वांचेच चित्त कृष्णाकडे आकर्षून राही. अनेक प्रकारचे खेळ खेळून नित्य नवीन लीला करणाऱ्या कृष्णाकडून एवढा काही आनंद प्रगट होत असे, की सर्वांच्याच सर्व वृत्ती कृष्णाच्या सहवासात त्याच्याच ठायी रमत असत. अशा तऱ्हेने कृष्णाच्या रूपाने, गुणाने व व्यक्तिमत्त्वाने सर्वच जण कृष्णावर भाळले गेले आणि त्यातील अनेकांना तर कृष्णाचा जणु नादच लागला.''

नारदाच्या मुखातून वाहणाऱ्या सगुण प्रेमगंगेत सचैल स्नान करीत असलेली लक्ष्मी तर अगदी मंत्रमुग्धच झाली होती. देहभान हरपलेल्या अवस्थेतच ती किती वेळ तरी स्वस्थच बसून राहिली होती. प्रेमाच्या वर्षावात भिजून चिंब झालेल्या तिच्या मनाची अवस्थाही अशी काही होऊन राहिली होती, की कृष्णप्रेमाशिवाय दुसरा काही विचार करण्याची तिच्या मनाची शक्तीच जणु कुंठीत होऊन राहिली होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे नारायणाच्या सगुण प्रेमभक्तिच्या माहात्म्याचा निश्चय लक्ष्मीच्या बुद्धीच्या ठिकाणी निश्चितपणे झालेला असल्यामुळे तिच्या मनात कुठलेही प्रश्नच निर्माण होत नव्हते. परंतु नारदाच्या मुखाकडे पाहिल्यावर मात्र तिच्या लक्षात आले, की नारदाच्या मुखातून वेगाने वाहणारा शब्दप्रवाह जरी थांबल्यासारखा दिसत असला, तरी नारद मात्र त्याच्या अंतःकरणातील आनंदसागरात पूर्णपणे बुडालेला आहे. लक्ष्मीला श्रवण करताना एका गोष्टीची मात्र आता निश्चितपणे खात्री झालेली होती, की जेथे आनंदाचा सागर आहे तेथे त्यावर सगुण प्रेमाच्या लहरी या सूक्ष्मरूपाने का होईना, पण उठत असणारच! त्या प्रेमलहरींना नादरूप व शब्दरूप येण्यासाठी भक्तिभावाचा जरासाही स्पर्श पुरेसा आहे. परंतु तो अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा केवळ हाच एकमेव हेतू मनाशी बाळगून लक्ष्मीने बोलण्यास प्रारंभ केला. तिचे आत्ताचे बोलणे हे कोणाला उद्देशून असे नव्हते, तर ती जणु स्वतः स्वतःशीच बोलल्यासारखी बोलत होती.

''खरोखरीच ते गोकुळवासी जन अतिशय भाग्याचे होत. अत्यंत आकर्षक व मोहक असे कृष्णाचे बालरूप पहावयाचे भाग्य तर त्यांना लाभलेच, परंतु त्यांना त्या बाळकृष्णाच्या जवळपास रहाण्याचा व वावरण्याचा सुयोगही प्राप्त

झाला. त्याची काहीतरी व्यक्तिगत कामे करण्याच्या निमित्ताने त्या भाग्यवंतांना त्या कृष्णाचा अंगसंगही घडला असणारच ना? ते त्या गोकुळजनांचे सुदैवच नव्हे का? अशी त्यांची काय पुण्याई असेल बरे, की ज्यामुळे त्यांना अत्यंत दुर्लभ असा लाभ अगदी सहजपणे झाला?''

लक्ष्मी जरी हळु आवाजात बोलत असली तरी तिचे बोलणे अत्यंत स्पष्ट असल्यामुळे नारदाला सहज ऐकू येत होते. तेच प्रेमसूत्र निमित्तासाठी आधाराला हाताशी घेऊन नारदाचे अंतरी दाटलेला सगुण प्रेमभक्तिभाव पुन्हा शब्दरूप होऊन प्रगटू लागला.

''हे भाग्यवान लक्ष्मी, तुझे म्हणणे अगदी खरे आहे. अशा भाग्याला साऱ्या त्रिभुवनात तोड नाही हे सत्यच आहे. गोकुळात कृष्णरूपाने जी नवलाई प्रगट झाली त्यामागे केवढी तरी पुण्याई ही असणारच. परंतु ही पुण्याई निश्चित कोणाची व किती हे सांगताच येणार नाही. कारण त्याचे ना काही गणित, ना काही हिशोब. तेव्हा ती या नारायणाचीच लीला आहे असे म्हणणेच अधिक यथार्थ होईल. लीला म्हणजे सहजता, उत्स्फूर्तता आणि मुख्य म्हणजे सगुण प्रेम निर्माण करून ते नित्य वाढवून अधिकाधिक आनंद देणारी! असा हा प्रेममूळ असलेला आणि आनंददायी असणारा खेळ कृष्णरूपाने गोकुळात सुरू झाला. या खेळामुळेच कृष्णाचा केवळ सहवासच सामान्यजनांनाही मिळाला एवढेच नव्हे, तर कृष्णाचा प्रत्यक्ष अंगसंगही त्यांना लाभला.

हा खेळ रंगण्यासाठी मात्र कृष्णाचा खेळकर स्वभावच कारणीभूत झाला. कारण स्वस्थता अशी म्हणून काही त्याच्या मनाला ठाऊकच नसावी असेच सर्वांना जाणवत होते. विश्रांतीची अशी त्याच्या देहाला जरुरीच वाटत नसे. रात्रीची झोपही तो कधीही सलगतेने घेत नसे. दिवसभर दमून श्रांत झालेला कृष्ण रात्री जरी लवकरच निद्राधीन होत असे, तरी पुन्हा भूक लागण्याच्या निमित्ताने त्याचे रात्री दोन-तीन वेळा तरी उठणे होत असे. असे वेळी अवेळी उठल्यावरही यशोदेने दूध पाजीपर्यंत मात्र कृष्णाला जराही दम धरवत नसे. मोठमोठ्याने रडून तो सर्व राजवाडाच डोक्यावर घेई. त्याचे रडणे एवढे मोठे असे की राजवाड्यातील सर्वांनाच जाग येई व थोडाफार रागही येई. कारण असे गाढ झोपेतून मध्येच उठायला लागणे हे त्रासदायकच असते.

या सर्वांमुळे यशोदेला तर अधिकच त्रास होई. एकतर, कृष्णाला रात्री महत् प्रयासाने झोपवायला लागत असे. आपणहून तो कधीच झोपायला राजी नसे. मग यशोदा सर्व दिवे मालवून लवकर अंधार करी व त्याला आपल्या अंकावर घेऊन बळे बळे थोपटून व थोडेसे दामटूनच झोपायला भाग पाडीत असे. काहीवेळा कृष्ण यशोदेने गाणे म्हणावे असाच हट्ट धरून बसे. मग त्याच्या प्रेमाखातर यशोदा आपल्या सुरेल आवाजात हळुवारपणे एखादे अंगाई गीत म्हणत असे. पण तेवढ्याने कृष्णाचे समाधान होतच नसे. तो 'आणखीन एक, आणखीन एकच म्हण' असा हेका व ठेका चालूच ठेवी. यशोदाही कृष्णाचे ते लडिवाळ हट्ट कौतुकाने पुरवीत राही. बरे थोड्या वेळाने कृष्णाला चांगली झोप लागली आहे अशी खात्री वाटून यशोदेने त्याला आपल्या मांडीवरून खाली बिछान्यावर ठेवावे, तर स्वारी लगेच आपले नेत्र उघडून यशोदेकडे

मिश्किलतेने पहात राही व तिच्या पदराचे टोक घट्ट धरून ठेवी. कृष्णाला झोपवण्यासाठी एवढा वेळ केलेला खटाटोप एका क्षणात फुकट गेला हे पाहून यशोदा साहजिकच थोडीशी चिडतही असे. शेवटी यशोदेची जणु दया किंवा कीवच येऊन कृष्ण मग आपणहूनच निद्रेचा अंगीकार करीत असे.

कृष्णाला झोपवण्याच्या प्रयत्नात स्वतः दमलेली यशोदा त्यानंतर सर्व कामे आटपून, नंदाला स्वहस्ते जेवण वाढून, मग स्वतःचे जेवण उरकत नसे. एवढे करताना थकलेली व भागलेली यशोदा बिछान्यावर अंग टाकताच लगेचच निद्रेला वश होते ना होते, तो कृष्णाची भुकेची वेळ होऊन तो जागा होत असे व दूध पिण्यासाठी अगदी व्याकूळ होत असे. बरे, त्याला दूधही गार चालत नसे, तर ते गरमच हवे असे आणि दूध गरम करून आणेपर्यंत त्याला तर जराही धीर धरवत नसे. त्याची ती अधीरता प्रगट करण्याची एकच परी होती आणि ती म्हणजे मोठमोठ्याने रडणे. त्याच्या या अशा वागण्याचा यशोदेला निश्चितच त्रास होई, पण त्याहीपेक्षा राजवाड्यातील सर्वांचीच झोपमोड होऊन त्यांना उगाचच कष्ट होत आहेत या जाणिवेने यशोदेच्या मनाला अधिकच क्लेश होत असत. तिला अगदी ओशाळल्यासारखे होई. कोणीही जरी प्रत्यक्ष तक्रार करीत नसले तरी यशोदेला मात्र फारच वरमल्यासारखे वाटत असे.

या सर्वांहूनही खरी गंमत म्हणजे दुग्धसेवनाने ताजा तवाना झालेला कृष्ण पुन्हा निद्रा घेण्याच्या मनःस्थितीतच नसे. खेळण्याचा उत्साह त्याच्या ठिकाणी जागा होई. वेळेचे भान न ठेवता तो पुन्हा खेळण्याचा हट्ट करी आणि त्यासाठी त्याला जोडीदारही हवे असत. कोणी नाईलाजाने तर कोणी कौतुकानेही कृष्णाबरोबर त्या अशा अपरात्रीच्या वेळीही खेळण्यास तयार होत असे आणि कृष्णाचा खेळ रंगत असे. शेवटी खेळून खेळून स्वतः दमल्यावर आणि इतरांनाही दमवल्यावर कृष्ण खेळता खेळताच स्वतःहूनच स्वतःला निद्रेच्या स्वाधीन करीत असे. तो एवढ्या अचानकपणे व सहजतेने निद्राधीन होत असे, की निद्रा घेणे हा सुद्धा जणु त्याच्या खेळाचाच भाग आहे असेच वाटत असे. कृष्णाच्या व इतरांच्याही अशा किती रात्री कृष्णखेळाने व कृष्णप्रेमाने जागल्या व रंगल्या असतील याची तर गणतीही करता येणे अशक्यच आहे.

नंद मात्र अशा परिस्थितीत जराही चिडचिड न करता शांतपणे तर रहात असेच, परंतु काही वेळा त्याला या सर्वांची गंमतच वाटत असे. त्यामुळे तोही कृष्णाच्या या खेळात सहजपणे सहभागी होऊन यशोदेला समयोचित सहाय्यही करीत असे. कृष्णाला शांत करणे आणि यशोदेला शांत राखणे या दोन्ही गोष्टींची जबाबदारी नंद अगदी व्यवस्थितपणे पार पाडत असे. कृष्णाला कडेवर उचलून घेणे, त्याला खांद्यावर घेऊन फिरवीत फिरवीत त्याचे सांत्वन करणे किंवा कृष्णाशी थोडेसे बोबडे बोल बोलून कृष्णाला हसविणे अशा अनेक गोष्टी नंदाकडून कृष्णावरील प्रेमापोटी अगदी सहजपणे घडत असत. तसे पाहिले तर, कृष्णाचे शब्दोच्चार पहिल्यापासूनच अगदी स्पष्ट होते. बोबडे बोलणे ते कसे त्याला ठाऊकच नव्हते. तरीही नंदाच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या बोबड्या शब्दांची कृष्णाला मौज वाटे व हसून तो प्रतिसादही देत असे. परंतु तेही तेवढ्यापुरतेच असे. त्याचा मूळ हट्ट कायमच असे. दुसऱ्या कशानेही त्याचे समाधान कसे ते होतच नसे. काही वेळेला नंद निरनिराळ्या प्राण्यांचे व पक्ष्यांचे चित्रविचित्र आवाज कृष्णाला काढून दाखवीत असे. त्याची अत्यंत गंमत वाटून कृष्णाचीही

हसता हसता अगदी पुरेवाट होत असे. परंतु त्याच्या मनात जे काही आधीपासूनच आलेले असे ते मात्र तो मुळीच विसरत नसे. विशेष म्हणजे नंदाला या सर्वाचा राग न येता त्याला कृष्णाच्या वागण्याची मजाच वाटे आणि काही वेळेला कौतुकही वाटे. कृष्णाला शांत करून खूशही करणे हे नंदाला एक प्रकारचे आव्हानच वाटे. त्या आव्हानातही तोचतोचपणा नसे, कारण कृष्णाचे हट्टही वेगवेगळ्या प्रकारचे असत. त्यातही त्याची नाविन्यता असे. त्यामुळे रोज रोज नवीन आव्हान स्वीकारण्यातही नंदाला एक प्रकारचा आनंदच होई. कारण त्यामुळेच त्याच्या शांत व उत्साही वृत्तीचा कसच लागत असे आणि त्याचा तो कस वाढतही असे.

असे अनेक प्रयत्न व प्रयोग करता करताच अचानक एक दिवस नंदाला एक सूत्र सापडले. हट्ट करणाऱ्या व त्यासाठी रडणाऱ्या कृष्णाला मध्यरात्रीच्या सुमाराला राजवाड्याच्या बाहेरील प्रांगणात आणले मात्र, कृष्णाचे रडणे एकदम थांबले व तो शांत झाला. आपल्या अनिमिष नेत्रांनी तो सर्वकडे टकमक टकमक पाहू लागला. नीरव व शांत परिसर, हवेतील सुखद गारवा, मंद प्रकाशात लुकलुकणारे असंख्य तारे, आकाशात निरनिराळे आकार धारण करून स्वच्छंदपणे विहार करणारे ढग, हळुवारपणे वाहणारा वारा, निश्चल व स्तब्ध दिसणारे वृक्ष, लता अशा रम्य वातावरणात कृष्णाचे मन एकदम मोहरून आले. निसर्गाचे ते स्वच्छ व सुंदर रूप पाहून कृष्णाचे जे सूर त्या निसर्गाशी जुळले ते जणु कायमचेच!

एकदा तर नंद कृष्णाला घोडागाडीत बसवून यमुना नदीच्याकाठी घेऊन गेला. तेव्हा तर कृष्णाची नुसती कळीच खुलली असे नव्हे, तर त्याचे मुखकमलच हर्षभराने फुलून आले. यमुना नदीतील खळखळून वाहणारे कृष्णजल तर कृष्णाच्या वर्णाला अगदी साजेसे व शोभेसे असेच होते. यमुनेच्या प्रवाहातील अधीरता तर कृष्णाच्या स्वभावाशी अगदी अनुरूपच होती. यमुनेच्या पात्रातील गंभीरता व गहिरेपणसुद्धा कृष्णाशी अगदी मिळते जुळते असेच होते. यमुनेच्या जलात प्रतिबिंबित झालेला अगणित ताऱ्यांचा प्रकाश आणि कृष्णाच्या जलमय नेत्रातील सात्त्विक तेजाची चमक यात तर अगदी पूर्ण साधर्म्य होते. यमुनेच्या अशा प्रथम भेटीतच कृष्णाचे जे नातेसंबंध यमुनेशी जुळले, ते एवढ्या घनिष्ठ प्रेमाचे होते की जणु त्यांचे जन्मोजन्मीचेच ऋणानुबंध होते. यमुना नदीच्या भेटीचे हे आकर्षण कृष्णाच्या मनाच्या ठिकाणी जे निर्माण झाले ते झालेच. त्या भेटीचे एवढे आकर्षण कृष्णाच्या ठिकाणी निर्माण झाले, की जणु त्याला तो छंदच नव्हे तर ध्यासच जडला.

आता त्याचे रात्रीचे असे अचानक जागे होणे जणु यमुनातीरी जाण्यासाठीच असे. कारण तेथे गेल्यावरच त्याला चैन पडत असे. तेथेच त्याचे मन पूर्णपणे खुशीत रहात असे. नंदाच्याही हळुहळू हे जेव्हा लक्षात आले तेव्हा मग नंदालाही दुसरा पर्यायच राहिला नाही. कृष्णाला जाग आल्यावर शेजारीच झोपलेल्या नंदाला हळूच हाकारून व हलवून कृष्ण उठवीत असे. जागे झालेल्या नंदाला कृष्णाच्या मुखाकडे पाहिल्यावरच त्याच्या मनातील विचार कृष्णाने न सांगताच कळत असे. नंद कृष्णाला खुणेनेच 'यमुनातीरी जायचे आहे का?' असे विचारीत असे आणि कृष्णही हसून व मान डोलवून होकार देत असे. नंद लागलीच स्वतः कृष्णाला घेऊन कधी घोडागाडीतून तर कधी बैलगाडीतून यमुनातीरी जात असे आणि कृष्णाच्या मनाचे पूर्ण समाधान झाल्यावरच त्याला राजवाड्यात परत घेऊन येत असे. काहीवेळेला यशोदेला सांगून, तर काही वेळा

थकून भागून शांत झोपलेल्या यशादेला न उठवता, तर क्वचित प्रसंगी यशोदेला बरोबर घेऊनही नंद व कृष्ण यांचे असे रात्रीच्या वेळी यमुनातीरी जाणे घडत असे. यशोदेला काहीवेळा या सर्वाचा थोडासा मनस्तापही होत असे. कृष्णाला अशा काहीतरी चुकीच्या सवयी लावल्याबद्दल ती नंदाला रागावीतही असे. कृष्णाला लहानपणापासूनच थोडीशी शिस्त ही हवीच, असे तिचे ठाम मत होते. तसा तिचा आग्रहही होता. या शिस्तीचा उपयोग कृष्णालाच त्याच्या पुढील आयुष्यात होणार आहे असे तिचे म्हणणे होते आणि ते अगदी योग्यच होते.

परंतु नंदाच्या मनातील विचार वेगळे होते. गर्गमुनींनी कृष्णाविषयी सांगितलेले रहस्य फक्त त्यालाच माहीत होते. यशोदेच्या भावना दुखावल्या जातील या भीतीने व काळजीने त्याने ती गोष्ट यशोदेला कधीच सांगितली नव्हती एवढेच! कृष्णाचे वेगळेपण नंद पूर्णपणे जाणून होता. 'कृष्ण हा अवतारी पुरुष आहे' हे गर्गमुनींचे वचन त्याच्या पूर्ण लक्षात होते. त्या वचनाचा निश्चित अर्थ व गूढ जरी नंदाला ठाऊक नव्हते, तरी कृष्ण हा सामान्य मुलगा नाही याची मात्र त्याला पक्की खात्री होती. तेव्हा आपण कृष्णाला वाढवायचे नसून, स्वतःहून वाढणाऱ्या कृष्णाला आपण सहाय्यभूत व्हायचे आहे याचा निश्चय नंदाठायी होता. याच दृष्टीने तो कृष्णाकडे पहात असे. कृष्णाच्या शारीरिक वाढीसाठी आवश्यक असे त्याचे खाणे, पिणे, निद्रा, विश्रांती या सर्वांची काळजी व जबाबदारी आपणच घ्यायची आहे. परंतु कृष्णाची मानसिक व बौद्धिक वाढ ही त्याची त्याचीच होत रहाणार आहे. आपण फक्त त्याला आपलेपणाने सहाय्य करायचे आहे हीच एकमेव जाणीव नंदाच्या हृदयात दृढपणे होती. म्हणूनच कृष्णाच्या दिवसा दिवसाला वृद्धिंगत होणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला आपण केवळ साक्षीभूत वा आधारभूत नसून, आपल्याला सहाय्यभूत होण्याची संधी मिळालेली आहे हे लक्षात ठेवून, ती संधी साधण्याचा आनंद नंद पूर्णपणे अनुभवीत होता.

नंद व यशोदा या दोघांना मिळून कृष्णासाठी आणखी एक गोष्ट करावी लागत असे. ती म्हणजे कृष्णाला जेवण भरवणे. तो तर एक कार्यक्रमच होत असे. खरे तर, कृष्णाची प्रत्येक गोष्ट, मग ती त्याला आंघोळ घालण्याची असो वा त्याला झोपवण्याची असो, त्याला खेळवण्याची असो नाहीतर खेळून खेळून मळलेले त्याचे कपडे बदलण्याची असो, तो तर एक कार्यक्रमच होत असे. परंतु त्यातल्या त्यात कृष्णाला जेवण करायला लावण्याचा कार्यक्रम हा अधिक आकर्षक होत असे. त्यामध्ये नंद व यशोदा यांच्या धीराची कसोटीच लागत असे. अनेक युक्त्या प्रयुक्त्या करून कृष्णाला आधी जेवणासाठीच राजी करावे लागत असे. कारण खेळण्याच्या नादात रंगलेल्या कृष्णाला भुकेचे वा तहानेचे भानच नसे. खेळ व आपले सवंगडी सोडून येण्यास कृष्ण मुळात तयारच होत नसे. कृष्णाच्या अशा हट्टीपणाचा यशोदेला कधी कधी अतिशय त्रास होई. कृष्णाला बळेबळे खेळापासून बाजूला करून जेवण भरवण्याचा यशोदा प्रयत्न करी. परंतु तिच्या त्या प्रयत्नाला कृष्ण अजिबात दाद देत नसे. मग साहजिकच काही वेळा यशोदेच्या रागाचा पाराही वर चढत असे. त्याची परिणती यशोदेकडून कृष्णाला रागावण्यात होत असे. यशोदेच्या रागाला कृष्ण कधी रडून, तर कधी हसून प्रतिसाद देई, पण दाद मात्र मुळीच देत नसे. नंद मात्र आपली शांत वृत्ती सोडत नसे व परिस्थितीतून कौशल्याने मार्ग काढण्याचा त्याचा प्रयत्न असे.

कृष्णाचे जेवण हे केवळ कर्तव्यकर्म म्हणून न पहाता तो जणु एक खेळच आहे अशी दृष्टी नंदाने विवेकाने प्राप्त करून घेतली. त्यामुळे नंदाचा मानसिक ताण एकदम नाहीसा झाला व त्याचा मार्ग सुकर झाला.

कृष्णाला जेवण भरवणे हा सुद्धा नंदाने कृष्णाच्या खेळाचा एक भागच केला. नंद स्वतः कृष्णाच्या खेळात सहभागी होई. कृष्णाचा हात धरून धावता धावता तो सहजपणे यशोदेच्या जवळ येई. यशोदा अनेक प्रकारच्या रसपूर्ण पदार्थांनी भरलेले ताट घेऊन बसलेली असे. तेथे आल्यावर 'कृष्णाला काहीही द्यायचे नाही. फक्त मला एकट्यालाच सर्व पदार्थ हवेत' असा हट्ट लटकेपणाने नंद धरीत असे. तेव्हा मात्र कृष्ण 'बाबांना काहीही द्यायचे नाही. फक्त मलाच सर्व हवे' असा प्रतिहट्ट धरी आणि नंदाच्याही पुढे सरसावून तोंडाचा 'आ' वासून उभा रहात असे. मिळालेल्या संधीचा लागलीच फायदा घेऊन यशोदा कृष्णाच्या मुखात दही-दूध भाताचा चांगला मोठा घास भरवी. कृष्णही भरल्या व हसऱ्या मुखाने तेथून पुन्हा धावत धावत निघून जाई. नंद थोड्या वेळाने पुन्हा त्याला खेळता खेळता यशोदेच्या जवळ आणी, आणि यशोदा पुन्हा कृष्णाला आणखीन एक घास भरवी. काही वेळेला कृष्ण यशोदेने नंदालाही घास भरवावा असा हट्ट धरीत असे. यशोदा तयार होत नसे. पण त्याच्या त्या हट्टापुढे यशोदेचाही मग नाईलाज होई. नंदही हसून संमतीदर्शक मान डोलवी आणि यशोदा थोडीशी लाजत लाजतच नंदालाही घास भरवी. कृष्ण जोरजोराने टाळ्या वाजवून आपला आनंद व्यक्त करी, तर नंदही मिश्किलतेने हसून त्या आनंदात सामील होई. जेव्हा अचानक कृष्ण आपल्या हाताने एखादा पदार्थ यशोदेला कौतुकाने भरवी, तेव्हा तर सर्वांच्याच आनंदाची परिसीमाच होत असे.

काही वेळेला तर यशोदेने केवळ कृष्णासाठी म्हणून केलेले खास पदार्थ तिने सर्व सवंगड्यांनाही द्यावेत असाच हट्ट कृष्ण धरून बसत असे. त्याचा तो हट्ट यशोदेला विचित्र वाटे आणि तिला तो मानवतही नसे. कारण कृष्ण धष्टपुष्ट व्हावा म्हणून दुधावरची घट्ट साय, लोणी-साखर, साजूक तूप इत्यादी अनेक सकस पदार्थांचा वापर यशोदेने फक्त कृष्णासाठीच म्हणून केलेला असे. म्हणूनच ते अन्न सर्वांना देण्यासाठी यशोदा राजी नसे. परंतु कृष्ण आपल्या सवंगड्यांना आपणापासून वेगळा पहातच नसे. त्याचे सवंगडी त्याचे अत्यंत आवडते होते. कृष्णाबरोबर खेळण्यासाठी म्हणून नंदाने मुद्दामहून गौळवाड्यातून अनेक मुलांना व मुलींनासुद्धा बोलावून घेतले होते. त्या मुलांपैकी काही कृष्णाच्या वयाचे, तर बरेचसे कृष्णापेक्षा वयाने मोठेही होते. त्यामुळे ते कृष्णाबरोबर, कृष्ण म्हणेल तसे व त्याला आवडेल तसे खेळत आणि कृष्णाला रिझवीत असत. कृष्णही त्यांच्याबरोबर मोकळेपणाने खेळून त्यांनाही सुखवीत असे. त्यामुळे आपल्या सवंगड्यांवर कृष्णाचा अतिशय लोभ जडलेला होता. कृष्णाच्यात व त्याच्या सवंगड्यांत काहीही फरक केलेला कृष्णाला मुळीच चालत नसे. कृष्णाच्या या वृत्तीचे नंदाला अगदी मनापासून कौतुक वाटत असे. यशोदेलाही त्याचे कौतुक होतेच, परंतु प्रत्यक्षपणे त्या सर्वांना सारखी वागणूक देणे तिला मानवत नसे म्हणून जमतही नसे म्हणा, किंवा जमत नसे म्हणून मानवत नसे म्हणा, पण तिच्या मनाची थोडीशी चलबिचल ही होतच असे. पण शेवटी कृष्णाच्या हट्टाची व प्रेमाचीच सरशी होई आणि यशोदा कृष्णासाठी खास केलेले पदार्थ त्याच्या सर्व सवंगड्यांनाही मग मात्र अगदी खुशीने देत असे. त्यावेळी कृष्णासह सर्वांच्याच

मुखावरील समाधान व हास्य हा तर यशोदेसाठी जणु अमूल्य असा ठेवाच होता. अशा तऱ्हेने कृष्णाच्या खेळत-खेळत जेवण्याचा किवा जेवत-जेवत खेळण्याचा कार्यक्रम मोठ्या आनंदाने पार पडत असे.''

कृष्णाच्या बाललीलांचे वर्णन करण्यात व ते श्रवण करण्यात नारद व लक्ष्मी एवढे रंगून राहिले होते, की त्या उभयतांना कृष्णरूपाशिवाय दुसरे काही दिसतच नव्हते. परंतु खऱ्या अर्थाने श्रवणभक्ती करणारी लक्ष्मी तिच्या मनाच्या ठिकाणी मात्र सावध होती. एक गोष्ट लक्ष्मी पूर्णपणे जाणून होती, की कृष्णलीलांचे वर्णन करणाऱ्या नारदाच्या अवस्थेत व त्या लीलांचे वर्णन श्रवण करताना तिच्या अवस्थेत मूलभूतच फरक होता. नारदाच्या मुखातून प्रगटणारे कृष्णचरित्र हे त्याच्या सखोल अंतःकरणात स्फुरण पावून आवेगाने बाहेर येत होते. त्यामुळे त्याच्या शब्दप्रवाहाला जरी वेग असला तरी अनुभवाची सखोलताही होती. त्यामुळे त्याचे चरित्र कथन व त्यावरील निरूपण याला अगदी सहजपणे भावपूर्णता होती. परंतु लक्ष्मीचे श्रवण हे मात्र तिच्या मनात एकदम प्रवेश करून सावकाशपणे तिच्या अंतःकरणात उतरत होते आणि तिचे अंतःकरण हळुहळू भावपूर्ण करीत होते. मन व अंतःकरण यामधील हा कृष्ण माहात्म्याचा प्रवासच अतिशय महत्त्वाचा होता. अंतरातील सर्व भाव विरघळवणारी ती प्रक्रिया एकदा का सुरू झाली की पूर्ततेस पावल्याशिवाय न थांबणारी होती. ती प्रक्रिया अखंड व वेगाने चालू रहाण्यासाठी मनात साठून व साचून राहिलेल्या अनेक गोष्टी व विचार मोकळे होणे आवश्यक होते. त्यासाठी मनाठायी मंथन होणे अत्यंत जरुरीचे असते आणि असे मंथन होण्यासाठी संवाद घडणे आवश्यक असते हे लक्ष्मी पूर्णपणे जाणून होती. तेव्हा असा संवाद नारदाशी व्हावा या हेतूने लक्ष्मीने मुद्दामहूनच नारदाशी बोलण्यास सुरुवात केली.

''हे सगुणकथाप्रेमी नारदा, कृष्णाच्या बाललीलांचे वर्णन तुझ्या मुखातून ऐकताना प्रत्यक्ष आपण गोकुळातच असल्याचा अनुभव मला येत आहे आणि त्याचा मला अतिशय आनंद होत आहे. त्या लीलांतून प्रकटणारे कृष्णाचे लडिवाळ व मोहक रूप खरेच अगदी विलोभनीय आहे. त्याचे निर्हेतुक व निरागस बोलणे व वागणे हे तर कोणाच्याही मनाला भुरळ पाडणारे असेच आहे. त्याचे बालहट्टसुद्धा मौजेचे वाटतात. या सर्वांमुळे कृष्णाविषयीचे प्रेमच अधिक वाढते हे जरी खरे असले, तरी त्या कृष्णाविषयीचे एक प्रकारचे कुतूहलही जागृत होते. तसे पाहिले व म्हटले तर कृष्णाचे बालपण हे बाह्यांगाने तरी एखाद्या सामान्य मुलासारखेच वाटते. त्यातल्या त्यात तो कृष्ण नंदासारख्या छोट्याशा का होईना, पण एका राजाच्या गृहात वाढत व वावरत असल्याने त्याचा हट्टीपणा जरा जास्तच असणार एवढेच! बरे, नंद राजा असल्यामुळे त्याचे दास-दासी म्हणा अगर इतर सामान्यजन म्हणा, हे साहजिकच कृष्णाचे हट्ट सहन तर करणारच आणि ते सर्व हट्ट पुरवणारही. त्यावर आणखी ते कृष्णाचे कौतुक करून त्याचे सर्व कोड पुरवणार व त्याचे वर लाडही करणार. तेव्हा या सर्व बाह्य परिस्थितीच्या अनुकूलतेमुळे कृष्णाचे बालपण इतर सामान्य लहान मुलांपेक्षा जरी वेगळे दिसत असले, तरी पुन्हा त्यामध्ये काहीतरी मूलभूतही फरक हा असणारच, नाही का? तेव्हा हे नारदा, तो फरकच जाणून घेण्याची उत्सुकता मला लागून राहिली आहे. तरी कृपा करून त्यासंबंधी मला सांगणे करावे अशी माझी तुला प्रेमाची विनंती आहे.''

लक्ष्मीच्या बोलण्याचा नारदाला अत्यंत संतोष झाला आणि तो त्याच्या मुखावर सहजपणे प्रगटला. लक्ष्मीच्या बोलण्याची त्याला थोडीशी मौजही वाटली. त्यामुळे स्मितहास्य पूर्वक मान डोलवून नारदाने लक्ष्मीशी बोलण्यास आरंभ केला.

''हे श्रवणप्रिय लक्ष्मी, तुझे म्हणणे एका अर्थाने बरोबर आहे. कारण नारायणाचे अवतार चरित्र व सामान्य जीवांचे जीवन यात बाह्यांगानेही वेगळेपणा हा असणारच. तो फरक तसा नसेल तर मग सामान्य जीव व नारायण यात फरक तो काय राहिला असे तुला वाटणेही रास्तच आहे. परंतु हे लक्ष्मी, एक गोष्ट तू पक्केपणाने लक्षात ठेव की सर्व जीव हे जसे या एका नारायणाचेच अंश आहेत, तसेच नारायणही सगुणरूपे अवतार घेताना सामान्य देहधारी जीव म्हणूनच प्रगट होतो. त्याचा देह हा सामान्यासारखाच असतो. त्या देहातील इंद्रियांद्वारे घडणारी कर्मे ही सुद्धा सामान्यांप्रमाणेच होतात. तोही पायानेच चालतो, नेत्रानेच पहातो, कानानेच ऐकतो आणि मुखानेच बोलतो. फक्त फरक असतो तो त्याच्या चालण्यात, पहाण्यात, ऐकण्यात आणि बोलण्यात. परंतु तो फरक सामान्याला दिसत नाही, दिसू शकतही नाही आणि त्यात सामान्याला दोषही देता येत नाही. कारण अज्ञानामुळे सामान्याची दृष्टी हीच मुळी दोषयुक्त झालेली असते. म्हणूनच कृष्णरूपाने अवतरलेल्या नारायणाच्या बाबतीतही अगदी तसेच झाले यात काहीच नवल नाही.

कृष्णाचा खेळण्यातील खोडकरपणा, वागण्यातील हट्टीपणा, बोलण्यातील खट्याळपणा या सर्वातून प्रगटणारा त्याच्या स्वभावातील लहरीपणा सर्वांनाच जाणवत असे. त्यातील ज्यांच्या ठिकाणी कृष्णाविषयी किंवा नंद-यशोदा यांच्याविषयी प्रेम व आपलेपणा होता, त्यांना कृष्णाने काहीही केले तरी कृष्णाविषयी एक प्रकारचे कौतुकच वाटत असे. कृष्णाचे कसेही वागणे व बोलणे हा त्या सर्वांचा एक कौतुकाचाच विषय होऊन राही. परंतु सर्वांचेच तसे नव्हते. काही जणांना मात्र कृष्णाच्या अशा वागण्याचा व बोलण्याचा त्रास होई व रागही येई. त्याचा दोष मात्र ते नंद व यशोदा यांना देत असत. 'कृष्ण लहान आहे त्यामुळे त्याचा हट्टीपणा आम्ही समजू शकतो, परंतु नंद व यशोदा हेच कृष्णाला योग्य शिस्त लावण्यात कमी पडत आहेत' अशी त्यांची ठाम समजूत होती. किंबहुना कृष्णाचे अनाठायी व अवास्तव कौतुक करून नंद व यशोदा या उभयतांनी कृष्णाला लाडावून ठेवले आहे. एवढेच नव्हे, तर त्याला डोक्यावरच बसवून ठेवले आहे असेच या लोकांना वाटत असे. फक्त नंद व यशोदा यांच्याविषयीच्या आदराने व थोड्याशा भीतीने ते काहीही न बोलता गप्प रहात असत एवढेच! परंतु या सर्वांची मने पूर्वग्रहदूषित मताने भरलेली असल्यामुळे त्यांची प्रतिक्रिया ही यथार्थ नव्हतीच. कोणाची केवळ कौतुकाची दृष्टी, तर कोणाची केवळ चिकित्सक दृष्टी. त्यामुळे त्यांनी काढलेले निष्कर्ष हे सम्यक नव्हते तर एकतर्फी होते. तेव्हा कृष्णाच्या या बालचरित्राकडे त्याच्या माहात्म्याच्या जाणिवेने तर पाहिले पाहिजेच, पण त्याचबरोबर त्याच्याकडे मोकळ्या मनाने व सरळ बुद्धीनेही पहाणे अत्यंत आवश्यक आहे. कारण तरच कृष्णचरित्रातील वेगळेपण दिसेल व त्याचे आगळेपण लक्षात येईल.

हे लक्ष्मी, मुळात आधी एक गोष्ट नीटपणे समजून घे आणि लक्षात ठेव, की कृष्णाच्या बालरूपात इतर सामान्य बालकांपेक्षा काही तरी वेगळेपण असावयासच हवे असे मुळीच नाही. किंबहुना असेही म्हणता येईल की, त्या बाळकृष्णाच्या ठिकाणी असे काही बाह्यांगाचे वेगळेपण दिसत नव्हते, हेच त्याचे खरे वेगळेपण असू शकेल. त्याचे बालपणातील वागणे, बोलणे इत्यादी सर्व अगदी इतर सामान्य बालकांप्रमाणेच होते हेच त्याचे असामान्यत्व होते असेही दिसू शकेल. माझे असे बोलणे एखादेवेळेस तुला केवळ बौद्धिक किंवा तार्किक वाटेल. परंतु माझ्या सांगण्यात बुद्धीचा कोरडेपणा किंवा तर्काचा कठीणपणा अंशमात्रानेही नाही याची खात्री बाळग. एक गोष्ट हजार हिश्शाने नक्की व पक्की आहे, की या नारायणाचे मुद्दामहून असे बाह्यांगाच्या वेगळेपणाने प्रगट होणे हे अस्वाभाविक आणि म्हणूनच कृत्रिम झाले असते. परंतु हा नारायण तर अगदी सहजस्वरूप आहे. त्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची कृत्रिमता मुळी संभवतच नाही. त्यामुळे त्याच्या मूळ सहजतेने त्याचे प्रगट होणे हेच स्वाभाविक आहे.

हे लक्ष्मी, तरीही कृष्णाच्या बालपणातील चरित्रात इतरांपेक्षा काहीतरी वेगळेपण हे असणारच असे म्हणणे सुद्धा बरोबरच आहे आणि ते तसे होतेही! परंतु ते केवळ बाह्यांगाचे नव्हते, तर त्या बाह्यांगाद्वारे प्रगटणाऱ्या त्याच्या वृत्तीचे होते. बालकृष्णाच्या ठिकाणी लहान मुलांसारखी निरागसता होती, परंतु बालिशपणा मात्र अजिबात नव्हता. सर्वसामान्य लहान मुलांच्या ठिकाणी सहजपणे असणारे अज्ञान कृष्णाच्या ठिकाणी दिसत नसे, तर त्याच्या वागण्या बोलण्यातून एक प्रकारचा समंजसपणाच आढळत असे. त्याच बरोबर कृष्णाच्या ठिकाणी त्या लहान वयातही सर्वांविषयीचा आपलेपणा अगदी सहजपणे प्रतीत होत असे. सर्वांशी समभावाने वागणे हा तर त्याचा स्वभावच होता. त्याला सर्वजण म्हणजे अगदी सर्वजण नेहमीच आपल्याबरोबर हवे असत. मग ती यशोदामाई असो वा तात नंद असोत, त्याच्या राजवाड्यातील मंडळी असोत किंवा नगरातील सामान्य लोक असोत, स्त्रिया असोत वा पुरुष असोत, एवढेच काय, कृष्णापेक्षा वयाने लहान असोत किंवा मोठे असोत. कृष्णाला सर्वच जण नेहमी हवेहवेसे वाटत.

कोणाबरोबरही वागण्यात, बोलण्यात किंवा खेळण्यातही तो विनासंकोच व अगदी मोकळेपणाने असे. स्वतःच्या मनाप्रमाणे वागण्याचा कृष्णाचा हट्ट आहे असे सकृत्दर्शनी जरी दिसत असले तरी कृष्णाच्या मनात मुळात सर्वांविषयी आत्यंतिक आपलेपणा व समभाव होता. त्यामुळे स्वतःच्या दैनंदिन जीवनात त्याला सर्वांचाच सहभाग हवा असे. त्याचाच आग्रह तो सतत धरीत असे आणि तो त्याचा आग्रहच सर्वांना नेहमीच मान्य होत नसे. यशोदेच्या ठिकाणी स्त्रीसुलभ स्वभावानुसार थोडासा आपपर भाव हा होताच. नंदाचे मन जरी मोठे असले तरी आपले व दुसरे यात योग्य तो फरक करणे आवश्यक आहे असे त्यालाही अगदी प्रामाणिकपणे वाटत असे. बरे, इतर जनही संकोचाने म्हणा किंवा नंद यशोदेविषयीच्या आदराने म्हणा, कृष्णाशी जास्त जवळीक साधायला एखादे वेळेस तयार होत नसत. तेव्हा या सर्वांनाच कृष्णाचे आग्रहाचे वागणे व बोलणे हे हट्टीपणाचे वाटत असे व तसा दोषही ते त्याला उघडपणे किंवा पाठीमागे लावत असत. अर्थात याविषयी त्यांनाही दोष देणे हे बरोबर नाही, कारण त्यांची दृष्टी ही मुळातच मर्यादित असल्यामुळे संकुचित झालेली होती. त्यामुळे कृष्णाचे मोकळेपण व व्यापक दृष्टी एकतर त्यांच्या मनाला मानवत नसे किंवा त्यांच्या मनाच्या कमकुवतपणामुळे झेपत नसे.

हे लक्ष्मी, कृष्णाचे त्या बाल वयातही आणखीन एक स्वभाव वैशिष्ट्य होते. ते म्हणजे तो स्वतःही दुसऱ्यांच्या जीवनात सहभागी होत असे आणि त्याचबरोबर त्यांच्या सुखदुःखाच्या भावनेशीही अगदी सहज समरस होत असे. आपल्या जवळच्या व संबंधितांपैकी कोणालाही काही परिस्थितीची व मानसिक अडचण निर्माण झाली, की ती पाहून किंवा ऐकूनही कृष्ण अत्यंत अस्वस्थ होत असे. त्यांना मदत करण्याविषयी तो अगदी उतावीळ होई आणि त्याची धावपळ सुरू होई. नंदाकडे व यशोदेकडे कृष्ण त्या दुःखी व्यक्तींना मदत करण्याविषयी एवढा आग्रह धरीत असे, की त्यांनी तशी मदत करेपर्यंत त्याला मुळीच स्वस्थता नसे. कृष्णाच्या आग्रहाखातर मग नंद व यशोदासुद्धा संबंधितांची अडचण व दुःख निवारण करीत आणि तेव्हाच कृष्णाच्या मनाला समाधान व स्वस्थता लाभत असे.

आता कृष्णाच्या या अशा वृत्तीला केवळ 'त्याचा तो हट्टीपणा आहे' असे म्हणून बाजूला करणे किंवा सोडून देणे हे योग्य नाही. तर त्या मधून त्याच्या ठिकाणी सर्वांविषयी असलेला आपलेपणा व कळवळा हा जर दृष्टोत्पत्तीस आला व तो जाणता आला, तर कृष्णाच्या स्वभावात हट्टीपणा न दिसता सर्वांना मदत करण्याची व सुखविण्याची त्याच्या स्वभावातील जिद्दच लक्षात येते. मग तोच कृष्णाचा स्वभाव हा केवढ्यातरी कौतुकाचा विषय ठरतो. हे लक्ष्मी, एक गोष्ट तू विशेषत्वाने लक्षात घे व लक्षात ठेव, की कृष्णाच्या या बालपणातील वैशिष्ट्यपूर्ण स्वभावातच त्याच्या पुढील सर्व चरित्राची मुळे पक्केपणाने रोवलेली होती. तेच त्याच्या आगळ्या वेगळ्या चरित्राचे मुख्य सूत्र होते. त्या सूत्रातूनच त्याचा पुढील सर्व जीवनपट गुंफला गेला आणि अत्यंत सुंदर, रमणीय व शोभिवंत असे जीवन चरित्र प्रगट झाले.''

नारदाचे बोलणे ऐकून लक्ष्मीच्या मनाला होत असलेले समाधान तिच्या मुखावरही सहजपणे दिसून येत होते. पण त्याचबरोबर तिच्या मनात वाढत असलेली श्रवणातुरता सुद्धा तिच्या मुखावरील विशिष्ट भावामुळे स्पष्टपणे लक्षात येत होती. त्या तिच्या भावाची उत्कटता एवढी होती, की त्या भावांना शब्दरूप घेणे भागच पडले. नारदाच्या सुरात मिळालेला लक्ष्मीचा सूर सहजपणे बोलू लागला,

''हे नारद महर्षे, कृष्णचरित्रातील तू उलगडून दाखवलेले आगळे वेगळेपण खरेच अगदी यथार्थ आहे. त्याचे तू केलेले शब्दवर्णनही अत्यंत सम्यक, समर्पक व मार्मिक आहे आणि यात मला तुझेच आगळेपण व वेगळेपण जाणवते. तेच सगुण भक्तिभावाचे मुख्य व महत्त्वाचे सूत्र आहे. नारायणाचे सगुण चरित्र हे नेहमीच वेगवेगळ्या अंगाने व रंगाने प्रगट होतच रहाणार आणि तेही या नारायणाच्या अंतःकरणाप्रमाणे अगदी उत्स्फूर्त असणार. त्यातील आगळेपण म्हणजे विशेषत्व हे साहजिकच फक्त त्याच्या भक्तांनाच जाणवणार आणि त्या आकर्षक, पण अनाकलनीय चरित्राचे भक्तिभावाने वर्णन करून त्यातील रहस्यही, त्या नारायणाचा तुझ्यासारखा परमभक्तच उलगडून दाखवणार हे त्रिवार सत्य आहे. तेव्हा हे नारदा, तुझ्याशी झालेल्या संवादातून तू जी दृष्टी मला दिली आहेस त्या दृष्टीनेच आता माझ्याकडून सर्व कृष्णचरित्राचे ऐकणे घडेल व त्याकडे त्याच भावाने पहाणे घडेल हे निश्चित! त्यामुळे कृष्णचरित्राचा पुढील भाग श्रवण करण्याची माझी

साहित्य प्रतिष्ठान®

उत्सुकता अगदी पराकोटीला जाऊन पोहोचली आहे.  तरीही या माझ्या भावाची तू त्वरित पूर्ती करावीस अशी हे नारदा, मी तुला प्रार्थनाच करते.''

*****



# यमुनाकाठचा गोपाळकृष्ण

लक्ष्मीचे योग्य प्रतिक्रियात्मक बोलणे ऐकून नारदाला समाधान व संतोष झाला. लक्ष्मीची योग्य समज तर झाली आहेच, पण त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे तिच्या ठिकाणी योग्य भाव निर्माण झालेला आहे याचे नारदाला विशेष कौतुक व आनंद वाटला. त्यामुळे आधीच भक्तिभावपूर्ण असलेली नारदाच्या अंतःकरणाची अवस्था अधिकच उत्कट झाली आणि शब्दरूपाने प्रगटून साकार होऊ लागली.

''हे नारायणप्रिय लक्ष्मी, या नारायणाच्या सर्व अवतारांमध्ये कृष्णावतार हा विशेष म्हणून समजला गेला आणि तसा तो ठरलाही! त्यातील एक महत्त्वाचे व प्रमुख कारण म्हणजे कृष्णाच्या अवतार चरित्रातील विशेषत्व त्याच्या अगदी लहानपणापासून, म्हणजे तसे पहायला गेले तर अगदी त्याच्या जन्माआधीपासूनच प्रगट होऊ लागले. बाह्यांगाचे सर्वसामान्य जीवन सामान्य रितीने जगत असतानाही, तो कधी सामान्य असा दिसलाच नाही. त्याच्यातील असामान्यत्वाच्या रंगाच्या छटा अगदी सुरुवातीपासूनच आणि त्याही अगदी सहजपणे प्रगट होत असत. स्वतःच्या जीवनाच्या हेतूची व कार्याची जाणीव कृष्णाच्या ठिकाणी अगदी स्पष्टपणे होती आणि तीच जाणीव सातत्याने त्याच्या वागण्या बोलण्यातून व प्रत्येक कृतीतूनच प्रगट होत असे. अर्थात सुरुवातीपासून बाह्यांगाने प्रगट होणाऱ्या त्याच्या अंतरंगातील रंगाच्या छटाच त्याच्या पुढील जीवनात हळुहळू पण निश्चितपणे, स्पष्टतेने व विस्ताराने प्रगट झाल्या आणि ते रंग अधिकाधिक गडद व गहन होऊ लागले. हे लक्ष्मी, ज्याप्रमाणे सप्तरंगी इंद्रधनुष्यातील सात रंग वेगळे वेगळे दिसतात परंतु एक रंग दुसऱ्या रंगापासून नेमका कोठे वेगळा झाला आहे हे निश्चितपणे दाखवता येत नाही, अगदी त्याचप्रमाणे कृष्णाच्या विविधरंगी जीवनपटाचे होते. त्याच्या जीवनात तर असंख्य रंग बाह्यांगाने प्रगट झाले. परंतु त्या रंगांचे वेगळेपण जाणवूनही ते वेगळेपण दाखवता येत नाही हेच त्या कृष्णचरित्राचे आगळेपण म्हणजे विशेषत्व होते. परंतु ते रंग अत्यंत रमणीय, विलोभनीय व आकर्षक होते एवढे मात्र निश्चित. त्यामुळेच जीवनाच्या विविध स्तरातील व अवस्थेतील अनेकजण त्या कृष्णाकडे आकर्षिले गेले.

परंतु एक गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे आणि ती म्हणजे ज्याप्रमाणे सात सुंदर रंगांचे मूळ एकाच पांढऱ्या शुभ्र रंगात असते, त्याचप्रमाणे कृष्णाच्या बाह्यांगाच्या विविध रंगाचे मूळ एकीएक त्याच्या अंतरंगातच होते. त्या कृष्णाच्या अंतरंगाला जाणणे जरी कठीण असले तरी त्याच्या बाह्यरंगाच्या आकर्षणामुळेच सामान्याचेही प्रत्यक्ष कृष्णाजवळ येणे घडत होते आणि त्यातूनच त्याचे अंतरंग जाणून घेण्याची शक्यता थोडीफार का होईना, पण निर्माण होत होती. कृष्णाचे अंतरंग व त्याचे बाह्यांगाचे रंग हे त्याच्या दृष्टीने वेगळे वेगळे असे नव्हतेच. त्याचा अनुभव तर एकीएकच होता. परंतु बाह्यांगाने त्याच्या जवळ येऊन त्याच्या बाह्यरंगात रंगून कितीजण त्याच्या जवळ राहिले, त्यांपैकी कितीजणांनी त्या कृष्णाची मनानेही जवळीकता साधली आणि त्यांहीपैकी कितीजणांनी कृष्णाचे अंतरंग जाणून ते स्वानुभवाने त्याच्याशी ऐक्य पावले हाच इतिहास खरा अभ्यसनीय आहे. कारण तोच अभ्यास सगुण प्रेमाचा ध्यास निर्माण करणारा व आनंददायी अशा

भक्तिभावाकडे नेणारा आहे. त्याचसाठी आपण कृष्णचरित्राच्या प्रवाहातच राहूया म्हणजे त्या प्रवाहाबरोबर पुढे पुढे वाहत राहणे आपल्याकडून सहजतेने घडत राहील.

हे लक्ष्मी, कृष्णाचे बालपण जे त्याच्या वागण्या-बोलण्यातही दिसतच नसे, ते बालपण काळाच्या ओघात बाह्यांगानेही वेगाने मागे सरत होते. त्याचे सवंगडी जसे जसे मोठे झाले तसे तसे त्यांचे आई-वडील त्यांना हळुहळू घरकामाला लावू लागले आणि त्यामुळे त्यांचे कृष्णाच्या घरी येणे कमी कमी होऊ लागले. परंतु कृष्णाला भेटण्यासाठी व त्याच्याशी खेळण्यासाठी मात्र ते अत्यंत बेचैन असत. त्यांची ती बेचैनी त्यांनी न सांगताच कृष्णाला कळली. कारण तशी बेचैनी स्वतः कृष्णालाही जाणवत होतीच. त्यावर कृष्णाने छान व योग्य उपाय शोधून काढला. तो स्वतःहून आपल्या सवंगड्यांच्या घरी जात असे. कामात असणाऱ्या आपल्या मुलांना त्यांचे आईवडील कृष्णाशी खेळण्याचीच काय, पण भेटण्याचीही मनाई करीत. कारण त्यांच्या दृष्टीने त्यांची घरकामे महत्त्वाची असत आणि त्यांना तसे वाटणे साहजिकच होते. त्यांची ती अडचण ओळखून कृष्ण मग आपल्या सवंगड्यांना त्यांच्या घरकामालाच मदत करू लागे. त्यामुळे त्या सवंगड्यांचे कामही सुलभ व लवकर होत असे आणि त्यांच्या आईवडिलांचीही काहीही तक्रार शिल्लक रहात नसे.

कृष्णाच्या या वृत्तीने व कृतीने त्याचे सवंगडी अत्यंत खूश होत. कारण त्या निमित्ताने त्यांना कृष्णाचा सहवास मिळत असे, जो त्यांच्या अत्यंत आवडीचा होता. बरे, त्यांचे कामही लवकर संपत असल्यामुळे पुन्हा कृष्णाशी खेळण्यासाठी भरपूर मोकळा वेळ त्यांना मिळत असे तो असेच! त्यामुळेच त्यांचाही कृष्णावरती जडलेला लोभ अधिकच वाढत राहिला. परंतु त्यांच्या आईवडिलांची प्रतिक्रिया मात्र अगदी सावध असे. कारण त्यांच्या दृष्टीने कृष्ण हा नंदराजाचा पुत्र होता. तेव्हा कृष्णाचे असे त्यांच्या घरी येणे व काम करणे नंदराजाला मान्य होईल की नाही याची त्यांना काळजी वाटत असे. कारण कोठल्याही परिस्थितीत नंदाची नाराजी ओढवून घेणे त्यांना मुळीच मानवले नसते. त्यामुळे कृष्णाच्या अशा घरी येण्याला त्यांचा थोडासा विरोधच असे. प्रत्यक्ष उघडपणे जरी ते तसा प्रगट करीत नसत, तरी त्यांच्या वागण्या-बोलण्याच्या प्रतिक्रियेतून त्यांची नाराजी स्पष्टपणे प्रगट होत असे. कृष्णाला त्यांच्या घरी येण्यापासून परावृत्त करण्याकडेच त्यांचा कल असे. हे सर्व कृष्णाच्या लक्षात येण्यास मुळीच वेळ लागला नाही. त्याने तर ते लगेचच ओळखले, परंतु तो नाउमेद झाला नाही. नाहीतरी त्याला त्याच्या सर्व सवंगड्यांच्या घरी एकाच वेळी जाणे शक्य होत नसेच. त्यामुळे इतर सवंगड्यांची ओढवून घेतलेली थोडीशी नाराजी व प्रेमाचा लटका का होईना, पण आलेला राग कृष्णाला जाणवल्याशिवाय रहात नसे.

कृष्णानेही या सर्व परिस्थितीचा विचार करून नीट अंदाज घेतला आणि त्यावरती एक नामी युक्ती शोधून काढली. कृष्णाने, आपण आता लहान राहिलो नसून मोठे झालो आहोत अशी भूमिका घेतली व तसे तो आपल्या घरी बोलूही लागला. आपल्या सवंगड्यांनाही त्याने तसे समजावून सांगितले आणि त्यांनाही त्यांच्या घरी तीच भूमिका प्रगट करण्यास लावली. त्याच्या सवंगड्यांना कृष्ण आपल्याला तसे का करावयास सांगत आहे ते आधी कळलेच नाही. परंतु कृष्णावरील प्रेमाने व श्रद्धेने ते तसे वागत राहिले. त्याचीच परिणती म्हणून कृष्णाने एक दिवस आपल्या घरी नंद व यशोदेला सांगितले, की यापुढे

घरच्या गाईंना तो स्वतःच रानात चरावयासाठी घेऊन जाणार. साहजिकच नंद व यशोदा यांनी त्याच्या म्हणण्याला विरोध केला. मुळात एक तर नंदाच्या घरी नोकर चाकरांची कमतरता नसल्यामुळे कृष्णाला काहीही काम करण्याची आवश्यकताच नव्हती. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे कृष्ण स्वतः जरी आपण आता मोठे झालो आहोत असे म्हणत असला, तरी खरे तर वयाने अजूनही तसा लहानच होता. त्यामुळे त्याने गाईगुरे रानात नेऊन राखण्याची जबाबदारी स्वतःवर घेणे अयोग्यच होते याची नंद, यशोदा यांना पूर्ण खात्री होती. परंतु कृष्णाने एक प्रकारचा हट्टच धरला आणि त्याच्या बालहट्टापुढे कोणाचेच काही चालेना. याला यशोदेचा तर अगदी पूर्णपणे विरोधच होता.

नंदही अर्थात मनापासून तयार नव्हताच. कृष्णाच्या सूचनेची त्यालाही आधी गंमतच वाटली होती. परंतु त्याचबरोबर नंदाला कृष्णाच्या उत्साहाचे व स्वतःहून जबाबदारी घेण्याच्या वृत्तीचे मात्र कौतुकच वाटले. त्यामुळे त्याने नाईलाजाने का होईना, पण कृष्णाच्या म्हणण्याला मान्यता दिली. पण त्यासाठी नंदाने एक महत्त्वाची अट घातली, की कृष्णाने गुरे राखण्याचे काम एकट्याने न करता, आपल्याबरोबर त्याच्या मोठ्या बंधूला म्हणजे बलरामाला घ्यावे. तो केवळ वयानेच नव्हे, तर समजुतीनेही मोठा असल्यामुळे कृष्णाची योग्य ती काळजी घेण्यास योग्य होता याची नंदाला पुरेपूर खात्री होती. बलरामाचा स्वभाव सरळमार्गी व थोडासा गंभीरच होता. कृष्णासारखा स्वभावातील अवखळपणा त्याच्या ठिकाणी लहानपणीही नव्हता आणि आता तर कृष्णाचा अल्लडपणा व खट्याळपणा पाहून बलराम अधिकच गंभीर होत असे. कृष्णाच्या विषयी अत्यंत प्रेम व आपलेपणा असल्यामुळे त्याला कृष्णाची नेहमी काळजी वाटे व क्वचित त्याचा रागही येई. परंतु तो शांत राहून स्वस्थ बसे.

आपल्या सवंगड्यांनाही आपल्या साथीला येऊ द्यावे असा आग्रहच कृष्णाने धरला असता नंदाला नाईलाजाने संमती द्यावी लागली. मग त्यासाठी नंदाने कृष्णाच्या सवंगड्यांच्या आईवडिलांशी स्वतःहून बोलणे केले आणि त्यांच्या समोर आपला विचार मांडला. प्रथमतः साहजिकच काळजीपोटी सर्वांनी त्याला विरोध केला. परंतु नंदाने समजावून सांगितले की ही लहान मुले रानात एकटी जाणार नाहीत, तर त्यांच्याबरोबर स्वतः बलराम व काही वयाने मोठी माणसेही असणारच आहेत. त्यांच्या मार्गदर्शनानुसार सर्व लहान मुलांचे वागणे घडेल व त्यांना हळुहळू सर्व शिकताही येईल. नंदाच्या या सांगण्याचा अपेक्षित परिणाम सर्वांवर झाला. त्यांचा विरोध मावळला आणि त्यांनी सावधपणे का होईना, पण आपली संमती दिली.

आपल्या योजनेप्रमाणे सर्व घडत असल्याचा कृष्णाला अतिशय आनंद झाला. कारण गाईगुरांना चरण्याच्या निमित्ताने रानात घेऊन जाताना, तो आणि त्याचे सर्व सवंगडी पुन्हा एकत्र येणार होते, एकत्र खेळणार होते, एकत्र जेवणार होते आणि बराच काळ एकमेकांच्या सहवासात एकत्र रहाणार होते. हेच तर कृष्णाला हवे होते. हाच तर त्याचा त्या योजनेमागील अंतस्थ हेतू होता आणि तो हेतू साध्य होत आहे याचा कृष्णाला तर अतिशय आनंद झालाच, पण त्याच्या सवंगड्यांच्याही लक्षात जेव्हा तो हेतू आला, तेव्हा तर त्यांना अत्यंत हर्षच झाला. त्या सर्वांनी टाळ्या पिटून, उड्या मारीत

आपला आनंद व्यक्त केला.  त्या आनंदाच्या भरात त्यांनी कृष्णाला तर उचलून आपल्या खांद्यावरच घेतले व त्याच्या सभोवती फेर धरून नाचू लागले.  त्यांच्या आवडत्या कृष्णाचा त्यांना अधिक सहवास मिळणार होता आणि त्या सहवासातील प्रेमसुख अनेक अंगाने अनुभवण्याची त्यांना पर्वणीच लाभली होती.  मुळात म्हणजे कृष्णाला त्याचे सवंगडी अत्यंत प्रिय होते आणि त्यांच्या सुखासाठी तो काहीही करण्यास तत्पर होता.  एकदा कृष्णाने ज्यांना आपले समजले व म्हटले, त्यांच्या आपलेपणापोटीच कृष्णाकडून हे सर्व घडत होते.  आपल्यांचा आपलेपणा राखणे व तो हर प्रयत्नाने अनुभवणे आणि त्यांनाही तो अनुभवाला आणून देणे हाच कृष्णाचा स्वभावधर्म होता आणि त्याच्या सवंगड्यांचे तेच परम भाग्य होते. खरे ना, लक्ष्मी?''

बोलण्याच्या ओघात नारदाकडून नकळत पण उत्स्फूर्तपणे लक्ष्मीला विचारणे घडले खरे, परंतु त्या प्रश्नातच त्यातील उत्तर एवढ्या सहजपणे प्रगट होत होते, की ते उत्तर उघडपणे देण्याची आवश्यकता ना लक्ष्मीला वाटली, ना त्याच्या प्रश्नाचे वेगळेपणे उत्तर ऐकण्याची जरुरी नारदाला भासली.  लक्ष्मीने केवळ किंचितसे स्मित करून थोडीशी मान डोलवली. त्यातूनच नारदाच्या प्रश्नातील उत्तर व त्या उत्तरातील भाव लक्ष्मीला नुसता कळला आहे असे नव्हे, तर तिचाही तोच भाव झाला आहे याची खूण व खात्री नारदाला पटली.  नारदाच्या वचनौघाला कोणत्याही कारणास्तव खंडीत करून, स्वतःच्या श्रवणानंदाला बाधित करण्याच्या अवस्थेत लक्ष्मीचे मन मुळी नव्हतेच.  कारण श्रवणाद्वारे नारदाच्या अंतःकरणातून वेगाने वाहणाऱ्या सगुण प्रेमाच्या प्रवाहात लक्ष्मी पूर्ण एकरूप झाली होती.  लक्ष्मीची ही श्रवणभक्तीची पूर्णावस्था नारदाला जाणवली आणि त्याला परमसंतोष झाला.  त्याचीच परिणती म्हणून नारदाने प्रयत्नपूर्वक आवरून धरलेला सगुण प्रेमाचा प्रवाह पुन्हा वेगाने व सखोलपणे वाहू लागला.

''हे भाग्यवती लक्ष्मी, खरे तर हे सौभाग्य आपलेही आहे.  माझे आहे, तुझे आहे, या शेषाचे आहे आणि या नारायणाच्या सहवासात येणाऱ्या व रहाणाऱ्या सर्वांचेच आहे.  परंतु एखादे वेळेस नित्याच्या सहवासाने व सरावाने नारायणाच्या माहात्म्याचे एकतर विस्मरण होते किंवा त्याचे माहात्म्य आपल्याला पूर्णपणे जाणवत नाही.  त्यासाठीच नारायणाच्या सगुण चरित्रकथांचे गायन, श्रवण व स्मरण नित्य आपल्याकडून घडावयास हवे.  कारण त्या कथाप्रसंगातच नारायणाचे संपूर्ण व यथार्थ माहात्म्य लपलेले असते.  नारायणावरील श्रद्धेने व प्रेमाने त्या चरित्राकडे पाहिले असता त्या चरित्रातील त्याच्या अंतरीचे गूज आपल्याला स्पष्टपणे दिसू व जाणवू लागते.  त्यामुळे नारायणाविषयी आत्यंतिक भक्तिभाव निर्माण होतो आणि त्याच्या अंतःकरणातील अवस्थेशी एकरूप होण्याचा एकीएक ध्यासच आपल्या ठिकाणी लागून रहातो. त्या ध्यासाची पूर्ती करण्याच्या आत्यंतिक आवश्यकतेमुळेच आपल्याकडून या नारायणाची सगुणभक्ती प्रत्यक्षपणे व उत्कटतेने घडते.  त्यामुळे नारायण तर आनंदित होतोच, पण आपल्यालाही आनंदाचा अनुभव येत रहातो आणि आपण अगदी सहजपणे या नारायणाशी केव्हा, कसे व कधी ऐक्य पावलो हे आपल्यालाही कळत नाही.

तेव्हा हे लक्ष्मी, या नारायणाची भक्ती हा केवळ मनाने कल्पना करण्याचा किंवा बुद्धीच्या तर्काने बोलण्याचा विषय नाही, तर ती भक्ती भावाने व कृतीने प्रत्यक्ष अनुभवण्याचीच आहे. त्यासाठी त्याच्या सगुण चरित्राचे गायनच त्याच्यावरील आत्यंतिक प्रेमाने आणि त्याच्या माहात्म्याचा पूर्णपणे निश्चय करून घडावयास हवे आणि त्याच भावाने त्या गायनाचे श्रवणही करावयास हवे. अगदी तीच अवस्था हे लक्ष्मी, आता आपल्या दोघांचीही आहे हेच आपलेही परमभाग्य आहे आणि ही नारायणाची आपल्यावरील परमकृपा आहे. तेव्हा आता सावधान राहून पुढील कथाभागाचे व्यवधान घेऊया आणि पूर्ण अवधान ठेवून श्रवणासाठी आपण उभयतां सादर होऊया!

तेव्हा मुख्य म्हणजे कृष्णाने आपल्या सवंगड्यांसह गाईगुरांना चरण्यासाठी नेण्याच्या निमित्ताने घराबाहेरच नव्हे, तर गोकुळाच्याही बाहेर पडण्यास सुरुवात केली. अर्थात त्याच्या बरोबर त्याचा मोठा बंधू बलराम हा जरी त्यांची काळजी घेण्यासाठी होता, तरी सर्व योजना कृष्णच ठरवीत असे आणि कृष्णाच्या सांगण्याप्रमाणेच सर्व काही घडत असे. कृष्ण हा बलरामाशी बोलून त्याच्याशी विचार विनिमय करीत असे. बलरामही आपलेपणाने त्यात काही सूचना व बदल सुचवीत असे. कृष्णही बलरामाचे सर्व सांगणे शांतपणे ऐकून घेत असे आणि त्याच्या योग्य सूचनांचा स्वीकारही करीत असे. परंतु अंतिम ठरवणे हे कृष्णाचेच असे. कारण ते सर्वांनाच मान्य होत असे. बलरामाविषयी वयाने मोठा म्हणून सर्वांनाच आदर असे. परंतु कृष्ण त्यांचा अत्यंत आवडता होता. त्यामुळे कृष्णाला आवडेल असेच करावे असा प्रयत्न सर्वांचाच असे. बलरामाच्याही हे सर्व लक्षात येत असेच. परंतु त्याचा त्याला राग येत नसे. कारण तो वयाने मोठा असून समजूतदारही होता. शिवाय आपल्याहून लहान असलेल्या कृष्णाविषयी त्याच्या ठिकाणी अत्यंत आपलेपणा होता. त्या लहान वयातही कृष्णाला असलेली योग्य समज आणि सर्वांच्या मनाला जाणून घेण्याची कृष्णाची वृत्ती बलरामाला ठाऊक होती. त्या गोष्टीचे त्याला विशेष कौतुकही होते. त्यामुळे बलरामही कृष्णाने ठरवलेल्या गोष्टीत मोकळेपणाने व पूर्णपणे सहभागी होई आणि त्याचा आनंद घेई.

सुरुवातीला नंदाने कृष्णाच्या व सर्वांच्याच सहाय्यासाठी ज्या मोठ्या व जाणकार मंडळींना त्यांच्या बरोबर पाठवले होते, त्यांच्याही ठिकाणी कृष्णाने आपल्याविषयी व आपल्या सवंगड्यांविषयी विश्वास निर्माण केला. त्यांची खात्री पटवली, की कृष्ण व त्याचे सवंगडी हे सर्व मिळून गाईगुरांची योग्य राखण करतील. एवढेच नव्हे, तर त्यांची व स्वतःचीही योग्य ती काळजी घेतील आणि सुरक्षितपणे जाऊन सुखरूपपणे घरी परत येतील. त्यामुळे पुढे पुढे मग त्या वयाने प्रौढ असलेल्या व्यक्तींनी गुरे राखण्याच्या कामातून हळुहळू आपले अंग काढून घेतले आणि सर्व भार कृष्ण, बलराम व त्यांच्या सवंगड्यांवर सोपवला. त्या सर्वांनी तो अगदी आनंदाने स्वीकारला. कारण त्यांच्यासाठी तो भार तर नव्हताच, तर ती एक पर्वणीच होती. त्यांना अगदी मनमोकळेपणाने वावरता येणार होते, मनसोक्त खेळता येणार होते आणि मनमुराद बागडता येणार होते. ते व त्यांचा अत्यंत आवडता असलेला कृष्ण आणि कृष्ण व त्याचे अत्यंत आवडते असलेले असे ते, बस्स्! या पलीकडे त्यांना काही ठाऊक नव्हते आणि काही माहिती करून घेण्याची आवश्यकताही त्यांना वाटत नव्हती. कृष्ण त्यांच्या प्रेमाचा आहे व ते कृष्णाच्या प्रेमाचे आहेत या भावातच त्यांचे सर्व सुख होते आणि कृष्ण त्यांच्यासाठी आहे व ते

कृष्णासाठी आहेत या अनुभवातच जणु त्यांचा खरा व सारा आनंद होता. त्यांच्या या कृष्णावरील निरागस प्रेमाची कृष्णालाही जाणीव होती. त्याचा कृष्णालाही अत्यंत आनंद होत असेच. परंतु त्याचबरोबर त्याच्या ठिकाणी आपल्या सर्व सवंगड्यांविषयीच्या एक प्रकारच्या जबाबदारीची जाणीवही असे. त्या सर्वांविषयी व त्यांच्या जीवनाविषयी कृष्णाच्या ठिकाणी अत्यंत काळजी असे. त्या सर्वांच्या स्वास्थ्याचा व हिताचाच विचार त्यामुळेच कृष्णाच्या मनात सुप्तपणे, पण सदैव असे.

भल्या पहाटे उठावे, लगबगीने आपले सर्व प्रातर्विधी उरकावेत, बरोबर आईने दिलेली शिदोरी घ्यावी, खांद्यावर कांबळे व हातात काठी धरावी, गोठ्यातील गुरांच्या दावणी सोडून त्यांना घराच्या अंगणाबाहेर काढावे आणि सर्वप्रथम कृष्णाच्या वाड्याचा रस्ता धरावा हा त्या गोपसवंगड्यांचा नित्यक्रम अगदी सहजपणे झाला. त्यांच्या ठिकाणचा उत्साह पाहून त्यांच्या आईवडिलांनाही नवल वाटे. एवढे दिवस ज्यांना एवढे लवकर उठायचे माहीत नव्हते आणि तसे लवकर उठवलेले ज्यांना अजिबात मानवत नसे, त्या आपल्या मुलांना अगदी आवडीने लवकर उठून सर्व गोष्टी भराभर व उत्साहाने करताना पाहून त्यांच्या आईवडिलांना साहजिकच अचंबा वाटला. नव्याची नवलाई नऊ दिवस, तर तेरड्याचे रंग तीन दिवस टिकतात या न्यायाने आपल्या मुलांच्या या उत्साहाकडे त्यांचे आईवडील अगदी कौतुकाने, तरीही जराशा सावधपणेच पहात होते. परंतु त्या मुलांचा उत्साह ओसरला तर नाहीच, पण दिवसेंदिवस तो वाढतच राहिला हे पाहून मात्र त्यांना आनंद झाला. उशिराने का होईना, पण आपल्या मुलांना समज आली आणि त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणीव झाली याचे समाधान त्यांना जरूर वाटले. पण ही सर्व जादू कशी व कोणामुळे झाली हे मात्र त्यांना उमगलेच नाही. ही जादू ज्याच्याकडून घडली तो जादूगार मात्र त्यांच्यासाठी अप्रगटच राहिला. परंतु त्या बाळगोपाळांना मात्र ही किमया ज्याच्यामुळे घडत आहे तो किमयागार केवळ ठाऊकच होता असे नव्हे, तर तो किमयागार व त्याची किमया हे दोन्ही त्यांना अत्यंत प्रिय होते. त्या बाळगोपाळांच्या प्रेमाखातर मग अधिकाधिक लीला कृष्णाकडून प्रगट होऊ लागल्या.

सुरुवातीला त्या बाळगोपाळांची साहजिकपणे एवढीच कल्पना होती, की गाईगुरे चरायला नेण्याच्या निमित्ताने घरापासून दूर, गोकुळाच्या बाहेर, रानावनात जायचे, तेथे भरपूर खेळायचे आणि यथेच्छ मौजमजा करायची. त्यामुळे ते सर्वजण अगदी खुशीत होते. परंतु त्यांच्या या खुशीच्या कल्पनेला कृष्णाच्या सांगण्यामुळे तडाच गेला. कृष्णाने सर्वांना अत्यंत स्पष्टपणे प्रथमतःच सांगितले, की आपल्या आईवडिलांनी व वडीलधाऱ्यांनी जो विश्वास आपल्यावर ठेवला आहे त्या विश्वासाला पात्र होऊन रहाणे ही आपली सर्वात प्राथमिक जबाबदारी आहे. त्यासाठी आपली गुरे राखण्याची कामगिरी आपण अत्यंत प्रामाणिकपणे व व्यवस्थितपणे पार पाडलीच पाहिजे. त्यात कोणत्याही प्रकारे हयगय करणे हे अयोग्यच आहे. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे या गाईगुरांमुळेच सर्व गोकुळवासीयांना मुबलक दूधदुभते मिळते, जे त्यांचे उपजीविकेचे महत्त्वाचे साधन आहे. एवढेच नव्हे, तर त्यांच्यावर आपले सर्व जीवनच अवलंबून आहे. तेव्हा त्या गाईगुरांची निगा राखणे व त्यांची योग्य काळजी घेणे हे तर आपले कर्तव्यकर्मच आहे.

परंतु त्याचबरोबर ती गाईगुरे जरी पशू असली तरीही त्यांच्या ठिकाणी जीव आहेच. ती मुकी असल्यामुळे जरी त्यांना बोलता येत नसले तरी त्यांनाही सुखदुःखाच्या भावना आहेत. त्यांनाही वेदना आहेत आणि संवेदनाही आहेत. तेव्हा त्यांचीही सुखदुःखे ओळखून व त्यांच्याही भावना जाणून घेऊन आपण त्यांना भूतदया दाखविली पाहिजे. या दृष्टीने त्यांच्याशीही आपण आपलेपणानेच वागले पाहिजे. त्यांच्या शारीरिक कष्टांची जाण आपल्या ठिकाणी सदैव असावयास हवी आणि आपल्याकडून त्यांना वृथा कष्टविणे घडता कामा नये. लहान वासरे, बछडे यांची आपण अधिक दक्षतेने काळजी घेतली पाहिजे. त्यांच्यावर आपले योग्य ते लक्ष हवेच, पण त्याचबरोबर त्यांची शेपटी पिरगळून त्यांना धावावयास लावणे, त्यांच्या पाठीवर बसून त्यांना आपल्याला हवे तसे पळविणे, त्यांच्या अंगावर बारीक बारीक दगड मारून त्यांना दचकविणे इत्यादी प्रकारे त्या बिचाऱ्यांना शारीरिक त्रास देऊन, स्वतः मात्र टाळ्या पिटून व हसून त्या सर्वांची मजा घेणे हे मात्र केवळ अयोग्यच नव्हे, तर अत्यंत गैर आहे. दुसऱ्याच्या दुःखामुळे ज्याला सुख होते तो मनुष्यच नव्हे, तर दुसऱ्यांचे दुःख जाणवून ज्याच्याठायी दया व कणव निर्माण होते आणि जो दुसऱ्यांचे कष्ट कमी करून दुःख दूर करतो, तोच खरा मनुष्य होय. एवढेच नव्हे, तर वेळप्रसंगी स्वतः दुःख सहन करूनही जो दुसऱ्याला सुखवितो, त्याच्यासारखा दुसरा भला मनुष्य तर या जगात कोठेही नाही. म्हणूनच आपला खेळ होण्यासाठी दुसऱ्या जीवांना त्रास देणे हे अत्यंत चुकीचे आहे आणि अशांना माझी साथ कदापि मिळणार नाही.

कृष्णाचे असे बोलणे ऐकून त्याचे सवंगडी, ते बाळगोपाळ प्रथम चकितच झाले. कृष्णाचे सांगणे त्यांना तेवढेसे मानवले नाही. पण थोडासा विचार केल्यावर त्यांना कृष्णाच्या बोलण्यातील अर्थ कळला व त्यातील भावनाही त्यांच्या लक्षात आली. कृष्णाचा विचार व सांगणे त्यांना पटले व तसेच वागण्याचे त्यांनी ठरवले. पण त्यांच्या दृष्टीने एकच मुद्दा अत्यंत महत्त्वाचा होता. तो म्हणजे, तसे न वागल्यास त्यांना कृष्णाची साथ लाभणार नव्हती आणि कुठल्याही परिस्थितीत त्यांना ती गोष्ट मुळीच मानवणारी नव्हती. कृष्णाची साथ नाही तर कशातच काहीही अर्थ नाही, ही कृष्णावरील आत्यंतिक प्रेमामुळे निर्माण झालेली भावना एवढी पक्केपणाने त्यांच्या ठिकाणी होती, की त्यासाठी काहीही सोडायला त्यांच्या मनाची तयारी अगदी सहज होती. कृष्णासाठी सर्व करणे आणि कृष्णाला प्रिय होऊन रहाणे एवढा छोटासाच भाव त्यांच्या ठिकाणी होता आणि तोच कितीतरी मोठा होता. त्यामुळे कृष्णाच्या सांगण्याप्रमाणे तंतोतंत वागणे त्यांच्याकडून लगोलग व अगदी सहजपणे घडायला लागले आणि त्याचा त्यांना अगदी मनापासून आनंदही व्हावयास लागला.

हे लक्ष्मी, कृष्णाने त्या बालगोपालांना आणखी एक गोष्ट अत्यंत आग्रहपूर्वक सांगितली की, ‘‘सर्व म्हणजे अगदी सर्व गाईगुरांची अत्यंत योग्य प्रकारे व सारखीच काळजी घेतली गेली पाहिजे. त्यात कोणत्याही प्रकारचा भेदभाव करता कामा नये. काही गुरे आता वयस्कर झालेली आहेत. त्यांच्या हालचालीही मंदावल्या आहेत, त्यांच्याकडून पूर्वीसारखे कामही होत नाही. तसेच काही गाईही आता दूध देईनाशा झाल्या आहेत. त्या आता पुन्हा गाभणही राहू शकणार नाहीत. परंतु या गाईगुरांचा आपल्याला आता उपयोग राहिलेला नाही म्हणून त्यांना कोणत्याही प्रकारे दुय्यम वागणूक देणे योग्य नाही, तर ते अत्यंत चुकीचेच आहे. एवढी वर्षे त्यांनी अत्यंत कष्ट करून आपली सेवा केली याचा विसर आपल्याला कदापि

पडता कामा नये. त्यांनी केलेल्या कष्टांची जाणीव आपल्या ठिकाणी सदैव असावयास हवी. त्या गाईगुरांच्या ठिकाणीही जीवच आहे, जो आपल्या ठिकाणी आहे. तेव्हा त्यांच्याविषयी 'जीवदया' ही आपणाठायी हवीच. कारण आपण मनुष्य आहोत याची जाणीव असावी. मग कृतज्ञता, दया हे तर मनुष्याठायीचे मुलभूत गुण आहेत याची आपल्या सर्वांना सदैव जाणीव असावी.

माझ्या असे पाहण्यात व लक्षात आले आहे, की अशी गाईगुरे म्हातारी व निरूपयोगी झाली, अशा दृष्टीने त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांना वेळच्या वेळी व पुरेसा चारा, पाणी दिले जात नाही. ती जलद चालू वा धावू शकत नाहीत म्हणून त्यांच्या पाठीवर काठ्याही मारल्या जातात. अशा तऱ्हेने त्यांना वागवणे हे क्रूरपणाचे व अमानुषच आहे. आपण सामान्य व साधे असलो तरी मनुष्य आहोत हे लक्षात ठेवावे आणि त्याच जाणिवेने आपले वागणेही असावे. तेव्हा अशा दुर्बल व गलितगात्र झालेल्या गाईगुरांची, जीही आपलीच आहेत, अधिक काळजी घेणे घडले पाहिजे. त्यांच्याविषयीची दया व आपलेपणा आपल्या ठिकाणी सदैव जागा ठेवावा व त्यांना आवश्यक त्या सहानुभूतीने आपल्याकडून वागवणे घडावे. त्यांचेही जगणे सुखाचे व स्वास्थ्याचे असावे याची काळजी आपणच घेतली पाहिजे आणि त्यासाठी त्यांना सर्वतोपरी मदतही आपणच केली पाहिजे.''

कृष्णाचे हे सांगणे ऐकून त्या बाळगोपाळांची पहिली प्रतिक्रिया म्हणजे त्यांना अत्यंत नवल तर वाटलेच, पण त्याचबरोबर त्यांच्या मनाला थोडासा धक्काही बसला. गाईगुरांसारख्या जनावरांकडेही एक जीव म्हणून पहाण्याची ही कृष्णाची दृष्टी त्यांच्यासाठी तर नवीनच होती आणि जराशी कठीणच होती. कारण एवढी वर्षे त्यांच्या दृष्टीला ही गुरे केवळ एक जनावर म्हणून नगण्यच होती. त्यांच्याकडून आपल्याला हवी तशी कामे, आपल्याला हव्या त्या प्रकारे करून घेणे आणि त्यांचा उपयोग संपला की एखाद्या निरुपयोगी वस्तूप्रमाणे त्यांना बाजूला सारून विसरून जाणे एवढेच त्यांना माहीत होते. एवढेच ते करीत होते. कारण ही दृष्टी त्यांना त्यांच्या आईवडिलांकडून जणू वारसा हक्कानेच प्राप्त झाली होती. परंतु कृष्णाविषयीचे प्रेम व त्याच्यावरील विश्वास यांमुळे त्यांच्याकडून कृष्णाच्या सांगण्याचा अधिकाधिक विचार घडू लागला आणि तसतसे त्यांना कृष्णाचे सांगणे पटूही लागले. त्याप्रमाणे जेव्हा त्यांच्याकडून प्रत्यक्ष वागणेही घडू लागले तेव्हा तर त्यांना कृष्णाच्या सांगण्याची खात्रीच पटली. त्यांच्या बदललेल्या दृष्टीमुळे व बदललेल्या वागण्यामुळे त्यांचे त्यांनाच बरे वाटू लागले. त्या गुरांविषयीची जीवदया त्यांच्या मनाठायीच निर्माण झाली. त्यामुळे त्यांचे असे माणुसकीचे वागणे त्यांच्याकडून अगदी सहजपणे घडू लागले. त्याचे समाधान त्यांच्या मनाला तर झालेच, परंतु कृष्णाच्या मनालाही अत्यंत संतोष झाला. या सर्वाची परिणती एवढीच झाली, की कृष्ण त्या बाळगोपाळांचा अधिकच आवडता झाला आणि त्यांचे मन कृष्णाठायीच जडून राहिले. त्यामुळे साहजिकच ते कृष्णाच्या प्रेमाला अधिकाधिक पात्र होऊ लागले आणि कृष्णाचेही त्यांच्याविषयीचे प्रेम अधिकाधिक व सहजपणे प्रगट होऊ लागले.

हे लक्ष्मी, त्यानंतर कृष्णाने अत्यंत प्रेमाने आपल्या सवंगड्यांच्या घरगुती व कौटुंबिक गोष्टींविषयी विचारपूस करायला सुरुवात केली. तेव्हा मग अनेक घरगुती अडचणी व कौटुंबिक समस्या त्यांच्याकडून हळुहळू कृष्णाला सांगितल्या जाऊ लागल्या. कृष्णाठायी असलेल्या त्यांच्याविषयीच्या आपुलकीची व प्रेमाची पूर्ण खात्री त्या बाळगोपाळांना असल्यामुळे, त्यांच्या कृष्णाशी वागण्या बोलण्यात पूर्ण मोकळेपणा येऊ लागला. कोणतीही गोष्ट कृष्णापासून कळत नकळत का होईना पण लपवून ठेवणे, हे त्यांच्या मनाला अजिबात मानवत नसे. सर्व म्हणजे अगदी सर्व काही कृष्णाला सांगितल्याशिवाय त्यांना मुळीच चैन पडत नसे. सर्व काही अगदी निःसंकोचपणे व खुलेपणाने कृष्णाला सांगितल्यावरच त्यांच्या मनाला मोकळे व बरे वाटत असे. अर्थात सुरुवातीला त्यांचा सूर साहजिकच तक्रारीचा व रागाचाच असे. त्यात त्यांनाही दोष देता येणार नाही. कारण त्यांच्या घरची परिस्थितीच त्याला कारणीभूत होती. कोणाची आई रागीट होती, तर कोणाचे वडील रागीट होते, तर कोणाचे दोघेही. पण त्यामुळे त्यांच्या घरी एक प्रकारचे भीतीचे व दहशतीचे वातावरण होते, कारण आईवडिलांच्या रागाची परिणती त्यांच्या परस्परांच्या भांडणात अथवा मुलांना मारण्यात होत असे. तर काहीजणांनी स्वतःहूनच कबूल केले, की त्यांचे आईवडील खरेच चांगले व शांत स्वभावाचे आहेत, पण ती मुलेच हट्टी व रागीट स्वभावाची आहेत.

कृष्णही सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेत असे आणि त्यांना तसे तसे मार्गदर्शन करीत असे. त्याच्या सांगण्याचे मुख्य सूत्र हेच असे की ''आई, वडील व घरातील वयाने थोर असलेल्या मंडळींचा योग्य तो मान कोणत्याही परिस्थितीत राखला गेलाच पाहिजे. त्यांचा अनादर केव्हाही केला जाऊ नये. त्यांनी आपल्यासाठी व सर्व कुटुंबासाठीच सोसलेल्या खस्ता व केलेले काबाडकष्ट यांची जाणीव पूर्णपणे आपल्याठायी असणे अत्यंत आवश्यक आहे. ती जाणीव आपल्या वागण्या-बोलण्यातून नेहमीच प्रगट झाली पाहिजे किंवा आपण ती तशी प्रगट केली पाहिजे. आपल्याकडून आपल्या कुटुंबातील वडीलधाऱ्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचा शारीरिक वा मानसिक त्रास, कळत नकळत का होईना, पण दिला जात नाही ना याची योग्य ती खबरदारी आपल्याकडून तर घेतली गेलीच पाहिजे, परंतु त्यांचेही कष्ट व त्रास जाणून घेऊन ते कमी करण्याचा आपला सदैव प्रयत्न असावा.''

हे लक्ष्मी, कृष्णाचे हे सांगणे त्या सवंगड्यांना साहजिकच थोडेसे विचित्रच वाटले. कारण त्या दृष्टीने त्यांनी आपल्या आईवडिलांकडे व कुटुंबियांकडे कधीही पाहिलेच नव्हते आणि तसे पहाणे त्यांना आतापर्यंत तरी आवश्यकच वाटले नव्हते. त्यामुळे आपले काही चुकत आहे वा चुकत असेल असा विचार त्यांच्या मनात चुकूनही कधी आला नव्हता. परंतु कृष्णाचे सांगणे ऐकल्यावर व त्याचा विचार केल्यावर मात्र त्यांना आपली चूक कळून चुकली. कृष्णाच्या सहवासाचा एक चांगला परिणाम त्याच्या सवंगड्यांवर झाला होता आणि तो म्हणजे, कृष्णाने काहीही सांगितल्यावर ते त्याचे सांगणे आधी शांतपणे ऐकून घेत. पण त्यानंतर त्यांच्या मनात त्याविषयी विचार सुरू होत. कृष्णाविषयी आत्यंतिक आपलेपणा असल्यामुळे आणि कृष्णाठायी त्यांच्याविषयी असलेल्या आपलेपणाची अगदी खात्री असल्यामुळे, त्यांच्या विचारांची दिशा नेहमी कृष्णाकडे असे. आपल्या आवडत्या कृष्णाला जे प्रिय आहे तसेच वागणे व बोलणे आपल्याकडून घडावयास हवे ही

त्यांच्या मनाची निश्चिती त्यांच्याठायी झालेली असल्यामुळे त्यांना जास्त वेळ विचारही करावा लागत नसे. कृष्णाचे सांगणे व त्याचा हेतू त्यांच्या लगेचच लक्षात येत असे. अर्थात कृष्णाचे सर्वच सांगणे त्यांना मानवत असे वा ते पूर्णपणे त्यांच्या मनाचे होई असे मुळीच नसे. परंतु कृष्णाची आपल्याकडून वागण्याची ही अपेक्षा आहे एवढे मात्र त्यांना लगेचच जाणवत असे. त्यामुळे तसे वागणे त्यांच्याकडून बाह्यांगाने का होईना, पण लागलीच घडत असे आणि हळुहळू त्याच्या दिसणाऱ्या बाह्य परिणामाने व स्वतःच्याही अनुभवाने कृष्णाचे सांगणे सर्वथा त्यांच्या मनाचे होऊन राही. त्यांचेही वागणे मग अगदी मनापासून घडू लागले आणि त्याचा त्यांनाच आनंद तर होऊ लागलाच, परंतु त्यामुळे कृष्णाला वाटणारे समाधान त्याच्या मुखावर पाहताना मात्र त्यांचा आनंद द्विगुणित नव्हे तर शतगुणितच होत असे.

हे लक्ष्मी, आपल्या मुलांमध्ये झालेला हा स्तुत्य बदल पाहून त्यांच्या आईवडिलांना व कुटुंबीयांना साहजिकच सुरुवातीला नवल वाटले. पण मग बरेही वाटले. मुख्यतः त्यांचा मान व मोठेपणा राखला जात होता म्हणून त्यांनी या बदलाचे अगदी कौतुकाने स्वागत केले. घराघरांतील संघर्षाचे व कलहाचे प्रसंग हळुहळू टळू लागले व कमी कमी होऊ लागले. त्यामुळे सर्व कुटुंबामध्ये स्वास्थ्याचे व शांततेचे वातावरण निर्माण झाले. परस्परांतील आपलेपणा वाढू लागला व मोकळेपणा निर्माण होऊ लागला. हा झालेला सर्व बदल कृष्णाच्या सांगण्यामुळे घडत आहे हे कळल्यावर तर सर्व घराघरांत कृष्ण हा प्रेमाचा व कौतुकाचा विषय होऊन राहिला. कृष्णाचे गोडवे सर्वजण गाऊ लागले आणि कृष्ण हा सर्वांचाच आवडता होऊन राहिला.

हे लक्ष्मी, कृष्णाचे सांगणे हे एवढ्यावरच थांबण्यासारखे नव्हते. आपल्या सवंगड्यांच्या ठिकाणी आधी माणुसकी, नंतर स्वतःच्या कर्तव्यकर्माची भावना, त्याचबरोबर योग्य प्रकारचे वागणे या गोष्टींची जाणीव कृष्णाने निर्माण केल्यामुळे त्यांच्या ठिकाणचा सात्त्विक भाव जरूर जागा झाला. कृष्णाच्या सहवासात तो वृद्धिंगतही होत राहिला. परंतु त्यानंतर कृष्णाने सर्वात महत्त्वाची एक गोष्ट केली, ती म्हणजे आपल्या सवंगड्यांच्या ठिकाणी स्वत्वाची जाणीव निर्माण केली. सर्वांना विश्वासात घेऊन व त्यांच्याशी सतत बोलत राहून तो ही जाणीव हळुहळू वाढवत राहिला.

त्याचे सर्वांना नेहमी एकच सांगणे असे की, ''आपण आपल्या आई, वडिलांच्या पोटी जन्माला आलो, त्यांच्याच कुटुंबात वाढलो हे खरे आहे. त्यामुळे आपण आईवडिलांचे व कुटुंबीयांचे काही तरी देणे निश्चितपणे लागतो हे अगदी खरे आहे. परंतु हे पूर्णपणाने खरे नाही. आपले म्हणून काही तरी स्वतंत्र अस्तित्व आहेच. ते अस्तित्वच मुलभूत, म्हणून महत्त्वाचे आहे. आपण कोणा आईवडिलांच्या पोटी जन्मलो, कोणत्या कुटुंबात वाढलो हे केवळ निमित्तमात्र आहे. खरा जन्म आपल्याला ईश्वरामुळेच लाभला आहे. खरे तर त्यानेच आपल्याला जन्माला घातले आहे आणि तोच आपल्याला वाढवीत आहे. तेव्हा जन्माला आपण आलो आहोत हेच खरे आहे. तेव्हा आपल्याला आपल्या अस्तित्वाची जाणीव असणे अत्यंत आवश्यक आहे. कारण आपले जीवन पुढे आपल्याला जगायचे आहे. ठराविक काळानंतर आपले आईवडील वा आपले कुटुंबीय यांचीही मदत आपल्याला मिळणार नाही. कारण ते सदैव आपल्या जीवनात आपल्यासाठी उपलब्ध असू

शकणार नाहीत.  तेव्हा त्यासाठी आपले मनोबळ आपल्यालाच वाढवावे लागणार आहे.  कोणी कितीही आपल्याला रक्षण दिले, आपल्याला वाढवले, आपल्याला काही मार्गदर्शन केले तरी कोणीही आपली कायमची जबाबदारी घेऊ शकणार नाहीच. हे सर्व ओळखूनच आपल्याला आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण स्वतःच करावयाची आहे हे लक्षात ठेवा.  अर्थात मीसुद्धा केवळ सांगण्यापुरताच निश्चितपणे रहाणार नाही.  मी सदैव तुमच्याबरोबर असेन.  तुम्ही माझ्याशी वारंवार बोलून खात्री ही करून घ्यायची आहेच.  प्रत्यक्ष येणाऱ्या अडचणींवरील उपाय मला विचारून घ्यायचे आहेत.  त्यासाठी मी तर नेहमीच तुम्हाला उपलब्ध आहे.  परंतु एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेवा, की तुमचे मनोबळ तुम्हांलाच घ्यायचे आहे आणि तुम्हालाच ते वाढवायचेही आहे.  मी फक्त तुम्हाला मार्गदर्शन करीत राहीन.

तेव्हा असे स्वतःचे अस्तित्व ओळखण्यासाठी व स्वतःचे मनोबळ वाढविण्यासाठी सर्वात प्रथम एक गोष्ट करा, की स्वतःच्या मनातील विचार आपल्या घरात मोकळेपणाने बोलण्यास सुरुवात करा.  त्यासाठी आधी विचार करायला शिका. आपल्या मनाला स्वतंत्र विचार करण्याची सवय लावा.  केवळ सांगकामे किंवा मुकी मेंढरे बनू नका.  आपले म्हणणे सर्वांचा योग्य मान ठेवून व आदर राखून, पण सांगत रहा.  आपले कर्तव्यकर्म दुसऱ्यांच्या बाबतीतले पूर्ण झाले, तरी आपले स्वतःच्या बाबतीतले कर्तव्यकर्म करणे शिल्लक राहिले आहे हे लक्षात ठेवा.  कर्तव्यकर्म योग्य प्रकारे पार पाडल्यानंतर आपल्या हक्कांचीही जाणीव आपल्याठायी हवीच.  आपले कर्तव्य न करताच आपला हक्क गाजवीत रहाणे हे जसे अत्यंत चुकीचे आहे, तसेच आपले कर्तव्य करूनही आपले वेगळेपण, आपले स्वातंत्र्य व आपले हक्क आपल्याला राखता आले नाहीत तर तेही तेवढेच चुकीचे आहे.  कारण त्यामुळेच आपल्याला आपले स्वतंत्र अस्तित्व व आपले स्वत्व ओळखता येईल, राखता येईल आणि त्याची जाणीव वाढविताही येईल.''

हे लक्ष्मी, कृष्णाचे हे विचार त्याच्या सर्वच सवंगड्यांना धक्का देणारेच होते.  मुळात कृष्णाचे सांगणेच त्यांना पूर्णपणे कळू शकले नाही.  'अस्तित्व' काय, 'स्वत्व' काय हे शब्द त्यांना आधी मुळी माहीतच नव्हते.  असे शब्द ते प्रथमच ऐकत होते, मग त्याचा अर्थ कळणे तर दूरच राहिले.  परंतु कृष्ण आपल्याला काही तरी वेगळे दाखवीत आहे आणि काही तरी वेगळेच करायला सांगत आहे, एवढे मात्र त्या सर्वांच्या जरूर लक्षात आले.  परंतु तेच त्यांना नीटपणे समजेना.  तरीही कृष्णाने आपले सांगणे सोडले नाही.  तो प्रसंगाप्रसंगाने व कारणाकारणाने त्यांच्याशी बोलतच राहिला आणि त्याचा योग्य तो परिणाम हळूहळू का होईना, पण त्या गोपसवंगड्यांवर निश्चितपणे होत राहिला.  त्यांना कृष्णाच्या सांगण्यातील शब्दार्थ जरी कळला नाही, तरी त्या सांगण्यातील हेतू त्यांच्या लक्षात आला.  परंतु तसे वागण्याचा धीर मात्र त्यांना होईना.  पण कृष्ण जणू त्यांच्या पाठीशीच लागल्यासारखे करीत असे.  तो वारंवार सवंगड्यांना विचारून त्यांची चौकशी करीत असे.  'त्यांनी त्यांचे म्हणणे घरी सांगितले की नाही?  त्यांच्या मनातील विचार त्यांनी त्यांच्या घरच्या मंडळींसमोर मांडले की नाही? स्वतःच्या बाबतीत त्यांच्या मनाला पटल्याप्रमाणे वागण्याचा धीर त्यांना होतो की नाही?  तेवढे धैर्य त्यांच्या मनाला प्राप्त होत आहे की नाही?' या सर्व गोष्टींची खात्री कृष्ण त्यांच्याशी वारंवार बोलून करीत असे.  त्यामुळे कृष्णाला अपेक्षित असणारा परिणाम त्याच्या सवंगड्यांवर होऊ लागला आणि तो तसा त्यांच्या वागण्या-बोलण्यातून दिसूही लागला.

कृष्णावरील प्रेमामुळे व श्रद्धेने त्यांचाही धीर हळुहळू चेपू लागला आणि ते आपल्या जीवनाचा हळुहळू विचार करू लागले. आपल्याविषयी व घरातील घडणाऱ्या गोष्टींविषयी ते आपले विचार व म्हणणे बोलू लागले.

काही काही वेळा ते स्वतःच्या बाबतीत मर्यादित स्वातंत्र्य घेऊ लागले. कृष्णाने त्यांना मर्यादा व स्वातंत्र्य यांची योग्य जाणीव करून दिली होती. 'केवळ मर्यादेचे पालन करीत राहिले तर आपली स्वतंत्रता आपण गमावून बसू आणि केवळ स्वातंत्र्यच आपण अनुभवत राहू, तर त्याच्या मर्यादेचे भान आपल्याला रहाणार नाही' या कृष्णाच्या सांगण्याचा अर्थ अगदी पक्केपणाने त्यांच्या लक्षात आला होता. 'मर्यादेत रहाणे म्हणजे सदैव बंधनात रहाणे नव्हे आणि स्वातंत्र्य घेणे म्हणजे स्वार्थीपणा व स्वैराचार नव्हे' हे त्यांना पूर्णपणे ठाऊक झाले होते. त्यामुळे योग्य स्वातंत्र्य घेण्याचा त्यांच्या मनाचा निश्चय कायम होता. त्यातूनही काही चुकले तर सांभाळून घेण्यासाठी, सांगण्यासाठी आणि सुधारण्यासाठी प्रत्यक्ष कृष्ण तर होताच. तो त्यांचा सवंगडी तर होताच, पण मार्गदर्शकही होता आणि पाठीराखाही होता. त्यामुळे येणाऱ्या अडचणींची त्यांना भीती नव्हती. बदल होताना व करताना काही तरी अडचणी या येणारच आहेत हे ते गोपबाळ जाणून होते आणि हे लक्ष्मी, तशा त्या पुढे आल्याही!

हे लक्ष्मी, गोपबाळांच्या वागण्या-बोलण्यातील बदलाला प्रथम कोणी आक्षेप घेतला असेल तर साहजिकच त्यांच्या आईवडिलांनी व कुटुंबियांनी! सुरुवातीला जेव्हा त्या गोपबालकांच्या ठायी कर्तव्यकर्माची आवश्यकता, सहजीवनाचे महत्त्व, वडिलधाऱ्यांविषयी योग्य मान यांची जाणीव निर्माण झाल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी पाहिले, तेव्हा त्यांना ते योग्य वाटले आणि त्याचे अत्यंत समाधान त्यांच्या मनाला झाले. या बदलामागे कृष्णाचे सांगणे आहे हे कळल्यावर तर त्यांनी कृष्णाचेही अतिशय कौतुक केले. कारण त्यात त्यांचा मान व मोठेपणा राखला जात होता. परंतु जेव्हा त्यांच्याच मुलाबाळांमधील स्वत्व जागे होऊ लागले व त्यांची स्वतंत्र वृत्ती दिसू लागली, तेव्हा मात्र या वडीलधाऱ्या मंडळींना ते सहन झाले नाही. त्यांच्या मोठेपणाला धक्का पोहोचू लागला. आपलीच मुले विचारांचा व आचाराचा स्वतंत्रपणा दाखवीत आहेत आणि स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवीत आहेत याचा आनंद त्यांना मुळीच वाटेना. उलट त्यात त्यांना त्यांचा अवमानच जाणवू लागला. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया सुरुवातीला रागावण्यात व नंतर बिथरण्यात झाली. त्यांनी घरात आकांडतांडव सुरू करून आपल्या मुलांवर मानसिक दबाव आणण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु कृष्णाच्या प्रेमाने प्रभावित झालेले ते बाळगोपाळ मात्र कृष्णाच्या सांगण्यानुसारच वागत असत. स्वतःच्या मनाचा तोल जाऊ न देता, कोणाचाही अवमान न करता ते बाळगोपाळ कृष्णावरील विश्वासाने कृष्णाला अनुसरत राहिले. तेव्हा मात्र, एवढे दिवस कृष्णाचे कौतुक करणारी ही वडीलधारी मंडळी कृष्णाला दूषणे देऊ लागली. 'कृष्णामुळे आमची मुले बिघडत असून, ती आता आमच्या ताब्यात मुळीच राहिलेली नाहीत. उलट कृष्णामुळे आमच्या कुटुंबातील तेढ वाढत आहे आणि कृष्ण आमच्यात फूट पाडत आहे' अशी तक्रार घेऊन ते नंदाकडे गेले.

नंदाने सर्वांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि त्याबाबत योग्य ती चौकशी करण्याचे आश्वासन त्यांना दिले. त्याप्रमाणे त्याने कृष्णाला बोलावूनही घेतले आणि त्याच्याकडे सर्व विचारणाही केली. नंदाने सर्व बाळगोपाळांनाही बोलावून घेतले व त्यांच्याशी अगदी खुलासेवार बोलणे केले. त्यातून त्याला हेच जाणवले, की कृष्ण जे काही त्याच्या सवंगड्यांना सांगत होता ते योग्य व रास्तच होते. प्रश्न एवढाच आणि अत्यंत महत्त्वाचा असा होता, की हे सर्व त्यांना कृष्णाने सांगणे कितपत बरोबर आहे? त्या मुलांची वडीलधारी मंडळी त्यांच्या त्यांच्या घरी असताना ही जबाबदारी कृष्णाने घेण्याचे काहीच कारण नव्हते. त्यातून निष्कारण व फुकटचा वाईटपणा मात्र कृष्णाला घ्यावा लागत होता. तेव्हा कृष्णाने आपल्या सवंगड्यांबरोबरचे संबंध खेळण्याच्या व गुरे राखण्याच्या पलीकडे उगाचच न वाढवणे हेच योग्य ठरेल. कारण त्यामुळे विनाकारण गैरसमज निर्माण होऊन ते वाढण्याचीच शक्यता अधिक आहे. त्यामुळे कोणालाही मार्गदर्शन करण्याची वा त्यांच्यावर संस्कार करण्याची किंवा त्यांचे जीवन घडविण्याची जबाबदारी कृष्णाने मुळीच घेऊ नये. तसे कृष्णाने करणे हे केवळ अनावश्यक नव्हे, तर चुकीचेच आहे.

नंदाचे हे सांगणे कृष्णाने आदरपूर्वक ऐकून घेतले खरे, पण तो त्याच्याशी सहमत मात्र झाला नाही. बलरामाला मात्र नंदाचे बोलणे अगदी मनापासून पटले आणि त्याच्या नेमस्त स्वभावानुसार ते साहजिकच होते. त्यानेही कृष्णाला समजावून सांगितले की, कृष्णाचा हेतू जरी कितीही चांगला असला तरी त्यामुळे जर कोणाच्या कुटुंबातील वातावरण अधिकच बिघडत असेल, तर कृष्णाचे सांगणे व वागणे हे अयोग्यच आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृष्णाच्या या भूमिकेमुळे नंदाला मात्र उगाचच्या उगाचच सर्वांकडून दोष लावला जात आहे. तेव्हा नंदासाठी तरी का होईना, परंतु कृष्णाने या सर्व गोष्टींपासून दूर राहिले पाहिजे आणि त्याच्या सवंगड्यांची काहीही जबाबदारी स्वतः न घेता ती सर्व त्याने त्यांच्या आईवडिलांवर सोपवणेच अधिक उचित आहे.

बलरामाच्या याही सांगण्याचा कृष्णावर काहीही परिणाम झाला नाही. त्याची आग्रही भूमिका कायम राहिली. त्याने आपली भूमिका पुन्हा एकदा सर्वांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. त्याची एकच भूमिका होती की ''हे सर्व बालगोपाळ माझे सवंगडी आहेत. त्यांना मी केवळ माझे साथीदारच नव्हे तर मित्र मानतो. त्यामुळे त्यांचे माझ्याशी व माझे त्यांच्याशी एक प्रकारचे भावनिक नाते आहे. तेव्हा आमचे संबंध केवळ खाण्यापिण्याचे किंवा खेळण्यापुरतेच मर्यादित रहाणे शक्य नाही. त्यांच्या सुखदुःखाच्या भावनेत मी मनाने सहभागी होणारच आणि त्यांना त्यांचे जीवन जगण्यासाठी जेवढी मदत करता येईल तेवढी ती माझ्याकडून होणारच! त्यांच्या हिताच्या ज्या गोष्टी आहेत त्या माझ्याकडून सांगितल्या जाणारच अणि माझ्या सवंगड्यांची माझ्यावर श्रद्धा व विश्वास असल्यामुळे त्यांच्याकडून माझ्या सांगण्यानुसार वागणे हेही घडणारच! हे सर्व अगदी साहजिकच आहे आणि आमच्यात असलेल्या मैत्रीच्या नात्याला हे सर्व धरूनच आहे.

आता प्रश्न शिल्लक राहिला आहे तो कुटुंबा-कुटुंबात निर्माण होणाऱ्या मतभेदांचा व त्यातून होणाऱ्या कलहांचा. परंतु त्यासाठी केवळ माझ्या सवंगड्यांनाच जबाबदार धरता येणार नाही वा मलाही त्याचा दोष देता येणार नाही. माझे

सवंगडी तसे फार मोठे झालेले नाहीत. त्यांचीही शारीरिक व मानसिक वाढ अजूनही होतच आहे. तेव्हा त्यांच्याकडून एखादे वेळेस कळत नकळत, जाणता अजाणता मर्यादेचे उल्लंघन त्यांच्या उत्साहाच्या भरात होत असेलही. परंतु अशा वेळी समजूतदारपणा दाखविण्याची जबाबदारी मोठ्यांचीच जास्त आहे. वयाच्या मोठेपणाला मनाच्या मोठेपणाची जोड हवी. मुख्य म्हणजे स्वतःच्या मोठेपणात अडकून न रहाता त्यांनी स्वतःहून आपलेपणाने आपल्या मुलांशी जवळीकता साधली पाहिजे. त्यासाठी आपला मोठेपणा बाजूला केला पाहिजे आणि तो विसरलाही पाहिजे. त्यांच्या मुलांच्या वागण्या-बोलण्यामागील हेतू आधी त्यांनी लक्षात घेतला पाहिजे. आपल्या मुलांना समजूनही घेतले पाहिजे आणि आवश्यक तेव्हा समजावूनही सांगितले पाहिजे.

एक गोष्ट अगदी निर्विवाद आहे, की ज्याच्या त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास ज्याला त्यालाच करावा लागतो आणि व्यक्तिमत्त्वाचा विकास म्हणजे मुळात मनाचाच विकास होय. वाढत्या वयाबरोबर मनाचीही वाढ होणे आवश्यक आहे. मनाची वाढ म्हणजे मन अधिकाधिक विकसित होणे, ते अधिकाधिक फुलणे होय. असा मनाचा विकास होणे हे केवळ प्रेमानेच शक्य आहे. ते प्रेम व आपलेपणा जर या मोठ्या माणसांकडून त्यांच्या मुलाबाळांना मिळाला, तर त्यांचे व्यक्तित्व विकास पावण्यासाठी त्यांना केवढे तरी सहाय्य मिळेल. मग कोठेही मतभेद व कलह निर्माण होण्याचे कारणच रहाणार नाही. सर्व कुटुंबात शांततेचे व सलोख्याचे वातावरण राहील आणि सर्वचजण एकत्र व एकोप्याने नांदतील.

परंतु असा आपलेपणा व प्रेम कुटुंबाकुटुंबात हळुहळू दिसेनासे होत चालले आहे. कारण मुळात ते व्यक्ती-व्यक्तींच्या ठिकाणीच कमी होत आहे. प्रत्येक व्यक्ती ही अधिकाधिक संकुचित स्वभावाची व त्यामुळे स्वार्थी भावाची होऊ लागली आहे. त्यामुळे आपला स्वार्थ साधावा व आपला विचार इतरांवर जेवढा शक्य होईल तेवढा लादावा हाच प्रयत्न सर्वांकडून सहजपणे घडत आहे. केवळ आपल्या वडीलकीच्या नात्याचा व वयाचा मोठेपणा गाजविणे या पलीकडे आपली काही जबाबदारी आहे हे कोणाला ठाऊकच नाही आणि त्यासंबंधी कोणी कोणाला सांगायची सोयही नाही. असे जरी असले तरी माझ्या ठिकाणी मात्र माझ्या सवंगड्यांबाबत आपलेपणा व प्रेम अत्यंत स्वाभाविकपणे आहे. त्यामुळे माझ्याकडून त्यांना त्यांच्या हिताच्या गोष्टी सहजपणे पुन्हा पुन्हा सांगितल्या जाणार. त्या गोष्टींचा आग्रहही मी धरणार. एवढेच नव्हे, तर त्यासाठी त्यांना सर्वप्रकारे सहाय्यभूतही होत रहाणार हे मात्र अगदी नक्की!''

हे लक्ष्मी, कृष्णाची ही भूमिका अत्यंत स्पष्ट व सडेतोड होतीच, परंतु ती तर्कशुद्धही होती. अर्थात सर्वांनाच ती कळली असेही नाही आणि ज्यांना ती कळली त्यांना त्यांच्या मनाच्या आडमुठेपणामुळे मानवली नाही. त्यामुळे साहजिकच त्यांच्याकडून तशा तशा प्रतिक्रिया प्रगट झाल्या. अनेकांनी आपल्या मुलाबाळांना कृष्णाशी असलेले संबंध सोडायला भाग पाडले. त्यांना गुरे राखण्याच्या कामातून बाजूला केले. कारण काय? तर त्या निमित्ताने त्यांची कृष्णाशी होणारी भेट होऊ नये. कृष्णाचा व त्यांचा संबंधच आला नाही म्हणजे कृष्णाचे व त्यांचे काही बोलणेच होणार नाही आणि मुलांवर काहीही विपरीत परिणाम होण्याची शक्यताही मग अजिबात नाहीशी होईल हाच त्यामागील उघड हेतू होता. काही जणांनी एवढी

कडक भूमिका न घेता थोडीशी सौम्य भूमिका घेतली. आपल्या मुलांना गुरे राखण्यासाठी जाण्याची परवानगी दिली. परंतु कृष्णाशी कोणताही संपर्क ठेवू नये अशी अट घातली. नंदानेही कृष्णाला पुन्हा समजावून सांगितले व योग्य ती समजही दिली. सर्व सवंगड्यांशी खेळण्यापुरते व गुरे राखण्याच्या कामापुरते संबंध राखावेत असे कृष्णाला आग्रहपूर्वक बजावून सांगितले. नंदाला एकीकडे कृष्णाठायी असलेली योग्य समज व त्याची विचार करण्याची प्रौढ बुद्धी याविषयी अत्यंत कौतुकच वाटले. कृष्णाचे म्हणणे अगदी बरोबर आहे याची नंदाला खात्री होती. म्हणूनच तर त्याने तशी मोकळीक व स्वातंत्र्य कृष्णाला आपणहून अगदी खुशीने दिले होते. परंतु गोकुळचा राजा या नात्याने मात्र तो इतर कोणावर तशी सक्ती करू शकत नव्हता.

या सर्वाचा परिणाम म्हणजे कृष्णाचे सर्व सवंगडी नाराज व थोडेसे निराशही झाले. कारण कोणत्याही परिस्थितीत कृष्णाला सोडून रहाण्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवू शकत नव्हता. परंतु कृष्णाने सर्वांना आधी शांत रहाण्यास सांगितले. यातून नक्की काही तरी मार्ग निघेल व आपण तसा मार्ग काढूही, अशी खात्री त्याने सर्वांना बाळगावयास सांगितली. कृष्णाने दिलेल्या आश्वासनावर विश्वास ठेवून त्याचे सवंगडी मनाने व बाह्यांगानेही शांत राहिले आणि कृष्णाचे म्हणणे ऐकण्यासाठी आतुर होऊन राहिले.

कृष्णानेही सर्व गोष्टींचा साधकबाधक विचार केला आणि त्यातूनही त्याने मार्ग हा काढलाच. कृष्ण हे पूर्णपणे जाणून होता की प्रत्येक अडचणीवर उपाय हा आहेच. फक्त तो उपाय पाहण्याची दृष्टी हवी आणि तो उपाय करण्याची मनाची हिंमत हवी. अनेकदा शक्तीपेक्षा युक्तीच वापरणे आवश्यक असते आणि वाद होत असतील तर ते टाळणेच हितकारक असते हे कृष्ण ओळखून होता. त्यामुळे त्याने आपल्या सवंगड्यांनाही तोच सल्ला दिला की, 'कोणाशीही निरर्थक वाद घालू नका. परंतु आपली योग्य भूमिका ही मात्र न सोडता मनात पक्केपणाने धरून ठेवा. वडीलधाऱ्या मंडळींचा कोणत्याही प्रकारे अनादर करू नका. परंतु आपले वागण्याचे व्यक्तिगत स्वातंत्र्य मात्र सांगून सवरून किंवा वेळप्रसंगी न सांगताही, पण जरूर घेत रहा. असे वागण्यात काहीही अयोग्य वा गैर नाही याची खात्री बाळगा. सर्वात महत्त्वाचे म्हणजे कृष्णाच्या नावाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे जराही व कोठेही उल्लेख करू नका. कारण कृष्णाच्या नावाचेच ज्यांना वावडे आहे त्यांच्यासमोर तसा कृष्णाचा नामनिर्देश करणे म्हणजे आधीच भडकलेल्या आगीत मुद्दामहून तेल टाकून अधिकच भडका उडविण्यासारखे आहे. तेव्हा ते जाणीवपूर्वक व प्रयत्नपूर्वकच टाळणे आवश्यक आहे. त्यामुळे निदान कुटुंबातील बाह्य वातावरण तरी शांततेचे राहील आणि ते तसे राखणे हेही अत्यंत जरुरीचेच आहे.'

कृष्णाचे हे धोरणात्मक सांगणे व त्याचा हेतू त्याच्या सवंगड्यांच्या हळुहळू, तसे वागता वागता लक्षात आला. त्यामुळे घराघरांतील वातावरण बरेचसे निवळले खरे, परंतु कृष्णाविषयीचा थोडासा राग व बरीचशी नाराजी मात्र काहीजणांच्या मनात कायम राहिली ती राहिलीच. त्यासाठी कोणाचाच व कोणताच इलाज नव्हता. परंतु एक गोष्ट मात्र या सर्वांतून घडतच राहिली, ती म्हणजे कृष्णाचे व त्याच्या सवंगड्यांचे परस्परांना भेटणे, सहवास करणे हे कुठल्या ना कुठल्या

साहित्य प्रतिष्ठान®

प्रकारे होतच राहिले. त्याला कोणतीच आडकाठी येऊ शकली नाही. वेगळ्या वेगळ्या वेळी, वेगळ्या वेगळ्या ठिकाणी, जसे जमेल तसे व तेव्हा त्यांची भेट होतच राहिली. कारण त्या भेटीच्या मुळाशी असलेली प्रेमाची ओढ ही उभयतांच्या ठिकाणी एकीएकच होती आणि ती कायमचीच होती. अशी प्रेमाची ओढ मनाच्या ठायी असली की मग कोणत्याही बाह्य अडचणी या आड येत नाहीत. त्या सहजपणे बाजूला करून किंवा त्यांच्यावर मात करून प्रेमभावाची पूर्ती ही कोणत्याही परिस्थितीत केली जातेच जाते, हे मात्र सत्य आहे. त्याचाच अनुभव कृष्ण व त्याचे सवंगडी घेत राहिले. परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळे त्यांचे प्रेमसंबंध अधिकच दृढ झाले.''

एवढा वेळ अगदी एकाग्रतेने श्रवण करीत असलेल्या लक्ष्मीच्या मनाच्या ठिकाणचे कुतूहल ऐकता ऐकता सारखे वाढतच होते. या कुतूहलापोटीच तिच्या मनाला स्वस्थ राहवेनाच. परंतु एकीकडे श्रवणाची उत्सुकताही सारखी वाढतच होती. शेवटी तिच्या मनाचा नाइलाजच झाला आणि तिच्या मनाची अवस्था तिच्याकडून शब्दरूपाने प्रगट होऊ लागलीच.

''हे नारदा, या कृष्णाचे सर्वच काही अगदी वेगळेच दिसते. एवढ्या लहान वयात त्याच्या ठिकाणी असलेली समज पाहून मला तरी नवलच वाटत आहे. अरे, एवढी समज तर मोठ्या माणसांना मोठ्या वयातही सहसा असत नाही. मग कृष्णाठायी एवढी समज कशी व कुठून आली? एवढे ज्ञान त्याला कोठून व कोणापासून प्राप्त झाले बरे? खरोखरी हे सारे तर एक आश्चर्यच आहे. परंतु एक गोष्ट मात्र खरी आहे की, कृष्णाची भूमिका व त्याचे सांगणे मात्र अगदी बरोबर होते. अर्थात ते सर्वांना समजणे हेही कठीणच आहे म्हणा! आणि समजले तरी ते मानवणे हे त्याहूनही कठीण आहे. परंतु कृष्णाच्या सवंगड्यांचे मात्र हे भाग्यच म्हणायला हवे की त्यांना कृष्णासारखा त्यांचे हित जाणणारा, सांगणारा व करणाराही असा सखा भेटला. त्यांनी मात्र योग्य समज करून घेतली व कृष्णरूपाने मिळालेल्या संधीचा लाभ उठवला याबद्दल कृष्णाच्या सवंगड्यांचे देखील खरेच कौतुक आहे.

हे नारदा, मला आणखीन एक गोष्ट जाणून घेण्याची अतिशय उत्सुकता लागून राहिली आहे. अरे, त्या कृष्णाने सर्वांचे व्यक्तिमत्त्व घडवावयास सुरुवात केली हे योग्य व चांगलेच झाले. परंतु मुळामध्ये कृष्णाच्या सहवासात खेळायला व मौजमजा करायला मिळावी या हेतूने जे सर्वजण गुरे राखण्याच्या निमित्ताने घराबाहेर पडत होते, त्या हेतूचे काय झाले? त्याची पूर्तता कृष्णाने केली की नाही? अर्थात ती कृष्णाने केली असणारच. परंतु कशी केली हे जाणून घेण्याची माझी उत्कंठा फारच वाढून राहिली आहे. त्यासाठी कृष्णाने काय योजना केली व त्याच्या लीला कशा प्रगट झाल्या, ते हे नारदा, मला अगदी सविस्तरपणे सांग. कारण त्या प्रेमलीलांशिवाय अधिक सुखकारक व आनंददायी असे या सृष्टीतच नव्हे, तर सर्व विश्वातच दुसरे काय आहे? खरे ना?''

लक्ष्मीच्या बोलण्याने झालेली खुशी नारदाच्या मुखावरील स्मित हास्याने प्रगट झाली. नारदाने सहजोद्गाराने लक्ष्मीला दाद देत म्हटले, ''अगदी बरोबर! हे लक्ष्मी, तुझे म्हणणे अत्यंत यथार्थच आहे. अगं, खरे तर हे सर्व विश्वच या नारायणाची लीला आहे. परंतु ती आकलन होणे अतिशय कठीणच आहे. मग त्याचा आनंद होणे हे तर जवळजवळ

अशक्यच आहे. या विश्वात निर्माण झालेली जीवसृष्टी ही सुद्धा खरे तर या नारायणाचीच लीला आहे. परंतु तीही सामान्य जिवाच्या दृष्टीने पहाता एवढी व्यापक आहे, की त्या सृष्टीला पूर्णपणे पाहणे व जाणणे सामान्यांच्या कुवतीच्या बाहेरचेच आहे. परंतु मानवी देहाने अवतरून या नारायणाकडून प्रगटलेल्या प्रेमलीला मात्र सामान्यांच्याच निमित्ताने घडलेल्या होत्या. त्यामुळे सर्वसामान्यांच्या मनाला त्या प्रेमलीला सुखवित्या तर झाल्याच, पण त्याचबरोबर त्यांच्या उद्धारालाही कारणीभूत व सहाय्यभूत झाल्या हे महत्त्वाचे! आधी सुख घेता घेताच काही जणांच्या ठिकाणी या नारायणाच्या कृष्णरूपाविषयी प्रेम निर्माण झाले. प्रेमातून प्रीती जडली. प्रीतीमुळे प्रत्यक्ष भक्ती घडली. भक्तीमुळे सर्व विभक्तता दूर होऊन कृष्णरूपाने नारायणाशी ऐक्य झाले आणि एकीएक आनंदाचाच अनुभव येऊन राहिला. तेव्हा अगदी सुखापासून सुरुवात होऊन आनंदाच्या अत्यंत उच्च अनुभवाच्या अवस्थेपर्यंत जाण्याचा सगुण प्रेमभक्तिमार्ग केवळ या नारायणाच्या कृष्णावतारातील प्रेमलीलांमुळेच प्रगट व उपलब्ध झाला हे मात्र निखालस सत्य आहे. तेव्हा कृष्णाने आपल्या सवंगड्यांसाठी सर्व सुखांची लयलूट केली यात नवल ते काय?

हे लक्ष्मी, सर्वात प्रथम कृष्णाने काय केले असेल, तर सर्वांच्या रसनेला भरपूर सुखविले. खरे तर त्याच्या सवंगड्यांना पोटभर अन्नही त्यांच्या शिदोरीतून मिळत नसे. मग चविष्ट अन्न मिळणे तर दूरच राहिले. तेव्हा कृष्णाने यशोदामाईला सांगून स्वतःच्या शिदोरीतून भरपूर व रूचकर पदार्थ आणावयास सुरुवात केली. प्रत्येकाने आपापली शिदोरी वेगवेगळे बसून न खाता, सर्वांनी एकदम व एकत्रितपणे बसून आणलेले अन्न सेवन करायचे असा प्रघात कृष्णानेच सुरू केला. त्यामुळे सर्वांच्या ठिकाणी एकोप्याची भावना निर्माण झाली. कृष्ण मध्ये व बाकी सर्वांनी त्याच्या भोवती अर्धमंडलाकार पंक्ती करून बसायचे ही कृष्णाची योजना तर सर्वांच्याच मनाला अतिशय भावली. कारण त्यामुळे सर्वांनाच त्यांच्या आवडत्या कृष्णाच्या मुखाकडे सतत टक लावून बघता येणे शक्य होणार होते आणि त्या सर्वांनाही कृष्णाच्या प्रेमळ दृष्टीक्षेपात रहाता येणार होते. त्यांच्या दृष्टीने या परती श्रेष्ठ अशी दुसरी कोणतीच भाग्याची गोष्ट नव्हती.

आपापल्या शिदोऱ्या सोडून अन्न सेवन करण्यासाठी सर्वच जण अत्यंत आतुर असत. कारण घरापासून पुष्कळ दूर चालणे, गाईगुरांच्या मागे सततचे धावणे, अनेक खेळ खेळणे इत्यादी कारणांमुळे त्या बाळगोपाळांना अगदी सडकून भूक लागलेली असे. त्यामुळे साहजिक हातातोडांची गाठ कधी एकदा पडते असेच त्या सर्वांना झालेले असे. परंतु कृष्ण त्यांच्या भुकेला आणखी थोडा वेळ थोपवून धरी आणि त्यांना एका गोष्टीची आठवण करून देई, की ज्या परमेश्वराच्या कृपेने आपल्याला अन्न सेवन करायला मिळत आहे त्याचे स्मरण करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तेव्हा कृष्णासह सर्व बाळगोपाळ सर्व प्रथम त्या जगन्नियंत्या परमेश्वराची एकमुखाने व दोन्ही हात जोडून प्रार्थना म्हणत आणि त्याच्या विषयीची कृतज्ञता व्यक्त करीत. त्यानंतरच सर्वांच्या अन्न सेवनाला सुरुवात होई. कृष्ण आपल्या शिदोरीतील लाडू, मोदक, खरवस यासारखे उत्तमोत्तम पदार्थ सर्वांना आधी वाटीत असे आणि त्यानंतरच स्वतः सेवन करीत असे. त्याचबरोबर इतरांच्या शिदोरीतील पदार्थही आवडीने मागून घेत असे. साहजिकच सुरुवातीला त्या बाळगोपाळांना अगदी संकोच वाटत असे. कारण त्यांच्याकडील पदार्थ तर अगदी साधे असत आणि ते कृष्णाला कसे द्यावेत या विचाराने त्यांना लाजच वाटत असे.

यावर उपाय म्हणून कृष्णाने एकदा एक नामी युक्ती शोधून काढली. सर्वप्रथम तो स्वतःसह सर्वांच्या शिदोऱ्यांतील पदार्थ एकत्र करून त्याचा काला म्हणजे मिश्रण करीत असे आणि नंतर पुन्हा सर्वांना ते वाटीत असे. त्या काल्याचे वाटप करताना मात्र तो लहान, मोठा, सशक्त, अशक्त या प्रमाणे पाहूनच योग्य प्रमाणात वाटप करीत असे. त्यामुळे कोणाचीही तक्रार तर रहातच नसे, पण सर्वांनाच भरपूर व रूचकर असे अन्न सेवन करावयास मिळत असे. सर्वांचीच क्षुधा शमन होऊन त्यांची मनेही संतुष्ट होत असत. हे लक्ष्मी, अद्भूत अशा प्रेमरसाने भरलेला काला सेवन करणाऱ्या त्या भाग्यवान बाळगोपाळांना त्या काल्यापुढे सृष्टीतील इतर सर्व सुखे तुच्छ वाटत असतील, तर त्यात नवल ते काय? अगदी स्वर्गीच्या देवांनी अमृत देऊन त्याच्या बदल्यात त्या रसपूर्ण काल्याची मागणी केली असती तरी त्या बाळगोपाळांनी त्या मागणीचा अत्यंत सहजतेने धिक्कार केला असता हे अगदी नक्की!

हे लक्ष्मी, या गोपाळ काल्यामुळे आणखीन एक महत्त्वाची गोष्ट घडली आणि ती म्हणजे त्या बाळगोपाळांच्या ठायीचे सर्व भेद दूर झाले. शारीरिक, बौद्धिक, आर्थिक व भावनिक अशी भिन्नता सर्वांठायी निसर्गतःच असल्यामुळे जो श्रेष्ठ-कनिष्ठ भाव सर्वांच्या ठिकाणी सहजपणे असतो तो मात्र अगदी लीलया लयाला गेला. कोणाच्याही ठिकाणी मीपणाचा वा कमीपणाचा अहंकार नावालासुद्धा शिल्लक राहिला नाही. आपण सर्वजण एकीएक त्या कृष्णाचेच आहोत व तो कृष्ण आपणा सर्वांचा आहे हाच एकमेव भाव त्यांच्या ठायी भरून राहिला होता. त्यातूनच जेथे कोणाचा मान नाही वा त्यामुळे निर्माण होणारा अवमानही नाही, अशी समानता त्या सर्वांच्या ठिकाणी नांदत होती. ज्या गोष्टी केवळ ज्ञानाने, नियमाने वा सक्तीने घडू शकत नाहीत, त्या प्रेमामुळे सहज शक्य होतात व सुलभतेने घडतात हेच खरे आहे. आपलेपणातून व प्रेमातून झालेले बदल हे अगदी मनापासून झालेले असतात आणि म्हणून ते बदल कायम स्वरूपाचे असतात.

जेव्हा कृष्णाने त्या सर्वांबरोबर नाना प्रकारचे खेळ खेळावयास सुरुवात केली तेव्हा हीच आपलेपणाची भावना सर्व बाळगोपाळांच्या ठायी अधिकच वाढू लागली. सवंगड्यांना खेळावयास सहजपणे जमतील व ज्यांची साधने सहज उपलब्ध असतील असे विविध खेळ कृष्णाने शोधून काढले. वडाच्या झाडांच्या लोंबकळणाऱ्या पारंब्यांचा उपयोग करून खेळलेला सुर-पारंब्यांचा खेळ, कपड्यांच्या चिंध्यांपासून बनवलेला चेंडू व बारीक चपट्या दगडांचा वापर करून खेळलेला लगोऱ्यांचा खेळ, झाडांच्या रूंद फांद्यांचा फळीसारखा उपयोग करून खेळलेला चेंडू-फळीचा खेळ असे नवीन नवीन खेळ कृष्णाने आपल्या सवंगड्यांना शिकविले आणि हळुहळू त्यात त्यांना तरबेजही केले. या खेळांबरोबरच पूर्वापार चालत आलेल्या लपाछपी, आट्यापाट्या, कुस्ती इत्यादी खेळांचाही कृष्णाने आधार घेतला आणि आपल्या सवंगड्यांची शारीरिक व मानसिक क्षमता वाढविली.



'विजयप्राप्तीच्या अपेक्षेनेच खेळायचे, परंतु जय-पराजयाच्या पलीकडील खेळाच्या आनंदाचा अनुभव घ्यायचा' ही कृष्णाची शिकवण स्वीकारणे त्या बाळगोपाळांच्या मनाला सुरुवातीला जडच गेले. परंतु कृष्णाने स्वतःच्या वागण्यातूनच सर्वांना ही गोष्ट दाखवून दिली. क्वचितप्रसंगी आपल्या सवंगड्यांकडून एखाद्या खेळात एखादे वेळेस हरताना कृष्णाला अजिबात वाईट वाटत नसे वा रागही येत नसे. उलट कृष्ण आपल्या प्रतिस्पर्धी खेळाडूचे अगदी मनापासून कौतुक करी आणि त्याची पाठ थोपटून त्याला प्रोत्साहन देत असे. खेळातील जयाचा उन्माद न होणारा आणि पराजयाचा हसतमुखाने स्वीकार करणारा 'कृष्ण' हा त्याच्या सवंगड्यांसाठी एक मूर्तिमंत आदर्शच होऊन राहिला. कृष्णाची ही खिलाडू वृत्ती त्या गोपबाळांवर परिणाम करीत राहिली आणि हळुहळू त्यांचीही वृत्ती तशी होत राहिली. त्यांच्या ठिकाणचे राग, त्वेष, द्वेष, असूया, मत्सर इत्यादी मनाचे दोष कमी होऊ लागले व त्यांची जागा सहनशीलता, प्रयत्नवाद, मनमोकळेपणा, कौतुक व दाद देण्याची तत्परता इत्यादी गुणांनी घेतली. त्यामुळे खेळामध्ये अंतर्भूत असलेले विशेषपण म्हणजे जी सहजता व जो आनंद, त्या दोन्हीचा अनुभव त्या बाळगोपाळांना यथार्थपणे येऊ लागला.''

*****

# मुरलीधर कृष्ण

हे लक्ष्मी, आपल्या सवंगड्यांना सुखविण्यासाठी विविध सुविधा निर्माण करण्याच्या नादात व भरात कृष्णाकडून एक नवलाईच घडली. आपल्या सवंगड्यांबरोबर रानावनांत स्वच्छंदपणे फिरत असताना कृष्ण एका विस्तीर्ण वृक्षाखाली विसाव्यासाठी काही वेळ थांबला असता, तेथे पडलेली झाडाची एक लहानशी फांदी त्याच्या नजरेत भरली. त्याने ती उचलून हातात घेतली आणि सवंगड्यांकडे असलेल्या धारदार पात्याच्या सहाय्याने ती साफ करून तिला गुळगुळीतही केले. तिच्या आतील भाग हळुहळू बाहेर काढून त्या काठीला आतून पूर्णपणे पोकळही केले. नंतर एका बाजूच्या पृष्ठभागावर काठीच्या एका टोकाला एक मध्यम आकाराचे छिद्र केले. त्या नंतर त्याच रेषेमध्ये खालच्या बाजूला, थोड्या पण समान अंतरावर आणखी सहा छिद्रे केली. त्यातून एक सुरेखसा पावा अथवा वेणू तयार झाला. सर्व सवंगडी आश्चर्याने व कौतुकाने कृष्णाकडे बघत असता, कृष्णाने तो पावा आपल्या कोमल ओठांवर ठेवला व आपल्या हाताची नाजूक बोटे त्या सहा छिद्रांवर ठेवली. कृष्णाने आपले नेत्र पूर्णपणे मिटून घेतले आणि तो क्षणभर स्तब्ध राहिला. पुढच्याच क्षणाला कृष्णाच्या मुखातून हवेची हळुवार फुंकर अलगदपणे त्या वेणूतून वाहू लागली आणि एक दिव्य नाद त्या सर्व आसमंतात घुमू लागला. त्या दैवी नादाच्या श्रवणाने ते बाळगोपाळ तर मंत्रमुग्ध झालेच, परंतु तो सर्व परिसरच भारीत झाल्यासारखा झाला. त्यातूनच कृष्ण जेव्हा आपल्या नाजूक बोटांची हालचाल करू लागला व त्या वेणूतून एकेक धून प्रगट होऊ लागली, तेव्हा तर सर्व बाळगोपाळ मोहित होऊन डोलूच लागले. त्यांचे सर्व देहभानच हरपले. त्यांच्या मनाला त्या सुरांची जणु भूलच पडल्यासारखे झाले.

थोड्यावेळाने त्या वेणूतून घुमणारे सूर जेवढ्या अचानकपणे सुरू झाले होते, तेवढ्याच अचानकपणे थांबले. कृष्णाने अर्धोन्मीलित नेत्रांनी आपल्या सवंगड्यांकडे पाहिले. त्यांची ती भारीत अवस्था पाहून कृष्णाच्या मुखावर स्मितहास्य पसरले. त्याने आपल्या मुखापासून तो वेणू बाजूला केला आणि सर्व सवंगड्यांना हाका मारून सावध केले. देहभानावर आलेल्या त्या बाळगोपाळांच्या मनाचे मात्र भान जे एकदा हरपले ते हरपलेच! त्यांचे मन काही पूर्व स्थितीला येण्यास मागेना आणि त्यांनीही तसा प्रयत्न केलाच नाही. थोड्या वेळाने जरी मनाला वस्तुस्थितीची जाणीव होऊन ते भानावर येऊ लागले, तरी मनाला त्या वेणूच्या नादाची लागलेली चटक मात्र कायम होती. त्यासाठी ते बाळगोपाळ वेणुनाद पुन्हा पुन्हा घुमविण्याचा कृष्णाला वारंवार आग्रह करीत राहिले. कृष्णाने काही वेळ त्यांचा हट्ट पुरवला खरा, परंतु त्यालाही त्यांची योग्य समज करून द्यावी लागली, की वेणू वाजवणे हीच काही एकमेव गोष्ट त्यांना दिवसभरात करायची नसून, इतर अनेक आवश्यक कामेही त्यांना पार पाडायची आहेत. त्या बाळगोपाळांचीही समजूत पटली खरी किंवा त्यांनी मनाची योग्य ती समजूत करून घेतलीही, परंतु त्या वेणूच्या नादाचे त्यांच्या मनाला जडलेले जबरदस्त आकर्षण मात्र कायमच राहिले. त्यामुळे इतर सर्व कामे करीत असतानाही वेणुनाद ऐकण्याचा त्यांना अत्यंत तीव्र ध्यास लागलेला असे. त्या ध्यासापोटी तो वेणुनाद त्यांच्या मनात सतत घुमत असे आणि त्या नादातच जणु त्यांची सर्व कामे सहजतेने व योग्यपणे घडत असत.''

नारदाच्या मुखातून वेणूच्या नादाचे वर्णन ऐकता ऐकता लक्ष्मीच्या मनाची अवस्थासुद्धा काहीशी नादमय झाल्यासारखीच झाली होती. त्यामुळे तिचे श्रवणाकडे पूर्ण लक्ष लागेनासे झाले. तिला शब्द ऐकू येत होते, परंतु त्यांचा अर्थ मात्र तिच्या बुद्धीपर्यंत पोहोचूच शकत नव्हता, कारण मुळात त्या शब्दांतील भावच तिच्या मनात शिरत नव्हता, एवढे लक्ष्मीचे मन त्या नादाने भरल्यासारखे झाले होते. तिचे मन तो वेणुनाद जणु प्रत्यक्षच ऐकत होते असेच लक्ष्मीकडे पाहून वाटत होते. लक्ष्मीची ही अवस्था लक्षात यावयास नारदालाही थोडासा अवधीच लागला. कारण खुद्द तो स्वतःसुद्धा त्या नादविश्वात पूर्णपणे बुडालेला होता. परंतु यथावकाश नारद देहभानावर येऊ लागला तसतशी लक्ष्मीचीही अवस्था त्याच्या लक्षात आली. तरीही नारद जाणुनबुजून स्वस्थच राहिला. त्याने लक्ष्मीला मुद्दाम सावध करायचा प्रयत्न न करता तिला स्वतःहून भानावर येऊ दिले. लक्ष्मी तिची तीच भानावर आली असता तिने नारदाकडे पाहून मंदस्मित केले आणि तीही स्वस्थच बसून राहिली. काय बोलावे व कुठल्या शब्दाने बोलावे अशा मनाच्या स्थितीत काही वेळ ती राहिली खरी, परंतु तसेही तिला फार वेळ राहवेना. शेवटी न राहवून तिच्या मुखाद्वारे शब्द प्रवाहित होऊ लागलेच.

''हे नारदा, कृष्णाने घुमविलेल्या वेणूच्या नादाच्या केवळ वर्णनानेच जर माझ्या मनाचे भान एवढे हरपले, तर मग तो नाद प्रत्यक्ष श्रवण केलेल्यांची अवस्था काय झाली असेल याची तर कल्पनाही करणे अशक्यच आहे. त्यांच्या भाग्याचे जेवढे मोठेपण सांगावे तेवढे कमीच आहे. परंतु त्या नादाविषयीचे कुतूहल मात्र माझ्या ठिकाणी सतत वाढतच आहे. तो नाद अत्यंत आगळा वेगळा होता हे तर निश्चितच. तरीही त्या नादाचे आगळे वेगळेपण नेमके कशामध्ये व कशामुळे होते हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रश्न माझ्या ठिकाणी शिल्लक राहतोच आहे. त्या प्रश्नाच्या अस्तित्वामुळेच माझ्या मनाला थोडीशी अस्वस्थता जाणवत आहे. हे नारदा, या नादाचे गूज तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला बरे माहीत असणार? तेव्हा तूच आता ते गूज मला उलगडून सांगावेस अशी मी तुला विनंती करते.''

लक्ष्मीच्या बोलण्याचा नारदाला अतिशय आनंद झाला आणि तो त्याच्या मुखावर अगदी स्पष्टपणे दृग्गोचर झालेला होता. त्याच्या ठायी नित्य असणाऱ्या त्या नादाचे नारदाला स्मरण झाले मात्र, त्याच नादात तो एका क्षणात पूर्णपणे तन्मय झाला आणि त्याच्या नकळतच त्या नादाचे जणू निनादच असे शब्द त्याच्या वाणीतून अलगदपणे झंकारू लागले. नारदाकडून प्रगट होणाऱ्या त्या शब्दांतील नाद व सूर यांचे वेगळेपण लक्ष्मीलाही लगेचच जाणवले आणि तीही मनःपूर्वक श्रवण करू लागली. तिच्या ठायीचे सर्व लक्ष जणू तिच्या कानांत एकवटले आणि तिच्या नेत्रांत प्रगटले. नारदाच्या वाणीतून ओघवणाऱ्या शब्दांचा नाद तिच्या कानांतून तिच्या मनापर्यंत पोहोचत होता, तर नारदाच्या मुखावर साकार होणारे त्या शब्दांतील भाव लक्ष्मीच्या नेत्रांद्वारे तिच्या मनाचा ठाव घेत होते. नाद व भाव यांच्या होणाऱ्या संगमात लक्ष्मीचे मन पूर्णपणे बुडाले होते. त्यामुळे सर्व सुखापरत्या असलेल्या एकीएक आनंदाचाच अनुभव लक्ष्मी त्या श्रवणाद्वारे घेत होती. नारदाची ओघवती वाणी ही अनेक सुकोमल व सुंदर शब्दसुमनांची भावपूर्ण बरसात करीत राहिली आणि करीतच राहिली.

''हे लक्ष्मी, तुझे म्हणणे व तुला जे वाटत आहे ते अगदी बरोबर आहे. कृष्णाच्या वेणूवादनाद्वारे घुमणारा नाद हा सर्वसाधारण नाद नव्हताच मुळी. या नारायणाचे सगुण सृष्टीरूप प्रगट होताना जो नाद प्रथमतः प्रगट झाला तोच हा 'मूळ नाद' होय. सृष्टी निर्माण होताना निर्गुण अशा अवकाश तत्त्वाच्या ठिकाणी चैतन्य स्फुरले आणि सर्वात आधी शब्द हा गुण साकार झाला. नारायणाच्या संकल्पातून अचानकपणे 'ओंकार' हा शब्दनाद घुमला आणि सर्व विश्वात दुमदुमून राहिला. शब्दरूपाने प्रगट होण्याच्या आधीच्या अवस्थेतील हा नाद नारायणाच्या अंतःकरणात नित्य व सहजपणे स्फुरत असतो. त्याच नादात हा नारायण नित्य रमलेला असतो. म्हणूनच त्या नादाला 'सनातन' नाद असे म्हटले जाते. या नादातूनच प्रथम ओंकार शब्द नाद प्रगट झाला. त्यानंतर अनेक स्वर, अनेक शब्द, अनेक भाव आवश्यकतेनुसार प्रगट होतच राहिले. परंतु त्या सर्वांमधील मूळ नाद एकीएकच होता. एकाच नादाची विविध अंगे व रूपे विस्तारित होत राहिली तरी त्यातील मूळ नाद कायमच होता.

हे लक्ष्मी, शब्दगुणाच्या माध्यमाने प्रगट झालेली ही नारायणाची माया पुढे स्पर्श, रूप, रस व गंध या गुणांच्या माध्यमाने अधिकाधिक विस्तार पावत राहिली आणि त्या मायेचा पसारा केवढा तरी वाढून राहिला. सर्वसामान्य जीव अज्ञानाने आपल्या मुळाला विसरून त्यापासून दूर गेला आणि या मायेच्या पसाऱ्यात अडकून पडला. परंतु ज्यांनी या मायेच्या मुळाला जाणले आणि त्या मुळाला आपल्या अंतःकरणात धरून ठेवले, त्या महात्म्यांच्या अंतःकरणात हा सनातन नाद अविरतपणे स्फुरत राहिला. तेच त्या नादाचे शुद्ध स्वरूप होय, जे अनेकविध भावांच्या शब्दांनी व विविध स्वरांनी प्रगट होऊनही कधीच बाधित होत नाही. किंबहुना त्या महात्म्यांच्या प्रत्येक शब्दातून व प्रत्येक स्वरातून तो सनातन असा शुद्ध नादच प्रगट होत असतो, एवढे त्या नादाशी ते महात्मे तादात्म्य पावलेले असतात. त्या नादाला ठराविक वा विशिष्ट माध्यमाचीच आवश्यकता नसते. परंतु ज्या वेळेस या नारायणाच्या गुणांचे, प्रेमाचे व भक्तीचे माहात्म्य या महात्म्यांकडून प्रगट होते, तेव्हा तो मूळ शुद्ध नाद विशेष अशा सौंदर्याने व लावण्याने सहजपणे युक्त होऊन प्रगट होतो. त्या नादाच्या या सुंदर बाह्यरूपाने सामान्यांचीही मने आकर्षित झाली तर त्यात नवल ते काय?

कृष्णाच्याही अंतःकरणात हा मूळ सनातन नाद जन्मतःच स्फुरत होता. खरे तर, त्याच्या प्रत्येक शब्दातून व बोलण्यातून तोच नाद प्रगट होत होता. त्यामुळेच त्याच्या सांगण्याचा प्रभाव सर्वांवर त्वरित होत असे. आपल्या बोलण्याने सर्वांचे मन व लक्ष तो आपल्याकडे सहजतेने वेधून घेत असे. तेवढा वेळ तरी ऐकणाऱ्यांच्या मनातील इतर सर्व विचार बाजूला होत आणि त्यांना कृष्णाचे म्हणणे खरे वाटत असे. याचे रहस्य कृष्णाठायीच्या त्या मूळ नादातच दडलेले होते. सामान्यांची जेथे अशी स्थिती होई, तेथे कृष्णप्रेमी असे त्याचे सवंगडी कृष्णाच्या बोलण्याने भुलून जात व प्रभावित होत हे तर अगदी ओघानेच आले.

हे लक्ष्मी, तेव्हा कृष्णाने वेणू म्हणा, बासरी म्हणा, नाहीतर मुरली म्हणा, पण जेव्हा आपल्या ओठावर धरली, त्यावेळेस त्याच्या अंतःकरणात नित्य स्फुरणारा असा तो मूळ शुद्धरूपातील सनातन नादच आधी त्याच्या हृदयात, मग

त्याच्या कंठात, तेथून त्याच्या मुखात आणि मग ओठातून त्या मुरलीमध्ये शिरला. आणि मुरलीतून जेव्हा तो घुमला तेव्हा त्या नादाने सर्व विश्वालाच व्यापून मोहित केले. कृष्णाच्या व्यापक अंतःकरणातून प्रगट होऊन सर्व विश्वाला व्यापून रहाणारा तो नाद एका लहानशा मुरलीच्या माध्यमातून साकार झाला, याहून दुसरी अद्भूत गोष्ट या त्रिभुवनात नाही.

हे लक्ष्मी, नारायणाच्या सृष्टीमध्ये निर्माण झालेल्या मानवी देहातही नेमकी हीच अद्भुतता आहे. तसे बघायला गेले तर या मानवी देहाचे आकारमान ते केवढे, त्याची ताकद ती केवढी आणि त्याचे या सृष्टीतील आयुष्यमान ते केवढे? एवढ्या अवाढव्य सृष्टीचा विचार केला तर मानवी देह कःपदार्थ आहे. पण तरीही या व्यापक नारायणाच्या अस्तित्वाचा अनुभव मानवी देहात आत्म्याच्या रूपाने घेता येतो. एवढेच नव्हे, तर मानवी देहाला असलेल्या मर्यादेतूनही प्राप्त झालेल्या स्वानुभवाच्या दृष्टीद्वारे या विश्वव्यापी नारायणाचे केवढे तरी माहात्म्य वर्णन करता येते. शब्दातीत असलेल्या त्या माहात्म्याच्या वर्णनाचा आनंद सर्व विश्वाला व्यापूनही केवढा तरी शिल्लक रहातोच.''

नारदाच्या मुखातून नारायणाच्या माहात्म्याचे वर्णन श्रवण करताना आनंदाने लक्ष्मीचे सर्व मन व्यापून गेले आणि त्या आनंदात ती कितीतरी वेळ तल्लीन होऊन राहिली. परंतु तल्लीन झालेल्या लक्ष्मीच्या मनातील प्रेमभाव मात्र जागा होता. त्यामुळे त्या प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी मन हळुहळू, पण सहजपणे देहभानावर आले. त्याच प्रेमभावपूर्ण नजरेने ती नारदाकडे पाहू लागली असता, तिला एकदम नारदाच्याच माहात्म्याची जाणीव होऊ लागली आणि न राहवून लक्ष्मी नारदाला उद्देशून बोलू लागली.

''अरे नारदा, तू नारायणाचे माहात्म्य आणि त्याच्या अंतःकरणात नित्य स्फुरणाऱ्या त्या सनातन नादाविषयीचे रहस्य सांगत आहेस ते अगदी बरोबर आहे. त्याच्या सत्यत्वाची प्रचिती मला तर आता तुझ्या सहवासातच येत आहे. तुझ्या मुखातून कृष्णाचे सगुण चरित्र ऐकत असताना श्रवणाचा जो काही आगळाच आनंद मात्र अनुभवण्यास मिळत आहे त्याचे गूजही माझ्या आत्ताच एकदम लक्षात आले.

नारायणाच्या अंतःकरणात सहज स्फुरणारा नादच तुझ्याही अंतःकरणात स्फुरत आहे. कारण तू तर नारायणाशी पूर्णपणे ऐक्य पावलेला आहेस. त्यामुळेच तुझ्या अंतःकरणाची अवस्था ही अगदी नारायणाच्या अंतःकरणासारखी झालेली आहे. तेव्हा तुझ्याकडून प्रगटणाऱ्या शब्दाशब्दातून व स्वरास्वरातून त्याच मूळ नादाचे निनाद घुमत आहेत हे अगदी सहज आहे. तुझ्या अंतःकरणातील तो मूळ सनातन नाद मला कळणे शक्य नाही. परंतु त्याचे निनाद श्रवण करण्याचे सौभाग्य मला प्राप्त झाले. त्याची गोडी मला लागली आणि त्या श्रवणाचा आता तर मला नादच लागून राहिलेला आहे. तुझ्या ठिकाणच्या मूळ नादाशी तद्रूप होणे मला शक्य होईल की नाही हे मला ठाऊक नाही, परंतु तुझ्या मुखातून प्रगटणाऱ्या शब्दनादाशी मात्र मी निश्चितपणे तन्मय होऊन रहाते. त्याचाही होणारा आनंद अगदी पूर्ण व अंतिम नसला तरी काहीतरी आगळा वेगळाच असतो हेही तितकेच खरे आहे. तेव्हा हे कीर्तनप्रिय नारदा, माझ्यावर कृपा कर आणि कृष्णचरित्रातील

प्रेमरसाने भरलेल्या सगुण कथाप्रसंगांच्या वर्णनाचा शब्दनाद सदासर्वदा घुमवीत रहा, जेणेकरून माझ्या तृप्त श्रवणांची श्रवणभूक वाढतच राहील.''

लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारदाला परमसंतोष झाला आणि एवढा वेळ त्याच्या ठिकाणी त्याने प्रयत्नपूर्वक आवरून ठेवलेला शब्दौघ पुन्हा वेगाने व सुमधुर नादाने प्रवाहित होऊन वाहू लागला.

''हे लक्ष्मी, या सनातन नादाचे रहस्य तुला कळले हे चांगलेच झाले. परंतु त्याहीपेक्षा तुला त्या नादाच्या श्रवणाची गोडी लागली हे अधिक महत्त्वाचे आहे. कारण त्या गोडीतूनच तुझ्या ठिकाणी तो नाद पुन्हा पुन्हा अनुभवण्याचा ध्यास निर्माण होईल आणि त्या ध्यासापोटीच एक दिवस तुझ्याही ठिकाणी असलेला तो सुप्त नाद जागा होऊन घुमू लागेल हे निश्चित. असो, त्यासाठी व त्या आधी तुझी श्रवणाची गोडी मात्र नित्य वाढत राहिली पाहिजे. तेव्हा कृष्णचरित्रातील सगुण प्रेमाच्या गोड कथा आता आपण उभयतांही श्रवण करूया हेच उत्तम!

हे लक्ष्मी, कृष्णाच्या मुरलीच्या नादाचा परिणाम सर्व चराचर सृष्टीवरच होत असे. तेवढा वेळ सर्व सृष्टीचे चित्रच पालटल्यासारखे दिसे. एरव्ही वेगवान व अवखळ असलेला यमुना नदीचा प्रवाहही त्या मुरलीच्या नादाने एकदम शांत व गंभीर होई. जोराने वाहणारा वाराही मंद मंद वाहू लागे. स्तब्ध असणारी झाडे व वृक्ष आनंदाने डोलू लागत आणि अचानकपणे वृक्षांवरच्या सुकोमल सुमनांचा सडाच्या सडाच भूमीवरती पडावयास सुरुवात होई. वृक्षांवरील फळांमधून मधुर रस अकारण गळू लागे. मग सजीव अशा पशुपक्ष्यांवरही त्या वेणुनादाचा परिणाम झाला तर त्यात नवल ते काय? पक्ष्यांचा किलबिलाट अगर चिवचिवाट पूर्णपणे थांबे आणि आजूबाजूच्या सर्व वृक्षांवर पक्ष्यांचे थवेच्या थवे मुरलीनाद श्रवण करण्यासाठी एकच गर्दी करीत. चरण्याच्या निमित्ताने दूरवर गेलेली गाईगुरे सुद्धा मुरलीच्या नादाने कृष्णाच्या जवळ येऊन बसत आणि कृष्णाकडे टक लावून बघता बघता मुरलीच्या धुनेवर मान डोलवीत असत.

हे लक्ष्मी, याच्याही पेक्षा नवलाईची गोष्ट म्हणजे आजूबाजूच्या रानावनांत आश्रम थाटून त्यात समाधी साधनाचा अभ्यास करण्याच्या प्रयत्नात असलेले अनेक तपस्वी व मुनी आपले साधन बाजूला ठेवून कृष्णाच्या मुरलीच्या नादश्रवणात निमग्न होऊन रहात. कारण समाधीच्या साधनाद्वारे जो हृदयातील अंतर्नाद श्रवण करण्याचा त्यांचा प्रयत्न असे, तो नाद श्रवण करण्याचे भाग्य त्यांना कृष्णाच्या मुरलीच्या रूपानेच लाभल्यामुळे, समाधी साधण्याचा वेगळा खटाटोप करण्याचे त्यांना कारणच उरत नसे. असा एखादा चमत्कार घडल्याप्रमाणे सर्व सृष्टी व जीवमात्र तेवढा काळ का होईना, पण भारावून जात. थोड्या वेळाने अचानकपणे व सहजपणे कृष्णाचे मुरलीवादन थांबत असे. तेव्हा सर्व जण हळुहळू भानावर येत आणि त्यांचे नित्याचे जीवन पुन्हा सुरळीतपणे सुरू होई.

कृष्णाच्या सवंगड्यांचा मात्र आणखी एक फायदा झाला, की कृष्णाच्या मुरलीनादाने त्यांची गाईगुरे स्वतःहून आपसूकच कृष्णाच्या जवळ येत असत. त्यामुळे त्या सवंगड्यांची गुरांच्या मागची धावपळ थांबली आणि गुरांना आपापल्या

घरांकडे वळवणे त्यांना सुलभ व सोईचे झाले. परंतु याही पलीकडे जाऊन कित्येक जणांच्या ठायी त्या मुरलीनादाचे स्मरण राही आणि त्या स्मरणातच त्यांचे घरी जाणे घडे, वागणे घडे, चालणे बोलणे घडे, नव्हे तर सर्व वावरणे व जगणेही त्यांचे त्या नादातच घडे. त्यामुळे त्यांच्या जीवनात घडणाऱ्या सुखदुःखाच्या प्रसंगांचा त्यांच्यावर परिणामच होत नसे. त्यातून थोडा परिणाम झाला तर तो थोडावेळच असे आणि खोलवर तर जात नसेच नसे. पण याहीपेक्षा काही जणांच्या ठिकाणी त्या मुरलीच्या नादाचा ध्यासच लागून राही. त्या ध्यासातच त्यांचे नित्याचे जीवन ते आनंदाने जगत असत. त्या ध्यासापोटी तर त्यांना त्यांच्या मनाच्या ठिकाणी तो मुरलीचा नाद सतत ऐकूच येई. त्यामुळे त्याचे विस्मरण घडण्याचा प्रश्नच निर्माण होत नसे. परंतु त्या नादाने त्यांच्या मनाचे समाधान होत नसेच. कारण तो मुरलीनाद घुमविणारे कृष्णाचे रूप पहाण्याची आर्तता उलट त्यांच्या ठिकाणी अधिकच वाढत असे. त्यामुळे कृष्णाला कधी एकदा प्रत्यक्ष पाहतो असेच त्यांना होऊन राही. दुसऱ्या दिवशी सकाळी पहाटेपूर्वीच लवकर उठून धावत जाऊन कृष्णाचे दर्शन घेतल्यावर व त्याच्या प्रत्यक्ष भेटीचा आनंद अनुभवल्यावरच त्यांच्या मनाला खऱ्या अर्थाने समाधान व संतुष्टता प्राप्त होत असे.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या मुरलीवादनाच्या निमित्ताने एक गोष्ट मात्र निश्चितपणे घडली, ती म्हणजे त्यामुळे गोकुळवासीयांमध्ये कृष्णाविषयीचे आकर्षण अधिकच वाढले. पूर्वी तो फक्त त्याच्या संवगड्यांनाच प्रिय होता, पण आता मात्र कृष्ण इतर मोठ्या मंडळींमध्येही आवडता झाला. त्यांच्या ठिकाणीही कृष्णाविषयीचे आकर्षण निर्माण होऊन ते वाढूही लागले. परंतु बहुतेक जणांची मर्यादा केवळ आकर्षणापुरतीच मर्यादित राहिली. तर काही जणांच्या ठिकाणी मात्र कृष्णाच्या सहवासाची आवडी निर्माण झाली. कृष्णाबरोबर नेहमी रहावे, बोलावे, खेळावे, खावे-प्यावे हे त्यांना आवडू लागले. त्यासाठी त्यांचा नेहमी प्रयत्न असे. त्याचेच व्यवधान त्यांना लागलेले असे आणि त्या व्यवधानाची पूर्ती केल्यावरच त्यांना स्वस्थता व समाधान लाभत असे. कृष्णाच्या सहवासात लाभलेल्या जवळीकतेमुळे त्यांना कृष्णाच्या ठायीचे कित्येक गुण दिसू व जाणवू लागले. कृष्णाच्या ठायीचा आत्मविश्वास, निर्भयता, प्रयत्नवाद, सारासारविवेकबुद्धी या असामान्य गुणांबरोबरच सर्वांविषयीचा आपलेपणा, सर्वांच्या दुःखाविषयी कळवळा, मदतीसाठी धावून जाण्याचा स्वभाव आणि परोपकार वृत्ती या कृष्णाच्या विशेष गुणांना पाहून काहीजणांच्या मनांत कृष्णाविषयी प्रेमच निर्माण झाले. त्या प्रेमापोटीच कृष्णाचे मन जाणून घेणे, त्याच्या मनाप्रमाणे करणे आणि त्यातून कृष्णाला झालेला आनंद पहाणे असाच एकीएक भाव त्यांच्या ठिकाणी निर्माण झाला. या प्रेमामुळेच कृष्णासाठीही आपण काहीतरी करावे, त्याच्याही सुखदुःखाचा विचार आपल्याठायी असावा आणि कृष्णाला आपण नित्य सुखवावे असे त्यांना नित्य वाटत असे आणि अगदी मोकळेपणाने ते कृष्णाविषयीचे आपले प्रेम व्यक्त करू लागले. कृष्णाचे केवळ खेळातले सवंगडी न रहाता ते कृष्णाचे मित्र होऊन रहिले. या सर्व मित्रांमध्ये पेंद्या नावाचा एक गोपाळ कृष्णाचा परमसखा होऊन राहिला.''

*****

# कृष्णाचा परमसखा पेंद्या

नारदाचे बोलणे चालू असता असताच त्याचे लक्ष लक्ष्मीच्या प्रश्नार्थक मुद्रेकडे गेले. परंतु तिने काही प्रश्न विचारण्याच्या आधीच नारदाने तिला हाताने खूण करून थांबण्यास सांगितले आणि आपले बोलणे पुढे चालूच ठेवले.

''हे लक्ष्मी, तुझ्या मनातील प्रश्न तू न विचारताच माझ्या लक्षात आला आहे. सवंगडी, मित्र, सखा असे तीन वेगवेगळे शब्दप्रयोग मी केल्यामुळे तुझ्या मनात काय विचार आला असणार ते मी ओळखून आहे. त्या शब्दांच्या अर्थांमध्ये निश्चित काय फरक आहे हेच तुला विचारायचे असणार, होय ना? खरे तर, ते तीनही शब्द तसे समानार्थीच आहेत. परंतु त्यामध्ये वेगळ्या वेगळ्या भावांची छटा आहे. मागे म्हटल्याप्रमाणे सवंगडी हे खेळण्यापुरतेच असतात. खेळण्यासाठी एकत्र जमतात, थोडा वेळ एकत्र खेळतात आणि पुन्हा आपापल्या घरी निघून जातात. त्यांची जीवने वेगवेगळी असतात आणि तशी ती वेगवेगळी जगत असतात. परस्परांच्या सुखदुःखांशी त्यांचे काहीही देणे घेणे नसते.

परंतु काहीजणांच्या बाबतीत मात्र खेळता खेळता एकमेकांविषयी काही तरी आपलेपणाची भावना निर्माण होते आणि त्यातूनच त्यांची मैत्री जुळते. एकमेकांची सुखदुःखे ते नित्याच्या सहवासात विचारून जाणून घेतात. दुःखाच्या प्रसंगात एकमेकांना सहाय्यभूत होतात आणि सुखाच्या प्रसंगात सहभागी होतात. त्यांच्यात स्वभावभिन्नता असते, त्यामुळे काही वेळा मतभिन्नताही निर्माण होते. त्यांच्या आवडी नावडीही वेगवेगळ्या असतात. परंतु तरीही त्यांची मैत्री कायम टिकून रहाते. कारण त्या मैत्रीत असलेला 'परस्परांवरील विश्वास व मनाचे प्रेम' हा पाया अत्यंत सखोल, म्हणूनच मजबूत असतो.

याच मित्रत्वातून काहीजणांच्यामध्ये व्यक्तिगत प्रेमाची भावना निर्माण होते आणि मनाने ते एकमेकांच्या अधिकाधिक जवळ येऊ लागतात. प्रेमाचे आगळे वेगळे संबंध निर्माण होतात. परस्परांना एकमेकांच्या सहवासाची ओढ लागते. परस्परांना सुखवावे व एकमेकांच्या भावना जाणून त्या राखाव्यात हाच विचार उभयतांच्या ठायी प्रबळ असतो. तो प्रेमाचाच एकीएक भाव असतो आणि त्याचाच अनुभव घेण्याचा ध्यास लागून राहिलेला असतो. एकमेकांशी जणू ऐक्यच पावले आहेत असे वाटायला लावण्याएवढे त्यांचे सख्य असते. या सख्यत्वासाठी कोणतेही सांसारिक नाते असण्याची आवश्यकता नसते. तरीही ते सख्यत्व कोणत्याही नात्यामध्येसुद्धा संभवते हेच या सख्यत्वाचे विशेषत्व आहे. किंबहुना या सख्यत्वामुळेच कोणत्याही नात्यामध्ये आत्यंतिक प्रेमाचे संबंध निर्माण होतात. हे संबंध जेवढे सखोल असतात तेवढी त्या नात्याची उंची अधिक दिसते. असे सख्यत्व मिळणे व जुळणे हे दुर्मिळ तर आहेच, पण त्याहूनही ते अधिक भाग्याचेच आहे. त्यातूनही ईश्वराशी असे सख्यत्व जडणे आणि त्या ईश्वराचेच सखा होऊन रहाणे तर परमभाग्याचेच आहे. असा सखा कृष्णाला पेंद्याच्या रूपाने मिळाला आणि पेंद्याला कृष्णाच्या रूपाने लाभला ही गोकुळामध्ये घडलेली कृष्णचरित्रातील वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट होती.''

साहित्य प्रतिष्ठान®

नारदाच्या बोलण्याने प्रभावित होत असलेल्या लक्ष्मीकडून अभावितपणे उद्गार निघाले, ''अरे नारदा, कमाल आहे! ही तर कमालच झाली!! सख्यत्वाचे वेगळेपण व विशेषपण तू सांगितलेस ते बरोबरच आहे. परंतु कृष्णालाही अशा सख्याची आवश्यकता होती हे कसे काय? मला तरी त्याचे नवलच वाटते. अरे, सर्वांची दुःखे जाणून त्यांचे सांत्वन करणारा, एवढेच नव्हे तर सर्वांना सदा सुखविणारा असा हा कृष्ण असताना त्याला अशी वेगळी ती सुखदुःखे काय असणार बरे? तो तर नंदाचा पुत्र होता आणि सर्व सुखे त्याच्या सेवेला सदैव सादर असत. मग त्याला म्हणून स्वतःला काही अशा भावनिक संबंधाची जरुरी ती काय व कशी बरे असणार? खरेच माझ्या तरी काही हे लक्षात येत नाही. तेव्हा हे नारदा, तूच मला ते नीट समजावून सांग ना!''

लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारद थोडासा गंभीरच झाला. क्षणभर त्याने आपले नेत्र मिटून पुन्हा उघडले, तर ते नेत्र अश्रूंनी पूर्णपणे डबडबलेले होते. नारदाला असे अचानक का भरून आले ते लक्ष्मीलाही कळेना. पण तीही थोडीशी भावनिक झाली. आपल्या विचारण्यात तर काही चूक झालेली नाही ना, अशा विचाराने तिला उगाचच वाईट वाटू लागले. तसे ती नारदाला बोलून दाखविणार, तर नारदानेच आधी बोलावयास सुरुवात केली.

''हे लक्ष्मी, कृष्ण हा नारायणाचा अवतार होता आणि म्हणून त्याचे सर्व चरित्रही दैवीच होते हे सत्यच आहे. परंतु ते चरित्र मानवी देहाद्वारे प्रगट होत होते हेही खरे आहेच ना? मानवी देह म्हणजे केवळ जडदेहच नव्हे, तर त्यातील भावनात्मकतासुद्धा! सामान्यजन हे विसरतात याचे मला नवल वाटण्यापेक्षा वाईट अधिक वाटते. पण जर भक्तांनाही त्याचे विस्मरण होऊ लागले तर मग अशा महात्म्यांच्या भावनेला कोणी जाणायचे? त्यांची मानसिकता कोणी समजावून घ्यायची? हे लक्ष्मी, या विचारानेच खरे तर माझे नेत्र पाणावले. आपल्यासारख्या नारायणाच्या भक्तांनीच त्याचे मन व भावना जाणून घेतल्या पाहिजेत. ती जबाबदारी आपली आणि फक्त आपलीच आहे. नारायणाने तरी आपला भरवसा नाही धरायचा तर मग कुणाचा धरायचा, खरे ना?

तेव्हा हे लक्ष्मी, कृष्णाच्याही ठिकाणी भावना होत्याच. सर्वांच्या सुखासाठी विचार करता करता, सर्वांची जीवने सुखाची व स्वास्थ्याची होण्यासाठी हरप्रकारे प्रयत्न करता करता कृष्णालाही अनेकांनी दूषणे द्यायला कमी केले नाही. ज्यांच्या अधिकाराला मान दिला गेला नाही त्यांचा साहजिकच अहंकार दुखावला गेला आणि त्यांनी कृष्णाला 'नावे' ठेवण्यास सुरुवात केली. त्यांच्या रागाचे कृष्ण हाच 'लक्ष्य' बनला. त्यांनी कृष्णाची निंदा तर केलीच, परंतु कृष्णाविरुद्ध खोटा अपप्रचार करण्यासही त्यांनी कमी केले नाही. कृष्णाने कोणाशीही वाद किंवा प्रतिवाद केला नाही. पण त्याच्या मनाला दुःख हे होत असेच. कारण त्याचे मन भावनात्मक होतेच. मानवी देहातील मनाठायीच्या असणाऱ्या सर्व संवेदना त्याच्याही ठिकाणी होत्याच. परंतु अंतःकरणाच्या निर्विकार अवस्थेमुळे त्याच्या मनात कोणतेही विकार मात्र संभवतच नसत. तो नेहमी शांत व हसतमुखच असे. या गोष्टीचाही अनेकांना राग येई. 'सर्व करून सवरून पुन्हा तोंड वर करून हसतोच आहे'

अशा शब्दांनी ते कृष्णाला फटकारू पहात. परंतु कृष्ण मात्र अशांच्याकडे लक्षच देत नसे. त्यांचे बोलणे कृष्ण मनाला लावूनच घेत नसे, किंबहुना त्याच्या मनाला ते लागतच नसे.

हे लक्ष्मी, परंतु काही वेळा ज्यांच्यासाठी तो हे सर्व करीत असे, ज्यांच्या निमित्ताने तो त्यांची योग्य बाजू घेऊन वेळप्रसंगी भांडत असे, ते त्याचे सवंगडीच थोडेसे साशंक दिसत किंवा त्यांचे मन ऐनवेळी कच खाई आणि ते कृष्णालाच दोष देत, तेव्हा मात्र कृष्णाच्या मनाला अतिशय वेदना होत असत. 'आपण ज्यांना आपले म्हटले, आपल्या अगदी जवळचे समजले अशांनीही आपल्याला समजून घेऊ नये. उलट इतरांच्या सांगण्यावर विश्वास ठेवून आपल्यावरच अविश्वास दाखववावा' याचे कृष्णाला अतिशय दुःख होई. कोणाला आपले समजावे व कोणावर भरवसा ठेवावा हे कृष्णालाही काहीवेळा कळेनासे होई. अशा वेळी कृष्ण अंतर्मुख होई. जास्त कोणाशी तो आपणहून बोलत नसे. सर्वांकडे पाहून स्मितहास्य करी खरा, पण क्षणार्धात पुन्हा गंभीर भाव त्याच्या मुखावर पसरत असत. अशा वेळी त्याच्या इतर सवंगड्यांनाही काय व कसे करावे हे कळत नसे. कृष्णाची मनःस्थिती लक्षात न आल्यामुळे तेही मग स्वस्थ बसून रहात आणि कृष्ण पुन्हा केव्हा हसून मोकळेपणाने बोलेल याची वाट पहात रहात. अशा वेळी कृष्णाशी फक्त एकच व्यक्ती जवळीकता साधू शकत असे आणि ती म्हणजे हा पेंद्या! कृष्णाचा जिवलग मित्र आणि परमसखा असलेला हा पेंद्या म्हणजे एक अजबच व्यक्तिमत्त्व होते.

अत्यंत गरीब कुटुंबात जन्माला आल्यामुळे घरची आर्थिक व इतर परिस्थितीही तशी अगदी जेमतेमच. त्यातून लहानपणीच आईचा मृत्यू झालेला म्हणून अनाथ, आणि वडिलांनी दुसरे लग्न केल्यामुळे नशिबी आलेला सावत्रपणाचा जाच. वडीलही असहाय्य म्हणून त्यांच्याकडूनही सहानुभूतीच्या पलीकडील दुसरी कसलीही मदतीची अपेक्षा करणेही चूकच. घरची व बाहेरची सर्व कामे करण्यासाठी फुकटात मिळालेला एक नोकर म्हणजेच जणू पेंद्या. परिस्थितीने गांजलेला पण मनाने खचून न जाता हळुहळू सर्वाला निर्ढावलेला पेंद्या स्वभावाने मात्र अत्यंत सालस व सरळ होता. अंगमेहनतीची कामे भरपूर, पण जेवणखाण मात्र अपुरे असल्यामुळे मूळचाच कृश असलेला पेंद्या अधिकच दुबळा झालेला होता. हाड न् हाड स्पष्ट दिसणाऱ्या शरीरयष्टीमध्ये मांसल भाग अपवाद म्हणूनच दिसत होता.

अशा पेंद्याच्या उंच व हाडकुळ्या व्यक्तिमत्त्वामध्ये एकच गोष्ट पटकन नजरेत भरत असे. ती म्हणजे त्याचे भावुक डोळे आणि हसरा चेहरा. त्याच्या मनातील दुःख वा क्लेश कधी त्याच्या चेहऱ्यावर चुकूनही आलेले दिसले नाहीत. परंतु हसतानाही त्यामागील कारुण्याचा भावही कधी लपून राहिला नाही. एवढे सर्व जणू कमीच झाले म्हणून की काय, बिचारा पेंद्या एका पायाने थोडासा अधूही होता. हातातील काठीचा आधार घेतल्याशिवाय त्याला धड चालताही येत नसे. अशा व्यक्तिमत्त्वामुळे पेंद्या गोकुळामध्ये सर्वांच्या चेष्टचा व मस्करीचा विषय बनला नसता तरच नवल होते. कोणीही येता जाता थट्टा करून व त्याचा कमीपणा दाखवून पेंद्याची टिंगल करीत आणि स्वतःची थोडा वेळ करमणूक करून घेत असत. सर्वात गमतीची गोष्ट म्हणजे 'पेंद्या' या नावाने जरी तो सर्वांना माहीत होता तरी त्याचे खरे नाव काय आहे हे कोणालाच, म्हणजे खुद्द त्याला स्वतःलाही माहीत नव्हते.

असा हा पेंद्या सुरुवातीला साहजिकच कृष्णाकडून मिळालेल्या खाण्यापिण्याच्या व खेळण्याच्या सुखामुळेच जरी कृष्णाच्या जवळ आला, तरी हळुहळू त्याला कृष्णाचे वेगळेपण कळू लागले. पेंद्याला आधी घरून शिदोरी नेहमी मिळत असेच असे नाही आणि मिळाली तरी ती पुरेशी मात्र कधीच नसे. अशा वेळी इतर बाळगोपाळ त्याची चेष्टा किंवा उपहास करीत आणि त्याला आपल्यापासून दूर ठेवण्याचाच त्यांचा कल असे. परंतु कृष्ण हा पेंद्याची परिस्थिती व त्याचे दुःख जाणून असल्यामुळे आपणहून पेंद्याच्या जवळ जाई आणि त्याला आपल्याजवळ बसवून घेई. आपल्या शिदोरीतील रसपूर्ण पदार्थ पेंद्याला अगदी पोटभर देऊन कृष्ण पेंद्याच्या पोटाबरोबरच त्याच्या मनालाही संतोष देई. पुढे सर्वांच्या शिदोरीचा काला करायला सुरुवात केल्यानंतरही पेंद्याला कृष्ण काहीच कमी पडू देत नसे. खेळण्याच्या वेळीही इतर बाळगोपाळ जेव्हा पेंद्याला दूर ठेवीत त्यावेळीही कृष्ण मात्र पेंद्याला त्याला जमेल तसे खेळात सहभागी करून घेई. वेळप्रसंगी पेंद्याशी कृष्ण स्वतःही खेळे आणि त्यालाही खेळाचा आनंद अनुभवास आणून देई. खरे तर, शरीराच्या पंगुत्वामुळे पेंद्याला कुठल्याच खेळात सहभागी होत येत नसे आणि त्याला इतर कोणी सहभागी करून घेतही नसत. मग पेंद्याला सहभागाची संधी मिळण्यासाठी कृष्णाने एक नवीनच खेळ शोधून काढला. एकाने दुसऱ्याला पाठुंगळी घ्यायचे आणि सर्वांनी मिळून धावण्याची शर्यत लावायची. जी जोडी जिंकेल त्या जोडीला भरपूर मोदक बक्षीस म्हणून मिळायचे. अर्थात कृष्णाने आपणहून पेंद्याशी जोडी जमवली. साहजिकच कृष्णामुळे त्यांचीच जोडी नेहमीच पहिला क्रमांक पटकावी आणि बक्षिसाचे सर्व मोदक एकटा पेंद्याच मटकावी.

असा कृष्णाच्या लोभाला पात्र झालेला पेंद्या खरोखरी भाग्यवंतच म्हणावयास हवा. आपल्या भाग्याचे असे फळ सेवन करता करता पेंद्याच्या ठिकाणी कृष्णाविषयी आधी कृतज्ञताच निर्माण झाली. त्या कृतज्ञतेपोटीच पेंद्या जमेल तशी कृष्णाची सेवा करीत असे. अर्थात 'सेवा' हा शब्दही पेंद्याच्या बाबतीत वापरणे बरोबरच नाही. कारण पेंद्याच्या साठी सेवा हा फारच मोठा शब्द होता. परंतु नेहमी कृष्णाच्या सोबत रहाणे, कृष्ण सांगेल त्याप्रमाणे करणे, कृष्ण बोलेल तसे वागणे यासारख्या म्हटल्या तर बाह्यांगाने अगदी किरकोळ वाटणाऱ्या गोष्टीच पेंद्याकडून घडत असत. परंतु त्या गोष्टी साध्या मात्र निश्चितच नव्हत्या. कारण त्यामुळेच कृष्णाला पेंद्या नेहमी जवळचा वाटे. आपल्या मनातल्या अनेक गोष्टी कृष्ण पेंद्याला मोकळेपणाने सांगे किंवा काही प्रसंगी काही गोष्टी विचारीतही असे. पेंद्याही कृष्णाचे सर्व बोलणे लक्षपूर्वक ऐकून घेई. त्याच्या डोक्यात काही प्रकाश पडत असे, असे मात्र मुळीच नाही. परंतु कृष्णाच्या बोलण्यातील निःसंदिग्धता व निश्चयात्मकता पेंद्याच्या नक्कीच लक्षात येई. कृष्णाच्या ठिकाणी दुसऱ्यांविषयी असलेला कळवळाही पेंद्याला जाणवत असे. त्यामुळेच कृष्णाच्या मनाचा मोठेपणा पाहून पेंद्याचे कृष्णावरचे प्रेम अधिकाधिक वाढत राहिले. कृष्णाला पाहिल्याशिवाय, त्याच्याशी बोलल्याशिवाय, त्याला भेटल्याशिवाय पेंद्याला चैनच पडत नसे. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे कृष्णालाही नेमके तसेच होई. पेंद्याची भेट झाली नाही तर कृष्णही अस्वस्थच असे. अशा वेळी जेव्हा ते दोघे एकमेकांना अचानक भेटत, तेव्हा तर एकमेकांना कडकडून मिठीच मारीत.

कृष्णावरच्या त्याच प्रेमापोटी पेंद्या हळुहळू कृष्णाशी मोकळेपणाने बोलूही लागला. मुळात असलेल्या कमीपणाच्या भावनेमुळे पेंद्याचे नेहमीचे बोलणेही अडखळत व चाचरत असे. 'कृष्ण' हा पूर्ण जोडाक्षरी शब्दही पेंद्याला उच्चारता येत नसे. तो तर कृष्णाला 'कुत्ना' या नावानेच हाक मारीत असे. त्याहीपेक्षा अधिक सोपे म्हणजे कृष्णाला सरळसरळ 'किसन' असेच म्हणत असे. कृष्णाला या नावापेक्षा त्या मागील पेंद्याचा निरागस व लडिवाळ भावच अत्यंत आवडत असे आणि तोही पेंद्याला काहीवेळा 'पेंद्याजी' किंवा 'पेंदूराव' असे संबोधून पेंद्याची चेष्टा करीत असे. किंबहुना पेंद्याची मनसोक्त चेष्टा करणे हा कृष्णाचा एक अत्यंत आवडता छंदच असे. इतरांनी काही चेष्टा केल्यास त्यांच्यावर रागावणारा पेंद्या कृष्णाच्या विनोदाने वा थट्टामस्करीने अतिशय खूश होत असे आणि त्याला तो अगदी मोकळेपणाने हसून दादही देत असे. क्वचितप्रसंगी पेंद्याही कृष्णाची थट्टा करण्याचे स्वातंत्र्य प्रेमाने घेई. परंतु त्यातही त्याच्याकडून मर्यादेचे उल्लंघन मात्र कधीच होत नसे. मुख्य म्हणजे पेंद्याने केलेल्या अशा थट्टेचे कृष्णही तेवढ्याच मनमोकळेपणाने स्वागत व कौतुकही करीत असे. अशी कृष्ण व पेंद्या यांची बाह्यांगाने विजोड दिसणारी परंतु जमलेली जोडी, हा गोकुळामध्ये एक नवलाचा व कौतुकाचा आणि अर्थातच काही जणांच्या टीकेचा व नाराजीचा विषय होऊन राहिला होता. त्या कशाकडेही लक्ष न देता कृष्ण व पेंद्या मात्र त्यांच्यात निर्माण झालेल्या प्रेमस्नेहाचा आनंद मनमुराद घेत असत.

कृष्णाचे मन प्रेमाने पेंद्या राखीत असे, तर कृष्ण पेंद्याला सुखवीत असे. पेंद्याच्या सुखाने कृष्णाला सुख होत असे. कृष्णाच्या प्रेमाला पेंद्या सदैव जागत असे, तर कृष्ण नेहमी पेंद्याचे कृष्णावरती किती प्रेम आहे हेच सर्वांना सांगत असे. पेंद्याचे स्वास्थ्य व हित जाणून कृष्ण त्याप्रमाणे करीत असे, तर कृष्णाच्या मनात काय आहे याचा विचार करून त्याप्रमाणे पेंद्या वागत असे. अशा या कृष्ण व पेंद्या यांच्या प्रेमाचे वर्णन केवळ 'अनुपम' या एकाच शब्दाने करता येण्यासारखे आहे.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या सहवासाने पेंद्याच्या बाबतीत एक मुख्य व महत्त्वाची गोष्ट घडली, ती म्हणजे पेंद्याच्या ठिकाणी त्याच्या शारीरिक पंगुत्वामुळे व मनाच्या दुर्बलतेमुळे जो एक न्यूनगंड निर्माण झाला होता, तो मात्र पूर्णपणे नाहीसा झाला. पेंद्याच्या ठिकाणी अधिकाधिक आत्मविश्वास निर्माण झाला. त्याचे लक्षण म्हणजे त्याच्या वागण्यात व बोलण्यात धीटपणा व मोकळेपणा आला. त्याला कशाचीही व कोणाचीही उगाचच भीती वाटेनाशी झाली. कारण कृष्ण आपला पाठीराखा व त्राता आहे याची त्याला पूर्ण खात्री होती. पेंद्यातील झालेला हा बदल सर्वांच्याच लक्षात आला. काहीजणांना त्याचे कौतुक वाटले, तर काहीजणांना अर्थातच तो बदल पसंत पडला नाही. पेंद्याच्या ठिकाणी एकच विचार नेहमी असे आणि तो म्हणजे कृष्णाच्या मानसिक स्वास्थ्याचा. कृष्णाला कोणी नावे ठेवली किंवा कृष्णाची कोणी पाठीमागून निंदा केलेली जर कानावर आली, तर पेंद्याला ती अजिबात सहन होत नसे. मग मात्र त्याचा राग अनावर होई आणि तो राग व्यक्त करायलाही तो मागे पुढे पहात नसे. संबंधित व्यक्तीशी रागाने बोलून तो त्याचा यथेच्छ समाचार घेई. वेळप्रसंगी तो एखाद्याच्या अंगावर धावूनही जाई. खरे तर त्याच्या अंगातली ताकद ती काय? परंतु कृष्णावरील प्रेमाने त्याच्या अंगात एकदम बळच संचारीत असे. अशा वेळी कृष्ण मात्र पेंद्याला आवरून धरीत असे आणि त्याला शांत करून स्वतःही शांत रहात असे. काही वेळा पेंद्याला कृष्णाच्या या शांतपणाचाच राग येई आणि तसे तो बोलूनही दाखवी. असाच एके प्रसंगी पेंद्या कृष्णाला म्हणाला,

''अरे कुत्ना, तू सर्वांशी एवढा प्रेमाने वागतोस, त्यांना हरप्रकारे मदत करतोस, सर्वांच्या सुखाची व स्वास्थ्याचीच नेहमी काळजी करतोस. तरीही काही लोक तुला का नावे ठेवतात? तुझी निंदा का बरे करतात? आणि तू ते सर्व शांतपणे सहनही का व कसे करतोस हेच मला समजत नाही. एवढे करूनही तुझ्या ठिकाणी कोणाविषयी राग तर नाहीच, उलट तू सर्वांशी प्रेमाने वागतोस आणि त्यांना अडचणीच्या प्रसंगी मदत करायलाही तत्पर असतोस. कोणी तुला हाक मारो किंवा न मारो, तुला मात्र त्यांच्या सहाय्याला धावून जाण्यासाठी जराही वेळ लागत नाही. हे किसना, अरे तू हे सर्व का करतोस? आणि असे वागणे तुला जमते तरी कसे? हेच मला समजत नाही.''

पेंद्याचे बोलणे ऐकून कृष्णाच्या मुखावरही थोडा वेळ गंभीरता पसरली. त्याने पुन्हा एकदा पेंद्याकडे दृष्टिक्षेप टाकला. पेंद्याच्या चेहऱ्यावरील काकुळतीचे भाव पाहून कृष्णाला पेंद्याची दयाच आली. पण त्याचबरोबर पेंद्याच्या ठिकाणी कृष्णाविषयी असलेले अतोनात प्रेम पाहून व जाणून कृष्णाला अतिशय आनंद झाला. त्यामुळे पेंद्याकडे पाहून कृष्णाने पुन्हा एकदा स्मितहास्य केले आणि तो पेंद्याला म्हणाला,

''अरे पेंद्या, हीच तर मोठी गंमत आहे. प्रत्येकजण त्याच्या त्याच्या स्वभावाने बांधला गेला आहे आणि त्यानुसार तो तसा वागत असतो. पण जोपर्यंत आपले मन शुद्ध आहे आणि आपला हेतू शुद्ध आहे तोपर्यंत दुसऱ्यांच्या म्हणण्याकडे लक्ष देण्याचे आपल्याला काय कारण आहे? कोणी आपली निंदा केली म्हणून त्याची पर्वा करण्याचे आपल्याला काहीच कारण नाही. अर्थात याचा अर्थ असा नव्हे, की आपले काही चुकतच नाही असा अहंकार आपण बाळगावा किंवा आपल्या चुकांविषयी आपण बेफिकीर असावे. आपल्या वागण्या-बोलण्याचा परिणाम काय होत आहे आणि आपला हेतू साध्य होत आहे ना याची नेहमीच काळजी घ्यावी. ज्याच्यासाठी आपण करीत आहोत त्याचे हित खरेच साधले जात आहे ना याची वारंवार खात्री करून घ्यावी. त्याचप्रमाणे 'माझे निर्णय, माझे वागणे व बोलणे हेच बरोबर व अंतिम आहे' असा आपला हट्ट कधीच नसावा. तर आपल्या वागण्या-बोलण्यातही परिस्थितीनुसार योग्य बदल करण्याचा मोकळेपणा आपल्या मनाच्या ठिकाणी असावा.

अरे पेंद्या, असे सर्व तेव्हाच शक्य होते जेव्हा आपली ईश्वरावर अत्यंत दृढ श्रद्धा असते. कारण त्या ईश्वराचीच सत्ता ही सर्वश्रेष्ठ आहे. त्याच्या नियतीनेच सर्व जीवमात्र बांधले गेलेले आहेत. आपापल्या स्वभावानुसार व संस्कारांप्रमाणे जो तो कर्मे करीत असतो आणि त्यांची फळे मात्र ज्याला त्याला त्याच्या नशिबानुसार मिळत असतात. परंतु हे न कळल्यामुळेच अज्ञानाने सर्वजण सतत कर्मे करीत राहतात आणि प्राप्त झालेल्या फळांचे सेवन करीत बसतात. अपेक्षेनुसार फळ मिळाल्यास सुखावून जातात आणि कर्मांच्या अधिकाधिक मोहात गुंतत जातात. अपेक्षेनुसार फळ मिळाले नाही तर निराश होतात व चिडतात आणि त्याचा दोष दुसऱ्याला देऊ पाहतात. ईश्वराच्या सत्तेची जाणीव ठेवून जेव्हा आवश्यक व योग्य असे प्रयत्न घडतात तेव्हाच मनाला समाधान व शांती सहजपणे लाभते आणि मग कसेही फळ मिळाले तरी ते समाधान व ती शांती अढळ रहाते.

अरे पेंद्या, एक गोष्ट लक्षात ठेव, की आपल्या चांगल्या वागण्याचे लोक कौतुक करतील वा न करतील. परंतु त्याचा आनंद आपणा स्वतःला होत असतो आणि तोच खरा. जसे आपण आंघोळ केली तर स्वच्छ राहिल्याचा आनंद आपल्यालाच आहे. आपण जेवलो तर भूक शमन झाल्याचा आनंद आपल्यालाच आहे. आपण पाणी प्यायलो तर तहान भागल्याचा आनंदही आपल्यालाच आहे, होय ना? अगदी तसेच ईश्वराला स्मरून, त्याच्या सत्तेची जाणीव ठेवून, आपण दुसऱ्याच्या सुखासाठी व हितासाठी आपल्याला जेवढे शक्य असेल तेवढे प्रेमाने करीत रहाणे याचा आनंद आपल्याला व आपल्यापाशीच आहे. सर्वांनाच तो आनंद कळेल वा मिळेल अशी अपेक्षा आपण बाळगून राहिलो तर अपेक्षाभंगाचे दुःख आपल्यालाच विनाकारण होत राहील. त्यापेक्षा 'कोणी काही म्हणा, कोणी काही म्हणा, अनुसरावे अपुल्याची मना' हेच बरे आणि हेच खरे!

अरे पेंद्या, माझ्यासाठी मात्र आणखी एक भाग्याची गोष्ट आहे की मला तुझ्यासारखा सखा लाभला. माझे मन जाणून व समजून घेणारा, माझ्या हेतूविषयी पूर्ण खात्री बाळगून असणारा, मला सर्वतोपरी सदैव साथ देणारा व सहाय्यभूत होणारा आणि मुख्य म्हणजे माझा नेहमी प्रेमाने कैवार घेऊन, माझ्यासाठी वेळप्रसंगी इतरांशी भांडणारा सुद्धा, असा माझ्या खऱ्या प्रेमाचा पेंद्या, तू माझ्या पाठीशी व माझ्याबरोबर असताना मला तर इतरांच्या मतांची व त्यांच्या प्रतिक्रियांची तमा बाळगण्याचे काहीच कारण नाही. खरे की नाही?''

कृष्णाचे आधीचे बोलणे ऐकत असताना मनाच्या थोड्याशा गोंधळलेल्या अवस्थेत असलेला पेंद्या कृष्णाच्या शेवटच्या वाक्याने मात्र एकदम खुशीत आला आणि कृष्णाकडे पाहून मोकळेपणाने हसला. त्याच मोकळेपणाने कृष्णाला उद्देशून पेंद्या बोलू लागला.

''अरे किसना, तू करीत असलेले माझे कौतुक ऐकून मला निश्चितच बरे वाटत आहे आणि माझी इवलीशी छाती थोडीशी का होईना पण फुगली आहेच. मला ठाऊक आहे की तू माझे जेवढे कौतुक करीत आहेस तेवढे काही मी विशेष केलेले नाही. पण एवढ्याशा गोष्टीचे केवढे तरी कौतुक करण्याचा तुझा स्वभावच आहे. आपल्या प्रेमाच्या व्यक्तीने केलेली लहानशी गोष्टही तुला फारच मोठी जाणवते हा तुझ्या मनाचा मोठेपणा आहे. त्यात माझा काहीच मोठेपणा नाही. त्यातूनही माझ्याकडून काही थोडेसे तुझ्यासाठी घडत असेल तर त्यालाही कारणीभूत तूच आहेस.

अरे किस्ना, तुझे बोलणे, सांगणे, वागणे, तुझे रूप, गुण एवढे मोहक आहेत, की माझ्यासारख्याच्या मनाला त्याची भूल न पडली तरच नवल. त्यातूनही तुझा जो प्रेमळ स्वभाव आहे ना, तो तर अगदी कमालीचा आहे. सर्वांवर तुझे जरी सारखे प्रेम असले तरी तुझे प्रेम माझ्यावरती जरा जास्तच आहे याची मला खात्री आहे. गंमत म्हणजे अशी खात्री प्रत्येकालाच वाटत असते. पण एक गोष्ट मात्र नक्की आहे की माझ्या ठिकाणी तुझ्याविषयी जे प्रेम निर्माण झालेले आहे, त्याची गणतीच करता येणार नाही. कारण त्या प्रेमाला कोणतेही मोजमाप नाही. पण त्या प्रेमाचे कारण व अस्तित्व

तुझ्यामुळेच आहे एवढे मात्र निश्चित. त्या तुझ्या प्रेमामुळेच नेहमी तुझ्याजवळ रहावे, तुझी सोबत करावी आणि प्रत्येक गोष्टीत तुला साथ द्यावी असे मनापासून वाटत असते.

किस्ना, तुझ्या डोळ्यांत दिसणारे माझ्याविषयीचे प्रेम आणि माझ्या प्रेमाचा तू धरून असलेला खात्रीचा भाव हे मला नेहमीच पहायला मिळावे एवढीच माझी इच्छा असते. तुझ्या सहवासाची, तुझी काहीतरी सेवा करण्याची संधी तू मला देतोस हे तुझे माझ्यावरती केवढे तरी उपकारच आहेत. नाहीतर माझी लायकी ती काय आहे बरे? ना माझ्याकडे शारीरिक बळ, ना मला अक्कल! ना माझ्याकडे रूप, ना माझ्याकडे काही कलागुण! तरीही तू मला आपला म्हटलेस, एवढेच नव्हे तर त्या आपलेपणाने मला वागवलेस आणि वाढवलेसही! त्याच आपलेपणापोटी तू तुझेही मन माझ्याकडे मोकळे करतोस. या तुझ्या उपकारातून ऋणमुक्त कधीच होता येणार नाही हे मला ठाऊक आहे. तसे ऋणमुक्त होण्याची माझी इच्छाही नाही आणि पात्रताही नाही. कारण तुला देण्यासारखे माझ्याकडे काय आहे? तर माझ्याशिवाय दुसरे काहीच नाही. म्हणूनच तर मी फक्त तुझाच आहे आणि तुझ्यासाठीच आहे, या एकाच दृष्टीने जगत असतो.

या तुझ्यावरील प्रेमापोटीच मला कोणी तुझ्यावर केलेल्या दोषारोपांचा, तुझ्या निंदेचा किंवा तुला दिलेल्या दूषणांचा अतिशय राग येतो. बरे, कोणाला काही समजावून सांगावे तर लोक माझे बोलणे गंभीरपणे घेतच नाहीत. उलट माझी चेष्टा करून तुझ्याविषयी काहीतरी बोलत रहातात. तेव्हा मात्र माझा राग अनिवार होतो. मग माझ्याकडून काहीतरी वाईट शब्दही बोलले जातात. क्वचित प्रसंगी माझे बळ नसतानाही माझ्याकडून मारामारीही केली जाते. अर्थात भरपूर मार मीच खातो आणि मग रडत रडत परत तुझ्याकडेच येतो. तू प्रेमाने जवळ करून मला तुझ्या कुशीत घेतलेस ना, की मग मात्र माझे सर्व दुःख दूर होते. तू एकदा आपल्या हाताने माझे डोळे पुसलेस ना, की मग माझे मन अगदी शांत होते. तुझ्या हसऱ्या मुखाकडे आणि माझ्याविषयीच्या कौतुकाने भरलेल्या तुझ्या नजरेकडे पाहिले की मग माझीही कळी खुलते. तू प्रेमभराने माझ्या गालाचे गालगुच्चे व मुके दोन्ही घेतोस ना, तेव्हा तर हे किस्ना, माझे मन अगदी आनंदाने नाचावयास लागते. मग मीही प्रत्यक्ष नाचू लागतो आणि तूही प्रेमाने माझे कौतुक करीत माझ्याबरोबर नाचूही लागतोस. अरे माझ्या कुत्ना, तूच सर्वस्वी माझा आहेस आणि मीही सर्वस्वी तुझाच आहे.''

कृष्णप्रेमाने ज्याचे अंतःकरण पूर्ण भरून वाहू लागलेले आहे असा पेंद्या आणखी किती वेळ असे बोलत राहिला असता कोणास ठाऊक? परंतु अंतःकरणातील कृष्णप्रेम पेंद्याच्या नेत्रातूनही वाहू लागले होते. त्यामुळे बोलता बोलता त्याचा कंठ दाटून आला आणि त्या कंठातून शब्द बाहेर फुटेनासेच झाले. परंतु प्रेमाश्रूंची धार मात्र थांबू शकतच नव्हती. त्या प्रेमभऱ्या अवस्थेतच पेंद्या कृष्णाच्या कधी जवळ आला आणि कृष्णाच्या कुशीत शिरून त्याच्या मिठीत केव्हा विसावला हे पेंद्यालाही कळले नाही आणि कृष्णालाही कळले नाही. तसे कळण्याची आवश्यकता व भान त्यांना होतेच कुठे? आपण एकमेकांचे आहोत हे त्यांना कळले होते आणि एकमेकांना ते मनोमनी मिळालेही होते.''

नारदाच्या मुखातून पेंद्याच्या कृष्णप्रेमाचे वर्णन ऐकता ऐकता लक्ष्मीही भारावून राहिली होती. नवलमिश्रित कौतुकाची दाद देणारे सहजोद्गार लक्ष्मीच्या मुखातून निघू लागले.

''कमाल आहे, हे नारदा, पेंद्याची खरेच कमाल आहे. एखाद्या व्यक्तीचे एखाद्या व्यक्तीवर एवढे उत्कट प्रेम असू शकते हे खरोखरीच नवलाईचे आहे, तसेच अत्यंत कौतुकाचेही आहे. अर्थात तो एक कृष्ण होता आणि दुसरा एक पेंद्या होता म्हणूनच हे शक्य झाले, हे मात्र मी नक्की जाणून आहे. कारण दुसऱ्या कोणत्याही दोन व्यक्तींमध्ये एवढे प्रेम असणे शक्यच नाही. हे नारदा, मी पूर्णपणे जाणून आहे की या प्रेमाचे मूळ कारण कृष्णच होता. त्याच्या सगुणरूपाचेच तर हे सारे माहात्म्य आहे. परंतु कृष्णाच्या प्रेमसादाला तेवढ्याच प्रेमाने प्रतिसाद देणारा पेंद्याही तेवढाच कौतुकास पात्र आहे. कारण कृष्णाने तर सर्वांनाच प्रेमाची साद घातली असणार आणि सर्वांनीच त्याला प्रतिसाद दिले असणेही शक्य नाही. कारण सर्वांनाच ते प्रेम कळले असेल व मानवले असेल असेही नाही. मग पेंद्याचे साधेपण व भाबडेपण हेच त्याच्या उपयोगाला आले असेल का? त्याच्या न्यूनगंडामुळे व दुर्बलपणामुळेच त्याचे व कृष्णाचे एवढे सख्य जमले असेल का?''

लक्ष्मीच्या प्रश्नाचे नारदाने हसून कौतुक केले. क्षणभरच थांबून तो लक्ष्मीला लागलीच म्हणाला, ''हे लक्ष्मी, तुझा प्रश्न योग्यच आहे. तुझे हेही म्हणणे बरोबरच आहे, की पेंद्या हा शरीराने व मनाने अत्यंत दुर्बल असल्यामुळेच त्याला कोणाच्या तरी आधाराची अत्यंत जरुरी होती. त्यामुळे त्याने कृष्णासारख्या सबळ, हुशार व धनवानही असलेल्याचा आश्रय एखादे वेळेस जाणूनबुजूनही घेतला असेल. कारण त्यात तर त्याचा स्वार्थ होताच. त्याला आधार मिळाला, त्याची खाण्यापिण्याची चंगळही झाली, कृष्णाकडून चांगले चांगले कपडेही त्यास मिळत असत, बस्स! मग आणखी दुसरे त्याला काय पाहिजे होते?

पेंद्याला हे सर्व भाग्याने मिळाले हे खरेच आहे. पण त्यातून त्याच्या ठिकाणी कृष्णाविषयी कृतज्ञता निर्माण झाली हे महत्त्वाचे. कारण अनेकजण आपला स्वार्थ साधला की केलेल्या उपकाराला व करणाऱ्या उपकारकर्त्याला विसरतात. वेळप्रसंगी कृतघ्नही होतात. अशा वेळी कृतज्ञभावाने पेंद्या नेहमी कृष्णाच्या जवळ राहिला आणि कृष्णाचे मन विचारून घेत राहिला हेच अत्यंत महत्त्वाचे होते. कारण कृष्णाच्या मनातील गोष्टीच दुसरे कोणीही विचारून व समजून घेत नसे. त्यामुळे कृष्णही आपले मन पेंद्याकडे मोकळे करी. कृष्णाचे मन हळुहळू कळू लागल्यावर पेंद्याला कृष्णाचे प्रेमही थोडे थोडे कळू लागले. तसे पाहिले तर ते प्रेम पेंद्याला आधीही नेहमीच मिळत होते, पण ते त्याला कळत नसे एवढेच. परंतु कृष्णाचे प्रेम कळू लागल्यावर मात्र पेंद्याच्या ठिकाणी कृष्णासाठी काहीतरी करावे असे मनोमनी वाटू लागले. त्याप्रमाणे पेंद्या नेहमीच काही ना काही तरी करीत राही. पेंद्या काय करतो यापेक्षा ज्या प्रेमाने करीत असे, ते प्रेम कृष्णाला अर्थातच लगेचच कळत असे. प्रेमाचा भोक्ता असलेला कृष्ण म्हणूनच मग पेंद्याच्या प्रेमाचा सहजपणे स्वीकार करी.

अशा त्या प्रेमाच्या देवघेवीतूनच कृष्ण व पेंद्या यांची मने जुळली आणि त्यामुळेच पेंद्या हा कृष्णाने देऊ केलेले सख्यत्व घेऊ शकला. प्रेमाच्या सौख्यातून प्रेमाचे सख्य निर्माण झाले. या सख्यत्वामुळेच पेंद्याच्या ठिकाणचा असलेला

कमीपणा किंवा न्यूनगंड नाहीसा होत गेला. कारण सख्यत्वामध्ये समानता असते. त्यात उच्च-नीच, लहान-मोठा किंवा श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेद असूच शकत नाही. परंतु बाहेरील फरक मात्र जरूर रहातो. तरी तो फरक सख्यत्वाच्या आड येऊ शकत नाही. बाह्यांगाने कृष्ण हा कृष्णच राहिला आणि पेंद्या हा पेंद्याच राहिला. कृष्ण राजवाड्यात रहात असे आणि पेंद्या हा त्याच्या झोपडीतच रहात असे. कृष्णाचा पोषाख भरजरी असे, तर पेंद्याचा पोषाख हा साधाच असे. कृष्ण आपल्या घरी मिष्टान्नाचे जेवण करीत असे, तर पेंद्याला त्याच्या घरी साधी भाताची पेज वा कण्याच मिळत असत. परंतु या गोष्टी दोघांच्याही आड आल्या नाहीत आणि त्यांनी या गोष्टींची अदलाबदलही केली नाही. कारण तशी त्यांना जरुरीच भासली नाही. परंतु कृष्ण व पेंद्या प्रसंगी एकमेकांच्या घरी मोकळेपणाने जात आणि तेथे प्रेमाच्या हक्काने जेवीत सुद्धा असत. बाहेरच्या गोष्टी ज्या सहजपणाने जशा जशा उपलब्ध होत्या त्यांचा तसा तसा उपयोग करून कृष्ण व पेंद्या एकमेकांच्या प्रेमाचा व सख्यत्वाचा मनमुराद अनुभव घेत.''

नारदाच्या मुखातून कृष्ण व पेंद्या यांच्या प्रेम-सख्याचे वर्णन श्रवण करीत असताना लक्ष्मीची उत्कंठा क्षणाक्षणाला वाढत होती. म्हणूनच न राहवून लक्ष्मीने नारदाला एकदम विचारलेच की, ''हे नारदा, एवढे जर कृष्ण व पेंद्या यांचे सख्यत्व होते, तर मग पेंद्या हा कृष्णाशी ऐक्यही अगदी सहजतेनेच पावला असणार, नाही का?''

लक्ष्मीच्या प्रश्नाने विचलित न होता नारदाने हसून, पण नकारात्मक मान डोलवली. नारदाच्या या अनपेक्षित प्रतिक्रियेमुळे लक्ष्मीच्या मुखावर आलेला नवलाईचा भाव नारदाने थोडावेळ निरखून पाहिला आणि लागलीच तो उत्तरला.

''हे लक्ष्मी, एक मुलभूत व मुख्य गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ऐक्य हे केवळ भक्तिभावानेच शक्य होत असते आणि असा भक्तिभाव केवळ ईश्वरी अस्तित्वाच्या ठिकाणीच संभवतो. ईश्वरी अस्तित्वाची व माहात्म्याची पूर्ण जाणीव आणि व्यक्तिगत प्रेमाची पराकोटी यांच्या संयोगातूनच या भक्तिभावाचा उगम होत असतो. म्हणूनच त्याची परिणती ईश्वर व भक्त यांच्या ऐक्यरूपी संगमात होत असते.

पेंद्याच्या ठिकाणी कृष्णाविषयीचे प्रेम निश्चितच असीम होते. त्याच्या प्रेमाला पारावारच नव्हता. परंतु कृष्णाच्या ठिकाणी असलेल्या ईश्वरी अनुभवाची पेंद्याला तर कल्पनासुद्धा नव्हती. किंबहुना ईश्वरी अस्तित्व, ईश्वरी अनुभव हे शब्दप्रयोग तर त्याला पूर्णपणे अपरिचित होते. एवढेच काय, ईश्वर या शब्दाचा अर्थही त्याला माहीत नव्हता आणि तो अर्थ माहीत करून घेण्याची त्याला कधी आवश्यकताच वाटली नाही. उलट, ज्या ज्या वेळेस कृष्णाच्या मुखातून 'ईश्वराच्या अस्तित्वाचा व सत्तेचा' उल्लेख सहजपणे येत असे त्या त्या वेळेस पेंद्या चकितच होत असे. त्याच्या मनात व डोक्यात गोंधळच उडत असे.



एकदा तर त्याने कृष्णाला थोड्याशा स्पष्टपणेच, पण प्रेमाच्या मोकळेपणानेच सांगितले की, ''अरे किस्ना, तू नेहमी 'ईश्वर, ईश्वर' म्हणून जो म्हणत असतोस तो आहे तरी कसा? आणि असतो तरी कोठे? मी तर त्याला कधीच पाहिलेला नाही आणि कधी पाहूही शकणार नाही. कारण तो तर आभाळाच्याही पलीकडे आहे असे मी ऐकून आहे. तेथे मी जाणार तरी कसा? आणि, तो तरी माझ्यासाठी खाली येणार कशाला? आता तू तर म्हणतोस की तो ईश्वरच आम्हाला सर्व काही देतो आणि तोच आमचे नेहमी रक्षण करीत असतो. पण आम्हाला आणि खास करून मला तरी, सर्व काही तूच देत असतोस. माझे रक्षण तर नेहमी तूच करीत असतोस आणि मला आधारही एकमेव तुझाच आहे. तेव्हा तुझ्या पलीकडे आणखी दुसरा कोणीही मला दिसत नाही आणि मी मानतही नाही. माझ्यासाठी तरी तूच माझा 'देव' आहेस. तुझेच प्रेम मला सदैव मिळते आणि केवळ तुझ्यावरतीच प्रेम करावे असे मला नेहमी वाटत असते. एवढेच नव्हे, तर सर्व काही तुझ्यासाठीच करावे आणि फक्त तुझ्यासाठीच जीवन जगावे असेच मला वाटत असते. हे किसन देवा, एवढेच मला कळते आणि एवढेच मी जन्मभर करीत रहाणार.''

पेंद्याच्या बोलण्याचे एकीकडे कृष्णाला अत्यंत कौतुक वाटले आणि तो अगदी मोकळेपणाने बराच वेळ हसतच राहिला. परंतु दुसरीकडे कृष्णाच्या मनात पेंद्याविषयी दयाही निर्माण झाली आणि म्हणून तो गंभीरपणे पेंद्याशी पुन्हा बोलूही लागला.

''अरे पेंद्या, हा तुझा लडिवाळपणा व प्रेमाचा निरागस भावच मला नेहमी आवडत असतो आणि म्हणूनच तूही मला प्रिय होत असतोस हे अगदी खरे आहे. परंतु त्याचबरोबर तुझ्या मनाची योग्य समज होणेही अत्यंत आवश्यक आहे. नाही तर मग, तुझे मन नेहमीच दुर्बल राहील आणि जेव्हा प्रत्यक्ष वस्तुस्थितीला सामोरे जाण्याची वेळ तुझ्यावर येईल, तेव्हा मात्र तुझ्या मनाला अत्यंत दुःख व क्लेश होतील.

हे पेंद्या, तू मलाच 'देव' म्हणतोस हे तुझ्या दृष्टीने जरी बरोबर असले तरी एक गोष्ट पक्केपणाने लक्षात ठेव, की मीही तुझ्यासारखाच मनुष्य देहाने आहे. त्यामुळे एक दिवस मीही सर्व मनुष्यांप्रमाणेच हा माझा देह सोडून जाणार आणि या

सृष्टीत मी असणार नाही. परंतु ईश्वर मात्र सदासर्वकाळ असतो. तो नाही असे कधीही होत नाही. त्याच्या सत्तेनेच सर्व सृष्टीचा कारभार चालत असतो हे अगदी खरे आहे. तो जरी दिसत नसला तरी सर्वांच्या ठायी त्या ईश्वराचेच अस्तित्व आहे. म्हणूनच तर आपण पाहू शकतो, ऐकू शकतो, बोलू शकतो, चालू शकतो आणि सर्व कर्मे करू शकतो, हे पूर्णपणे लक्षात ठेव. त्या ईश्वराचीच आठवण ठेव. त्याचेच स्मरण नेहमी करीत रहा आणि संकटकाळीसुद्धा त्या ईश्वरालाच आळवीत रहा. तोच तुझे रक्षण करील. कारण तोच तुझा खरा आधार आहे.''

कृष्णाचे बोलणे ऐकून पेंद्या थोडासा विचारात पडला आणि साहजिकच गंभीरही झाला. परंतु लगेचच त्याच्या चेहऱ्यावर मंदस्मित झळकले आणि तो कृष्णाला पुन्हा मोकळेपणाने सांगू लागला, ''अरे किस्ना, तू हे जे मोठे मोठे शब्द वापरून बोलत आहेस ना, ते ऐकून माझे डोके अगदी जड झाल्यासारखे झाले आहे. तुला ठाऊकच आहे की आधीच मी डोक्याने मठ्ठ आहे. त्यात तुझे हे जड जड शब्द आणि गंभीर बोलणे, मग तर विचारायलाच नको. मला तर अगदी काहीच कळेनासे झाले आहे. परंतु किस्ना, माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे तुझे सांगणे अगदी बरोबरच असणार याची मला पक्की खात्री आहे. परंतु तुझे सांगणे मला कळत नाही. अर्थात तो माझाच कमीपणा आहे, तरीही ते खरेच आहे. पण ज्याला मी पाहू शकत नाही, ऐकू शकत नाही, ज्याच्याशी मी बोलू शकत नाही किंवा ज्याला मी काही विचारूही शकत नाही, त्याची आठवण मी कशी ठेवणार आणि त्याचे स्मरण तरी मला कसे होणार? मला तरी ते मुळीच शक्य होणार नाही.

तेव्हा हे किस्ना, आता नेहमीप्रमाणे तूच मला सांभाळून घे. माझा राग करू नकोस किंवा माझ्यावरती नाराजही होऊ नकोस. परंतु माझ्या दृष्टीने माझ्यासाठी तरी तूच माझा 'देव' आहेस. मला दुसरे काहीही समजत नाही. मला फक्त तूच दिसतोस आणि मलाही फक्त तूच हवा आहेस. तुझ्या रूपाने, तुझ्या गुणाने आणि त्याहीपेक्षा तुझ्या प्रेमाने तूच मला अत्यंत प्रिय आहेस. माझे मन नेहमी तुझ्याकडेच धावत असते आणि त्या मनाला तुझ्याठायी आल्यानेच शांती व समाधान लाभत असते. अरे किस्ना, घरातील देवतांच्या मूर्तीसमोरसुद्धा जेव्हा सकाळ-संध्याकाळ मी हात जोडतो ना, तेव्हा माझ्या मिटलेल्या डोळ्यांसमोर तुझीच मूर्ती येते. तुझेच हास्यमुख माझ्या दृष्टीसमोर रहाते आणि माझे मन तुझ्या प्रेमाने भरून येऊन डोळ्यांद्वारे वहात रहाते. हे किस्ना, मी तुला अगदी खरे खरे सांगतो, की मी तुझ्याशिवाय दुसऱ्या कुणालाही जाणत नाही आणि त्याची तशी मला जरुरीही नाही. तेव्हा 'माझ्या या प्रेमाचा व सेवेचा तू नेहमीच स्वीकार करीत रहावेस आणि सतत मला तुझ्याच जवळ ठेवावेस' एवढेच मी तुझ्याकडे मागतो'', असे बोलत बोलतच पेंद्या कृष्णाच्या अगदी जवळ आला आणि स्फुंदून स्फुंदून रडत कृष्णाच्या कुशीत शिरला. तर कृष्णाने अत्यंत प्रेमाने पेंद्याला आपल्या पूर्ण मिठीतच घेतले आणि प्रेमाचे दृढालिंगन दिले.''

*****

साहित्य प्रतिष्ठान®

# प्रेमाचे सख्य व भक्तिचे ऐक्य

पेंद्याच्या ठिकाणी कृष्णाविषयी असलेल्या निरागस व पराकोटीच्या प्रेमाचे वर्णन ऐकून लक्ष्मीही निश्चितपणेच भारीत झाली होती. परंतु त्याचबरोबर नारदाच्या मुखातून प्रगटलेले ऐक्य पावण्याच्या भक्तिभावाचे रहस्यही लक्ष्मी सावधपणे ऐकत होती. त्यामुळेच तिने नारदाला पुन्हा प्रश्न केला,

''हे नारदा, तू एकीकडे पेंद्याच्या प्रेमाचे कौतुकही करीत आहेस आणि दुसरीकडे भक्तिभावाचा वेगळेपणाही दाखवीत आहेस. पण मग पेंद्याच्या व्यक्तिगत प्रेमाचे महत्त्व तरी काय? तो कृष्णाशी कधीच ऐक्य पावला नाही का? त्याच्याकडून तशी भक्ती कधीच घडू शकली नाही का?''

लक्ष्मीच्या ठिकाणी नकारात्मक भावाची सुरुवात होत आहे असे लक्षात येताच त्याचे ताबडतोब खंडन करण्याच्या उद्देशाने नारदाने लागलीच बोलावयास सुरुवात केली.

''हे लक्ष्मी, तसे मात्र मुळीच नाही. या सृष्टीत एखाद्याने अगदी नकळत किंवा अज्ञानानेही जरी या नारायणाप्रीत्यर्थ काहीही केले तरी ते कधीच व्यर्थ जात नाही. त्याच्या त्याच्या अवस्थेप्रमाणे त्याला त्याच्या कृतीचे फळ मिळतेच आणि त्यातूनच त्याला पुढच्या पुढच्या अवस्थेत जाण्याची संधी प्राप्त होत असते.

प्रपंचात दुःखाने गांजलेले प्रापंचिक जीव रक्षणासाठी व आधारासाठी त्यांच्या समजुतीच्या ईश्वराला अज्ञानाने का होईना पण आळवतात. त्याच्यासाठी व्रते करतात, तीर्थयात्रा करतात, पूजाअर्चा करतात. पण त्याचेही फळ त्यांना मिळतेच. बाह्यांगाने त्यांच्या मनाप्रमाणे गोष्टी काहीवेळा घडतात किंवा घडतही नाहीत. परंतु ईश्वराविषयीचा आस्तिक्यभाव त्यांच्या ठिकाणी निर्माण होऊ लागतो. त्यामुळे ते प्रापंचिक जीव ईश्वराला नित्यनेमाने आळवू लागतात आणि त्यांच्याठायी हळुहळू भाविकता निर्माण होऊ लागते. त्या भाविकतेमुळेच त्या भाविकांकडून कथा-पुराण ऐकणे, भजन करणे, सगुण चरित्रांचे वाचन व श्रवण करणे इत्यादी गोष्टी आवडीने घडू लागतात. त्यातूनच त्या भाविकांच्या ठिकाणी सगुणचरित्रांविषयी प्रेमाची भावना निर्माण होते. या प्रेमाच्या भावनेतूनच काहीजणांच्या ठिकाणी तशा सगुणप्रेमाचा अनुभव आपल्यालाही यावा अशी आर्तता निर्माण होते. या आर्त भावाने व्याकुळ होऊन ते अशा सगुण प्रेमाला नित्य शोधीत असतात. त्यांच्याही या आर्त भावाचे फळ त्यांना या नारायणाच्या नियतीनुसार निश्चितपणे मिळते आणि ईश्वरी अनुभवामुळे प्रेमस्वरूप होऊन राहिलेल्या परमथोर अशा अवतारी महात्म्यांशी त्यांची भेट होते.

अशा महात्म्यांच्या सहवासात त्यांच्या प्रेमस्वरूप अवस्थेमुळे विशुद्ध, निरपेक्ष, निर्मोही, निर्विकार असे ईश्वरी प्रेम सहजपणे मिळत रहाते. ते प्रेम घेता घेता हळुहळू मनात शिरत रहाते आणि त्या प्रेमाच्या सहज गुणधर्मानुसार त्या मनाला शुद्ध करीत रहाते. आर्त असलेल्या मनाची प्रेमपूर्ती होते आणि मन शांत शांत होत रहाते. मनाच्या ठायीचे मोह, आसक्ती,

राग, लोभ असे विकार लयाला जातात आणि मन त्या महात्म्यांविषयीच्या प्रेमाने नित्य भरलेले रहाते. या प्रेमातूनच काहीजणांच्या ठायी त्या महात्म्यांविषयी प्रीती निर्माण होते आणि त्यांचे मन त्या महात्म्यांच्या ठायीच जडून रहाते. त्या महात्म्यांचीच नित्य सेवा करावी, त्यांच्याकडेच मनातील सर्व भाव मोकळे करावेत, त्यांचाच अंगसंग करावा, त्यांच्याशीच संवाद करून त्यांचे अंतःकरण जाणून घ्यावे आणि त्यांच्याच अंतःकरणाला सदासर्वकाळ प्रमाण मानावे असा उत्कट व एकविध प्रेमभाव म्हणजेच प्रीतिभाव होय. हा प्रीतिभाव म्हणजे भक्तिभाव निर्माण होण्याच्या आधीची अत्यंत महत्त्वाची व जवळची पायरी आहे.

हे लक्ष्मी, अशा उत्कट प्रीतिभावाने महात्म्यांच्या संगतीत त्यांच्या प्रेमस्वरूप अवस्थेचा संग मनाला जडतो. मन नेहमीच त्या प्रेमाच्या संगतीत रहाते आणि मनाच्या ठिकाणी महात्म्यांच्या प्रेमस्वरूप अवस्थेचा ध्यासच लागून रहातो. त्यांच्या अंतःकरणाची अवस्था म्हणजेच त्या ईश्वरी अनुभवाची अवस्था होय याची खात्री पटते. त्याचाच निश्चय होतो आणि त्या अवस्थेचाच अनुभव आपण आपल्याठायी घ्यावा असा ध्यासच चित्ताच्या ठायी लागतो. महात्म्यांच्या अंतःकरणाची अवस्था व आपल्या मनाची अवस्था यांतील फरक व विभक्तता जाणवून मन अगदी व्याकुळ होते. या व्याकुळतेपोटीच हे अवस्थांतील अंतर भरून काढण्यासाठी त्या ईश्वरस्वरूप महात्म्यांचीच भक्ती घडू लागते. या भक्तिभावानेच समर्पणाचा भाव निर्माण होतो. ईश्वराने दिलेले सर्व जीवन, देह, मन, बुद्धीसह सर्व ईश्वरासाठी, म्हणजेच ईश्वरस्वरूप असलेल्या महात्म्यांसाठीच आहे या निश्चयाने, ध्यासाने, भावाने त्यांनाच अर्पण केले जाते. त्यामुळे साहजिकच आपल्या अस्तित्वाचा सर्व अहंकारच गळून पडतो आणि अज्ञानाची व अहंकाराची सर्व विभक्तता दूर होऊन केवळ ऐक्यरूप अविभक्तताच शिल्लक रहाते.

म्हणूनच हा भक्तिभाव हाच सर्वश्रेष्ठ भाव आहे. कारण या भक्तिभावामुळेच त्या महात्म्यांशी ऐक्य पावता येते आणि त्यांच्या ईश्वरस्वरूप अनुभवाशी एकरूपता साधता येते. त्यांचा ईश्वरी अनुभव हा आपला स्वानुभव होतो आणि त्यांचा ईश्वरी आनंद हा आपला स्वानंद होऊन रहातो. हे लक्ष्मी, तेव्हा एक गोष्ट हजार हिश्शाने खरी आहे, की या नारायणासाठी कल्पनेने, भावनेने, प्रेमाने, प्रीतीने किंवा भक्तीने त्या त्या अवस्थेनुसार काहीतरी करणे जरी घडत राहिले, तरी त्याचे तसे तसे फळ निश्चितपणे मिळतेच. हे अगदी खरे आहे. परंतु प्रेमरसपूर्ण स्वानंदाचे फळ फक्त सगुण भक्तीनेच प्राप्त होते हे मात्र सत्य आहे.

हे लक्ष्मी, या दृष्टीने पेंद्या हा अत्यंत भाग्यवान ठरला. कारण प्रेमस्वरूप अवस्थेत असलेला आणि आपल्या ईश्वरी स्वरूपाची जाणीव जन्मतःच असलेला असा कृष्ण त्या पेंद्याला सहजपणे भेटला. कृष्णाचा सहवास, प्रेम आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे कृष्णाचे सख्यत्व पेंद्याला लाभले. त्यातून पेंद्याच्या मनात कृष्णाविषयी अलोट व असीम प्रेम निर्माण झाले. त्यामुळे अर्थातच तो पेंद्या पुढेही अनेक साधुसंतांच्या व भगवत्भक्तांच्या कौतुकाचा विषय झाला. त्याचा प्रेमळपणा, लडिवाळपणा, निरागसता, भाबडेपणा आणि त्याहूनही कठीण म्हणजे कृष्णावर कधीही न रागावणे, हे सर्व भक्तिमार्गीयांना

नेहमीच आदर्शवत वाटले. कारण मनाच्या ठायी निर्माण झालेले हे सगुणप्रेम हाच भक्तिमार्गाचा पाया आहे हे ते सर्वजण जाणून होते.

असा कृष्णप्रेमाचा पाया पेंद्याच्या मनात अगदी सखोलपणाने होता. कृष्णाच्या सगुण रूपाची प्रेममूर्तीही त्याच्या मनात पक्केपणाने स्थित होती. त्यामुळे त्या वेळेस जरी तो भक्तिभावाने कृष्णाशी ऐक्य पावू शकला नाही, तरी त्यासाठी आवश्यक असलेली त्याची मनोभूमिका त्याच्या नकळत का होईना, पण निश्चितपणे तयार झालेली होतीच. त्यामुळे पुढे जेव्हा केव्हा त्याला संधी मिळाली असती, तर तेव्हा त्याच्या ठिकाणीही भक्तिभाव निश्चितपणे निर्माण झाला असताच. आणि काय सांगू लक्ष्मी, तशी वेळ त्याच्या जीवनात परमभाग्याने आलीही आणि पेंद्याने ती संधी साधलीही! त्याचेही जीवन तृप्त व धन्य झाले. पण तो पुढे घडलेला इतिहास मी तुला आत्ताच सांगत बसत नाही. कृष्णचरित्राच्या वर्णनाच्या ओघात तो भाग सहजपणे येणारच आहे. त्यावेळेसच ते सांगण्याचा व ऐकण्याचा आनंद आपण निश्चितपणे घेऊ, एवढेच मी तुला आता सांगून ठेवतो.''

कृष्णाच्या ठायी पेंद्याविषयी असलेले सख्यत्व आणि पेंद्याच्या ठिकाणी असलेले उत्कट कृष्णप्रेम याचे प्रेमरसपूर्ण वर्णन श्रवण करता करता लक्ष्मीही अगदी सहजपणे प्रेममय होऊन राहिली. तिचे मनही नारायणाच्या व्यक्तिगत प्रेमाने अगदी भरून गेले होते. त्यामुळे बराच वेळ ती काहीही बोलण्याच्या व ऐकण्याच्याही मनःस्थितीत नव्हती. परंतु त्यानंतर काही काळाने का होईना, पण तिच्या ठिकाणी श्रवणभक्तीची अवस्था पुन्हा तेवढ्याच सहजतेने निर्माण झाली. सगुणकथेतून भरभरून वाहणाऱ्या प्रेमरसात नहात रहावे आणि त्या प्रेमगोडीच्या सेवनाचा आनंद लुटत रहावे अशी उत्कट इच्छा लक्ष्मीच्या मनात पुन्हा निर्माण झाली. त्या भावाची पूर्ती करण्यासाठी लक्ष्मीने स्वतःहून पुन्हा नारदाशीच बोलण्यास सुरुवात केली.

''हे सगुणभक्तिपरायण नारदा, पेंद्याच्या निमित्ताने तू जे सख्यत्वाचे महत्त्व सांगितलेस आणि त्याचबरोबर सख्यत्व व सख्यभक्ती यांतील जो फरक दाखविलास तो अगदी बरोबर आहे. सख्यत्व भाग्याने मिळते हे खरेच आहे असे मीही माझ्या अनुभवाने म्हणेन. कारण या नारायणाचे प्रेमसख्य मलाही अगदी तशाच परमभाग्याने मिळालेले आहे. त्यामुळे नारायणाची बाह्यांगाची जवळीकता मला अगदी सहज मिळाली आहे. त्याच्या माझ्यावरील प्रेमाचाही मला नेहमीच अनुभव येत असतो आणि मीही माझ्या परीने मला जमेल तशी नारायणाची सेवाही करीत असतेच. परंतु या सख्यत्वातील केवळ सौख्यच मी अनुभवत असते असे मला तरी वाटते. कारण प्रेमाची उत्कटता किंवा आर्तता असे काही माझ्या ठिकाणी मला जाणवत नाही. माझा तसा भाव नाही की स्वभाव नाही हेही मला नीटपणे कळत नाही.

याला थोडीशी या नारायणाची वृत्तीही कारणीभूत असावी असे मला वाटते. कारण हा नारायण केव्हा केव्हा माझ्याशी प्रेमाच्या एवढ्या मोकळेपणाने वागून माझी थट्टा व विनोद करून मला प्रेमाचे एवढे सुख देतो, की माझे मन त्याच्या प्रेमात अगदी हरवून जाते. तर हाच नारायण काहीवेळा एवढा अंतर्मुख होऊन रहातो, की बाह्यांगाने त्याच्या जवळ असूनही मी दूरच असते. अशा वेळी त्याच्या अंतःकरणाशी जवळीकता साधणे मला तरी शक्य होत नाही. कारण अशा

वेळी नारायण स्वतःहून तर माझ्याशी बोलत नाहीच, परंतु मीही त्याच्याशी बोललेले त्याला आवडत नाही म्हणा किंवा मानवत नाही म्हणा, परंतु त्याचा प्रतिसाद जेमतेमच असतो. मलाही आता हळुहळू तशी सवय झाल्यामुळे मीही मग स्वस्थच बसून रहाते आणि नारायण त्याच्या अंतर्मुख अवस्थेतून केव्हा बाहेर येईल याची वाट पहात रहाते. परंतु भक्तिभावाचे मूळ व कारण जी आर्तता आहे म्हणून जे तू सांगतोस, तशी प्रेमाची आर्तता मात्र मला माझ्या ठिकाणी जाणवत नाही. नारायणाच्या देहभानविरहित अवस्थेमुळे जर हे घडत असेल तर मग यावर उपाय तरी काय? आणि तो उपाय करायचा तरी कोणी व कसा? हे नारदा, तुझ्या बोलण्यावरून मला तरी असे जाणवते की ही सगुण प्रेमाची भक्ती फक्त मानवी देहातच शक्य आहे. नारायण व आपण भूतलावर मानवी देहाने गेलो तरच हे सगुणाचे प्रेम अनुभवता येणार आणि तरच त्या सगुणाची भक्ती करता येणार. खरे ना?''

लक्ष्मीच्या प्रश्नाने थोडासा चकित झालेला नारद थोडासा गंभीरही झाला. परंतु लक्ष्मीच्या मनात निर्माण झालेली थोडीशी निराशेची भावनाही नारदाच्या लक्षात आली आणि म्हणून तो लक्ष्मीला उद्देशून लागलीच बोलू लागला.

''हे नारायणप्रिय लक्ष्मी, तू मुळात एक गोष्ट विसरू नकोस की प्रेम, मग ते भावनात्मक असो वा दृढ भावाचे असो, तो मनाचा विषय आहे. त्या प्रेमाचा उद्भव हा मनाच्याच ठिकाणी होत असतो. तात्काळ व तात्कालिक असलेल्या प्रेमाला भावनेचे प्रेम म्हटले जाते, तर कायमच्या व सखोल असलेल्या दृढ प्रेमाला प्रेमभाव असे समजले जाते. तेव्हा प्रेम ही मनाची भावावस्था असल्यामुळे आपण मानवी देहाने आहोत की दिव्य देहाने आहोत यामुळे काहीच फरक पडू शकत नाही.

हे लक्ष्मी, तू परमभाग्याने या नारायणाची अर्धांगिनी असल्यामुळे आणि तुझा वास या नारायणासह वैकुंठातच असल्यामुळे तुलाही नारायणासारखाच दिव्य देह प्राप्त झालेला आहे. तेव्हा जे तुला भाग्याने मिळाले आहे, ते तुझ्या व नारायणाच्या संबंधाच्या आड येण्याचे काहीच कारण नाही. तर त्याचीच जोड तुला घेता आली पाहिजे. त्यासाठी मुद्दाम मानवी देह धारण करून भूतलावर जाण्याचे काहीच कारण नाही. परंतु या नारायणाचे दिव्य चरित्र अनेक अंगांनी व अनेकांच्या निमित्ताने फक्त भूतलावरच प्रगट होते, ही मात्र वस्तुस्थिती आहे. या वैकुंठात नारायणाच्या केवळ अस्तित्वामुळे तुला सर्व दिव्य सुखे सहजपणे उपलब्ध आहेत. बरे, तुला वेगळा म्हणून काही प्रपंच नाही, त्यामुळे त्याचा व्याप-ताप असण्याचाही काही प्रश्नच निर्माण होत नाही. त्यामुळे तुला तेही दुःख नाही. नारायणाच्या प्रेमाचेही सौख्यच लाभत असल्यामुळे तुझ्या मनाला एवढे स्वास्थ्य मिळत असणार, की त्यामुळेच मनाला थोडीशी सुस्ती व निष्क्रियता येत असणार. त्या मनाच्या ठिकाणी कोणत्याही कारणाने आर्तता येणे शक्यच नाही. सर्व सौख्य तुला भरपूर व सहजपणे मिळत आहे, तरीही तुझ्या मनाला समाधान व शांती नाही हेच तुझे खरे दुःख आहे. खरे की नाही?

भूतलावरील मानवी जीवन मात्र अत्यंत वेगळे आहे ही वस्तुस्थिती आहे. तेथे जन्मापासून ते मृत्यू येईपर्यंतचे सामान्यांचे जीवन अत्यंत कष्टमय आहे. ज्यांना बाह्य कष्ट नाहीत त्यांना मानसिक क्लेश आहेत. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी दुःखाची आर्तता अगदी सहजपणे असते. नारायणाच्या सगुण अवतार चरित्रात अशा आर्त जीवांसाठी केवढे तरी कार्य घडत

असते. कारण त्या अवतारी पुरुषांच्या ठायी त्या सामान्य जीवांविषयी आत्यंतिक दया, कणव व कळवळा असतो. त्या कार्यातून त्या जीवांना अवतारी महात्म्यांचे सगुण प्रेमही सहज लाभते आणि त्या जीवांना त्या महात्म्यांचे माहात्म्यही अगदी पूर्णपणे जरी नाही, तरी थोडेफार का होईना पण जाणवतेच. जेवढे माहात्म्य जाणवते व जेवढे प्रेम त्यांच्या ठिकाणी निर्माण होते, तेवढी भक्ती त्या जीवांकडून घडते आणि तेवढे ते जीव त्या महात्म्यांच्या जवळ येतात. त्यातूनही काही भाग्यवान जीवांच्या ठिकाणी अवतारी महात्म्यांचे माहात्म्य पूर्णपणे जाणून त्यांच्याविषयीच्या प्रेमामुळेच आर्तता निर्माण होते. त्यांच्याकडूनच केवळ त्या महात्म्यांची सगुण भक्तीही घडते आणि ते त्या महात्म्यांशी अंतःकरणाने ऐक्य पावतात. तेच खरे भक्त होत आणि त्यांनी अवलंबिलेला मार्गच सत्यभक्तिमार्ग होय!

हे लक्ष्मी, तेव्हा तू एक गोष्ट कायमची लक्षात ठेव, की प्रेमाची आर्तता हीच खरी होय. बाह्य देहदुःखाने आलेली आर्तता थोड्याशा सुखानेही नाहीशी होईल. मनाच्या क्लेशाने आलेली आर्तता ही जरासे मनःस्वास्थ्य मिळाले की लगेचच विरूनही जाईल. परंतु सगुण प्रेमाने निर्माण झालेली आर्तता मात्र भक्तिभावाचे ऐक्य साधेपर्यंत संपणार नाही. म्हणूनच ही प्रेमार्तता हेच खरे भक्तिभावाचे मूळ आहे. हे लक्ष्मी, तुला भाग्याने कोणतेही बाह्य दुःख व क्लेश नाहीत ही तर चांगलीच गोष्ट आहे. परंतु नारायणाकडून मिळालेल्या प्रेमाचे केवळ सौख्यच न अनुभवता त्यातूनच तुझ्या मनात सुखापरते असलेले प्रेम निर्माण झाले तर ही आर्तता तुलाही निश्चितपणे जाणवेल. अगं, सर्व सुख व स्वास्थ्य असूनही तुझ्या मनाला जी बेचैनी जाणवते ना, ते त्या प्रेमाच्या आर्ततेचेच लक्षण आहे. ती प्रेमखूण तू पक्केपणाने जाण आणि दृढपणाने मनात धरून ठेव.

आता एक गोष्ट मात्र खरी आहे, की नारायणाचे चरित्र विशेषत्वाने या वैकुंठात घडू शकत नाही आणि त्यात कोणाचाच दोष नाही. कारण इकडची परिस्थितीच अशी आहे. तुझ्यावरील काही संकटे दूर करायची आहेत किंवा तुझे कोणापासून रक्षण वगैरे करायचे आहे असे येथे काहीच नाही. खरे तर, हे तुझ्या भाग्याचेच फळ आहे. परंतु त्याचबरोबर नारायणाची अनेकविध रूपे वा कार्यही येथे प्रगट होत नाही हेही खरे आहे. पण ही वस्तुस्थिती स्वीकारायलाच हवी. आता हा नारायण त्याच्या 'स्व'भावाने त्याच्या स्वानंदात रमलेला असतो आणि तू तुझ्या स्वभावाने नारायण देहभानावर येण्याची शांतपणाने वाट पहात असतेस. काहीवेळा अधीर होतेस, नाराजही होतेस. पण तेही स्वाभाविकच आहे. परंतु अशा वेळी हे लक्ष्मी, तू एकाच गोष्टीची काळजी घेतली पाहिजेस की तुला नारायणाच्या माहात्म्याचे कदापिही व किंचितही विस्मरण होणार नाही. अर्थात त्या माहात्म्याचे नित्य स्मरण रहाण्यासाठी तू ते माहात्म्य आधी यथार्थपणे जाणून घेतले पाहिजेस आणि मग त्याचा दृढ निश्चय केला पाहिजेस.

या नारायणाचे माहात्म्य गाण्याची संधी मला आणि ऐकण्याची संधी तुला मिळत आहे ही या नारायणाचीच आपणा दोघांवर मोठी कृपाच आहे. मला तो त्याचे माहात्म्य गाण्याची प्रेरणा देत आहे आणि तुझ्या ठिकाणी ते ऐकण्याची तळमळ निर्माण करीत आहे. असे हे सारे नारायणाचेच माहात्म्य आहे. परंतु माहात्म्य श्रवण घडल्यानंतर त्याचे मनन करण्याची जबाबदारी मात्र केवळ तुझीच आहे. मननामुळे श्रवण केलेले माहात्म्य तुझ्या मनाठायी स्थिर होईल आणि मन त्या

माहात्म्याने नेहमी युक्त होऊन राहील. या माहात्म्याच्या जाणिवेला मग तुझ्या नारायणावरील व्यक्तिगत प्रेमाची जोड मिळाली की तुझी नारायणाकडे पाहण्याची दृष्टीच बदलून जाईल. नारायणाच्या माहात्म्याचे विस्मरण तर तुला कधीही होणार नाहीच, पण तुझ्या ठिकाणी प्रेमाची आर्तता मात्र कायमची राहील. त्यामुळे जेव्हा केव्हा नारायणाच्या स्वेच्छा वृत्तीनुसार तुला त्याचे प्रेम अनुभवण्याची संधी मिळेल, तेव्हा तू जराही कमी न पडता त्याचे प्रेम उत्स्फूर्तपणे व पुरेपूर अनुभवशील. ही मनाची प्रेमध्यासपूर्ण अवस्था हीच भक्तिभावाची अवस्था होय. याच भक्तिभावपूर्ण अवस्थेमुळे हे लक्ष्मी, तू नारायणाला सहजपणे आनंदित करशील आणि स्वतःही त्या आनंदाचा अनुभव घेशील.''

नारदाच्या बोलण्याने पूर्ण मोकळे झालेले लक्ष्मीचे मन नारायणाच्या प्रेमाने पुन्हा पूर्णपणे भरले आणि नारायणाच्या माहात्म्याच्या जाणिवेने पुन्हा युक्त झाले. त्याचाच परिणाम म्हणून की काय, लक्ष्मी एकदम अंतर्मुख झाली आणि बराच वेळ स्तब्धच होऊन राहिली. परंतु तिची अंतर्मुखताही बहुधा तिलाच जास्त वेळ मानवली नसावी. म्हणूनच जणू ती म्हटले तर नारदाला उद्देशून आणि म्हटले तर स्वतःशीच बोलू लागली.

''हे नारदा, तुझे सांगणे अगदी बरोबर आहे. या नारायणाचे माहात्म्य वेगळेपणाने मला येथे तर क्वचितच पहावयास मिळते. तेही जेव्हा तुझ्यासारख्या नारायणाच्या प्रिय भक्ताचे येथे येणे होते तेव्हाच! तुमचे उभयतांचे परस्परांवरील अलोट प्रेम तर अनुपमेयच आहे. त्याची या त्रिभुवनातील कशालाही सर नाही व उपमा नाही हेच खरे. तुझ्या ठिकाणी असलेली नारायणाच्या माहात्म्याची पुरेपूर जाणीव आणि नारायणाच्या ठिकाणी असलेली तुझ्या भक्तिभावाविषयीची खात्री व कौतुक यांचाच हृदयंगम संगम तुमच्या भेटीत झालेला असतो. तुमच्या भेटण्यातून, पहाण्यातून व बोलण्यातून तुम्ही एकमेकांचे आहात आणि एकमेकांसाठीच आहात हे लक्षात यायला अजिबात वेळ लागत नाही. अशावेळी नारायणाचे माहात्म्य विशेषत्वाने जाणवते हे अगदी खरे आहे.

आता या नारायणाचे माहात्म्य ऐकायला मिळते तेही जेव्हा तुझ्या मुखातून श्रवण करायला मिळते तेव्हाच. बरे, तुझे येथे येणेही वारंवार होत नाही. येतोस तेव्हा मुख्यतः तू नारायणाच्या भेटीस आलेला असल्यामुळे साहजिकच येथील तुझा सर्व वेळ नारायणाच्या संगतीतच जाणार आणि माझ्या वाट्याला तू थोडा वेळच येणार. अर्थात ते बरोबरच आहे म्हणा. माझी त्याविषयी काहीच तक्रार नाही. उलट माझ्या ठिकाणी तुझ्या भक्तिभावाची व थोरवीची केवढी तरी जाणीवच आहे. एक गोष्ट मात्र खरी आहे आणि ते माझे भाग्यच आहे, की या थोड्याही वेळात तुझ्याकडून या नारायणाचे माहात्म्य आणि सगुण भक्तिभावाची थोरवी केवढीतरी प्रगट होत असते. त्याचेच मनन माझ्याकडून घडले पाहिजे आणि त्याचेच व्यवधान मी राखले पाहिजे, हे आता माझ्या पूर्णपणे लक्षात आले आहे. कारण ते व्यवधानच जेव्हा माझ्याकडून सुटते किंवा कमी होते, तेव्हाच नारायणावर माझे व्यक्तिगत प्रेम असूनही माझ्या मनाला उगाचच बेचैन झाल्यासारखे वाटते. कारण नारायणाकडून माझी प्रेमाची अपेक्षा राहते आणि त्याची पूर्ती न झाल्यामुळेच माझे मन नाराज होत असते.

हे नारदा, मला वाटते ही माझी भावना व अपेक्षा माझ्या स्त्रीत्वामुळे आहे, नाही का? आम्हा स्त्रियांची ही भावनात्मकताच आमच्या आड येते का? कारण आपला प्रेम अर्पण करण्याचा भाव आहे, पण प्रेम घेणाऱ्याला त्याचे भान नाही असे पाहिल्यावर थोडासा तरी राग येणारच ना? ते साहजिकच आहे, नाही का? हे नारदा, कृष्णचरित्राचे श्रवण तुझ्या मुखातून करीत असताना हा एक प्रश्न माझ्या मनात कोठेतरी खोलवर व अस्पष्ट असा निर्माण झालेला आहे. कृष्णाचे मित्र व सवंगडी याविषयी तू पुष्कळच सांगितलेस. पेंद्याचे तर तू केवढे तरी कौतुक केलेस व त्याच्या सख्यत्वाचे गुणगान केलेस. पण अजूनही कोणा स्त्रीचा उल्लेख तुझ्याकडून झालेला नाही. अशी संधी स्त्रियांना देणे अयोग्य आहे म्हणून ती कृष्णाने दिली नाही, की अशी संधी मिळूनही कोणाला ती साधता येऊ शकली नाही? कारण स्त्रियांच्या दृष्टीने विचार केला असता एकंदरीत असे घडणे कठीणच वाटते.

अरे, मी येथे वैकुंठात नारायणाची पत्नी म्हणून त्याच्या सतत जवळ असते, तरी त्या भक्तिभावाचे सातत्य राखणे मला अशक्य होते. मग भूलोकासारख्या ठिकाणी तर एखाद्या स्त्रीला कृष्णाचे असे सख्यत्व आधी मिळणे आणि मग ते जुळणे हे मला तरी महाकर्मकठीणच वाटते. हे नारदा, यासंबंधी तुझ्याकडून श्रवण करण्यासाठी मी अत्यंत आतुर झालेली आहे. तेव्हा माझ्या मनातील हे वाडे कोडे तूच निरसन करावेस अशी तुला मी अत्यंत प्रेमपूर्वक प्रार्थना करते.''

*****



# स्त्री-पुरुष द्वैत

लक्ष्मीचे भावनात्मक आवेगाचे बोलणे ऐकता ऐकता नारदही थोडासा गंभीर, पण अंतर्मुख जास्त झाला. कारण बोलता बोलता लक्ष्मीने मुलभूत विषयालाच स्पर्श केला होता. परंतु त्यामुळे नारद अधिकच उत्तेजित झाला आणि आपल्या गंभीर वाणीने स्पष्ट शब्दात निःसंदिग्धपणे बोलू लागला. त्याच्या अंतःकरणात अत्यंत सखोलपणे साठून राहिलेला भाव दाटून येऊन शब्दांद्वारे मोकळा होऊ लागला.

''हे लक्ष्मी, मुळात एक गोष्ट पक्केपणाने लक्षात ठेव, की या नारायणाचे सर्वच अवतार आणि त्यातूनही विशेषतः कृष्णावतार, हा सर्व जिवांचा उद्धार करण्याच्या सत्यसंकल्पातूनच झालेला होता. आता सर्व म्हणजे सर्व! मग त्यामध्ये स्त्री-पुरुष, आबालवृद्ध, लहान-थोर, गरीब-श्रीमंत असे सर्वच जण आले. या सर्वांनाच स्वतःचा उद्धार करून घेण्याची संधी कृष्णावतारात प्राप्त झाली होती. यामध्ये त्यांना कृष्णाने संधी कशी मिळवून दिली हेच कृष्णचरित्राचे विशेषत्व होते आणि त्यांनी ती मिळालेली संधी कशी व किती साधली हा त्यांच्या त्यांच्या भावाचा व प्रयत्नांचा भाग होता. कित्येकजणांना या मिळालेल्या संधीची जाणही नव्हती, एवढे अज्ञान व मूढत्व त्यांच्या ठिकाणी होते. त्यांनाही कृष्णाने प्रेमाने स्वतःच पुढाकार घेऊन कशी संधी मिळवून दिली, हीच तर त्या कृष्णचरित्रातील त्याची प्रेमलीला होती.

हे लक्ष्मी, पण स्त्री व पुरुष या संबंधातील प्रश्न जो तू विचारलास ना, तो तर खरेच अत्यंत मुलभूत आणि म्हणूनच अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण स्त्री व पुरुष या द्वैतावरच या जीवसृष्टीचा डोलारा व पसारा उभारलेला आहे. या द्वैतामुळेच सृष्टीतील सृजनाचे कार्य घडत असते. या द्वैतामुळेच जिवांच्या संसाराला अस्तित्व व आधार लाभत असतो हे अगदी खरे आहे. असे हे द्वैत सृष्टीचा व्यवहार चालण्यासाठी जरी आधारभूत व सहाय्यभूत होत असले तरी ते द्वैत केवळ बाह्यांगाचेच आहे. त्यांच्यातील फरक हाही केवळ बाह्यांगाचाच आहे. परंतु जीव म्हणून त्यांच्यात काहीही भेद नाही. त्या दोघांची निर्मिती ही एकाच परमात्म तत्त्वापासून होत असते आणि त्या उभयतांच्याही ठिकाणी एकच चैतन्यस्वरूप आत्मतत्त्व अंशमात्र आहे.

तेव्हा स्त्री व पुरुष या द्वैताद्वारे एकच अद्वैत तत्त्व प्रगट आहे आणि खेळत आहे. म्हणूनच या सृष्टीचा खेळही चालू आहे. पण काळाच्या ओघात याची भूल सर्वसामान्य जिवांना पडली आणि ते या भेदरूपी मायाचक्रात अडकून त्यात असहाय्यपणे फिरत राहिले. काळाचा प्रवाह हा वरून खाली म्हणजे अधोगतीकडे चालत असल्यामुळे स्त्री-पुरुष यांतील हा फरक अधिकच वाढत राहिला आणि त्यांच्यात अधिकाधिक दुरावा निर्माण झाला. त्यातूनही दुर्भाग्याची गोष्ट म्हणजे या दुराव्यामुळे स्त्री व पुरुष दोघेही परमात्मस्वरूप अशा या नारायणापासूनच अतिशय दूर गेले. परंतु त्यातही सद्भाग्याची गोष्ट अशी की या सृष्टीतच कृष्णावतारासारख्या रूपाने या नारायणाचे सगुणचरित्रही प्रगट झाले आणि स्त्री व पुरुष या उभयतांनाही भक्तिमार्गाची संधी मिळाली. त्यामुळेच त्यांच्या आत्मोद्धाराचाही मार्ग त्यांच्यासाठी स्पष्टपणे प्रगट झाला.''

नारदाच्या बोलण्याने लक्ष्मीच्या मनाला समाधान वाटले खरे, पण ते पूर्णपणे झालेले नव्हते. परंतु आपले असमाधान लपवून न ठेवता, मनाचे पूर्ण समाधान करून घेण्याच्या निश्चयाने लक्ष्मी नारदाशी पुन्हा मोकळेपणाने बोलू लागली.

''हे नारदा, तुझे बोलणे बुद्धीला कळते व पटतेही. परंतु साशंकता शिल्लक रहाते ती मात्र मनाठायीच! कारण एखाद्या मानवदेहधारी व्यक्तीच्या ठायी एवढे उत्कट प्रेम व एवढी एकविध भक्ती निर्माण होणे हेच मुळात अशक्य वाटते. अर्थात कृष्णावतारात कृष्णाच्या मनोहारी रूपामुळे व त्याच्या आनंददायी प्रेमलीलांमुळे अशी शक्यता निर्माण झाली हे अगदी खरे आहे. तरीही सर्वसामान्य स्त्रीच्या दृष्टीने पहाता असे प्रेम व अशी भक्ती मला तरी कठीणच वाटते. कारण कितीही झाले तरी कृष्णाशी एवढी जवळीकता साधणे कुठल्याही स्त्रीला शक्यच होणार नाही. अर्थात कृष्ण हा एक वयाने लहान असलेला मुलगा होता. तो काही मोठा पुरुष नव्हता. त्यामुळे स्त्रियांना तेवढी काही अडचण आली नसणार म्हणा. परंतु तरीही एकंदरीत ते तेवढेसे सोपे नाही असे मला तरी वाटते.

तेव्हा हे नारदा, केवळ शाब्दिक वा तार्किक शक्याशक्यता न सांगता, प्रत्यक्ष असे काही घडले असल्यास तोच कथाप्रसंग मला तू सविस्तरपणे समजावून सांग. त्यामुळेच माझ्या मनाला पूर्ण समाधान प्राप्त होईल. कारण 'शास्त्राला प्रत्यक्षाच्या प्रमाणाची आवश्यकता असते, परंतु प्रत्यक्षाला कोणत्याही शास्त्रीय प्रमाणाची आवश्यकता नसते' हे मी तुला सांगणे म्हणजे नारदा, लहान तोंडी मोठा घास घेण्यासारखेच आहे. तेव्हा अशी कृष्णाशी प्रेमाने प्रत्यक्ष जवळीकता साधण्याची संधी कोणा स्त्रियांना खरेच मिळाली का? आणि ती संधी साधून खरेच कोणी कृष्णाच्याच भक्तीने त्याच्याशी ऐक्य पावू शकले का? तसे घडले असेल तर ती केवळ नवलाईचीच नव्हे, तर एक अद्भुतच गोष्ट म्हणावी लागेल.''

लक्ष्मीच्या स्पष्ट व मोकळेपणाच्या बोलण्याने नारदाला एकीकडे जरूर कौतुक व समाधानही वाटले. पण त्याचबरोबर नारद एकदम अंतर्मुखही झाला आणि त्याने आपले नेत्र पूर्णपणे मिटून घेतले. थोड्याच वेळात त्याचे मुख आरक्त झाले आणि त्याच्या नेत्रातून अश्रुधारा पाझरू लागल्या. त्याची ती भावपूर्ण अवस्था पाहून लक्ष्मीलाही भरून आले. तिच्या लक्षात आले की आता नारद हा मनाने संपूर्णतः गोकुळातच गेलेला आहे. परंतु लक्ष्मी हेही जाणून होती, की हे गोकुळ नारदाच्या स्वानुभवाचे आणि नारदाच्याच अंतःकरणात आहे. नारदासाठी 'गोकुळ' म्हणजे भूतकाळाची स्मृती नसून, 'गोकुळ' ही त्याची वर्तमानकाळाची अनुभूती होती. या खात्रीपोटीच लक्ष्मीही नारदाच्या भावपूर्ण अवस्थेकडे त्याच भावाने पहात राहिली आणि नारदाची अनुभवपूर्ण अवस्था प्रगट होण्याची प्रतीक्षा करीत राहिली. काळवेळेचे भान हरवलेला नारद थोड्यावेळाने यदृच्छेने देहभानावर आला आणि प्रेमाश्रूंनी भरलेले त्याचे नेत्र सहजपणे उघडले गेले. नारदाच्या अंतःकरणात सदैव दाटून राहिलेले सगुण प्रेम नेत्रांबरोबरच आता त्याच्या वाणीद्वारेही ओसंडून वाहू लागले.

''हे लक्ष्मी, या नारायणाच्या सृष्टीत म्हटले तर सर्वच अद्भुत आहे आणि कोणतीही गोष्ट अशक्यही नाही. परंतु सगुणभक्तीसारखी अद्भुत गोष्ट शक्य होते ती केवळ भक्तांच्या भावामुळेच हे मात्र सत्य आहे. अर्थात सगुणभक्तीचे मूळ

कारण हे नारायणाचे सगुण रूप हेच आहे आणि सगुण प्रेमालाही कारण त्या सगुणरूपधारी महात्म्यांची प्रेमस्वरूप अवस्था हेच आहे. तरीही सगुण प्रेम अनुभवता अनुभवता ज्यांचे त्या सगुणरूपावर प्रेम जडले आणि ज्यांच्याकडून त्या सगुणरूपाचीच भक्ती घडली, ते भक्त मात्र धन्यतेस पावले आणि ते भक्तच खऱ्या कौतुकास पात्र ठरले. त्या भक्तांची जीवने महात्म्यांच्या जीवनांत मिसळली गेली आणि एकरूप पावली. त्यामुळेच अशा भक्तांची चरित्रेसुद्धा अवतारी महात्म्यांच्या चरित्राचा एक अविभाज्य भाग होऊन राहिली. अशा भक्तांच्यामुळेच सगुण प्रेमभक्तीचे माहात्म्य प्रगट होत राहिले आणि सृष्टीमध्ये दुमदुमत राहिले याविषयी कोणतेही व कोणाचेही दुमत नाही.

हे लक्ष्मी, या भक्तांच्या मालिकेत अनेक स्त्रियाही होऊन गेल्या ही वस्तुस्थिती आहे. सृष्टीच्या सुरुवातीच्या काळात स्त्री व पुरुष या उभयतांच्या ठिकाणी त्यांच्या आत्मस्वरूपाची जाणीव सहजपणे असे. नारायणाचा संकेत जाणून व सृष्टीच्या नियमाला अनुसरून सहजीवन जगत असताना, स्त्री-पुरुष उभयता आपल्या आत्मस्वरूपाच्या नित्य व्यवधानात असत. परस्परांशी सुसंवाद करून व्यापक परमात्मस्वरूपाशी अनुसंधान राखून तेथे लीन असत आणि एके दिवशी एका क्षणी मानवी देहाचा सहजपणे त्याग करून, आपले आत्मस्वरूप व्यापक परमात्मस्वरूपात विलीन करीत असत. हा मानवी देहातील सर्वोच्च व सर्वोत्कृष्ट अनुभव स्त्री व पुरुष उभयता अगदी सहजपणे घेत असत. त्यामध्ये कोणाचाही अपवाद नाममात्र म्हणून सुद्धा नसे.

पुढे काळाच्या अधोगतीच्या ओघात स्त्री-पुरुष या सहजानुभवापासून दूर तर गेलेच, परंतु एकमेकांपासूनही दुरावत चालले. तरीही कित्येक पुरुषांनी प्रयत्नपूर्वक आपल्या ठिकाणच्या आत्मस्वरूपाचे अनुसंधान कायम राखले. त्यांच्या पत्नीसुद्धा आपापल्या पतींना अनुसरत राहिल्या आणि स्वतःच्या ठिकाणच्या आत्मस्वरूपाचे भान कायम राखीत राहिल्या.

त्याही पुढे पुरुषांना आत्मप्राप्तीच्या ज्ञानासाठी सद्गुरुंना शरण जाणे, त्यांचा सहवास करणे, त्यांची सेवा करणे आवश्यक होऊ लागले. तेव्हा साहजिकच स्त्रियांना त्यांच्या नैसर्गिक कारणांमुळे व मर्यादेमुळे दुय्यम भूमिका घेणे क्रमप्राप्त झाले. तरीही गृहकृत्य व आपला संसार सांभाळून स्त्रिया आपल्या पतींना पूरक असे जीवन जगत असत. पुरुषही स्त्रियांची अडचण ओळखून सद्गुरुंकडून प्राप्त झालेले आत्मज्ञान अत्यंत आपलेपणाने स्वस्त्रियांना देत असत. त्यामुळे अशा स्त्रियाही मनाने संसारात अडकून न रहाता मुक्त असत आणि मुक्तपणे मुक्तीचा आनंद अनुभवत असत. अशा तऱ्हेने प्राप्त जीवनातच मुक्तीचा अनुभव घेणारे स्त्री-पुरुष देहत्यागानंतर सहजपणे जीवनमुक्त होत असत.

हे लक्ष्मी, परंतु पुढे काळ अधिकच कठीण होऊ लागला. म्हणजेच आत्मप्राप्तीचे ज्ञान व त्यासाठीच्या मार्गाने जाणारे जीव दुर्मिळ होऊ लागले. या संबंधीच्या सर्व संस्कारांचा लोप होऊ लागला. लोक बाह्योपचारातच जास्त अडकू लागले. ईश्वराच्या अस्तित्वाच्या प्रतीकात्मक अशा पाषाणाच्या व मृत्तिकेच्या मूर्ती घडू लागल्या. त्या मूर्तींसाठी देवळे बांधली जाऊ लागली. तेथे तीर्थे वसू लागली. या सर्व बाह्य देखाव्यामध्ये रमता रमता कोणालाही आत्मज्ञान, आत्मप्राप्ती

यासारख्या मुलभूत गोष्टींचे स्मरणच राहिले नाही. किंबहुना त्याची आवश्यकताच वाटेनाशी झाली. मनातील वासनेचे मूळ व मळ आणि अज्ञान हे दोष आतमध्ये तसेच दडून राहिले आणि अहंकार मात्र वाढतच राहिला.

पुरुषांची अशी अधोगती झाल्यावर मग स्त्रियांचा तर आत्मोन्नतीचा मार्गच खुंटला. पुरुषांची स्त्रियांकडे पहाण्याची दृष्टी केवळ वासनात्मकच राहिली. स्त्रियांकडे विषयसुखाची भोग्य वस्तू म्हणूनच पाहिले जाऊ लागले. त्यातूनच स्वस्त्रियांविषयी मालकी हक्काची भावना वाढीस लागली आणि तरीही विषयसुखाची पूर्ती न झाल्याने इतर स्त्रियांकडेही वैषयिक नजरेने पहाणे चालूच राहिले. पतिसेवा, कुटुंबातील कर्तव्यकर्म, मुलांचे संगोपन अशा मोठ्या मोठ्या शब्दांचा वापर करून स्त्रियांना खोटा मोठेपणा दिला जाऊ लागला. त्यांना देवी वा देवता संबोधिले जाऊ लागले. अनेक स्त्रिया या बाह्य मोठेपणाला फसल्या आणि ज्यांना या मोठेपणामागील खरा हेतू लक्षात आला, त्या स्त्रियाही परिस्थितीच्या दबावाखाली संसारात अडकून राहिल्या. त्यातून सुटण्याचा कोणताही मार्ग त्यांच्या दृष्टोत्पत्तीस न आल्याने असहाय्य होऊन प्राप्त जीवन कंठीत राहिल्या.

हे लक्ष्मी, अशा बिकट परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर कृष्णावतार झाला होता. त्या परिस्थितीतून मार्ग काढण्याचे कार्य कृष्णाच्या जीवनचरित्राद्वारे घडायचे होते आणि तसे ते घडतही होते. त्यासाठी कृष्णाचे सुंदर व्यक्तिमत्त्व, आकर्षक गुण, प्रेमळ स्वभाव आणि मनमोकळी वृत्ती त्याच्या कार्याला सहजपणे सहाय्यभूत होत होती. याच गोष्टींचा उपयोग करून कृष्णाने जसे बाळगोपाळांना आपल्याकडे आकर्षून घेतले होते, अगदी तसेच त्याने गोपबालांनाही आपल्याकडे तेवढेच आकर्षून घेतले होते.

अगदी लहानपणापासून कृष्ण त्याच्या आसपास वावरणाऱ्या स्त्रियांचे जीवन अगदी जवळून पहात आला. त्यांचा प्रेमळपणा, त्यांची भावनात्मकता, त्यांची सतत दुसऱ्यासाठी करीत रहाण्याची वृत्ती, त्यांची सहनशीलता इत्यादी स्वभावगुणांचे कृष्णाला अतिशय कौतुक वाटत असे. परंतु त्याचबरोबर त्या स्त्रियांना जगावे लागणारे असहाय्य, असुरक्षित व अवहेलनात्मक असे अवमानाचे जीवनही कृष्णाच्या लक्षात आले आणि त्याचे त्याला अत्यंत वाईट वाटले. स्त्रियांच्या स्वभावातील भिडस्तपणा, भीरूता, मनाची दुर्बलता, आपल्या भावना दाबून ठेवण्याची प्रवृत्ती यांसारख्या कमतरताही कृष्णाने अचूकपणाने हेरल्या. परंतु असे सर्व समजून घेऊन स्वस्थ बसणाऱ्यांपैकी काही कृष्ण नव्हता. त्याने आपल्या आंतरिक प्रेरणेला प्रमाण मानून या स्त्रियांशी आपणहून जवळीकता साधली. त्या स्त्रियांमध्ये बालिका होत्या, युवती होत्या आणि अगदी प्रौढ स्त्रियाही होत्या. त्या सर्वांना त्यांच्या त्यांच्या परीने दुःख होते, अडचणी होत्या, क्लेशही होते. परंतु त्या गोष्टी काही त्या स्त्रिया कृष्णाला सांगणे शक्य नव्हते. कारण एकतर त्यांच्या दृष्टीने कृष्ण एक लहान मुलगा होता आणि दुसरे म्हणजे त्यांच्यासाठी सुरुवातीला तरी कृष्ण एक घराबाहेरचीच व्यक्ती होती. त्यामुळे कृष्णाला आपल्या घरातील किंवा व्यक्तिगत म्हणून काही खाजगी गोष्टी सांगणे त्या स्त्रियांना साहजिकच योग्य वाटत नव्हते. कृष्ण हे जाणून होता आणि म्हणून कृष्णानेच त्या गोपस्त्रियांशी आपणहूनच जवळीकता साधण्यास सुरुवात केली.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या बाललीलांनी या स्त्रियांची मने आधीच कृष्णाकडे आकर्षित झालेली होती. त्यामुळे कृष्णालाही त्यांच्याशी जवळीकता साधणे अगदी सुलभ झाले. जरा मोठा झाल्यावर त्या गोपस्त्रियांशी कृष्ण प्रेमाचे हट्ट करू लागला. त्यांनी त्याला कडेवर घ्यावे, आवडता खाऊ द्यावा, वाड्याबाहेरील बागेत न्यावे यासाठी म्हणून कृष्ण त्या गोपिकांच्या अगदी मागेच लागे आणि त्याही कधी प्रेमाने तर कधी लटक्या रागाने, पण कृष्णाच्या मनासारखे करीत असत. कृष्णाला कडेवर घेतल्यावर कृष्ण त्यांना प्रेमाने एवढा बिलगत असे की त्या प्रेमस्पर्शाने गोपींच्या सर्वांगातून प्रेमाच्या लहरीच झिरझिरून जात असत. त्यांच्या ठायी कृष्णाविषयीचे प्रेम एवढे भरून येई, की त्या गोपी कृष्णाचे भरभरून मुकेच घेऊ लागत. कृष्णाच्या नाजूक गालावर, कपाळावर, हनुवटीवर मुक्यांचा जणू अगदी माराच करीत. त्या प्रेमवर्षावाने सुखावलेला कृष्ण मग गमतीने त्याची परतफेड त्याच प्रेमाने व त्याच रितीने त्या गोपींना करीत असे. आपले नाजूक ओठ गोपींच्या गालावर, कपाळावर, केसांवर ठेवून कृष्ण जेव्हा त्या गोपींचेही मुके घेत असे तेव्हा त्या गोपी तर अत्यंत हर्षभरितच होत. परंतु काही काही वेळा कृष्ण खट्याळपणे त्या गोपींच्या ओठांवरही आपले ओठ ठेवीत असे. तेव्हा मात्र त्या गोपी कृष्णाच्या डोक्यावर एखादी टपली मारून त्याला रागावल्यासारखे करीत आणि त्याला लागलीच खाली ठेवीत. अशावेळी कृष्ण आपल्या हाताने आपले डोळे झाकून घेई आणि स्फुंदून स्फुंदून रडावयास सुरुवात करी. त्याच्या रडण्यातील नाटकीपणा गोपींच्या लगेचच लक्षात येई. कारण कृष्ण जरी रडल्याचा आवाज काढीत असे तरी त्याच्या डोळ्यात मात्र पाण्याचा एक थेंबही नसे. गोपींना मग एकदम हसू फुटे आणि त्या कृष्णाला पुन्हा उचलून घेत. मग कृष्णही खुदूकन हसू लागे आणि 'कशी गंमत केली' या भावाने गोपींकडे पाहू लागे. तेव्हा तर त्या गोपी कृष्णाला आपल्या मिठीत अधिकच जवळ घेत व अगदी घट्ट धरून ठेवत.

वयाने आणखीन थोडे मोठे झाल्यावर कृष्णाने त्या गोपींशी निरनिराळे खेळही खेळण्यास सुरुवात केली. सुरुवातीला कृष्णाच्या आवडीचे खेळ खेळता खेळता, कृष्ण गोपींच्या स्त्रीसुलभ आवडीचे म्हणजे फुगडी, झिम्मा, लपाछपी, अगदी भातुकलीसारखे खेळही खेळू लागला. इतकेच नव्हे, तर निरनिराळी गाणी म्हणत म्हणत व हातात हात धरून नाचण्याचा आनंदही कृष्ण गोपींसह अगदी मनमुराद घेत असे. कृष्णाच्या प्रेमासाठी त्या गोपी कृष्णाच्या आवडीचे निरनिराळे अनेक पदार्थही करून आणीत आणि प्रेमाने त्याला आपल्या हाताने भरवून खाऊ घालत. कृष्णही त्या पदार्थांचे सेवन आनंदाने करीत असे आणि आपल्या हाताने त्या गोपींनाही ते पदार्थ भरवून त्यांना आत्यंतिक सुखाचा अनुभव आणून देत असे. कित्येक वेळा तर हट्टाने आपल्या आवडीचा पदार्थ गोपींकडून मागून घेत असे आणि आपल्या प्रेमाचा हक्क बजावीत असे. कृष्ण त्या गोपींची चेष्टाही अगदी मोकळेपणाने करीत असे. कधी कोणाचे पाठीमागून येऊन डोळे झाक, कधी एकमेकींच्या वेण्यांची गाठच मारून ठेव, तर कधी त्यांच्या वस्तूच लपवून ठेव, असे त्याचे नाना तऱ्हेचे उद्योग सारखे चालू असत. नंदाच्या राजवाड्यातच चालणारे हे कृष्ण व गोपींचे हसणे, बागडणे व खेळणे हा नंद व यशोदा यांच्याही कौतुकाचा व आनंदाचा विषय होऊन राहिला होता.

हे लक्ष्मी, मागे तू म्हटल्याप्रमाणे कृष्ण हा वयाने लहान असल्यामुळे गोपस्त्रियांना कृष्णाशी अशी जवळीकता साधणे सोपे गेले हे खरे आहे. परंतु एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव. कृष्णाची वाढ झपाट्याने होत होती. कृष्णावताराचे

वैशिष्ट्यच मुळी हे होते, की त्याच्या ठिकाणी त्याच्या आत्मस्वरूपाची जाणीव जन्मतःच होती. त्यामुळे त्याची मानसिक व बौद्धिक वाढ अगदी लवकरच झालेली होती. सर्वांगीण विचार करण्याची क्षमता आणि समजुतीची प्रगल्भता त्याच्या ठिकाणी अगदी सहजपणे होती. कृष्णाच्या देहाचीही वाढ भराभरच झाली होती. दही, दूध, लोणी, तूप यांच्या सेवनाने आणि नित्य खेळण्याने असेल म्हणा, पण कृष्ण हा त्याच्या वयापेक्षा थोडा मोठाच दिसत असे. त्यामुळे आठ वर्षांचा होता होताच कृष्ण त्याच्या वागण्याबोलण्याने एखाद्या तरुणासारखाच वाटत असे.

कृष्णाची अशी झालेली वाढ सर्वांच्याच लक्षात आली आणि डोळ्यांतही भरली. काहीजणांसाठी तो कौतुकाचा विषय झाला, तर काहीजणांसाठी, विशेषतः नंद व यशोदा यांच्यासाठी तो थोडासा काळजीचाही विषय होऊन राहिला. कारण त्यामुळेच कृष्णाची गोपींशी असलेली जवळीकता व सलगी ही काहीजणांना शंकास्पद व संशयास्पद वाटू लागली. कृष्ण व गोपिकांचे असे प्रेमसंबंध सर्वांनाच पाहवले व मानवले असे नाही. मग काही जणांनी कुरबुरीचा सूर लावला आणि आपापसात कुजबूजही सुरू केली. हळुहळू या गोष्टी यशोदेच्याही कानावर आल्या. अर्थात या गोष्टी ती नित्य पहातही होती. त्यामुळे तिला तरी त्यात काही गैर आहे असे कधीच वाटले नाही. परंतु नंदाला मात्र जेव्हा या गोष्टी कळल्या तेव्हा तो थोडासा गंभीर झाला. कारण गोकुळचा राजा म्हणून तो एक जबाबदार पुरुष होता. त्याने प्रथम यशोदेला बोलावून घेतले व तिच्याशी हा विषय काढला. यशोदेने तो विषय हसण्यावारीच नेला आणि ती नंदाला म्हणाली की, ''माझा कान्हा अजून एवढा लहान व निरागस आहे की त्याच्याविषयी अशी काही शंका घेणे हेच मुळात गैर आहे. या गोष्टींची दखल घेणे म्हणजेच त्या गोष्टींना नसते महत्त्व देण्यासारखे आहे. तेव्हा या गोष्टींची चर्चाच काय, पण त्यांचा उल्लेखही न करणे हाच त्याच्यावरचा एकमेव उपाय आहे.''

यशोदेच्या बोलण्याने नंदाचे समाधान झाले नाही. पण त्याला कौतुक मात्र जरूर वाटले. कारण तो जाणून होता की यशोदेच्या ठिकाणची ही माता वात्सल्यभावाने बोलत आहे. त्यामुळे तिच्या नजरेला कृष्ण हा नेहमी लहानच दिसणार आहे. परंतु नंद जाणून होता की कृष्ण मोठा होत होता आणि वयाच्या मानाने जास्तच मोठा झालेला होता. कृष्णाच्या शरीराची, मनाची व बुद्धीची झालेली वाढ नंदाला तर समक्ष दिसतच होती. परंतु कृष्णाचा मनमोकळेपणा व समजूतदारपणाही नंदाला माहीत होता. त्यामुळे त्याने यशोदेच्या उपस्थितीतच कृष्णाला प्रत्यक्षच बोलावून घेतले. कृष्णासोबत बलरामही तेथे आला. आल्याबरोबर कृष्ण व बलराम यांनी नंदाला अभिवादन केले आणि कृष्ण थेट यशोदेच्या मांडीतच जाऊन बसला. बलराम मात्र तेथेच नंदाच्या जवळ उभा राहिला. कृष्ण जवळ आल्याबरोबर यशोदेचा प्रेमवात्सल्यभाव दाटून आला. तिने कृष्णाला आपल्या अगदी जवळ घेऊन हृदयाशी धरले आणि त्याचे मस्तक ती प्रेमाने कुरवाळीत राहिली. कृष्ण व यशोदेचे ते प्रेम पाहून नंदही भारावला आणि थोडासा गहिवरलाही. परंतु त्याने लगेचच स्वतःला सावरले आणि तो कृष्णाशी बोलू लागला.

''अरे कृष्णा, तू माझा अत्यंत आवडता आहेस हे तुलाही ठाऊक आहे. तुझ्यासारखा सद्‌गुणी मुलगा आमच्या पोटी आला हे तर आमचे भाग्यच आहे असे आम्ही समजतो. परंतु सध्या मात्र तुझ्या वागण्याविषयी आणि खरे म्हणजे स्त्रियांशी वागण्याविषयीच्या काही कुरबुरी, काही तक्रारी माझ्या कानावर आल्या आहेत. तू वयाने अजून तेवढा काही मोठा झालेला नाहीस, परंतु या सर्व गोष्टी कळण्याएवढी समज मात्र तुझ्या ठिकाणी नक्की आलेली आहे. माझ्या व यशोदेच्या ठायी तुझ्याविषयी कोणतीही शंका नाही. आम्हा दोघांनाही तुझ्या निर्मळ मनाची अगदी खात्री आहे. तुझा मनमोकळा स्वभाव व वागणेही आम्हाला माहीत आहे. परंतु हा तुझा मोकळेपणा स्त्रियांच्या बाबतीत जरा जास्तच होत आहे असे मला तरी वाटते. निदान दिसायला तरी तसे दिसते. तेव्हा जे तुझ्या मनात नाही ते बाहेर दिसूही नये हेच योग्य नव्हे का? कारण कितीही झाले तरी स्त्री व पुरुष यांच्यात मूलतःच फरक आहे आणि मग तो फरक त्यांच्याशी जवळीकता साधण्यातही असलाच पाहिजे. आता तसा फरक असला पाहिजे, तर जाणून-बुजूनच तसा तो केला पाहिजे. अर्थात कृष्णा, हे सर्व तू जाणतोसच. मी काही तुला वेगळे सांगावयास हवे असे मुळीच नाही. तेव्हा तुझ्या या वागण्याचा अर्थ तूच आम्हाला नीट समजावून सांग. हा बलराम बघ. त्याचा स्वभाव कसा शांत व गंभीर आहे. त्याचे वागणेही अत्यंत संयमित व मर्यादेत असते. तो कधीही कोणाच्या अध्यात नाही की मध्यात नाही. बलरामा, तुझे काय म्हणणे आहे? कृष्णाचे असे वागणे तुला तरी पटते का? तुला तरी ते योग्य वाटते का?''

नेहमी शांत दिसणारा व एवढा वेळ स्तब्ध उभा राहून सर्व ऐकत असलेला बलराम, नंदाने अचानकपणे त्याला उद्देशून विचारलेल्या प्रश्नाने एकदम भानावर आला. थोडावेळ तोही काही बोलला नाही. परंतु काही काळानंतर त्याच्या विचारमग्न अवस्थेतून तो बाहेर आला आणि नंदाला उद्देशून बोलू लागला.

''अहो तात! तुमचे सांगणे योग्यच आहे याची मला पूर्ण खात्री आहे. कृष्णालाही तसे मी वारंवार समजावून सांगत असतो. परंतु माझे सांगणे त्याला मान्य होत नाही. त्याचे म्हणणे नेहमी असेच असते, की जर त्याच्या मनात कोणतेही वाईट विचार नाहीत, तर त्याने इतरांच्या म्हणण्याला महत्त्व देण्याचे काहीच कारण नाही. तर माझे म्हणणे असे असते, की आपण जर सर्वांबरोबर जीवन जगत आहोत, तर आपल्याला इतरांच्या म्हणण्याचा विचार हा केलाच पाहिजे. त्यात तथ्य असेल तेवढे आपण घ्यावे व बाकीचे सोडून द्यावे. हे तात, परंतु एक गोष्ट मी तुम्हाला निश्चितपणे सांगतो, की भले मला कृष्णाचे वागणे पसंत नसेल, परंतु कृष्णाच्या मनातील हेतू अगदी शुद्ध आहे याची तुम्ही पुरेपूर खात्री बाळगा. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे कृष्णाचे वागणे हे केवळ त्यालाच जमणारे आहे आणि फक्त त्यालाच शोभणारे आहे. मलाही तसे करता येणार नाही आणि मी तसे करणारही नाही.''

बलरामाचे विचारपूर्वक बोलणे त्याच्या स्वभावानुसार अगदी स्पष्ट व सरळ होते. त्याच्यात भावनिकता जरी जास्त नसली तरी बौद्धिक कोरडेपणाही नव्हता. कृष्णाविषयीचा आपलेपणा मात्र पुरेपूर होता. बलरामाच्या बोलण्याचा नंदालाही

साहित्य प्रतिष्ठान®

संतोष झाला, पण समाधान मात्र झाले नाही. म्हणून त्याने पुन्हा कृष्णाकडे वळून पाहिले आणि त्याच्याशीच तो बोलू लागला.

''अरे कृष्णा, जो तो ज्याच्या त्याच्या परीने बोलत आहे. पण तूच अजून काही बोलत नाहीस. सर्वांचे म्हणणे तू ऐकलेच आहेस. अगदी तुझा मोठा भाऊ बलराम यालाही काय म्हणायचे आहे हेही तुझ्या लक्षात आलेले आहे. आता तूच बोलायचे आहेस. तुला काय म्हणायचे आहे आणि या पुढे तू काय व कसे करणार आहेस हे तूच आता आम्हाला नीट समजावून सांगावेस हेच अधिक बरोबर ठरेल.''

एवढा वेळ यशोदेच्या मांडीवर बसून कृष्ण सर्व काही शांतपणे ऐकत होता. त्याच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची चलबिचल जराशीही दिसत नव्हती. नंदाने जेव्हा त्याला बोलण्यास सांगितले तेव्हा मात्र तो लागलीच उठून नंदाच्या जवळ येऊन उभा राहिला. नंदाला त्याने हात जोडून प्रणिपात केला आणि जराही न रागावता नम्रपणे, पण ठामपणे तो नंदाशी बोलू लागला.

''हे तात, तुमचे सर्व म्हणणे मी नीटपणे ऐकले आहे. त्यातून तुम्हाला काय सांगायचे आहे हेही माझ्या चांगले लक्षात आले आहे. बलरामदादाचेही म्हणणे मी ऐकले आणि त्याला काय म्हणायचे आहे तेही मला कळले आहे. तुम्हा उभयतांच्या ठिकाणी माझ्या भल्याचा व हिताचाच विचार आहे याची मला पूर्ण खात्री आहे. माझ्याविषयी तुमच्या ठिकाणी कोणतीही शंका नाही याची मला निश्चिती आहे. त्यामुळे माझे मनोबळ अधिकच वाढले आहे. परंतु मुळात माझ्या मनाचे बळ हे माझ्या मनाच्या शुद्धतेतच आहे. माझे मन अगदी मोकळे आहे. माझी मनोभूमी स्वच्छ आहे आणि म्हणूनच माझी मनोभूमिकाही स्पष्ट आहे.

हे तात, मला या गोष्टीचे कारण सांगता येणे शक्य नाही, परंतु मला सर्वांविषयी म्हणजे अगदी सर्वांविषयी, आत्यंतिक आपलेपणा अगदी सहजपणे वाटत असतो. मग त्या स्त्रिया असोत वा पुरुष, लहान असोत वा मोठे असोत, चांगले असोत वा वाईट असोत, मला त्यांच्याविषयी एक प्रकारचे प्रेम व जिव्हाळा नेहमी वाटत असतो. एवढेच काय, मला गाईगुरांविषयीसुद्धा जेथे आपुलकी वाटत असते, तेथे मग मनुष्यांविषयीचा आपलेपणा हा केवढा तरी असणारच, नाही का? सर्वांच्या सुखदुःखात सहभागी व्हावे, एवढेच नव्हे तर त्यांचे दुःख नाहीसे करून त्यांना सुख द्यावे असे मला अगदी मनापासून वाटत असते. तसा माझा नेहमीच प्रयत्नही असतो. त्यातच माझ्या मनाला सुख व समाधान वाटत असते. त्यासाठी मी सर्वांशीच प्रेमाच्या मोकळेपणाने वागत असतो. तसे मी केवळ स्त्रियांशीच वागतो असे नाही, तर पुरुषांशीही मी तसेच वागत असतो. अर्थात पुरुषांशी प्रेमाच्या मोकळेपणाने वागणे योग्य आहे आणि स्त्रियांशी तसे वागणे मात्र अयोग्य आहे असे जर कोणी म्हणत असेल, तर ते म्हणणेच सर्वस्वी अयोग्य आहे. ते मी कधीही व कदापिही मान्य करणे शक्य नाही. कारण मुळात जो भेद ईश्वरानेच केलेला नाही तो भेद आपल्याला करण्याचे कारण नाही आणि त्यापेक्षा आपल्याला

तसा अधिकारही नाही. अर्थात कारण असेल तर ते फक्त अज्ञान हेच आहे आणि अधिकार असेल तर तो केवळ अहंकारामुळेच आहे.

ईश्वराने स्त्री व पुरुष यांत केवळ देहानुषंगिकच फरक ठेवला आहे आणि तो केवळ नैसर्गिक कारणापुरताच आहे. तो फरक तेवढाच मर्यादित ठेवला पाहिजे. त्यापेक्षा त्याला जास्त महत्त्व देणे हेच मुळी अयोग्य आहे. कारण मनाचा सुखदुःखाचा अनुभव, मनाची भावनिकता व संवेदनक्षमता आणि मनाला असणारी प्रेमाची व आपुलकीची जरुरी या सर्व गोष्टी स्त्री असो वा पुरुष, पण सर्व मनुष्यांच्या सारख्याच आत्यंतिक गरजेच्या आहेत. त्याची पूर्ती करून घेण्याचा अधिकार सर्वांना सारखाच आहे. परंतु सर्वांना सारखीच संधी जीवनात मिळते असे मात्र नव्हे. माझ्यापुरते बोलायचे झाले, तर अशी संधी मी सर्वांनाच व सारखीच उपलब्ध करून देत असतो. माझ्या ठिकाणी सर्वांविषयी असलेले प्रेम मी संधी साधून व्यक्त करीत असतो आणि माझ्याविषयी ज्यांच्या ठिकाणी प्रेम आहे त्यांना ते व्यक्त करण्याची संधी मी निर्माण करून देत असतो. एखाद्याने अशी संधी साधली तर त्या प्रेमाच्या अनुभवाने मला निश्चितच अतिशय आनंद होतो. परंतु कोणाठायी जर असे प्रेमच नसेल किंवा असूनही त्याला ती संधी साधता आली नाही तर माझ्या ठिकाणी कोणाविषयीही काहीही राग नसतो हेही तेवढेच खरे आहे. अशांविषयीचे माझे प्रेम मात्र कायमच असते आणि मी पुन्हा योग्य संधीची वाट पहातच रहातो.

हे तात, शारीरिक जवळीकतेसंबंधीचा जो मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे, तोही खरे तर अप्रस्तुतच आहे. त्यातूनही स्त्रियांविषयीच्या जवळीकतेला जो वेगळा रंग दिला जात आहे किंवा त्याचा काहीतरी वेगळा अर्थ काढला जात आहे ते तर साफ चुकीचे आहे. अर्थात अशी शारीरिक जवळीकता जर केवळ शारीरिक आकर्षणापोटी किंवा शारीरिक सुखासाठी होत असेल तर ते केव्हाही निषेधार्हच आहे. परंतु म्हणून शारीरिक जवळीकता केवळ त्याच कारणासाठी होत असते असे मानणे मात्र गैरच आहे आणि प्रेमाच्या शुद्ध भावनेने जवळ येणाऱ्यांवर ते अन्यायकारक आहे. या दृष्टीने पहाणाऱ्यांची व बोलणाऱ्यांची दृष्टीच अशुद्ध आहे असेच म्हणावे लागेल. मुळात ज्यांची स्वतःचीच स्त्रियांकडे पहाण्याची दृष्टी केवळ वासनात्मक आहे, त्यांच्या दृष्टीला अशी स्त्री-पुरुषांची जवळीकता ही वासनायुक्त आहे असेच नेहमी दिसणार आणि फक्त तसेच त्यांना जाणवणार. तेव्हा त्यांच्या वाटण्याला व म्हणण्याला आपण किती महत्त्व द्यायचे हे आपणच ठरवायचे आहे. मी मात्र अशा लोकांच्या मताला व बोलण्याला अजिबात किंमत देत नाही. कारण मी हे पूर्णपणे जाणून आहे, की मनातली प्रेमासारखी चांगली व शुद्ध भावना व्यक्त करायलासुद्धा शरीर हेच माध्यम आहे.

हे तात, या सर्व बोलण्यामध्ये एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे, की हा विषय तिसऱ्या व्यक्तींनी बोलण्याचे काहीच कारण नाही. या गोष्टी फक्त संबंधितांनीच जाणायच्या असतात व बोलायच्या असतात. कारण अशा गोष्टी दोन व्यक्तींच्या प्रेमसंबंधातून अत्यंत उत्स्फूर्तपणे घडत असतात. त्याचा हेतू व त्याचा अर्थ फक्त त्यांनाच कळतो आणि फक्त त्यांनाच जाणवतो. तेथे संबंध नसलेल्या इतरांनी कल्पना करण्याचे व तक्रार करण्याचे काहीच कारण नाही. ज्यांच्या ठिकाणी मुळात असे प्रेमच नाही, त्यांना त्या प्रेमाची उत्स्फूर्तता तरी कशी काय कळणार? दोन प्रेमाच्या व्यक्ती जेव्हा

एकमेकांना भेटतात व खेळतात तेव्हा एकमेकांच्या हातावर टाळी देणे, परस्परांचे हात हातात धरून ठेवणे, एकमेकांच्या जवळ बसणे, हात हातात घेऊन नाचणे, गाणी म्हणणे अशा गोष्टी अगदी सहजपणे घडतात. कारण त्याद्वारेच परस्परांच्या प्रेमाची देवघेव होते आणि प्रेमाची देवघेव होते म्हणूनच आनंदाचा अनुभव येतो. ते प्रेमही निर्मळ असते आणि आनंदही निखळ असतो. कारण असे प्रेमाचे संबंध परस्परांच्या संमतीतून व समजुतीतूनच निर्माण झालेले असतात. तेथे सक्तीचा वा अनिच्छेचा प्रश्नच निर्माण होऊ शकत नाही. हे तात, तेव्हा मला तुम्हाला एवढेच विचारायचे आहे, की संबंधित स्त्रियांपैकी कोणी तुमच्याकडे माझ्याविरूद्ध तक्रार केली आहे का? तसे असेल तर मात्र मला त्याची दखल निश्चितच घ्यावी लागेल. परंतु आमचे संबंध एवढे मोकळेपणाचे आहेत की तशी कोणाची नाराजी असल्यास ती नाराजी त्या फक्त मला आणि मलाच सांगतील याची मला पूर्ण खात्री आहे.''

कृष्णाचे बोलणे ऐकता ऐकता नंद अगदी स्तिमित होऊन राहिला होता. यशोदाही चकित झाली होती. तिला कृष्णाचे बोलणे सगळेच कळले होते असेही नाही. परंतु तिच्या मुखावरील कृष्णाविषयीचा कौतुकभाव अगदी ओसंडून चालला होता. बलराम नेहमीप्रमाणे गंभीरच होता. थोडा अधिक गंभीर झाला इतकेच! परंतु वातावरणातील शांततेचा भंग झाला तो पुन्हा नंदाच्याच बोलण्याने. त्याने आपला हात कृष्णाच्या मस्तकावर ठेवून थोडेसे थोपटल्यासारखे केले आणि कृष्णाशी तो बोलू लागला.

''अरे कृष्णा, तुझे बोलणे तर मोठमोठ्या ज्ञानी पंडितांनाही लाजवील असेच आहे. तुझे बोलणे भावनात्मक तर आहेच, परंतु ते तर्कशुद्धही आहे. तुझे स्पष्ट व निःसंदिग्ध बोलणे हे कोणाच्याही बुद्धीला मान्य करावेच लागेल. या एवढ्या लहान वयात तुझ्या ठिकाणी असलेली एवढी मोठी समज आणि असलेला सर्वांगीण विचार पाहिला, की तुला लहान का म्हणावे हाच प्रश्न कोणाच्याही मनात उभा राहील. पण म्हणूनच तुला लहान वयाचा व अज्ञानाचा फायदाही मिळू शकत नाही हेही तितकेच खरे आहे. कारण तुझे वागणे व बोलणे निर्हेतुक आहे असे म्हणून सोडूनही देता येत नाही. कारण प्रश्न सामान्यांच्या मनाचा आहे. त्यांच्या मनात शंका येणे साहजिकच आहे. त्यांची मने कमकुवत असतीलही किंवा त्यांच्या मनात दोषही असतील. परंतु ती वस्तुस्थिती आहे हे मान्य करावेच लागेल. ज्यांचा याच्याशी प्रत्यक्ष संबंध नाही त्यांच्याकडे लक्ष देण्याचे कारण नाही असे तुला वाटते. परंतु माझा संबंध हा सर्वांशीच आहे. म्हणून त्या सर्वांच्या म्हणण्याकडे लक्ष देणे हे तर माझे कर्तव्यकर्मच आहे. तेव्हा माझे तुला एवढेच सांगणे आहे, की तुझे वागणे व बोलणे हे तुझे तूच संयमित व मर्यादेत ठेव की जेणेकरून कोणालाही शंका घेण्यास जागा उरणार नाही.

कृष्णा, तू मला आणखीन एक प्रश्न विचारला होतास, की संबंधितांची काही तुझ्याविषयी तक्रार आहे का? तशी कोणतीही तक्रार कोणीही माझ्याकडे वा यशोदेकडे केलेली नाही. परंतु याचा अर्थ असाच काही होत नाही, की त्यांची काही तक्रार नसेलच. नाराजी असूनही कोणी भीतीने वा भिडस्तपणाने तक्रारीचा सूर न लावण्याची शक्यताही आपल्याला

नाकारता येणार नाही.  अशा व्यक्ती पाठीमागे दुसऱ्याकडे तक्रार करू शकतात.  तेव्हा कोणाचाही भरवसा न धरता आपण आपल्या बाजूने काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

कृष्णा, मला तुला आणखीन एक गोष्ट प्रकर्षाने सांगायची आहे.  तुझी विचारसरणी, तुझा स्वभाव, तुझे वागणे व बोलणे हे अतिशय उदात्त व श्रेष्ठ दर्जाचे आहे.  सामान्यांच्या समजुतीच्या व संस्काराच्या पलीकडे असल्यामुळे त्यांना ते कळणे कठीण आहे.  परंतु त्यातील सत्यत्व मी जाणून आहे.  म्हणून माझ्या ठिकाणी तुझ्याविषयी अत्यंत कौतुक आहे. अर्थात मला तुझे नवल मात्र वाटत नाही.  कारण तुझ्या जन्मानंतर लगेचच येथे महात्मा गर्गमुनींचे आगमन झाले होते. त्याचवेळी तुझे जातक वर्तविताना त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते, की तुझे जीवन हेच मुळी सर्वांना सुखदायी, प्रेमदायी व आनंददायी असे आहे.  अनेकांचे जीवनकल्याण तुझ्याकडून घडणार आहे.  त्याप्रमाणे तुझे जीवन अगदी लहानपणापासूनच वेगळे आहे हे आम्ही पहात आलो आहोत.  तू केवळ आमचाच नसून सर्वांचाच आणि सर्वांसाठीच आहेस आणि याचा आम्हाला अतिशय आनंद होत असतोच.''

बोलता बोलता नंदाचे डोळे प्रेमजलाने डबडबल्यासारखे झाले.  त्याने कृष्णाला आपल्या जवळ घेऊन त्याचे मस्तक कुरवाळले.  दुसऱ्या बाजूने बलरामालाही त्याने आपल्या जवळ घेतले.  ते भावपूर्ण दृश्य पाहून यशोदेचे नेत्र मात्र वाहूच लागले.''

नारदाच्या मुखातून श्रवण करताना लक्ष्मीचेही नेत्र पाणावले होते.  नारद वर्णन करून सांगत असलेल्या कृष्णकथांतील भरभरून वाहणारा प्रेमरस लक्ष्मीच्या अंतःकरणापर्यंत पोहोचल्याचेच हे लक्षण होते.  कारण केवळ त्यामुळेच ते प्रेम तिच्या नेत्रातून वहात होते.  ती लक्ष्मीची निव्वळ भावनिक अवस्था नव्हती, तर तिच्या ठायी असलेल्या सखोल व उत्कट प्रेमामुळे लक्ष्मी अत्यंत भावपूर्ण झाली होती.  लक्ष्मीची ती प्रेमभावपूर्ण अवस्था पाहून प्रेमभक्तिभावाने सदैव युक्त असलेल्या नारदाला परम संतोष झाला.  तो संतोष नारद बोलून व्यक्त करणार, तोच लक्ष्मीनेच बोलावयास सुरुवात केली.

''हे नारदा, मुळात या नारायणाचे सगुण प्रेम हेच अत्यंत गोड आहे हे सत्यच आहे.  परंतु त्यातूनही या कृष्णप्रेमाची गोडी मात्र काही औरच आहे हेही खरे आहे.  त्याचे वर्णन करताना व ऐकताना वक्ता व श्रोता हे उभयतां त्यातील प्रेमरसाने तृप्तही होतात आणि तरीही अतृप्तच रहातात.  ही किमया त्या कृष्णप्रेमाचीच आहे हे निश्चित!  परंतु आणखीन एक महत्त्वाची गोष्ट कृष्णकथा श्रवण करताना घडते.  ती म्हणजे त्या कथा मनाला पुन्हा विचार करायला तर लावतातच, परंतु त्याचबरोबर मनाला त्याचे मूळचे विचार व संस्कारही सोडायला भाग पाडतात.  आता हा स्त्रियांच्या बाबतीत घडलेला जो प्रसंग तू सांगितलास तोच बघ ना!  त्यात कृष्णाचे सांगणे व त्याची भूमिका अगदी तंतोतंत बरोबर आहे.  बुद्धीला ती सहजपणे पटते, पण मन मात्र तेवढ्या सहजपणे त्याचा स्वीकार करायला तयार होत नाही.

हे नारदा, या दृष्टीने नंदाने उपस्थित केलेली शंकाही मला उचितच वाटते.  कृष्णाने ज्या स्त्रियांना प्रेमाची जवळीक देऊ केली, ती त्यांनाही अगदी मनापासून मानवली का?  त्यांनाही त्याचे महत्त्व खरेच कळले का?  त्यांनाही त्याची जरुरी वाटली का?  हे प्रश्नही तेवढेच महत्त्वाचे आहेत.  कारण स्त्रिया या भावनाप्रधान असल्यामुळे मनानेही दुर्बलच असतात.

त्यांच्या मनाविरूद्ध घडणारी एखादी गोष्ट त्या न बोलता निमूटपणे सहन करीत रहातात. त्यामुळे ती शक्यताही गोकुळातील स्त्रियांबाबत अजिबात नाकारता येत नाहीच!''

लक्ष्मीच्या बोलण्यावर किंचितसे स्मित करून नारद उद्गारला, ''अगं लक्ष्मी, शक्यता ही कशाचीच नाकारता येत नाही. या सृष्टीत केव्हाही, कोठेही आणि काहीही घडू शकते. त्यातून या मनाचा तर काहीच भरवसा धरता येत नाही आणि दुसऱ्याच्या मनाचा तर नाहीच नाही. कारण मुळात त्याचा थांगपत्ता लागणेच अत्यंत कठीण असते. केव्हा त्याला काही आवडेल वा नावडेल, केव्हा त्याला काही योग्य वाटेल वा अयोग्य वाटेल याचे काहीच सूत्र नसते. परंतु सृष्टीत ज्याप्रमाणे चांगले व योग्य असेच घडेल असे गृहीत धरूनच सर्वांना वागावे लागते आणि त्याचबरोबर जे काही प्रत्यक्ष घडेल त्याची तयारी ठेवून त्याला प्रत्यक्ष सामोरे हे जावे लागतेच, अगदी तसेच मनाच्या बाबतीतही करावे लागते. त्याला काय मानवेल किंवा भावेल याची खात्री नसली, तरी काही तरी अंदाजाने गोष्टी या करीत रहाव्या लागतातच. गोकुळच्या स्त्रियांच्या बाबतीत कृष्णाची नेमकी हीच भूमिका होती. मुख्य म्हणजे कृष्णाचे मन मोकळे व निर्मळ होते आणि त्याचा हेतूही शुद्ध असल्याचा पूर्ण आत्मविश्वास कृष्णाठायी होता. त्यामुळे नंदाच्या सांगण्याने कृष्णाची भूमिका बदलली तर नाहीच, पण थोडीसुद्धा हलली नाही. कृष्ण त्याच्या आंतरिक प्रेरणेशी प्रामाणिक व ठाम राहिला.

हे लक्ष्मी, आता तुझी जी मुलभूत शंका आहे, की कृष्णाकडून स्त्रियांना जी प्रेमाची जवळीकता मिळाली ती त्यांना मनापासून मानवली का? आणि त्यांना ती खरेच भावली का? तर त्याचेही उत्तर तसे सोपे व सरळ आहे. कोणाच्या मनात नक्की काय आहे हे पूर्णपणे कळणे जरी कठीण असले, तरी मनातील गोष्टी सहजगत्या कोणाच्याही वागण्या बोलण्यातून प्रगट होत रहाताताच. त्या पूर्णतः आणि जास्त वेळ लपूनही राहू शकत नाहीत हेही तितकेच खरे आहे. तेव्हा कोणाची राजीखुशी वा नाराजी कृष्णाच्या लक्षात आल्यावाचून तर राहणे शक्यच नव्हते. कारण कृष्णाचे अंतःकरणही तेवढेच कोमल, तरल व संवेदनाशीलही होते. अर्थात एक गोष्ट खरीच होती, की अशा तऱ्हेची नात्यापलीकडील व कुटुंबाबाहेरील व्यक्तिशी प्रेमाची एवढी व अशी जवळीकता असणे हा विचारसुद्धा त्या स्त्रियांना अगदी अपरिचित होता. कारण त्यांच्यावरील संस्कारच मुळी अत्यंत वेगळे होते. त्यामुळे परक्या व्यक्तीशी असे मोकळेपणाने वागणे तर त्यांना ठाऊकच नव्हते. परंतु भाग्याने, तेही कृष्णाच्या स्वभावामुळे, आता त्या स्त्रियांना अशी संधी मिळाली होती. त्याचा परिणाम व उपयोग त्यांना त्यांच्या त्यांच्या स्वभावानुसार झाला. कृष्णाठायी त्यांच्याविषयी असलेला आपलेपणा, त्यांच्या दुःखाविषयी असलेला कळवळा, त्यांच्या कष्टमय जीवनाविषयी असलेली सहानुभूती या गोष्टी तर त्यांच्या लगेचच लक्षात आल्या. परंतु त्याहीपेक्षा त्यांना प्रत्यक्ष मदत करण्याची असलेली कृष्णाची तत्परता आणि त्यांना प्रेमाने सुखविण्याची कृष्णाची वृत्ती यामुळे त्या गोपस्त्रिया कृष्णाकडे मनापासून आकर्षित झाल्या नसत्या तरच नवल होते.

आतापर्यंत त्यांच्या भावनांचा कोणीच व कधीही विचार केला नव्हता. त्यांच्या भावना नेहमी दबूनच राहिल्या होत्या. त्या मात्र सर्व कष्ट सोसून कुटुंबीयांची सेवा चाकरी करीतच होत्या आणि त्यांच्या सुखामध्ये स्वतःचे सुख मानून, स्वतः मात्र नित्य दुःखाचा अनुभव घेतच राहिल्या. त्यामुळे त्यांच्या भावना जाणून घेऊन त्यांना सुखविणारे कृष्णाचे प्रेम

अनुभवून, त्या कृष्णप्रेमाला सुरुवातीला भुलल्या यात काहीच आश्चर्य नाही. त्यामुळे कृष्णाची भेट घ्यावी, त्याच्याशी बोलावे, त्याचे ऐकावे आणि त्याचे प्रेम मनमोकळेपणाने व मनमुराद अनुभवावे असा छंदच त्यांच्या ठिकाणी निर्माण झाला.

प्रत्यक्ष कृष्णाच्या सहवासात त्याच्याठायीची निःस्वार्थता, निरपेक्षता व मनाची निर्मळता पहाता पहाता त्यांचे मन कृष्णाठायी पूर्णपणाने जडून राहिले. त्या कृष्णाच्या प्रेमात त्यांना वासनेचा कुठे वासही आला नाही. हे लक्ष्मी, एक स्त्री म्हणून तू जाणूनच असशील, की कोणाही पुरुषाच्या ठिकाणी वासनेचा थोडासा जरी अंश असला तरी त्या पुरुषाच्या बोलण्यातून, पहाण्यातून वा स्पर्शातून प्रगटणारी वासनेची किंचितशी छटा सुद्धा स्त्रियांच्या सर्वात आधी लक्षात येते. त्या वासनेचा वास प्रथम स्त्रियांच्या नाकाला येतो. अशी व्यवस्था ईश्वराच्या नियतीत या निसर्गानेच निर्माण केलेली आहे. कारण त्यामुळेच स्त्रिया सावध व दक्ष होतात आणि तत्परतेने स्वतःला अशा पुरुषांपासून दूर करतात. असे असूनही गोपस्त्रिया कृष्णाशी अगदी मोकळेपणाने वागत असत आणि कृष्णाच्या मोकळे वागण्याचे त्यांना कोणतेही दडपण अजिबात येत नसे. यातच सर्व काही आले.

हे लक्ष्मी, कृष्णाचे गोपींवर खरे प्रेम होते आणि त्यांच्याविषयी खरेच आपलेपणा होता. म्हणूनच या आपलेपणापोटीच कृष्ण आपल्या सख्यांना वेळोवेळी योग्य वागण्याचे मार्गदर्शनही करीत असे. एवढेच नव्हे, तर तसे वागण्याचा तो वारंवार आग्रहच धरीत असे ही गोष्ट अत्यंत महत्त्वाची आहे. घरात कसे वागावे, दुसऱ्याच्या घरी गेल्यावर कसे वागावे, चार-चौघात गेल्यावर कसे वागावे याविषयी कृष्ण त्याच्या सख्यांना वारंवार सांगत असे. प्रत्यक्ष वागत असताना किंवा नंतरही कृष्ण त्यांना सतत सावध करीत असे. विशेषतः गवळणींविषयी तर त्याचा विशेषच कटाक्ष होता. 'तुम्ही 'स्त्रिया' आहात आणि पुरुषही तुमच्याकडे 'स्त्री' याच दृष्टीने नेहमी पहात असतात हे लक्षात ठेवा आणि अतिशय सावधानतेने वागा' असे सांगून कृष्ण त्यांना सावध करीत असे. वागताना, बोलताना व वावरताना अत्यंत काळजीने रहा असे त्यांना कृष्ण अगदी निक्षून सांगत असे. कारण सर्वसामान्य पुरुषांच्या स्त्रियांकडे पाहण्याच्या नजरा या निर्मळ व स्वच्छ असणार नाहीत, तर त्या नजरा दूषितच असणार याची जाणीव कृष्णाला होती. तशी जाणीव तो आपल्या सख्या गवळणींना नेहमी करून देत असे. त्यातूनही कोणाचे वागणे चुकले तर त्याला त्याच्या चुका दाखविण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी कृष्ण अनेक परी करीत असे. कधी रागावून, कधी त्यांची गंमत वा चेष्टा करून, तर कधी त्यांची काहीतरी खोडी काढून कृष्ण त्यांना त्यांच्या चुका दाखवून देत असे.

*****

# गोपस्त्रियांचे लज्जारक्षण

हे लक्ष्मी, एकदा असाच एक प्रसंग घडला. काही कारणाने कृष्ण भर दुपारी एकटाच यमुनेच्या तीरावरून जात होता. गोकुळातील बहुतेक स्त्रिया पाणी भरून आपापल्या घरी परतल्या होत्या. पण काही गवळणी अजूनही यमुनाकाठी रेंगाळत होत्या. त्यांचे पाण्याने भरलेले हंडे व कळशा त्यांनी काठावर ठेवल्या होत्या. तेवढ्यात एकदम त्या स्त्रियांनी आजूबाजूला कोणी नाही याचा अंदाज घेऊन आपली सर्व वस्त्रे उतरवून तेथेच काठावर ठेवली आणि त्यांनी यमुनेच्या जलात प्रवेश केला. ते दृश्य पाहून कृष्ण तर एकदम चकितच झाला आणि त्वरित एका झाडाआड लपला. तेथूनच तो त्या गोपी काय करीत आहेत हे पहात राहिला. त्या गोपींचे कृष्णाकडे मुळीच लक्ष नव्हते आणि म्हणून त्या स्वच्छंदपणे जलात स्नान करीत होत्या. कोणी पोहत होत्या. कोणी एकमेकींवर पाणी उडवून चेष्टामस्करी करीत होत्या. कोणी आपापसात नाना खेळ करून परस्परांना रिझवीत होत्या. अशा तऱ्हेने यमुनेच्या पाण्यात जलक्रीडा करणाऱ्या त्या गवळणी सर्व देहभान हरवून अगदी धुंद झाल्या होत्या.

हे लक्ष्मी, कृष्णाने त्या पूर्ण विवस्त्र अवस्थेतील गवळणींची स्वैर वृत्ती पाहिली आणि त्याला त्यांची अत्यंत काळजीच वाटली. कारण नेमका त्याचवेळी जर कोणी गोकुळातील अथवा परका पुरुष मनुष्य त्या ठिकाणी आला असता तर काय परिस्थिती निर्माण झाली असती ते सांगता येत नाही. कोणाही सामान्य पुरुषाच्या ठिकाणी ते दृश्य पाहून त्याच्या वासना निश्चितच चाळवल्या गेल्या असत्या तर त्यात काय नवल होते. लोण्याला जर आगीच्या जवळ ठेवले तर ते सहजपणे वितळणारच ना? मग त्या पुरुषांकडून त्या गवळणींची काही छेडछाड काढली गेली असती किंवा त्यांच्याकडून काही अतिप्रसंग घडला असता तर मग त्यात दोष कोणाचा होता? तो दोष सर्वस्वी त्या गवळणींकडेच गेला असता. एवढे विचार कृष्णाच्या मनात आले आणि त्याने त्या गवळणींना वेळीच सावध करावयाचे ठरवले. त्यासाठी त्यांची गंमत करूनच त्यांना चांगला धडा शिकवण्याचा निश्चय कृष्णाने केला.

सर्व गवळणी त्यांच्या त्यांच्या नादात आहेत हे पाहून कृष्ण हळूच आवाज न करता एकेक पाऊल टाकीत पुढे आला. कोणाचे लक्ष नाही असे पाहून कृष्णाने काठावर ठेवलेली गवळणींची सर्व वस्त्रे उचलली आणि पुन्हा त्या झाडावर उंच चढून लपून बसला. थोड्या वेळाने त्या गवळणींपैकी कोणाला तरी वेळेचे भान आले आणि घरी जायला आता उशीर होणार हे लक्षात आले. त्या गोपीने इतर सर्व गोपींना सावध केल्यावर त्या सर्वजणी लगबगीने नदीतून बाहेर पडून काठावर येऊ लागल्या. पाण्यातून अर्धवट बाहेर येऊन काठाकडे पहातात तो काय, तेथे एकही वस्त्र नाही. त्यांची सर्व वस्त्रे काठावरून नाहीशीच झालेली त्यांना आढळली. त्या गोपी अत्यंत घाबरल्या आणि घाईगडबडीने परत नदीत उतरून त्यांनी आपली शरीरे खांद्यापर्यंत पाण्यात बुडवून झाकून घेतली. तेथूनच त्या भिरभिरत्या नजरेने काठाकडे पाहून आपली वस्त्रे शोधू लागल्या. परंतु त्यांची वस्त्रे त्यांना कुठेच दिसेनात. हा काय चमत्कार म्हणून त्या गोपी विचार करू लागल्या. परंतु त्यांना

काहीच कळेना.  आता काय करावे या विचाराने त्या कावऱ्या बावऱ्या झाल्या.  परंतु त्यांना काहीच उपाय सुचेना.  जसा जसा वेळ जाऊ लागला तशा तशा त्या गोपी अधिक भयभीत होऊ लागल्या.  अशा वेळी त्यांचा प्रिय सखा कृष्णच त्यांना आठवला.  तोच या संकटातून आपल्याला वाचवेल अशी त्यांना खात्री होती.  पण त्या कृष्णाला आता कसे बोलवायचे? त्याला कशी हाक मारणार?  आपली ही विचित्र अवस्था कृष्णाला कळणार तरी कशी?  कोणीतरी मुद्दामच आपली वस्त्रे लपवली आहेत आणि आपल्या अवस्थेचा गैरफायदा तो घेऊ पहात आहे हेही त्यांच्या लक्षात आले आणि त्या अत्यंत व्याकुळ झाल्या.  तशा त्या असहाय्य अवस्थेत त्या गोपींनी आर्त भावाने मनातल्या मनात एकीएक कृष्णाचीच आळवणी सुरू केली.  त्या कृष्णाचाच धावा सुरू केला.

कृष्ण झाडावर बसून गोपींची ही सर्व अवस्था पहात होता.  त्यांची व्याकुळावस्था पाहून कृष्णाला दयाच आली आणि त्याचे मन द्रवले.  कारण कितीही झाले तरी आणि त्यांचे काहीही चुकले असले तरी त्या गोपी कृष्णाच्या आवडत्या सख्या होत्या.  त्यांची ती दुःखाकुल अवस्था कृष्णालाही जास्त वेळ बघवणे शक्यच नव्हते.  कृष्णाने मग आपली मुरली हातात घेऊन आपल्या ओठांवर धरली आणि त्यातून मंजूळ सुरावट तो वाजवू लागला.  मुरलीचा सूर ऐकताक्षणीच सर्व गोपी सावध झाल्या आणि त्यांच्या ठिकाणच्या आशा पल्लवीत झाल्या.  आपल्याला आधार व रक्षण देणाऱ्या कृष्णाचे अस्तित्व जवळच आहे या खात्रीने त्या गोपींचे चेहरे पुन्हा उजळले.  मुरलीच्या स्वरांच्या दिशेने पाहून त्या कृष्णाचा शोध घेऊ लागल्या.  तो एका झाडावर उंच जागी बसून मुरली वाजवणारा कृष्ण त्यांच्याकडे मिश्किल नजरेने पहाताना त्या गोपींना आढळला.  कृष्णाला पहाताच गोपींच्या जिवात जीव आला.  गोपी आधी लाजल्या खऱ्या, पण मग त्यांना ओशाळल्यासारखेही वाटू लागले.  कृष्णाने त्यांना अशा विवस्त्र अवस्थेत पहावे याची गोपींना लाजच वाटू लागली.  परंतु कृष्णाच्या निरागस व शुद्ध मनाची खात्री असलेल्या गोपींनी आपल्या मनातील संकोच थोडासा बाजूला केला आणि त्यांची वस्त्रे त्यांना परत करण्यासाठी त्या कृष्णाला विनवू लागल्या.  कृष्ण मात्र त्यांच्याकडे केवळ हसून पहातच राहिला.  तशा त्या गोपी अगदी काकुळतीला आल्या.  तेव्हा कृष्ण झाडावरून उतरून खाली येऊन गोपींच्या समोर आला आणि त्यांना उद्देशून बोलू लागला.

''हे गोपींनो, तुमची अशी केविलवाणी अवस्था पाहून मला तुमची कीवच वाटत आहे.  परंतु तुमच्या या अवस्थेला तुम्ही स्वतःच जबाबदार नाहीत का?  सर्व लौकिक व लज्जा सोडून तुम्ही ज्या तऱ्हेने पूर्ण विवस्त्र होऊन या यमुना नदीत आंघोळ करीत आहात आणि यथेच्छ डुंबत आहात, त्यावरून तुम्ही तसे एरवीही करीत असणार हे नक्की!  आता या वेळी येथे कोणाचा वावर नाही म्हणून ठीक आहे.  परंतु अचानक कोणी आले असते तर मग काहीही घडू शकले असते हे लक्षात ठेवा.  त्यातूनही कोणी गोकुळच्या बाहेरची व्यक्ती आली असती तर त्याच्यापुढे आपल्या गोकुळाचे काय विचित्र चित्र दिसले असते याचा विचार तुमच्या मनात आलाच नाही का?  तुम्ही स्त्रिया आहात, त्यामुळे तुम्हाला ज्या नैसर्गिक व सामाजिक

मर्यादा आलेल्या आहेत त्या विसरू नका. त्या मर्यादांचे पालन करणे हे तुमचे प्रथम कर्तव्यकर्म तर आहेच, पण तुमच्या सुरक्षिततेच्या दृष्टीनेही ते अत्यंत आवश्यक आहे हे नीट ध्यानात ठेवा. असल्या अयोग्य वागण्याने अडचणींना वा संकटांना आमंत्रण दिल्यासारखेच आहे. मी तुमच्याकडे ज्या दृष्टीने पहातो तसे इतर कोणीही पहाणे शक्य नाही. तुमचे हे भाग्य समजा की नेमका मीच येथे आलो. दुसरा कोणी आला असता आणि त्याने परिस्थितीचा गैरफायदा घेतला असता तर तुमची काय पंचाईत झाली असती? आणि मग त्याला कोण जबाबदार होते? तेव्हा स्वतःच्या वागण्याने स्वतःलाच व गोकुळालाही संकटात पाडू नका. एवढे केलेत तरी गोकुळावर पुष्कळ उपकार केलेत असेच मी म्हणेन.''

कृष्णाने अशा तऱ्हेने आपल्या मर्मभेदक बोलण्याने त्या गोपींची चांगली कान उघाडणी केली आणि त्यांना वेळीच सावध केले. गोपींनाही अनवधानाने त्यांच्याकडून झालेली चूक लक्षात आली. त्यांना अत्यंत वाईट वाटले आणि रडूच कोसळले. कृष्णाने त्या गोपींचे सांत्वन केले आणि अशी आगळीक पुन्हा करणार नाही असे त्यांच्याकडून वचन घेतले. त्या गोपींनीही अगदी 'कृष्णा तुझ्या गळ्याची व तुझ्या प्रेमाची शपथ' असे म्हणून कृष्णाला वचन दिले. कृष्णाने मग आपल्या हातातील गोपींची वस्त्रे तेथेच काठावर ठेवली आणि पुन्हा तो झाडाआड जाण्यासाठी वळला. गोपींना संकोच वा लाज वाटू नये हाच कृष्णाचा हेतू होता. परंतु परत फिरणाऱ्या कृष्णाला त्या गोपींनी स्वतःहूनच हाक मारली आणि कृष्णाला उद्देशून त्या म्हणाल्या,

''अरे कृष्णा, तुझे आमच्यावर फारच उपकार आहेत. आमच्या स्वच्छंद मनोवृत्तीला तू आळा घातलास आणि आमच्याकडून जो स्वैराचार कदाचित घडू शकला असता, त्यापासून तू आम्हाला दूर वळवलेस. खरे तर, आम्ही नेहमी तुझ्याच स्मरणात असतो आणि तुझ्याच अनुभवलेल्या प्रेमाच्या धुंदीत मश्गूल होऊन राहिलेल्या असतो. म्हणून काही वेळा अनवधानाने आमच्याकडून असे चुकीचे वागणे घडत असते. परंतु आमच्याकडून योग्य वागणेही घडणे आवश्यक आहे हे तू आम्हाला वेळीच सावरून लक्षात आणून दिलेस म्हणून बरे झाले. यापुढे आम्ही आमचे वागणे नेहमीच योग्य असेल याची काळजी घेऊ. कारण तेच आमच्या तुझ्यावरील प्रेमाचे सहज लक्षण आहे. त्यामुळेच आम्ही तुला प्रिय होऊ आणि तुलाच प्रिय होऊन रहाण्यासाठी तर आम्ही सर्व काही करीत असतो. तुझ्यासारखी शुद्ध प्रेमाची नजर आमच्यावर दुसऱ्या कोणाचीही असणे शक्य नाही हे अगदी खरेच आहे. पण तुझे शुद्ध प्रेम आमच्यावर असताना आम्ही वस्त्रे नेसत असताना तुला येथून मुद्दामहून दूर जावयास सांगणे आम्हाला तरी योग्य वाटत नाही. कारण तसे करणे म्हणजे तुझ्या शुद्ध प्रेमाचा अवमानच करण्यासारखे आणि तुझ्यावर अविश्वास दाखविण्यासारखेच आहे. तेव्हा आम्ही पाण्याच्या बाहेर येऊन आमची वस्त्रे नेसेपर्यंत येथेच थांबण्याचे करावेस. मुद्दामहून बाजूला जाण्याचे काहीच कारण नाही अशी आम्ही तुला अत्यंत प्रेमाने अगदी मनःपूर्वक प्रार्थना करतो.''

गोपींच्या या प्रेमळ व लडिवाळ बोलण्याने कृष्ण प्रसन्न झाला आणि अत्यंत मोकळेपणाने तो हसला. गोपींचा निरागस भाव ओळखून कृष्णाने त्यांचा प्रेमाचा हट्ट पुरवला आणि तो तेथेच गोपींना सन्मुख होऊन उभा राहिला. गोपीसुद्धा

लगबगीने बाहेर आल्या आणि आपली अंगे पुसून त्यांनी त्यांची वस्त्रे घाईघाईने नेसली. त्यांच्याकडे हसत हसत मिश्किल नजरेने पाहणाऱ्या कृष्णाकडे गोपीही तेवढ्याच प्रेमाने व मोकळेपणाने हसून बघत होत्या. त्यांची वस्त्रे नेसून झाल्यावर त्या गोपी कृष्णाच्या जवळ आल्या असता कृष्णाने प्रेमाने त्यांचे कौतुक केले आणि त्यांना त्वरित घरी जावयास सांगून तो स्वतःही त्याच्या नेहमीच्या लगबगीने राजवाड्याकडे निघाला.''

नारदाचे बोलणे लक्षपूर्वक ऐकणारी लक्ष्मी किंचित हसून मान डोलवीत म्हणाली, ''अरे नारदा, तू सांगितलेला प्रसंग जरी तसा लहानसाच असला तरी मला तो अत्यंत महत्त्वाचाही वाटतो. कृष्णाने गोपींच्या त्या थोड्याशा स्वैर वृत्तीला ज्या कौशल्याने व ज्या खंबीरपणाने वेळीच आळा घातला त्याचेच मला अत्यंत महत्त्व व कृष्णाचे कौतुक वाटते. अर्थात त्यावेळी कृष्णाचा खट्याळपणाही जरा जास्तच प्रगट झाला. परंतु तरीही मला वाटते तो प्रसंग तसा नाजूकच होता. कारण त्याचवेळी, म्हणजे तेथे कृष्ण असतानाच, जर कोणी दुसरा तिसरा तेथे आला असता तर त्याचा खुद्द कृष्णाविषयीच गैरसमज होणे अगदी सहज शक्य होते, नाही का? बरे, पाहणारी व्यक्ती काहीतरी समज करून घेते आणि काहीतरी अनुमान काढून बसते. प्रत्यक्ष काही विचारून किंवा जाणून न घेता मग अशा गोष्टी मुद्दाम पसरवल्या जातात आणि त्या गोष्टी पसरायला जराही वेळ लागत नाही. गैरसमज करून देणे व करून घेणे हा तर सामान्यांचा सहज स्वभाव असतो. या दृष्टीने कृष्णाला पुढे काही कोणी दोष वगैरे तर दिला नाही ना? मला आपली उगाचच काळजी वाटत आहे. म्हणून मी आपली तुला विचारून खात्री करून घेत आहे.''

लक्ष्मीच्या बोलण्यातील योग्य काळजीचा विचार पाहून नारदाला लक्ष्मीचे कौतुक वाटले आणि तो तिला म्हणाला, ''हे लक्ष्मी, तुला वाटलेली काळजी अगदी बरोबरच आहे. कारण नेमके झालेही तसेच. कोणीतरी त्याचवेळी कृष्ण व गोपी यांच्या नकळत येऊन गेला असावा आणि त्याने त्याच्या झालेल्या गैरसमजुतीप्रमाणे गोकुळात वाच्यता केली असावी. किंवा एखादे वेळेस त्या गोपींपैकीच एखाद्या गोपीने उत्साहाच्या भरात कोणाला तरी सांगितले असावे. परंतु या गोष्टीचा गोकुळात मोठा गाजावाजा झाला. कृष्णानेच यमुनाकाठी काही गोपींची छेडछाड काढली आणि त्यांच्याशी असभ्य वर्तन केले अशीच जिकडे तिकडे कुजबुज सुरू झाली. त्या गोपींच्या घरच्या मंडळींनीही ती गोष्ट अत्यंत गंभीरपणे घेतली आणि खुद्द नंदाकडे जाऊन कृष्णाविरूद्ध तक्रार केली. नंदालाही ते ऐकून धक्काच बसला. त्याचा त्याच्या कानावर विश्वासच बसेना. मग त्याने प्रत्यक्ष कृष्णालाच बोलावून घेतले आणि त्याच्याकडे विचारणा केली. कृष्णाने आधी त्या सर्व गोपींना नंदाच्या वाड्यावर बोलावून घेतले आणि त्यांच्या समक्षच जे काही घडले, जे काही कृष्णाने पाहिले, जे काही कृष्णाने केले व का केले हे सर्व सविस्तरपणे नंदाला समजावून सांगितले. सर्व गोपींनीही कृष्णाच्या सांगण्याला दुजोरा दिला. त्याने नंदाचे पूर्ण समाधान झाले. नंदाने मग त्या गोपींना यापुढे नीट काळजीपूर्वक वागण्यासाठी बजावले आणि कृष्णाच्या समजूतदारपणाचे कौतुकही केले. परंतु त्याच बरोबर नंदाने कृष्णाला त्याच्या खट्याळ व खोडकर स्वभावालाही आवर घालायला सांगितले. कारण कृष्णाच्या याच स्वभावामुळे त्याच्याविषयी संशय व शंका घेण्याची संधी लोकांना मिळते हे नंद जाणून होता. तेव्हा

तशी संधीच कृष्णाने कोणालाही देऊ नये हाच नंदाचा उद्देश होता आणि नंदाच्या दृष्टीने त्याचे सांगणे बरोबरच होते. पण तरीही कृष्णाचा मूळ स्वभाव काही बदलला नाही, तर तो तसाच कायम राहिला हेही खरेच आहे.

हे लक्ष्मी, कृष्णाच्या चरित्रातील या प्रसंगाविषयी त्यावेळी गोकुळात निंदा झाली यात काहीच नवल नाही. पुढे कृष्ण चरित्र घडून गेल्यावरती हजारो वर्षे सुद्धा हा 'गोपीवस्त्रहरणाचा प्रसंग' अनेकांच्या टीकेचा व निंदेचा विषय झाला. ज्यांची स्वतःची मने विषय वासनेने अशुद्ध झालेली आहेत आणि ज्यांच्याकडे केवळ चिकित्सक बुद्धी आहे, अशा अनेक बुद्धिवाद्यांना या प्रसंगात अश्लीलता दिसली आणि त्यांनी कृष्णाची निंदा करून त्याच्यावर टीकेची झोड उठवली. काही भाबड्या भाविकांनी मात्र ही कृष्णाची लीला आहे असे म्हणून कृष्णाच्या वागण्याचे जोरदार समर्थन करण्याचा केविलवाणा प्रयत्न केला आणि कृष्णवरील टीकेकडे कानाडोळा केला. परंतु या कृष्णचरित्रातील प्रसंगातील कृष्णाचे अंतःकरण मात्र फक्त सद्भक्तांनीच जाणले आणि त्या कृष्णचरित्राचा खरा आनंद अनुभवला. ज्याचे अंतःकरण विशुद्ध असल्यामुळे ज्याच्या ठिकाणी पूर्ण आत्मविश्वास आहे अशा कृष्णाला मात्र ना कोणाच्या निंदेची वा टीकेची पर्वा होती, ना कोणाच्या पाठिंब्याची वा समर्थनाची जरुरी होती. कृष्ण त्याच्या आत्मानंदात नित्यच रमलेला असे. हेच कृष्णाचे विशेषत्व होते आणि तेच त्याचे माहात्म्यही होते.

हे लक्ष्मी, आणखीन एक असाच प्रसंग काही गवळणींच्या बाबतीत घडला. गोकुळातील दूध, दही, लोणी इत्यादी पदार्थ मथुरेच्या बाजारात विकण्यासाठी पाठवले जात. मुळात घरच्या मुलाबाळांची आबाळ करून केवळ धन मिळविण्याच्या हेतूने या पदार्थांची विक्री करणे हेच कृष्णाला मानवत नव्हते. त्यातूनही ते पदार्थ मथुरेच्या बाजारात विक्रीसाठी पाठवणे याला तर कृष्णाचा सक्त विरोधच होता. कारण मथुरेचा अधिपती कंस याच्या जुलमी सत्तेची झळ गोकुळवासीयांनाही लागत असे. कंसाचे सैनिक गोकुळातील लोकांना काहीतरी त्रास देण्याची संधी कधीही सोडत नसत. त्यामुळे गोकुळातील लोकांना नेहमी कंसाच्या दबावाखाली रहावे लागत असे. अशा परिस्थितीत आपण मथुरेच्या बाजारात आपले दूध, दही, लोणी यासारखे पदार्थ पाठवणे हे गैरच आहे असे कृष्णाचे स्पष्ट मत होते.

आणखीन एक गोष्ट होती की गोकुळातील गोप मुद्दामच आपल्या स्त्रियांना किंवा मुलीबाळींना हे पदार्थ घेऊन मथुरेच्या बाजारात पाठवत असत. त्यामुळे त्यांच्या पदार्थांना अधिक भाव मिळावा हा त्यामागील त्यांचा अंतःस्थ हेतू असे. त्याहीपेक्षा नवल म्हणजे त्या गवळणीही मुद्दामहून चांगल्या नटून थटून मथुरेच्या बाजाराला जात असत. त्यामुळे त्यांच्याकडे बघून मथुरेतील लोक आकर्षित होत आणि त्यांच्याकडील पदार्थ जास्त भावाने खरेदी करीत. बाजारात फिरणारे कंसाचे सैनिक किंवा इतर वाईट दृष्टीने पहाणारे लोकही बऱ्याच वेळा त्या गवळणींची चेष्टा करून त्यांची छेडछाडही काढीत असत. पण गवळणी बिचाऱ्या ते सर्व सहन करीत असत. कारण त्यांचे लक्ष मिळणाऱ्या जास्त धनाकडे असे. त्याहीपेक्षा नवलाईची गोष्ट म्हणजे काही गवळणींना तर अशी थट्टा मस्करी आवडतही असे.

या सर्व गोष्टी जेव्हा कृष्णाला कळल्या तेव्हा तर त्याचा राग अनावरच झाला. कृष्णाने मग हे सर्व ताबडतोब नंदाच्या कानावर घातले आणि ते प्रकार त्वरित थांबवण्याची मागणी नंदाकडे केली. नंद तर हे सर्व ऐकून चकित व अत्यंत व्यथित झाला. त्याने सर्व गोपांना बोलावून घेतले आणि हे सर्व व्यवहार त्वरित थांबवण्यास सांगितले. या बाबतीत ज्याने त्याने स्वतःच स्वतःला शिस्त लावून घ्यावी आणि या गोष्टी बंद कराव्यात, 'आपल्या स्त्रियांच्या अब्रूपुढे त्या धनाची किंमत काहीच नाही' असेही नंदाने सर्वांना निक्षून सांगितले. सर्वांनीच नंदाच्या बोलण्याला संमती दिली आणि मथुरेशी होणारे सर्व व्यवहार थांबवण्याचे आश्वासनही दिले.

हे लक्ष्मी, अशा तऱ्हेने नंदाच्या सांगण्यानुसार गोकुळाचे दूध, दही व लोणी असे पदार्थ मथुरेच्या बाजारात न पाठवण्याचे सर्वांच्या संमतीनुसार ठरले होते खरे. परंतु त्यातीलच काहीजणांना धनाचा मोह आवरेनासा झाला. जवळच्याच दुसऱ्या कुठल्या तरी गावात हे पदार्थ पाठवत आहोत असे सांगून व दाखवून कोणाच्याही नकळत ते पदार्थ मथुरेच्याच बाजारात जाऊ लागले. काही गवळणींनाही नटून थटून मथुरेच्या बाजारात जाण्याची आणि मिळालेल्या पैशातून तेथेच छानछौकीच्या वस्तू खरेदी करण्याची चटक लागलेली होती. त्यांनाही आता चैन पडेनासे झाले. त्यामुळे त्यांनीही हळुहळू चोरून मारून मथुरेच्या बाजाराला जाण्यासाठी पुन्हा सुरुवात केली. परंतु हे सर्व चोरटे व्यवहार कृष्णाच्या दृष्टीस पडल्याशिवाय राहिले नाहीत. मग मात्र कृष्णाला रागाबरोबरच अत्यंत वाईटही वाटले. परंतु गोकुळच्या हितासाठी कृष्णाने या सर्व गोष्टी थांबवायच्या ठरवल्या. त्याचबरोबर असे चोरून व्यवहार करणाऱ्यांना चांगली अद्दल घडवावी याही हेतूने कृष्णाने एक बेत आखला.

मथुरेकडे चोरून दूधदुभते नेणाऱ्या गवळणींवर कृष्णाने आपल्या सवंगड्यांच्या मदतीने आधी पाळत ठेवली आणि एक दिवस त्याने त्या गवळणींना आपल्या सोबत्यांसह वाटेतच गाठले. कृष्णाला अचानक त्या ठिकाणी आलेला पाहून त्या गवळणी आधी बावरल्या आणि मग घाबरल्याही. परंतु वरकरणी तसे न दाखवता त्या कृष्णाकडे लक्ष न देताच वाटेने पुढे जाऊ लागल्या. तेव्हा मात्र कृष्णाने आपल्या सवंगड्यांसह त्या गवळणींची वाट अडवून ठेवली आणि त्यांना पुढे जाण्यास मज्जाव केला. कृष्णाने त्या गवळणींना जरा खडसावूनच 'कुठे चाललात आणि या तुमच्या डोक्यावरच्या मडक्यांमध्ये काय आहे?' असे विचारले, तर त्या गवळणींनी प्रथम तर काहीही सांगण्यास नकारच दिला. परंतु त्यांच्या घाबऱ्या घुबऱ्या झालेल्या चेहऱ्यावरून तर त्यांची चोरी लपून रहातच नव्हती. 'आम्ही जवळच्याच दुसऱ्या गावाकडे जात आहोत' असे काहीतरी थातुर मातुर बोलून त्यांनी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला खरा, परंतु कृष्णापुढे त्यांचे काहीच चालले नाही. 'आमच्या मडक्यात दूध, दही वगैरे असे काहीच नाही' असेही त्या गवळणी जेव्हा खोटेच म्हणू लागल्या, तेव्हा कृष्णाने त्यांना ती मडकी उघडून दाखवावयास सांगितली. त्याला त्या गवळणी नकार देऊ लागल्या असता, कृष्णाच्या काही उत्साही सवंगड्यांनी गवळणींच्या डोक्यावरची मडकी बळे बळे उतरवण्याचा प्रयत्न केला. त्या गडबडीतच ती मडकी खाली पडून फुटली आणि त्या गवळणी दुधाने पूर्ण भिजून अगदी चिंब झाल्या. गवळणींचा खोटेपणा जसा पूर्णपणे उघडकीस आला तशा त्या त्याच अवस्थेत गोकुळाकडे धावत धावत परत गेल्या.

हे लक्ष्मी, या घडलेल्या प्रसंगात तर कृष्णाची काहीच चूक नव्हती. पण तरीही त्याच्यावरील टीकेला तोंड देण्याची पाळी नेहमीप्रमाणेच पुन्हा कृष्णावरती आली. कारण त्या गवळणींनी व त्यांच्या घरच्यांनी आपला खोटेपणा लपवण्यासाठी उलट कृष्णावरतीच हेत्वारोप केले. 'आमच्या स्त्रियांना कृष्णाने भर रस्त्यात अडवून त्यांची मडकी फोडण्याचा खोडसाळपणा केला' असा कांगावा त्यांनी कृष्णाविरूद्ध सुरू केला. एवढेच नव्हे, तर नंदाकडे जाऊन कृष्णाविरूद्धच तक्रार केली. नंदाने कृष्णाला प्रत्यक्ष बोलावून घेतल्यावर कृष्णानेही त्या गवळणींना त्या ठिकाणी बोलावून घेतले. नंदाच्या व कृष्णाच्या प्रत्यक्ष समोर मात्र त्यांना खोटे बोलता येईना. डोळ्यात पाणी आणून त्यांनी आपली चूक कबूल केली आणि पुन्हा तसे न वागण्याचे आश्वासनही दिले. कृष्णाला झालेल्या त्रासाबद्दल गवळणी कृष्णाची जेव्हा क्षमा मागू लागल्या, तेव्हा मात्र कृष्ण त्या गवळणींना उद्देशून बोलू लागला.

''हे गवळणींनो, माझ्या ठिकाणी तुमच्याविषयी कोणताही राग नाही. परंतु तुम्ही एक गोष्ट नीट लक्षात ठेवा, की तुम्ही स्त्रिया आहात आणि त्या मर्यादेमध्ये रहाण्यातच तुमचे हित आहे. केवळ धन प्राप्तीसाठी तुम्ही तुमच्या स्त्रीत्वाचा उपयोग करणे किंवा दुसऱ्या कोणाला तसे करू देणे हे अत्यंत गैरच आहे. तुम्हाला स्त्रीत्व ईश्वराने यासाठी दिलेले नाही. तुमचे स्त्रीत्व हे केवळ तुमच्या पतीच्या व मुलाबाळांच्या सेवेसाठीच आहे. या मर्यादा म्हणजे तुमच्यासाठी फक्त बंधनच नाही, तर ते तुमच्यासाठी एक संरक्षक असे कवच आहे. त्यामुळेच तुम्ही परपुरुषांपासून दूर रहाल आणि त्यांच्या वाईट नजरेपासून बचावाल. केवळ बाह्यसुखाच्या अभिलाषेने स्वतःचे स्वत्व गमावू नका. आपले चारित्र्य व शील याचे रक्षण तुम्ही स्वतःच करायचे आहे. असे तुमचे वागणे घडेल तरच तुम्ही माझ्या प्रेमाला पात्र व्हाल. माझ्या प्रेमानेच असे वागण्याचे मनोबळ तुम्हाला प्राप्त होईल. तुमच्या अशा योग्य आचरणानेच तुम्ही मला खऱ्या अर्थाने प्रिय व्हाल. तेव्हा यापुढे मनाची कुठलीही दुर्बलता न ठेवता सबळ होऊन आपले जीवन जगा.''

कृष्णाच्या अशा बोलण्याने त्या गवळणींचे मन अत्यंत भरून आले. कृष्णाच्या ठिकाणी आपल्याविषयी किती आपलेपणा व काळजी आहे हे पाहून व जाणून त्यांना गहिवरच आला. त्या पुढे आल्या आणि नंदाच्या समक्षच त्यांनी कृष्णाचा हात आपल्या हातात घेऊन त्याला वचन दिले की 'कृष्णा यापुढे आम्ही कधीही चुकीच्या मार्गाने जाणार नाही. फक्त तुझ्याच मार्गदर्शनानुसार आमचे जीवन जगू आणि तुझ्याच प्रेमस्मरणात नित्य राहू.' गवळणींच्या त्या बोलण्याने कृष्णाला संतोष झाला आणि नंदालाही समाधान वाटले.

हे लक्ष्मी, परंतु पुढे पुढे मात्र काही काही स्त्रियांच्या वागण्या बोलण्यात फरक पडू लागला आणि तसा तो जाणवूही लागला. सुरुवातीचा उत्साह त्यांच्यात राहिला नाही आणि त्यांच्या वागण्यातील मोकळेपणाही हळुहळू कमी होऊ लागला. याला कारण म्हणजे काहीजणींचा तसा स्वभावच होता, तर काही जणींच्या बाबतीत त्यांची परिस्थिती कारण होती. ज्यांचा स्वभावच चंचल वा धर-सोड वृत्तीचा होता त्यांच्या मनाची हळुहळू द्विधा स्थिती होऊ लागली. सुरुवातीला कृष्णाच्या प्रेमाचे सुख अनुभवले खरे, परंतु जेव्हा तो लोकांच्या टीकेचा व चर्चेचा विषय होऊ लागला, तेव्हा मग त्यांचे मन डळमळू

लागले. आपले वागणे बरोबर आहे किंवा नाही याची शंका त्यांच्या स्वतःच्याच मनात येऊ लागली. मनाच्या या अशा दुर्बलतेमुळे घरच्यांचीही नाराजी ओढवून घेणे त्यांना झेपले नाही. आपण बरे नि आपले कुटुंब बरे असा स्वतःच्या सोयीचा विचार करून त्यांनी कृष्णाच्या घरी येण्याचे आपणहूनच कमी केले. काही विशेष कारणाने येणे घडत असे तेवढेच. आणि तेव्हाही त्यांचे वागणे औपचारिकच असे. पूर्वीचा मोकळेपणा त्यांच्या ठिकाणी राहिला नाही.

कृष्णाच्याही ते लक्षात आल्यावाचून राहिले नाही. त्याने त्या गोपींना पुन्हा पुन्हा विचारून पाहिले. परंतु जेव्हा त्यांच्याकडून हवा तसा प्रतिसाद मिळाला नाही तेव्हा कृष्णही मग स्वस्थच बसला. तरीही त्याच्या ठिकाणी त्या गोपींविषयीचा आपलेपणा मात्र कायम राहिला. जेव्हा त्या गोपी कृष्णाच्या घरी येत असत किंवा केव्हातरी त्याच्या समोर येत असत तेव्हा कृष्ण त्यांची सर्व विचारपूस करी आणि त्यांच्याशी पूर्वीच्याच मोकळेपणाने बोलत असे. अर्थात कृष्णाच्याही वागण्यात मात्र पूर्वीसारखा मोकळेपणा साहजिकच राहिला नाही.

हे लक्ष्मी, काही स्त्रियांनी मात्र त्यांच्या सोयीप्रमाणे भूमिका घेतली. कृष्णाकडून मिळणारे प्रेम व सुख त्यांना सहजगत्या मिळाले तर पाहिजेच होते आणि तसे त्या घेतही होत्या. त्याचे फायदे त्यांना जरूर हवे होते, परंतु त्यासाठी लागणारी कुठलीही तोशीस मात्र त्यांना नको होती. त्यामुळे जेव्हा कृष्णाला दोष दिला जाऊ लागला आणि त्या गोपींवर टीका होऊ लागली, तेव्हा मात्र त्यांनी आपला पवित्रा अचानक व एकदम बदलला. कुटुंबीयांच्या रोषापासून स्वतःला वाचविण्यासाठी त्यांनी असा कांगावा करावयास सुरुवात केली, की त्या कृष्णाला भेटायला मनापासून जातच नव्हत्या. त्यांना तर ते पसंतच नव्हते. परंतु कृष्णच पुढाकार घेऊन त्यांना बोलावून घेत असल्यामुळे त्यांचा नाइलाज होत असे. नाही म्हटले तरी त्यांच्यावर कृष्णाचे दडपणच येत असे. कारण कृष्ण हा नंद व यशोदेचा मुलगा आहे याची त्यांना जाणीव होती. अशी कातडी बचावू व सोयीस्कर भूमिका घेऊन या गोपी नंदाच्या घरी कृष्ण भेटीसाठी येईनाशा झाल्या.

या गोपींच्या अशा वागण्याचे कृष्णाला थोडेसे नवल वाटले, पण वाईट मात्र जास्त वाटले. परंतु त्यांच्या मनाची अवस्था ओळखून व समजून कृष्ण स्वस्थच राहिला. त्यांच्याशी बोलून त्यांची काही समजूत काढावी असा विचारही कृष्णाच्या मनात आला नाही. कारण तशा बोलण्याचा त्यांच्यावर काहीही परिणाम होणार नाही याची कृष्णाला पक्की खात्री होती. 'ज्यांनी मनाची कवाडे जाणून बुजून व स्वतःहूनच बंद करून घेतली आहेत त्यांना काही समजावून सांगणे म्हणजे पालथ्या घड्यावर पाणी ओतण्यासारखे आहे' याची कृष्णाला जाणीव होती. त्यामुळे कृष्णाने अशा गोपींकडे त्यांच्या मनाची कुवत ओळखून दुर्लक्षच केले.

हे लक्ष्मी, काही गोपी मात्र खरेच प्रेमळ व मनाने सरळ होत्या. कृष्णाच्या प्रेमातील आपलेपणा व सच्चेपणा त्यांना जाणवला होता. या कृष्णाचे प्रेम सांसारिक प्रेमापेक्षा अगदी वेगळे आहे हे त्यांच्या लक्षात आले होते. कृष्णाच्या प्रेमाने त्यांचे मनही मोकळे होत असे. संसारामुळे निर्माण होणारे मनातील सर्व ताण तणाव कृष्णाच्या सहवासात सैल होतात, कृष्णाशी बोलण्याने संसारातील मनाचे क्लेश हलके होतात आणि दुःख सुसह्य होते हा तर प्रत्यक्ष त्यांचा स्वतःचा अनुभव

होता.  त्यामुळे त्यांच्या ठिकाणीही कृष्णाविषयी प्रेमाची भावना निश्चितपणे निर्माण झालेली होती.  परंतु मनाच्या भावनात्मक अवस्थेमुळे या गोपी मनाने दुर्बलच राहिल्या होत्या.  घरच्यांच्या रागाला व बाहेरच्यांच्या टीकेला कायम तोंड देणे त्यांना शक्य होत नसे.  त्याहूनही कृष्णाला जी लोकांची निंदा सहन करावी लागत असे त्याचा त्या गोपींना जास्त त्रास होई. कृष्णाच्या त्रासाला आपणही कारणीभूत होत आहोत या विचाराने त्या गोपींच्या मनाला अधिकच दुःख होई.  कृष्णावरील प्रेमामुळे कृष्णावर होणारे आरोप त्या गोपींना मुळीच सहन होत नसत.

तेव्हा 'आपल्यामुळे कृष्णाचा त्रास वाढू नये आणि कृष्णाच्या होणाऱ्या अवमानाला आपण कारणीभूत होऊ नये' हा विचार त्या गोपींच्याठायी प्रबल झाला.  म्हणून त्यांनी कृष्णाच्या भेटीस येण्याचे स्वतःहूनच थांबवले.  परंतु कृष्णाविषयीचे प्रेम व मुख्य म्हणजे कृतज्ञता त्यांनी आपल्या मनात कायमची राखून ठेवली.  अशा गोपींची समजूत घालण्याचा प्रयत्न मात्र कृष्णाने आपणहून केला.  त्यांची भेट स्वतःहून घेऊन कृष्णाने या गोपींना पुन्हा पुन्हा समजावून सांगितले की 'त्या गोपींनी कृष्णाची काळजी करण्याचे काहीच कारण नाही.  अशा निंदेला तोंड देण्याचे कृष्णाचे सामर्थ्य आहे याची खात्री गोपींनी बाळगावी आणि अशा गोष्टींकडे त्यांनी दुर्लक्षच करावे.  कृष्ण जर अशा गोष्टींना महत्त्व न देता त्यांच्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतो तर गोपींनीही अशा गोष्टींना महत्त्व देऊ नये व त्याकडे लक्ष देऊ नये.  गोपींनीही स्वतःच्या मनाशी प्रामाणिक राहून कृष्णाशी प्रेमाचे व आपलेपणाचे संबंध कायम ठेवावेत.'  कृष्णाचे हे प्रेमाचे सांगणे त्या गोपींच्याही मनाला पूर्णपणे पटले. कारण त्या म्हणण्यातील खरेपणा त्या स्वानुभवाने जाणून होत्या.  परंतु त्यांना तसे वागण्याचे धैर्य मात्र झाले नाही.  म्हणून त्यांनी कृष्णाची तशी विनवणी केली आणि कृष्णाचा प्रेमाने निरोप घेऊन त्या गोपी आपल्या घरीच स्वस्थ बसून राहिल्या. पण त्यांच्या ठिकाणी कृष्णाविषयीचा कृतज्ञताभाव आणि कृष्णाचे प्रेमस्मरण मात्र सततचे असे.  त्याचा परिणाम असा झाला की त्या गोपींना संसारात राहूनही सांसारिक दुःखाची झळ कधीच पोहोचली नाही.  त्याचबरोबर संसारात सुखाची अपेक्षा न करता, प्राप्त संसार त्या सुखासमाधानाने करीत राहिल्या.

हे लक्ष्मी, परंतु काही गोपी मात्र कृष्णाच्या प्रेमाने निश्चितच सबळ झाल्या होत्या.  कृष्णाच्या सहवासाचे व प्रेमाचे खरे मूल्य त्यांना खरोखरीच कळले होते.  भाग्याने मिळालेले कृष्णप्रेम हा त्यांचा अमूल्य ठेवा होता आणि त्यामुळेच तो प्रेमठेवा प्राप्त करून घेण्यासाठी कोणतेही मूल्य मोजण्याची त्यांच्या मनाची तयारी अगदी सहजपणे झालेली होती.  त्यांनी लोकांच्या टीकेकडे व निंदेकडे तर दुर्लक्ष केलेच, परंतु घरच्यांच्याही विरोधाला व रोषाला दाद दिली नाही.  वेळप्रसंगी घरच्यांनी केलेला शारीरिक वा मानसिक छळ सहन करूनही त्या कृष्णभेटीची संधी साधीत राहिल्या.  त्यासाठी त्यांनी नाना प्रकारच्या युक्त्या प्रयुक्त्याही केल्या.  परंतु कृष्णाला कधीच अंतर दिले नाही, कारण त्यांचे अंतर कृष्णप्रेमाने पूर्णपणे भरलेले होते.  त्यामुळे कृष्णावर आलेला कठीण प्रसंग ओळखून त्या कृष्णाच्या बरोबर ठामपणे उभ्या राहिल्या.  कृष्णाला सोडून जाण्याचा विचारही त्यांच्या मनाला थोडासुद्धा स्पर्श करू शकला नाही.  त्या गोपी जाणून होत्या की अशावेळी कृष्णापासून आपण दूर जाणे म्हणजे त्याच्या निंदकांनाच अधिक प्रोत्साहन देण्यासारखे आहे.  म्हणूनच कृष्णाला त्यांनी एकटे तर पडू दिले नाहीच, परंतु कृष्णावरील टीकेचा रोख त्यांनी आपल्याकडे वळवून घेतला आणि त्या टीकेला चोख उत्तरही दिले.

कृष्णाच्या शुद्ध प्रेमाची त्यांनी सर्वांना ग्वाही दिली आणि त्यांच्या ठिकाणी कृष्णाविषयी असलेल्या प्रेमाची कबुलीही त्यांनी निःसंकोचपणे दिली. कृष्णाविषयी असलेली प्रेमाची भावना ही मुळात आमची आहे आणि त्या भावनेचा कृष्ण केवळ स्वीकार करतो. खरे तर, हे कृष्णाचे आमच्यावरील उपकारच आहेत असे त्या गोपींनी सर्वांना ठणकावून सांगितले आणि घडलेल्या गोष्टींची आपली जबाबदारी त्यांनी मोठ्या धैर्याने स्वीकारली. कृष्णाच्या प्रेमाने त्या केवळ जगल्याच नाहीत, तर त्या प्रेमाला त्या गोपी खऱ्या अर्थाने जागल्याही. हेच अत्यंत महत्त्वाचे होते. कारण कृष्णाच्या प्रेमाला त्या पात्र ठरल्याचेच ते लक्षण होते. साहजिकच कृष्णाच्या ठिकाणी त्या गोपींविषयी आत्यंतिक कौतुक व सार्थ अभिमान भरून राहिला होता.''

नारदाचे बोलणे ऐकता ऐकता अधिकाधिक विस्मय पावत असलेली लक्ष्मी शेवटी न राहवून नारदाच्या वचनौघाला आवर घालीत बोलू लागली,

''हे नारदा, तुझी अगदी कमालच आहे. कृष्णचरित्रातील हा महत्त्वाचा व गंभीर विषय तू किती स्पष्टपणे व मोकळेपणाने सांगत आहेस. कापूस पिंजून काढल्यासारखे जे तू गोपींच्या मनाचे अगदी बारीक धागे नि धागे मोठ्या नाजूकपणे व कौशल्याने वेगळे वेगळे करून दाखवत आहेस ना, ते तर केवळ अलौकिकच आहे. कारण प्रेम व मन हे दोन्हीही विषयच मुळात नाजूक आहेत. परंतु मन हे दुर्बल आहे, तर खरे प्रेम हे अत्यंत सबळ आहे. तेव्हा एखाद्याचे मन त्या प्रेमामुळेच सबळ होऊ शकेल हे तर सत्यच आहे. परंतु त्या मनामध्ये प्रेमाचा शिरकाव झाल्यापासून ते मन पूर्णपणे प्रेमाने युक्त होईपर्यंतचा हा प्रेमाचा प्रवासच महत्त्वाचा व अभ्यसनीय आहे. कारण मनाची दुर्बलता ही त्यातील अशुद्धपणामुळेच असते हेही खरेच आहे. मनाच्या शुद्धीकरणाची ही जी प्रक्रिया आहे तीच अगदी कठीणही आहे आणि अत्यंत आवश्यकही आहे. या प्रक्रियेतील मनाच्या वेगवेगळ्या अवस्था जणू तू त्या त्या वेगवेगळ्या अवस्थेतील गोपींच्या रूपकाद्वारे वर्णन करून दाखवत आहेस हे माझ्या पूर्णपणे लक्षात आले आहे. तेव्हा ज्या गोपी कृष्णाच्या प्रेमाने सबळ होऊन राहिल्या आणि ज्यांनी कृष्णाची पाठराखण करून त्याची साथ धरून ठेवली त्या गोपी निश्चितच कौतुकास पात्र आहेत. कारण प्रेमाच्या सर्व लक्षणांनी त्या युक्त होऊन राहिल्या. अर्थात हे माहात्म्य कृष्णाच्या प्रेमाचेच आहे हे निःसंशय. परंतु त्या गोपीही निश्चितपणे अभिनंदनास पात्र आहेत.

हे नारदा, परंतु प्रेमाची अवस्था हीच अंतिम होती का? हीच त्या गोपींकडून घडणारी भक्ती होती का? आणखीन एक प्रश्न माझ्या मनात अंधुकपणे येत आहे. कृष्णाचे प्रेम अगदी शुद्ध होते. त्यामध्ये कोणत्याही वासनात्मक सुखाचा लवलेश नव्हता हे तर सत्यच आहे. कारण कृष्णाचे अंतःकरण परमशुद्ध होते. परंतु त्याच्या सहवासामध्ये आलेल्या सर्वच गोपींची मने शुद्ध होती का? तसे असणे तर शक्यच नाही. कारण कृष्णाच्या अंतःकरणासारखे त्यांचे मन शुद्ध नसणारच. बरे, तू म्हणतोस तसे कृष्णही त्या वयात अगदी तरणाबांड व राजबिंडा दिसत होता. त्याच्या ठिकाणी अलौकिक असे गुणही होते. मग त्या गोपींच्या मनात कृष्णाच्या रूपगुणामुळे त्याच्याविषयी मोह व सुखाची वासना निर्माण होणे शक्य नव्हते का? मला तर वाटते की तसे गोपींच्या बाबतीत अगदी सहज शक्य होते. त्यामुळे कृष्णाकडे केवळ सुखाच्या अपेक्षेने त्या गोपी

बघत असल्यास नवल नाही. मुख्य म्हणजे हे सर्व तर कृष्णाच्याही सहज लक्षात आले असणारच. मग तरीही जाणून बुजून त्याने त्या गोपींच्या अशुद्ध प्रेमाचा स्वीकार केला की काय? तसे जर असेल तर कृष्णाला बोल हा लागणारच. त्यामुळे असा बोल लावणाऱ्यांना जराही दोष देता येणार नाही. अरे नारदा, तेव्हा तू अगदी मोकळेपणाने मला सर्व खरे खरे ते सांग आणि माझ्या मनातील या अस्पष्ट शंकेचे लागलीच निरसन कर.''

*****



# वासनात्मक प्रेमातून ईश्वरी प्रेमाकडे

लक्ष्मीच्या बोलण्यावर किंचित स्मित करून नारद म्हणाला, ''हे लक्ष्मी, तुझ्या ठिकाणची अस्पष्ट शंका मला तरी अगदी स्पष्ट दिसत आहे. सर्वसामान्यांना अशी शंका येणे अगदी साहजिकच आहे. कारण त्यांची मुळातील दृष्टीच वासनायुक्त म्हणून दोषास्पद असते. परंतु तुझ्या ठिकाणी अस्पष्ट का होईना पण अशी शंका यावी याचे मला मात्र नवल वाटते. तेव्हा कृष्णाच्या विशुद्ध प्रेमाने भरलेल्या अंतःकरणालाच प्रमाण मानून तू या गोष्टींकडे पाहशील तर तुझी हीच काय, सर्वच शंका त्या कृष्णप्रेमात विरघळून जातील हे निश्चित!

हे लक्ष्मी, तुझ्या म्हणण्याप्रमाणे काही गोपींच्या ठिकाणी त्यांच्या अशुद्ध मनामुळे कृष्णाविषयी वासनात्मक सुखाची दृष्टी असेलही. तशी शक्यता अगदीच नाकारताही येत नाही. कारण संसारात प्रेम काय, खरे सुखही न मिळाल्यामुळे त्या गोपींच्या ठिकाणी त्या सुखाची भूक राहिलेली असणारच. त्यामुळे कृष्णासारखी रूपवान व गुणवान व्यक्ती पाहिल्यावर त्या गोपींची मने कृष्णाकडे आकर्षिली जाणे आणि त्यांनी कृष्णाकडे त्या सुखाच्या अपेक्षेने पहाणे अगदी नैसर्गिक व साहजिकच होते. आता जी गोष्ट आपल्याला येथे बसून लक्षात येत आहे, ती गोष्ट कृष्णाला त्यावेळेस तेथे लक्षात आली नसणार काय? तर निश्चितच आली असणार. पण तरीही कृष्णाने त्यांच्या वासनात्मक प्रेमभावनेचाही स्वीकार जाणून बुजून केला आणि त्या गोपींना त्यांच्या अपेक्षेप्रमाणे सुखवलेसुद्धा! कारण हेच तर कृष्णचरित्राचे विशेषत्व होते.

सामान्यातील सामान्याला सुद्धा जवळ करून त्याला जवळीकतेची संधी देणे हाच तर कृष्णाच्या असामान्य चरित्राचा मुलभूत पाया होता. त्यामुळेच तर सामान्यालाही त्याच्या सामान्य अवस्थेतून वर येण्याची संधी प्राप्त होत होती. यातच तर असामान्यांचे असामान्यत्व सामावलेले असते. सामान्यांवरील प्रेमामुळे, सामान्यांच्या संगतीत ते कधी जरी त्यांच्यासाठी सामान्य पातळीवर आलेले दिसले, तरी त्यांची असामान्य अवस्था मात्र अभंग असते. कारण क्षणार्धात ते आपल्या मूळ अवस्थेला प्राप्त होतात. त्यातूनच सामान्य अवस्थेतील जनांच्या उद्धाराची शक्यता निर्माण होते. सामान्यांनी आपला उद्धार करून घेतला तर उत्तमच आणि नाही केला तर एक गोष्ट मात्र निश्चित, की त्यात त्यांचे नुकसान तरी नक्कीच होत नाही. उलट त्यांच्यातील अशुद्धतेला बसला तर आळाच बसतो आणि त्यांची अधोगती टळते.

हे लक्ष्मी, सुख जेव्हा केवळ देहाच्या पातळीवरच भोगले जाते तेव्हा त्याला सुखाची वासना म्हणतात. परंतु त्या सुखामध्ये दुसऱ्याच्या मनातील भावनांचाही व दुसऱ्याच्या सुखाचाही विचार यायला लागतो, तेव्हा ते सुख वासनेकडून प्रेमाच्या भावनेकडे वळू लागते. अर्थात प्रेमाच्या भावनेच्या पूर्तीलाही देहाच्या माध्यमाची जरुरी लागतेच. मात्र येथेच मनाच्या शुद्धीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात होते. नेमकी याच प्रक्रियेची सुरुवात गोपींच्या ठिकाणी कृष्णप्रेमामुळे झाली. त्यांच्या ठिकाणच्या सुखाच्या भावनेची पूर्ती कृष्णाच्या विशुद्ध प्रेमामुळे होता होता, त्यांच्या सुखाच्या वासनेचे शमन होऊ लागले आणि त्यांच्या ठिकाणी प्रेमाची भावना हळुहळू निर्माण होऊ लागली. एरव्ही जेव्हा वासनात्मक सुखाला वासनात्मक

सुखाचीच जोड मिळते, तेव्हा आगीत टाकलेल्या तेलामुळे जशी आग अधिकच भडकते, तशा वासना अधिकच उद्दीपीत होतात आणि त्याचा दाह सर्वांगाला होतो. परंतु या गोपींच्या बाबतीत मात्र त्यांच्या वासना शांत शांत होत गेल्या आणि त्यांचे मनही मग सदासर्वकाळ तृप्त होऊन राहिले. अर्थात त्यातूनच निर्माण झालेली कृष्णप्रेमाची भूक मात्र त्यांच्या ठिकाणी सतत वाढतच राहिली.

हे लक्ष्मी, वासनात्मक सुखातूनही शुद्ध प्रेम निर्माण करण्याचे आत्मसामर्थ्य कृष्णाठायी होते. याचे कारण म्हणजे त्याच्या स्वतःच्या विशुद्ध अंतःकरणाविषयी त्याच्या ठिकाणी पुरेपूर आत्मविश्वास होता. खरा विशुद्ध भाव हा अशुद्ध भावाला कधीही घाबरत नाही किंवा त्याचा रागही धरीत नाही. कारण तो निरहंकारी असतो. उलट शुद्धभावाच्या ठिकाणी अशुद्ध भावाविषयी आपलेपणा व दयाच असते. त्यामुळे अशुद्धभावाला शुद्धभाव आपल्याजवळ येऊ देतो किंवा आपणहूनच त्याच्याशी जवळीकता साधतो. शुद्धभावाच्या संगतीत झाला तर अशुद्धभावच एकवेळ शुद्ध होईल, परंतु शुद्धभाव मात्र कधीच अशुद्ध होणार नाही याची खात्री शुद्धभावाच्या ठिकाणी असते. एखादे वेळेस अशुद्धभावातील अशुद्धपण शुद्धभावाला बाह्यांगाने लागेलसुद्धा आणि शुद्धभाव हा अशुद्धभाव दिसेल सुद्धा. परंतु शुद्धभाव हा मुळात निर्लेप असल्यामुळे हा बाह्यांगाचा अशुद्धपणा क्षणात झटकला जातो आणि शुद्धभाव त्याच्या मूळ तेजाने पुन्हा झळाळू लागतो. अधिकच तेजस्वी दिसू लागतो. शुद्धभावाची हीच निर्लेपता व तेजस्विता जेव्हा त्या अशुद्धभावाला आकर्षित करते तेव्हा त्या अशुद्धभावाला शुद्धभावाच्या जवळ येण्यावाचून गत्यंतरच उरत नाही. कारण तेथेच त्याला स्थान आहे आणि महत्त्वाचे म्हणजे शुद्ध होण्याची केवढी तरी संधी ही तेथेच आहे. तेव्हा कृष्णाने अशा अशुद्ध भावाच्या प्रेमालाही संधी दिली आणि त्या भावाचा स्वीकारही केला यात कृष्णाची केवढी तरी थोरवीच प्रगट झालेली होती.

हे लक्ष्मी, कृष्णप्रेमाने युक्त होऊन निष्ठेने कृष्णासंगे राहिलेल्या गोपींचे तुला वाटत असलेले कौतुकही योग्यच आहे. त्या कौतुकास निश्चितच पात्र आहेत, कारण कृष्णाच्या प्रेमाचे माहात्म्य व महत्त्व त्यांनी पूर्णपणे जाणले होते. आता प्रेमाची हीच अंतिम अवस्था आहे का असे तू विचारशील, तर एक गोष्ट लक्षात ठेव, की प्रेमात अंतिम असे काहीच असू शकत नाही. कारण प्रेम हा एक सततचा व अखंड प्रवाहाचा स्त्रोत आहे. बाह्यांगाच्या अनेक अडचणींतून व चढ-उतारांमधूनही तो प्रवाह कायमपणे वहातच असतो. अनेक प्रसंगातील कसोटीला उतरून त्या प्रेमाचा कस अधिकाधिक वाढतच असतो. कृष्णाच्याही जीवनात असे अनेक प्रसंग पुढे काळाच्या ओघात येत राहिले आणि ज्यांचे प्रेम खरे होते त्यांचे प्रेम सिद्ध होत राहिले. पण एक गोष्ट लक्षात ठेव, की प्रेमाची अंतिम परिणती ही भक्तिभावामध्येच होते आणि भक्तिभावाचीच अंतिम परिणती ही ऐक्यभावामध्ये होते.

मनामध्ये सगुणाचे प्रेम भरले व सगुणाची मूर्ती ठसली तरी मनातील इतर दोष व अशुद्धता कायम असते. त्यामुळे पूर्ण अनुभवाच्या दृष्टीने मनातील विभक्तता ही पूर्णपणे दूर झालेली नसतेच. परंतु मनातील प्रेमाने जेव्हा सगुणाची भक्ती घडू लागते तेव्हाच मनातील दोष व अपुरेपणा हळुहळू आधी प्रगट होऊ लागतात आणि मग थोडे थोडे नाहीसे होऊ

लागतात.  मनाच्या शुद्धीकरणाची ही प्रक्रिया पूर्ण झाली की मगच मन भक्तिभावपूर्ण होते आणि ऐक्यभावाच्या दिशेने निश्चयाने व आनंदाने वाटचाल करू लागते.  हे लक्ष्मी, अशी परिस्थितीजन्य विभक्तता कृष्णाच्या जीवनात घडलेल्या बाह्य बदलामुळे प्रथम निर्माण झाली आणि त्यामुळे नंतर ती विभक्तता गोपींच्या कृष्णप्रेमाने भरलेल्या मनाला जाणवू लागली. त्या प्रसंगातून कोण कोण व कसे कसे कृष्णाच्या जवळ राहिले आणि कृष्णाच्या अधिक जवळ आले हे ऐकणे व पहाणे हे भक्तिभावासाठी प्रेरणादायी ठरणार आहे.  कारण त्यातूनच सगुण प्रेमभक्तिची थोरवी खऱ्या अर्थाने प्रगट होणार आहे.

हे लक्ष्मी, पूर्वी मी तुला सांगितल्याप्रमाणे कृष्णाने आपल्या गोपसवंगड्यांबरोबर गुरे राखायचे निमित्त करून घराबाहेर जाण्यास सुरुवात केली होती.  सकाळी भल्या पहाटे उठून व गाईगुरांना घेऊन कृष्ण जो बाहेर पडे, तो संध्याकाळी सूर्यास्त झाल्यानंतर घरी परतत असे.  त्यामुळे खरी अडचण मात्र गोपींचीच झाली.  कारण कृष्णाच्या घरी येऊन कृष्णाचा सहवास करण्याची व त्याच्या प्रेमभेटीचा आनंद घेण्याची त्या गोपींची संधीच हरवली.  एवढ्या दिवसांची परिस्थितीची अनुकूलता अचानक नाहीशी होऊन एकदम प्रतिकूलता निर्माण झाली आणि गोपींच्या प्रेमाची कसोटीच लागण्याची संधी सहजगत्या निर्माण झाली.  एवढ्या दिवसांच्या सहवासाच्या सरावाला त्यांना अकल्पितपणे मुकावे लागण्याची वेळ आली.  असे काही घडेल अशी ज्याची कल्पना स्वप्नातही त्या गोपींना नव्हती, त्या गोष्टीला प्रत्यक्ष सामोरे जाण्याची वेळ त्यांच्यावर येऊन ठेपली होती.  आलेल्या कठीण प्रसंगातून कसा मार्ग काढावा हे त्यांना कळेना.  त्यांना काहीच सुचेनासे झाले.  त्यामुळे त्या गोपी नुसत्याच हिरमुसल्या झाल्या नाहीत, तर त्या अत्यंत बेचैनच झाल्या.  कृष्णाचा हा विरह त्यांना सहनच होईनासा झाला.  परंतु प्रत्यक्ष त्या गोपी काहीच करू शकत नव्हत्या.  कारण त्या तर अगदी असहाय्यच होत्या.  मात्र त्यांच्या मनात एकच विश्वास होता, की त्यांचा कृष्णच यातून नक्की काहीतरी मार्ग काढेल आणि त्याच्या भेटीची संधी त्यांच्यासाठी पुन्हा निर्माण करेल.

हे लक्ष्मी, त्या गोपींच्या मनाची ही अवस्था कृष्णाशिवाय दुसऱ्या कोणालाही जाणवणे शक्य नव्हते.  त्याप्रमाणे कृष्णालाच त्या गोपींची मनोव्यथा जाणवली आणि कृष्णाचेही अंतःकरण व्यथित झाले.  गोपींवरील प्रेमामुळे त्यालाही त्यांचा विरह जाणवतच होता आणि कृष्णही त्या गोपींना भेटण्यासाठी तेवढाच आतुर व बेचैन होता.  कृष्णानेही अंतर्मुख होऊन थोडा विचार केला आणि प्रसंगातील अडचणींवर उपाय हा शोधून काढलाच!

नित्याप्रमाणे कृष्ण गोपांबरोबर गाईगुरांना घेऊन गोवर्धन पर्वताच्या पायथ्याशी जात असे.  गाईगुरांना चरण्यासाठी मोकळे सोडल्यावर बरोबरचे गोपही मग स्वस्थ मनाने इकडे तिकडे फिरत असत.  कधी कृष्ण त्यांच्या बरोबर खेळत असे. कधी ते आपापसातच खेळत बसत.  एक दिवस असेच ते गोपबाल खेळण्यात रमलेले आहेत असे पाहून कृष्ण त्यांच्यापासून त्यांच्या नकळत थोडासा बाजूला झाला.  कृष्णाकडे सतत लक्ष ठेवून असलेल्या पेंद्यालाही त्याने खुणावून आपल्याकडे बोलावून घेतले.  पेंद्याच्या काहीच लक्षात आले नाही.  परंतु त्याच्या सहज स्वभावानुसार कृष्णावरील प्रेमाने तो कृष्णाच्या जवळ येऊन उभा राहिला आणि प्रश्नांकित मुद्रेने कृष्णाकडे पहात राहिला.  कृष्णाने त्याला बोटाच्या खुणेनेच काही न

बोलण्याविषयी सांगितले आणि पेंद्याला बरोबर घेऊन कृष्ण बाजूच्या पायवाटेने यमुनानदीच्या दिशेने चालू लागला. जवळ जवळ धावतच चालणाऱ्या कृष्णाच्या वेगाने पावले टाकणे पेंद्याला तर शक्यच होत नव्हते. परंतु कृष्णाने त्याचा एक हात घट्ट धरून ठेवल्यामुळे का होईना पण पेंद्यालाही कृष्णाच्या मागे धावपळ करणे भागच पडत होते. परंतु 'अरे किस्ना, हळुहळू, मी पडतोय, अरे मला धर' असे लटक्या रागाचे अस्फुट शब्द बोलण्यापलीकडे पेंद्या काहीच करू शकत नव्हता. कृष्ण मात्र पेंद्याच्या बोलण्याकडे लक्ष न देता त्वरेने पुढे चालतच राहिला.

थोड्याच वेळात जेव्हा यमुनानदीच्या दिशेने पाण्याचे हंडे घेऊन जाणारा गोप स्त्रियांचा समूह कृष्णाच्या दृष्टीला आला तेव्हा मात्र कृष्णाच्या चालण्याचा वेग मंदावला. कुतूहलाने पहाणाऱ्या पेंद्याला कृष्णाने खुणेनेच एका झाडाच्या आड स्वस्थपणे उभे रहावयास सांगितले आणि स्वतः मात्र त्या गोपींच्या दिशेने पुढे जाऊ लागला. कृष्णाचा हेतू पेंद्याच्या ताबडतोब लक्षात आला आणि तो कृष्णाकडे बघून डोळे मिचकावून हसला. पेंद्यानेही मग गंमतच केली. त्याने कृष्णाला आपल्या हाताने धरून मागे घेतले आणि झाडामागे उभे केले. कृष्णाकडे मिश्किलपणे हसून पहात पेंद्या स्वतः त्या गोपींच्या दिशेने निघाला.

आपल्याच नादात असलेल्या आणि डोईवरील पाण्याने भरलेल्या घड्यांना सांभाळीत सांभाळीत चाललेल्या त्या गोपींच्या वाटेत समोरच पेंद्या अचानकपणे उभा राहिला. पेंद्याला पाहून चकित झालेल्या गोपी मग भानावर आल्या. त्यांनी आजूबाजूला अपेक्षेने वळून पाहिले. परंतु त्यांचा प्रिय कान्हा त्यांना कोठेच दिसेना. हिरमुसल्या होऊन त्या पुढे चालू लागल्या, तोच पेंद्याला त्या गोपींची चेष्टा करण्याची लहर आली. आपले दोन्ही हात पसरवून त्याने गोपींची वाट लटक्या अविर्भावाने अडवली आणि त्यांना म्हणाला, ''अगं बायांनो, या यमुना नदीचे पाणी घेण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला? असे फुकटात पाणी तुम्हाला नेता येणार नाही. त्याचे दाम तुम्हाला द्यावे लागेल. या राज्याच्या राजाचा तसा कायदाच आहे आणि ते दाम वसूल करण्यासाठीच त्या राजाने माझी सरदार म्हणून नेमणूक केली आहे. तेव्हा आधी या पाण्याचा कर भरा आणि मगच पुढे सरका.''

पेंद्याच्या अशा बोलण्याची त्या गोपींना फारच गंमत वाटली आणि त्या मोठमोठ्याने हसू लागल्या. हसत हसतच त्या गोपी पेंद्याची थट्टा करण्याच्या उद्देशाने पेंद्याला म्हणाल्या, ''अरे पेंद्या, तू ज्या राज्याचा सरदार असशील त्या राज्याची भरभराट निश्चितच होणार यात काहीच शंका नाही. तुझ्यासारख्याला सरदार म्हणून नेमणारा हा राजा आहे तरी कोण बरे? आणि त्याचे नाव तरी काय आहे बरे? ज्याने यमुना नदीच्या पाण्यावरही कर लावला आहे त्या तुझ्या राजाला भेटण्याची आम्हाला फारच इच्छा आहे. किंबहुना हा पाणीकर आम्ही त्या राजाकडेच प्रत्यक्ष भरू, तुझ्याकडे मात्र मुळीच देणार नाही.'' असे म्हणून त्या गोपींनी पेंद्याला लटक्या रागाने बळेबळेच दूर केले. एका गोपीने तर आपली पाण्याची घागर पेंद्याच्या डोईवरच रिकामी केली आणि त्याला पार भिजवून टाकले. पेंद्या हवालदिल होऊन जेथे कृष्ण लपून राहिला होता त्या झाडाच्या दिशेने पाहू लागला. गोपींनीही वळून मागे पाहिले. परंतु त्यांना कोणीच दिसेना. एवढ्यात अचानक त्यांच्या

कानावर बासरीचे सूर आले आणि त्यांनी लगेचच ओळखले की हे सर्व नाटक कृष्णाचेच आहे. त्यांनी आपले पाण्याने भरलेले घडे तसेच व तेथेच खाली ठेवले आणि त्या गोपी बासरीच्या सुरांच्या दिशेने धावतच सुटल्या.

कृष्णाची सावळी व अत्यंत मनोहारी अशी मूर्ती त्यांनी पाहिली मात्र, सर्व भान हरपून त्या गोपींनी कृष्णाला प्रेमाने मिठीच मारली. अनेक दिवसांचा भुकेला असलेल्याच्या पुढ्यात अचानक पंचपक्वान्नाचे ताट यावे असेच जणू त्या गोपींना झाले. तर कृष्णाचीही अवस्था अगदी तशीच झाली होती. प्रेम किती देऊ घेऊ असेच उभयतांना झाले होते. प्रेमामध्ये विरहाचे दुःख उभयतांना जसे सारखेच व्याकुळ करते, तसेच मीलनाचे सुखही उभयतांचे तेवढेच उत्कट असते. म्हणूनच तर प्रेम हे त्याच्या कुठल्याही अवस्थेत व रूपात नेहमीच अतिशय आनंददायी असते. त्या प्रेमानंदाच्या अनुभवाच्या अवस्थेतून भानावर येण्यास गोपींना साहजिकच वेळ लागला खरा, परंतु कृष्णाने हळुवारपणे व हळुहळू त्या गोपींना भानावर आणले. परस्परांनी परस्परांचे सुखदुःख व कुशल विचारून घेतले. तरीही शब्दापरते उरलेले भाव, नेत्रांमध्ये पहाण्यातून, स्पर्शातून, मुखावलोकन करून पुन्हा पुन्हा अनुभवले जात होते. परंतु त्या भावाची पूर्ती अशी होतच नव्हती आणि कधी होईल असे वाटतही नव्हते. शेवटी कृष्णानेच त्या भावनावेगाने युक्त झालेल्या गोपींना सावरले आणि त्यांचे मन शांत व स्वस्थ केले. सर्व गोपींना आपल्या समवेत कृष्णाने बसवून घेतले आणि त्यांच्याशी तो प्रेमाच्या अत्यंत मोकळेपणाने बोलू लागला.

''हे गोपींनो, तुमच्या या माझ्यावरील प्रेमाने मला अतिशय आनंद होत आहे. मला तुमचे अगदी मनापासून कौतुक वाटत आहे. काही काळ आपला भेटीविना गेला खरा. परंतु या काळातही तुम्हाला माझे विस्मरण तर झाले नाहीच, उलट तुमच्या ठिकाणची प्रेमाची आर्तता व भेटीची ओढ अधिकच वाढली. तुम्हाला मी अगदी खरे सांगतो की माझ्याही मनाची अवस्था तशीच झालेली होती. अर्थात ही काही मोठ्या नवलाईची गोष्ट नाही. कारण खऱ्या प्रेमाचे ते सहज लक्षणच आहे. बाह्य परिस्थितीच्या अडचणींमुळे आपली भेट होऊ शकत नव्हती. परंतु प्रत्येक अडचणीवर उपाय हा असतोच. अर्थात तसे इच्छाबळ असेल तरच हा उपाय सापडतो आणि तसे मनोबळ असेल तरच तो उपाय कृतीत आणता येतो. तुमच्या मनाची होणारी घालमेल मला जाणवत होती आणि तुम्हाला त्यावर काही उपाय शोधून काढता येणे शक्य नाही हेही मला ठाऊक होते. त्यासाठी तुम्ही पूर्णपणे माझ्यावरच अवलंबून असणार आणि अशा उपाय योजनेची अपेक्षा सुद्धा तुम्ही माझ्याकडूनच करीत असणार हेही मला माहीत होते. तुमच्या परिस्थितीच्या असहाय्यतेमुळे ते अगदी साहजिकच आहे. त्यामुळे मी सुद्धा सर्व बाह्य परिस्थितीचा साधक बाधक विचार सतत करीतच होतो.

आपली भेट कशाने साधित होईल आणि कशाने बाधित होईल याचे मनन माझ्या ठिकाणी अखंड असे. तुमच्या माझ्यावरील प्रेमामुळेच तो ध्यास माझ्या ठिकाणी निर्माण झालेला होता याची मला पूर्ण खात्री आहे. त्यातूनच हा मार्ग मला सापडला आणि म्हणूनच आपली आज भेट होऊ शकली. माझ्या मनाशी विचार करता करता माझ्या लक्षात आले की माझ्या कामानिमित्त जसा मी बाहेर पडत आहे, तशाच तुम्हीही तुमच्या कामानिमित्त सकाळी किंवा संध्याकाळी पाणी आणण्यासाठी बाहेर पडत असता. आठवड्यातून एखाद दुसऱ्या दिवशी दही, दूध व लोणी यांचे हंडे भरून घेऊन तुम्ही बाजारालाही जात

असता. तेव्हा अशी संधी आपण आधी ठरवून साधीत राहिलो तरच आपल्याला पुन्हा एकमेकांना भेटणे अगदी सहज शक्य होईल. आपण भेटलो तरच प्रेमाचा अनुभव घेता येईल. प्रेम अनुभवले तरच तुमच्या ठिकाणचा माझ्याविषयीचा प्रेमभाव जागा राहील आणि तुमच्या मनात इतर सुखदुःखाच्या अडचणींना व त्यांच्या त्रासांना जागाच रहाणार नाही. तुमचे मन माझ्यावरील प्रेमामुळे सदैव शांत व तृप्त राहील आणि तुमचे प्राप्त जीवन तुम्ही समाधानाने व आनंदाने जगाल याची मला पूर्ण खात्री आहे. तुम्हीही तशी खात्री बाळगा आणि ईश्वराच्या कृपेने मिळत असलेली ही संधी साधण्याचा निश्चय करा.''

कृष्णाचे बोलणे ऐकून सर्व गोपींना अत्यंत हर्ष झाला आणि विरहाच्या कल्पनेने त्यांच्या मनावर आलेला ताण एकदम हलका झाला. कृष्णाची व आपली भेट ही होत रहाणारच आणि त्याच्या प्रेमाचा अनुभव आपल्याला घेता येणारच, या खात्रीने त्या गोपी पूर्ण निःशंक झाल्या. कृष्णाने योजलेल्या मार्गाने जाण्याचा वेगळा काही निश्चय करण्याचा प्रश्न त्या गोपींच्या बाबतीत निर्माणच होऊ शकत नव्हता. कारण तसा पूर्ण निश्चय कृष्णप्रेमामुळे त्यांच्या ठिकाणी केव्हाच झालेला होता. अशा तऱ्हेने कृष्णाला बाहेर कुठेतरी भेटणे योग्य की अयोग्य अशी शंका काय, असा विचार सुद्धा त्यांच्या मनाला स्पर्शही करू शकला नाही.

कृष्णावरील पूर्ण श्रद्धाभावामुळे एक गोष्ट त्या गोपी निश्चितपणे जाणून होत्या, की योग्यायोग्यतेचा विचार कृष्णाने केलेलाच असणार आणि त्याचा निर्णय हाच योग्य असणार याची त्यांना पूर्ण खात्री होती. आता त्या गोपींनी विचार करायचा होता तो फक्त त्यांच्या शक्याशक्यतेचा. पण त्यांनी त्याहीपेक्षा आधी विचार केला तो त्यांच्या आवश्यकतेचा. कृष्णाची भेट तर त्यांना अतिशय आवश्यक वाटत होती, कारण कृष्णप्रेम हा तर त्यांच्या जीवनाचा जणू प्राणच होता. कृष्णप्रेमाशिवाय तर त्या जगूच शकत नव्हत्या किंवा त्यांच्या तशा जगण्याला काही अर्थच नव्हता आणि अर्थहीन जगणे हे प्रत्यक्ष मरणाच्या दुःखापेक्षाही जास्त असते. कारण मरणाचे दुःख एकदाच होते आणि मरणाबरोबर तर सर्व दुःखेच लयाला जातात. परंतु प्रेमविरहित जगण्याचे दुःख क्षणाक्षणाला अनुभवावे लागते. तर कृष्णप्रेमाने कृष्णप्रेमासाठी जगण्याचा क्षण न् क्षण हा अतीव आनंदाचा असतो. तेव्हा एकदा अत्यंत आवश्यकता आहे हे जाणवले की मग सर्व काही शक्य होते आणि अशक्यही शक्य करता येते. हाच मनातील निश्चयाचा भाव गोपींच्या मुखावर सहजपणे उमटला होता. त्यांचा तो कृष्णभेटीचा निर्धार कृष्णाने ओळखला आणि त्याच्या सादाला प्रतिसाद मिळाल्याचा अतिशय आनंद कृष्णाला झाला. खरे तर, गोपींच्या सादाला कृष्ण प्रतिसाद देत होता असेही म्हणता येईल. परंतु खऱ्या प्रेमाच्या उत्स्फूर्त सादाला खऱ्या प्रेमाचा प्रतिसाद तेवढ्याच उत्स्फूर्तपणे मिळत होता हेच खरे!

कृष्ण व गोपी यांचे असे भेटणे बोलणे होत असताना पेंद्या मात्र कृष्णाच्या मनातील ओळखून दूरच उभा होता. तेवढ्यात पेंद्याच्या कानावर दुरून येणाऱ्या काही मंडळींचा आवाज आला आणि त्याने लागलीच कृष्णाला हाक मारून सावध केले. पेंद्याने केलेला इशारा कृष्णाच्याही लगेच लक्षात आला. त्यानेही गोपींना सावध केले आणि ताबडतोब निघण्याची सूचना केली. कृष्णाचा संकेत गोपींच्याही लक्षात आला आणि त्याही तेथून लगबगीने निघाल्या. परंतु निघण्यापूर्वी दुसऱ्या

दिवशी पुन्हा भेटण्याचे आश्वासन कृष्णाकडून घेण्यास मात्र त्या अजिबात विसरल्या नाहीत. आपले पाण्याचे हंडे, घागरी, कळशा इत्यादी घेऊन त्या गोकुळाच्या मार्गाने निघाल्या, तर इकडे कृष्ण व पेंद्या पुन्हा आपल्या सवंगड्यांच्याकडे जवळ जवळ धावत धावतच येऊन पोहोचले. सर्व सवंगडी आपापसात खेळण्याच्या नादात पूर्ण बुडालेले होते. 'कृष्ण आपल्यापासून दूर गेला होता' हे लक्षात येण्याच्या आतच कृष्ण पेंद्यासह त्यांच्या सन्निध येऊन पोहोचला सुद्धा होता!

अशा तऱ्हेने कृष्णाचे व गोपींचे पुन्हा एकमेकांना भेटणे सुरू झाले. कधी ठरवून तर कधी न ठरवता, जेव्हा व जेवढा वेळ मिळेल तेव्हा व तेवढा वेळ कृष्ण व गोपी यांची भेट होतच राहिली आणि त्यांच्या प्रेमाची देवाणघेवाणही होतच राहिली. अशा तऱ्हेने कृष्णप्रेमाने त्या गोपींचे मन पूर्णपणे संसारापासून दूर होऊन कृष्णाकडे वळले. संसाराची कर्तव्यकर्मे मात्र त्यांच्याकडून योग्यपणे व सहजपणे घडत राहिली. त्यात कुठलीही कसर कधीही त्यांच्याकडून झाली नाही. कोणाला कधीही तक्रार करायला वावच मिळाला नाही. उलट त्या गोपी कुटुंबियांच्या कौतुकालाच पात्र ठरल्या. परंतु त्या गोपींचे मन मात्र कृष्णप्रेमासाठी सदैव आसुसलेलेच राहिले. म्हणूनच त्यांच्या ठिकाणचे संसाराचे मोह व आसक्ति केव्हा व कशी नाहीशी झाली हे त्या गोपींना सुद्धा कळले नाही. कृष्णप्रेमामुळे त्या गोपींच्याठायी कृष्णभेटीचा सततचाच ध्यास एवढा असे की कृष्णप्रेम हा जणू त्यांचा श्वासच झाला होता. जसे श्वासामुळेच जीवन जगणे आहे, तसेच कृष्णप्रेमामुळेच त्या गोपी जगत होत्या आणि कृष्णप्रेमाशिवाय त्या जगूच शकत नव्हत्या.''

गोपींच्या प्रेमपूर्ण अवस्थेचे वर्णन नारदाच्या मुखातून श्रवण करताना लक्ष्मी अधिकाधिक चकित होत होती. परंतु त्याचबरोबर थोडीशी अस्वस्थताही तिच्या मनाला जाणवत होती. त्यामुळे न राहवून ती नारदाला विचारू लागलीच,

''अरे नारदा, गोपींचे कृष्णावरील प्रेम, त्यातून त्यांच्या ठिकाणी निर्माण होणारी व्याकुळता हे सर्व काही मी निश्चितच समजू शकते. मला त्यांचे अत्यंत कौतुकही वाटतेच. परंतु असे कृष्णाला बाहेर भेटणे हे कितपत योग्य होते हा प्रश्नही निर्माण होतोच ना! कारण एखादा जी गोष्ट करतोय ती योग्य असली, आणि तेही त्यालाच तसे वाटत आहे, तरीही ती गोष्ट एखादा ज्या पद्धतीने करतोय ती पद्धत योग्य नसेल किंवा ती सर्वांना मान्य नसेल, तर त्याविषयी टीका ही होणारच. अशी लोकांची टीका मुद्दामहून ओढवून घेण्याने काय साधणार आहे? झालाच तर त्या गोपींना अडथळाच निर्माण झाला असणार आणि फुकटचा मनस्तापही झाला असणार! बरे, एकवेळ त्या गोपींची भावनिक अवस्था मी समजू शकते. परंतु कृष्णाने तरी थोडासा संयम पाळून थोडा काळ वेळ जाऊ द्यायला हवा होता. म्हणजे कालांतराने एखादे वेळेस सर्व काही ठीक झालेही असते. न जाणो त्या गोपींना अनुकूलता प्राप्त झालीही असती. पण येथे तर कृष्णानेच सर्व पुढाकार घेतला होता आणि त्यानेच हा भेटण्याचा उपाय अत्यंत जोखीम पत्करून शोधून काढला होता. कृष्णाचा निर्णय हाच योग्य असणार हे अर्थातच निश्चित आहे. परंतु या निर्णयामागची कृष्णाची भूमिका नेमकी काय होती बरे? आणि या गोष्टीचा पुन्हा गोकुळात काय परिणाम झाला? सर्वांना ते मानवले नसणारच. मग कृष्णाने तरी असा निर्णय घेऊन त्यातून निश्चित काय साधले बरे?''

लक्ष्मीच्या प्रश्न विचारण्यातील तीव्रता ही तिच्या ठिकाणच्या नाराजीतून आलेली नसून गोपींविषयीच्या आणि विशेषतः कृष्णाविषयीच्या काळजीतून आलेली आहे हे नारदाने ओळखले होते. कृष्णाने घेतलेला निर्णय लक्ष्मीला तेवढासा मानवलेला नव्हता हेही नारदाच्या लक्षात आले होते. तरीही तिची कृष्णावरची श्रद्धा कायम होती आणि कृष्णाने घेतलेला निर्णय हा योग्यच असणार याचीही तिला खात्री होती. लक्ष्मीच्या याच निश्चयाचे नारदाला अतिशय कौतुक व समाधान वाटत होते. लक्ष्मीचा तो निश्चय अधिक दृढ करण्याच्या हेतूने नारद पुन्हा तिच्याशी अधिक सविस्तरपणे बोलू लागला.

''हे लक्ष्मी, कृष्णाने घेतलेला निर्णय बरोबरच असणार अशी श्रद्धा तुझ्या ठिकाणी असूनही तुझे मन मात्र थोडेसे साशंक होणे हेही साहजिकच आहे. कारण मन हे एक विशिष्ट भूमिका आधीच घेऊन बसलेले असते आणि त्या भूमिकेच्या चौकटीतही अडकून पडलेले असते. त्यामुळे एका ठराविक दृष्टीनेच ते मन सर्व गोष्टींकडे पहात असते. त्या चौकटीच्या जरासे जरी बाहेर काही घडलेले त्या मनाच्या दृष्टीला आले, तर ते मन लगेचच अस्वस्थ व नाराज होते आणि निषेधाचा सूर लावू लागते. परंतु कुठलीही गोष्ट केवळ चौकटीत बसून व बसवून केव्हाच साध्य करता येणार नाही. चौकटीची मर्यादा हे जर बंधन ठरायला लागले, तर ती चौकट बदलावी तरी लागते, नाही तर ती चौकट मोडावी तरी लागते. काही वेळा तर एखादी गोष्ट साध्य करावयाच्या ध्यासापोटी या अशा बाह्य चौकटी कोलमडूनच पडतात. कारण साध्यापेक्षा साधन हे केव्हाही श्रेष्ठ असूच शकत नाही. साधन हे कधीही साध्यापेक्षा वरचढ होऊ देता कामा नये. साध्य साधण्यासाठी वेळ प्रसंगी साधन बदलणे जर आवश्यक असेल, तर ते साधन बदलता आलेच पाहिजे. नाहीतर केवळ साधनातच अडकून पडणे घडेल आणि साधनाचीच मात साध्यावर होत राहील. काहीवेळा काही ज्ञानी लोक साधनाच्या शुचितेचा आग्रह धरतात आणि त्यामुळे साध्याकडे दुर्लक्षच करतात. असे शब्दज्ञानी केवळ पंडितच रहातात. परंतु स्वानुभवी मात्र केव्हाच होऊ शकत नाहीत. मुळामध्ये ईश्वराचे प्रेम हेच खऱ्या अर्थाने विशुद्ध व पवित्र पावन आहे. त्या प्रेमाव्यतिरिक्तच्या शुद्धतेला तर काहीच अर्थ नाही आणि त्या साधन शुद्धतेचा केवळ टेंभा मिरवण्यातही काही अर्थ नाही.

तेव्हा साधन व साध्य याची सांगड असणे हेच अत्यंत महत्त्वाचे आहे. साध्याकडे जाणारे व साधकाला नेणारे साधन हे मुळात साधकाला शुद्ध करीत रहाते आणि म्हणूनच ते साधनही शुद्धच असते. कारण ते साधन साधनाच्या मूळ हेतूशी प्रामाणिक रहाते. तेव्हा कृष्णाने शोधून काढलेल्या उपाययोजनेकडे आणि त्याच्या निर्णयाकडे याच शुद्ध दृष्टीने बघता आले पाहिजे, तरच त्यातील सत्यत्व आपल्या लक्षात येईल. बरे, तशी शुद्ध दृष्टी एखाद्याच्या मनाची नसेल, तर त्याने कृष्णाने विशुद्ध अंतःकरणापासून घेतलेला निर्णय हाच कसा खरा व बरोबर असला पाहिजे, असा विचार कृष्णावरील प्रेमाने मनात करीत राहिले पाहिजे. म्हणजे मग त्याचे मन हळुहळू शुद्ध होत राहील आणि त्याची दृष्टीही अगदी साफ व स्वच्छ होऊन राहील. कृष्णचरित्रातील कृष्णाच्या प्रेमलीलांचा आनंद मग त्याला खऱ्या अर्थाने व पूर्णपणे अनुभवता येईल.

हे लक्ष्मी, एक महत्त्वाची गोष्ट लक्षात ठेव की कृष्णाला त्याच्या अंतःकरणात असलेल्या विशुद्ध प्रेमाविषयी पूर्ण आत्मविश्वास होता आणि मुख्य म्हणजे या प्रेमाचा अनुभव तो ज्या गोपींना देऊ करत होता, त्या गोपींविषयी त्याच्या

ठिकाणी आत्यंतिक आपलेपणा होता.  या शुद्ध प्रेमानेच गोपींची मनेही शुद्ध होतील आणि त्यांच्या मनातील मोह, आसक्ति व दुर्बलता नष्ट होऊन त्या खऱ्या अर्थाने मनाने सबळ होतील याची कृष्णाला अगदी पुरेपूर खात्री होती.  निर्मळ, प्रेमळ व सबळ मन हेच सर्व आनंदाचे मूळ आहे हे कृष्ण जाणून होता आणि तेच मूळ कृष्णाला त्या गोपींच्या मनात निर्माण करायचे होते.  शिवाय ज्या प्रेमाची गोडी कृष्णाने त्या गोपींना लावली होती, त्या प्रेमापासून आता कृष्ण त्यांना वंचित करू शकत नव्हता.  ते प्रेम अनुभवण्याची सोय करण्याची जबाबदारी कृष्णाची होती आणि तीच जबाबदारी हर प्रयत्नाने व हर प्रकारे कृष्ण पार पाडत होता.  प्रेमाच्या अनुभवामध्ये स्मरण, मनन, चिंतन, ध्यास इत्यादी गोष्टी जरी सहजपणे असल्या, तरी प्रत्यक्ष भेटीतच प्रेमभावाची पूर्ती होते आणि प्रेमाचा अनुभवही पूर्ण होतो ही वस्तुस्थिती आहे.  तेव्हा अशा भेटीसाठी कृष्णानेच प्रयत्न केला आणि अशा भेटी घडण्यासाठीही त्यानेच उपाय शोधून काढला हे अगदी योग्यच केले असेच म्हणावे लागेल.

हे लक्ष्मी, आता गोपींच्या भेटीसाठी कृष्णाने काढलेला मार्ग योग्य होता का हा प्रश्नच अयोग्य आहे.  कारण अशा भेटी घडणे हे अत्यावश्यकच आहे हे एकदा मान्य केल्यानंतर या भेटी कशा घडाव्यात हा विचार दुय्यम आहे.  कारण कोणतीही उपाययोजना ही त्या त्या परिस्थितीनुसार ठरत असते आणि ती कायमची नसते.  परिस्थितीत योग्य सुधारणा होऊन ती जर पुन्हा अनुकूल झाली तर आधी काढलेल्या उपायाची जरुरीच रहात नाही.  जसे रोगासाठी केलेली औषधाची उपाययोजना रोग बरा झाल्यानंतर सहजच अनावश्यक ठरते, तसेच कुठल्याही उपाययोजनेचे असते.  त्या तात्कालिकच असतात हे खरे आहे.  परंतु असतात तेव्हा मात्र त्या योजना अत्यंत आवश्यकच असतात.

हे लक्ष्मी, आता परिस्थितीत अनुकूलता निर्माण होईपर्यंत कृष्णाने व गोपींनी काही काळ थांबणे इष्ट ठरले असते की नाही हा जो तुझा प्रश्न आहे, तो विचार कृष्णाच्याही मनात नक्कीच आला असणार.  परंतु कृष्ण एक गोष्ट निश्चितपणे जाणून होता की काळाची व बाह्य परिस्थितीची अनुकूलता ही दिवसेंदिवस कमीच होत जाणार.  तेव्हा अनुकूल काळाची व परिस्थितीची वाट पहात रहाण्यात काहीच अर्थ नव्हता.  सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व उपाय कृष्ण व गोपी यांच्या प्रेमभावाची पूर्ती करण्यासाठी काढले जात होते आणि प्रेमामध्ये तर 'श्रद्धा ठेवा. काहीतरी चमत्कार घडेल, तोपर्यंत सबुरी बाळगा' अशी भाषा संभवतच नाही.  कारण प्रेम असते तेथे सबुरी नसते तर मजबुरी असते, म्हणून ते प्रेमच स्वस्थ न बसता स्वतःच चमत्कार घडविते.

हे लक्ष्मी, आणखीन एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे कृष्ण त्याच्या आंतरिक प्रेरणेने एक गोष्ट निश्चितपणे जाणून होता, की त्याचे गोकुळातील वास्तव्य हे कायमचे नव्हते.  एक दिवस गोकुळ सोडून जाणे त्याला क्रमप्राप्त ठरणार होते हे कृष्णाला ठाऊक होते.  तेव्हा त्याच्या आधी गोकुळातील आपले कार्य जास्तीत जास्त पूर्ण करावे असा ध्यासच कृष्णाच्या अंतरात नेहमीच असे.  त्या ध्यासापोटी कृष्णाच्याठायी एक प्रकारची अधीरता नित्य असे.  परंतु कोणत्याही प्रकारची बाह्यांगाची उतावीळता मात्र त्याच्या ठिकाणी कधीच नसे.

हे लक्ष्मी, 'कृष्णाने एवढी मोठी जोखीम व धोका पत्करण्याचे काय कारण होते' असे तू विचारशील, तर अशी जोखीम व धोका कृष्णाच्या बाबतीत तर अगदी त्याच्या जन्मापासूनचेच होते. कृष्ण जन्मताच केवढा धोका पत्करून वसुदेवाने त्याला मुसळधार पावसातून व यमुना नदीच्या पुरातून वाट काढीत गोकुळात नंदाकडे आणून पोचवले होते. हा कथाप्रसंग तुझ्या लक्षात आहे ना? परंतु कुठल्याही बाबतीत कृष्ण वेळप्रसंगी धोका पत्करूनही आपले उद्दीष्ट साध्य करीत असे, याचे मूळ कारण होते ते म्हणजे त्याच्या स्वतःच्या भूमिकेविषयी असलेला त्याच्या ठायीचा जबरदस्त आत्मविश्वास आणि ज्यांच्यासाठी तो हे सर्व करीत असे त्यांच्याविषयी असलेला आत्यंतिक आपलेपणा! अर्थात सर्व निःस्पृहपणे व निरपेक्षपणे करीत असल्यामुळे सर्व गोष्टींच्या बऱ्या वाईट परिणामांची जबाबदारी कृष्णाने पूर्णपणे स्वीकारली होती. त्यामुळे कृष्णाचे मन कधीही विचलित तर झाले नाहीच, परंतु त्याची आंतरिक भूमिका मात्र दृढपणाने कायम राहिली. कृष्णाचे प्रेम अनुभवण्याची सर्व अनुकूलता त्याने त्याच्या प्रियजनांसाठी निर्माण करून दिल्यावरती त्या अनुकूलतेचा कोणी किती उपयोग करून घेतला याचाही विचार व काळजी कृष्ण करीत बसला नाही हे महत्त्वाचे. कारण त्याच्या प्रेमधर्माला कृष्ण जागत होता. तेच तर कृष्णाचे ब्रीद होते आणि तेच तर कृष्णाचे कार्य होते. त्यामुळे असा निर्णय घेऊन कृष्णाने काय साधले हा प्रश्न कृष्णाच्या ठिकाणी निर्माण होणे शक्यच नव्हते. कारण त्यातून कृष्णाला स्वतःला काहीच मिळवायचे नव्हते. आता ज्यांना कृष्णभेटीची संधी पुन्हा मिळाली त्यांनी काय साधले हा प्रश्न ज्याचा त्याचा होता. त्याचे उत्तर कृष्णचरित्रातील कथाप्रसंगाच्या वर्णनातून त्या त्या वेळी येणारच आहे.

हे लक्ष्मी, आता कृष्ण व गोपी यांच्या एकमेकांना बाहेर भेटण्यामुळे गोकुळवासीयांवर काय परिणाम झाला याचे उत्तर तर अत्यंत सरळ आहे. त्याचा गाजावाजा झाल्यावर सर्वांनाच ते आवडणे व मानवणे शक्यच नव्हते. ज्यांचा त्या गोपींशी काहीच संबंध नव्हता त्यांनी फक्त त्या भेटण्याचा निषेध व टीका केली. परंतु ज्यांचा त्या गोपींशी प्रत्यक्ष नातेसंबंध होता ते लोक मात्र साहजिकच चिडले व अत्यंत रागावले आणि त्यांनी त्या गोपींची अडवणूक करून त्यांना त्रास देण्यास सुरुवात केली. त्यामुळे गोपींच्या प्रेमभावाची पुन्हा एकदा कसोटी लागली. ज्यांच्या मनात थोडीशी साशंकता होती त्या गोपींनी आपणहूनच काढता पाय घेतला. ज्यांच्या मनाला कृष्णप्रेमाची आवडी व म्हणून जरुरीच निर्माण झाली होती, त्या गोपी ठामपणे पाय रोवून कृष्णाच्या बरोबरीने उभ्या राहिल्या. त्यातूनही ज्यांच्या ठायी कृष्णाविषयी आत्यंतिक प्रेम निर्माण झाल्यामुळे कृष्णप्रेम अनुभवण्याची आतुरता व व्याकुळता निर्माण झाली होती, त्या गोपींनी मात्र सबळतेने आपला पाय कृष्णाच्या दिशेने पुढतीच टाकला. त्यांना ना परिस्थितीची प्रतिकूलता अडवू शकली, ना कुटुंबीयांचा विरोध त्यांना रोखू शकला. जननिंदेकडे लक्ष देण्याचे तर त्या गोपींना भानही नव्हते आणि कारणही नव्हते.''

नारदाच्या मुखातून बाहेर येणारा शब्द न् शब्द लक्ष्मीच्या मनाला थोडे थोडे अस्वस्थ करीत होता. लक्ष्मीला एक गोष्ट निश्चितपणे ठाऊक होती, की मनाला स्वस्थता मिळाल्याशिवाय श्रवणाकडे नीट लक्ष लागणार नाही आणि श्रवण घडत राहिल्याशिवाय मनाला स्वस्थताही लाभणार नाही. त्यासाठी मनातील अस्वस्थता आधी प्रगट करणेच अत्यंत आवश्यक

आहे हेही लक्ष्मीला माहीत होते. म्हणूनच मनाच्या अस्वस्थतेत जास्त वेळ न दवडता ती नारदाशी अगदी मोकळेपणाने बोलू लागली.

''हे नारदा, गोपींच्या त्या कृष्णप्रेमाची अशी सारखी सारखी कसोटी कशाला लागायला हवी होती बरे? त्या गोपी बिचाऱ्या अगदी साध्या नि सरळ होत्या. अर्थात काही गोपी त्या कसोटीला कमी पडल्या असतीलही. परंतु त्यामध्ये त्यांना काहीच दोष देता येणार नाही. परिस्थितीवर मात करणे सर्वांनाच शक्य होतेच असे नाही. त्या गोपींना कृष्णासाठी जेवढे करता आले तेवढे त्यांनी केलेच ना? कृष्णाला जेवढी साथ त्या गोपींना देता आली तेवढी साथ त्यांनी दिलीच ना? झाले तर मग! त्या बद्दल त्या गोपींचे कौतुकच आपल्याला करावयास हवे. तेवढेच आपण करावे आणि त्याचा आनंद घ्यावा हेच बरे नाही का? हे नारदा, बरे ज्या गोपींनी प्रेमबळ घेऊन धैर्याने पुढे पाऊल टाकले, त्यांच्याकडून तरी कृष्णाची खरी भक्ती घडली का? का त्याही पुढे कमीच पडल्या? कारण एकंदरीत तुझ्या सांगण्यावरून मला तरी असे चांगलेच लक्षात आले आहे, की या कृष्णप्रेमाची कसोटी वारंवार लागत असावी. त्यामुळे ती कसोटी पुढेही नक्कीच लागली असणार. त्या कसोटीत पुढे मग त्या गोपी कमीच पडल्या असेच तू पुढे सांगणार आहेस का? तुझ्या बोलण्याचा सूर मला तरी तसाच जाणवत आहे. कारण शेवटी त्या गोपी या स्त्रिया होत्या. त्यामुळे त्या कुठेतरी कमी पडणे अगदी नैसर्गिक व साहजिक होते असेच तुला म्हणावयाचे आहे ना?

तेव्हा हे नारदा, स्त्रियांना त्यांच्या सर्व अंतर्बाह्य मर्यादांमुळे खऱ्या अर्थाने भक्त होता येणे शक्य नाही याच निष्कर्षापर्यंत तू येत आहेस, असे मला तरी ऐकताना जाणवत आहे. खरेच का कोणी स्त्री त्या कृष्णाची भक्त होऊ शकली नाही? मागे तू गोपांमध्ये पेंद्याच्या प्रेमाचे वर्णन अत्यंत कौतुकाने केले होतेस. तरीही तुझ्या म्हणण्याप्रमाणे तो पेंद्या कृष्णाशी ऐक्य पावला नाहीच. मग गोपींमध्ये अगदी भक्त जरी नसली, तरी कृष्णावरील प्रेमाने कृष्णाची आत्यंतिक जवळीकता अनुभवून, कृष्णाच्या अंतःकरणाच्या अगदी जवळ येऊन राहिलेली एखादी तरी गोपी असेलच ना? अगदीच कोणी नसेल असे मला तरी वाटत नाही. कोणी तरी गोपी एवढी कृष्णाच्या जवळ नक्कीच आली असणार याची मला अगदी खात्री आहे. हे नारदा, आता तू जास्त वेळ न घालवता माझ्या या प्रश्नाचे त्वरित उत्तर दे आणि माझ्या मनातील या तळमळीचे शमन कर.''

लक्ष्मी बोलत असताना तिच्या मुखातून शब्द एवढे भराभर येत होते, की नारदही थोडासा विस्मयचकितच झाला. परंतु त्या शब्दांच्या वेगामागील भाव नारदाच्या लक्षात आला होता. म्हणून किंचितसे स्मित हास्य करून नारद लक्ष्मीशी बोलू लागला.

''हे लक्ष्मी, तुझ्या बोलण्यातील कळवळा मी समजू शकतो. एक स्त्री म्हणून स्त्रियांविषयी असलेली तुझ्या ठिकाणची सहानुभूती योग्यच आहे. परंतु तुला निराशेचा सूर लावण्याचे काहीच कारण नाही. मुळामध्ये भक्तिमार्गामध्ये स्त्री-पुरुष हा किंवा इतर कोणताही भेद संभवतच नाही. कारण ईश्वराशी ऐक्य पावण्याचा हा भक्तिमार्ग सर्वांसाठी, म्हणजे

अगदी सर्वांसाठी मोकळा आहे. त्यातूनही भक्तिभाव हा मनाच्या ठिकाणी निर्माण होत असल्यामुळे त्याचा उद्‌भव सर्व जीवांच्या ठिकाणी होण्याची शक्यता आहे. त्याला बाह्यांगाचा अपवाद असूच शकत नाही. अर्थात तसा भक्तिभाव निर्माण होणे अत्यंत भाग्याचे व म्हणूनच दुर्मिळ आहे हेही खरे आहे. आता बाह्यांगाच्या अडचणी या सर्वांनाच आहेत. मग ती स्त्री असो वा पुरुष असो. फार तर त्या अडचणींचे रूप वा प्रकार वेगळे असतील, परंतु या अडचणी मात्र कोणालाही चुकलेल्या नाहीत. त्या अडचणींवर मात करण्याचे आधी मनोबळ आणि मग कुशलता ही मात्र ज्याला त्यालाच प्राप्त करून घ्यावी लागते. आता भक्तिभाव निर्माण होण्यासाठी मानसिक अडचणी या स्त्रियांच्या बाबतीत अधिक आहेत असे म्हणत असशील, तर तुला एक गमतीची गोष्ट सांगतो जी ऐकून तुलाही एखादे वेळेस नवलच वाटेल.

हे लक्ष्मी, मागे मी तुला सांगितलेले तुझ्या लक्षात असेलच, की ब्रम्हदेवाने सर्व सृष्टी निर्माण केलेली पाहून नारायणाला कौतुक वाटले, परंतु समाधान काही झाले नाही. कारण त्या जड सृष्टीत व प्राणी सृष्टीत अशी कोणतीही गोष्ट वा वस्तू नव्हती, की जी या नारायणाचे प्रेम अनुभवून भक्तिभावाने नारायणाशी ऐक्य पावेल. नारायणाची ही इच्छा जाणून ब्रम्हदेवाने मनुष्यप्राण्याची निर्मिती केली. त्यामध्येही सर्व प्रथम पुरुषच निर्माण झाला. पुरुष हा बुद्धी व शक्ती या दोन्ही अंगाने सृष्टीतील सर्व प्राण्यांमध्ये सरस व वरचढ होता. आपल्या बुद्धीने या सृष्टीतील नानाविध वस्तुमात्रांचे, एवढेच काय या सर्व विश्वाचेही ज्ञान मानवाने प्राप्त करून घेतले. स्वतःच्या ठिकाणी आत्म्याच्या रूपाने असलेल्या या नारायणाच्या अंशाचेही आत्मज्ञान, पण फक्त शब्दरूपाने स्वतःच्या बुद्धिबळावर या मानवी पुरुषांनी जाणून घेतले. परंतु भक्तिभावाने नारायणाशी ऐक्य पावण्यात मात्र ते कमी पडत असत. कारण पुरुषांच्या ठिकाणी मनाची भावनिकता ही कमी प्रमाणात होती. त्यामुळे दुसऱ्यासाठी काही करणे, दुसऱ्यांचे मन व त्यांची सुखदुःखे जाणून घेणे, त्यांचे निवारण करण्यासाठी आपण काही प्रयत्न करणे हा पुरुषांचा नैसर्गिक स्वभावच नव्हता. त्यामुळे त्यांच्या ठिकाणी भक्तिभावाची मानसिकता निर्माण होणे दुर्मिळ व कठीण होत असे. अर्थात हा सर्वसाधारण नियम झाला तरी त्याला काही थोडेफार अपवाद हे होतेच.

हे लक्ष्मी, मानव योनीमध्ये पुरुषांची निर्मिती झाल्यानंतर काही काळानंतर ब्रम्हदेवाकडून स्त्रीची निर्मिती झालेली आहे. ब्रम्हदेवाच्या अंतःकरणात मानव योनी निर्माण करताना एकच ध्यास होता, की नारायणाच्या अंतरातील ध्यासाची पूर्ती करणे. नारायणाला तर भक्तिभावाने त्याच्याशी ऐक्य पावणारे मानव हवे होते. त्यामुळे साहजिकच ब्रम्हदेवाकडून पुरुषानंतर झालेली स्त्रीची निर्मिती ही भक्तिभावाला अधिक अनुकूल व पोषक होती.

स्त्री ही पुरुषापेक्षा देहाने दुर्बल असली, तरी मनाने अधिक भावनाप्रधान आहे. त्यामुळे मनाची सहिष्णुता, दुसऱ्यांच्या भावनांचा विचार व त्याला प्राधान्य देण्याचा स्वभाव आणि मुख्यतः सेवाभाव व त्याग करण्याची वृत्ती हे स्त्रीठायीचे विशेष नैसर्गिक गुण आहेत. भावनाप्रधान स्वभावामुळे कोणावर तरी प्रेम करण्यासाठी व कोणाचे तरी प्रेम अनुभवण्यासाठी स्त्री ही नेहमीच आसुसलेली असते. सुरुवातीला लहानपणी माता पित्यांचे व बंधुभगिनींचे प्रेम, मग माहेरच्या नात्यांचा पूर्ण त्याग करून विवाह झाल्यानंतर पतीचे प्रेम हे मुख्य आणि त्यानुषंगिक सासू-सासरे, दीर-नणंदा यांची

सेवा आणि पुढे मुलेबाळे व नातवंडे, पतवंडे सुद्धा यांची देखभाल व काळजी या सर्वांमध्ये पूर्णपणे गुंतून जाता जाता स्त्रीचे स्वतःचे सर्व अस्तित्वच हरवले जाते. तिचे वेगळे जीवन म्हणून काही रहातच नाही.

हाच तिचा प्रेमगुण जर भक्तिमार्गाकडे लागला तर स्त्रीला भक्तिमार्ग अगदी सरळ, सोपा व सहज होऊन रहातो. कारण भक्तिमार्गाला लागणारे प्रामाणिकपणा, एकनिष्ठा, समर्पणाचा भाव इत्यादी महत्त्वाचे व आवश्यक गुण स्त्रियांच्या प्रेमभावात सहजपणे अंतर्भूत असतात. फक्त त्यांना ईश्वराच्या खऱ्या सगुण प्रेमाचा अनुभव आला व कळला पाहिजे आणि सांसारिक प्रेमामध्ये गुंतलेले त्यांचे मन मात्र एकदा सुटले पाहिजे. मग स्त्रियांना या भक्तिमार्गापासून कोणीच व काहीच रोखू शकत नाही. तेव्हा पुरुषांपेक्षा स्त्रियांची मानसिकता ही सगुण प्रेमभक्तिमार्गासाठी अधिक अनुकूल आहे हे एक नैसर्गिक सत्य आहे. अर्थात अनेक पुरुष भक्तही या सृष्टीमध्ये होऊन गेले. परंतु त्यालाही कारण म्हणजे त्यांच्या ठिकाणी हीच स्त्रियांची मानसिक वृत्ती अधिक होती हेच होय.''

नारदाचे बोलणे ऐकून विस्मय पावणारी लक्ष्मी खुशीने हसतही होती. तीच खुशी शब्दानेही व्यक्त करीत लक्ष्मी बोलू लागली.

''अरे नारदा, तुझी अगदी कमालच आहे. तुझ्यासारखा वक्ता सर्व विश्वात एकीएक तूच आहेस. कोणताही विषय प्रगट करण्याची तुझी हातोटी केवळ अद्वितीयच आहे. एखादा विषय बाह्यांगाने प्रगट करताना तू वरवरच्या बोलण्यातून केव्हा एकदम मुळापर्यंत जातोस हे तर श्रवण करताना कळतच नाही. परंतु त्या विषयाच्या खोलवर जाताना जरी गंभीर व्हायला झाले, तरी एक वेगळ्याच प्रकारचा आनंद मनाला निश्चितपणे होत असतो. त्यातूनही मुळातून तू पुन्हा जेव्हा विषयाच्या पृष्ठभागावर येतोस ना, तेव्हाही मनाची झालेली अंतर्मुखता कायम रहाते आणि बाह्य वर्णनाचा काहीतरी आगळाच आनंद मनाला प्राप्त होत असतो.

एकच विषय सर्वांगाने तुझ्याकडून एवढ्या सहजपणे प्रगट होतो, की मनाची द्विधा स्थिती व्हायला वावच रहात नाही. फक्त श्रवण मात्र तेवढ्या एकाग्रतेने, सावधपणे व मोकळेपणाने घडावयास हवे. अर्थात हे श्रवणाचे गुण सुद्धा, तुझ्या मुखातून या नारायणाचे माहात्म्य प्रगट करणाऱ्या सगुण चरित्रकथा ऐकता ऐकताच मनाला प्राप्त होतात, हे मी माझ्या स्वानुभवाने अगदी खात्रीपूर्वक सांगते. आत्ताच बघ ना! आधी तुझे बोलणे ऐकताना माझ्या मनाला तर असेच वाटायला लागले होते, की स्त्रिया जणु सगुण प्रेमभक्तिच्या मार्गाला लायकच नाहीत. कारण एवढी त्यांना परिस्थितीची मर्यादा व मनःस्थितीच्या अडचणी आहेत. त्यामुळे ऐकताना मीही जराशी निराश व उदासीनच होत होते. आणि तशी ती अवस्था माझ्याकडून प्रगटही झाली. परंतु तरीही मी शांतपणे व अधीर न होता तुझे सर्व बोलणे ऐकत होते.

हे नारदा, बोलता बोलता तू तर विषयाला अशी सुंदर कलाटणी दिलीस, की मला तर एकदम सुखद धक्काच बसला. आता तर तू 'स्त्रियांची मानसिकता हीच सगुण प्रेमभक्तिसाठी अधिक अनुकूल व पोषक आहे' असेच प्रतिपादन करीत

आहेस. तू काढलेला हा निष्कर्ष केवळ बुद्धीच्या अभ्यासाने काढलेला नाहीस हे नक्कीच. तुझ्या अनुभवानेच तू नेहमी बोलत असतोस हे मला पक्केपणाने ठाऊक आहे. मला तर अगदी खात्री आहे की तुझ्या मनामध्ये निश्चितच कोणीतरी व्यक्ती आहे आणि ती सुद्धा या कृष्णचरित्रातीलच आहे. होय ना? तेव्हा हे नारदा, आता जराही विलंब न करता तू त्या व्यक्तिरेखेला साकार कर आणि कृष्णप्रेमाचे रंग त्या व्यक्तिरेखेमध्ये भरून कृष्णाच्या चरित्रकथा रंगव. कृष्णप्रेमभक्तिचे नानाविध रंग बघण्यास, ऐकण्यास व त्यात पूर्णपणे रंगून रहाण्यास मी कमालीची आतुर झालेली आहे.''

लक्ष्मीचे बोलणे ऐकून नारदालाही अत्यंत संतोष झाला. सगुण प्रेमामध्ये नित्य रमलेला नारद कृष्णचरित्रातील सगुण प्रेमभक्तिकथा रंगून गाण्यासाठी लक्ष्मीपेक्षाही जास्तच अधीर झालेला होता. त्यामुळे क्षणाचाही वेळ वाया न घालविता नारदाने लागलीच बोलण्यास सुरुवातच केली. त्याच्या अंतःकरणातील सदैव दाटून राहिलेले नारायणाचे सगुण प्रेम शब्दाद्वारे प्रगट होण्याच्या आधीच त्याच्या मुखाला मात्र पूर्णपणे व्यापून राहिले होते. प्रेमाने आरक्त झालेले नारदाचे मुखकमल विशेष शोभिवंत दिसत होते आणि त्याच्या नेत्रातील एक विशिष्ट चमक त्याच्या मुखाला अधिकच तेजस्वी करीत होती. त्या सुंदर मुखातून नादमधूर वाणीने प्रगटणारे सप्तस्वर शब्दरूपाने साकार होऊ लागले.

''हे लक्ष्मी, तुझ्या श्रवणभक्तीचे मला खरेच अत्यंत कौतुक वाटत आहे. श्रवणाद्वारे वक्त्याच्या अंतःकरणातून प्रगटणाऱ्या भावाला ऐकणे व पहाणे आणि वक्त्याच्या आनंदाचाच अनुभव घेणे ही साधी गोष्टच नाही. केवळ श्रवणाने ती साध्य होणार नाही, तर फक्त श्रवणभक्तीनेच ती सहजगत्या घडू शकते. म्हणूनच जे श्रवणभक्तिचे माहात्म्य पुन्हा पुन्हा सांगितलेले आहे ते अगदी योग्यच आहे. श्रवणभक्तिमुळेच वक्त्याच्या अंतःकरणातील व्यवधान लक्षात येते आणि ते व्यवधान प्राप्त करून घेण्याचा ध्यासच लागतो. याच ध्यासापोटी तू माझ्या अंतःकरणातील व्यवधान जाणू शकलीस. तू अगदी बरोबर ओळखलेस, की स्त्रियांच्या सगुण प्रेमभक्तिमार्गाविषयी सांगताना माझ्या अंतःकरणात एक निश्चित व्यक्तिरेखा आहे. खरे तर, सगुणभक्तिभावाचे प्रतीक व द्योतक असलेली ती व्यक्ती भावाने नेहमीच माझ्या अंतःकरणात रंगत असते. ती भक्तिभावाची व्यक्तिरेखा जशी कृष्णापासून कधीच वेगळी करता येणार नाही, तशीच ती माझ्या अंतःकरणातूनही तिच्या भावाने कधीच वेगळी होणे शक्य नाही, एवढे त्यांचे ऐक्य कायम स्वरूपाचे आहे. ती व्यक्ती म्हणजे **कृष्णाची प्रिय सखी राधा होय! राधा म्हणजे कृष्णप्रेमाची अखंड धाराच होय.** राधा म्हणजे भक्ती आणि भक्ती म्हणजे राधा असे एक समीकरणच पुढे अनेक भक्तांनी आपल्या भक्तिभावाच्या स्वानुभवाने तयार केले.

*****



# लेखक परिचय - श्रीपरमानंदस्वामी

श्रीपरमानंदस्वामी - श्री.अविनाश मोरेश्वर लिमये यांनी मुंबई विद्यापीठातून M.Sc. with Research ही पदवी घेतली. आय.आय.टी. पवई, मुंबई या सुप्रसिद्ध संस्थेत मेटॅलर्जिकल इंजिनिअरिंग या विभागात ते दीर्घकाळ सेवा करून निवृत्त झाले आहेत.



गृहस्थाश्रमात राहूनच भक्तिमार्ग कसा साधता येतो व सद्गुरु कृपेने ईश्वरप्राप्ती कशी करून घेता येते याचा आदर्श त्यांच्या जीवनाद्वारे प्रत्यक्ष साकार झालेला आहे.

त्यांनी प्रदीर्घ काळ, अखंडपणे व प्रेमभावाने त्यांचे पूज्य पिता व सद्गुरु श्रीअवधूतस्वामी यांची सेवा, भक्ती व त्यांचे कार्य करून तसेच स्वतःची साधना करून सर्वश्रेष्ठ असा आत्मानुभव घेतला.

श्रीअवधूतस्वामी यांच्या महानिर्याणानंतर श्रीपरमानंदस्वामी यांनी तरुण वयातच या दत्तपरंपरेच्या कार्याची धुरा अत्यंत समर्थपणे सांभाळली आणि सर्वसामान्यांना व भक्तांना अचूक मार्गदर्शन केले व आजही करीत आहेत.

श्रीपरमानंदस्वामी यांनी लिहिलेला प्रभूरामाच्या अंतःकरणाच्या अवस्थेचे दर्शन घडविणारा अनुभवसिद्ध ग्रंथ 'हा राम माझा' २००० साली व कृष्ण व राधा यांच्या भक्तिऐक्याचे स्वानुभूतीतून मनोहारी दर्शन घडविणारा ग्रंथ 'कृष्ण सखा माझा' २००४ साली प्रकाशित झाला. तसेच नारद व लक्ष्मी यांच्या संवादातून उलगडलेले कृष्णाच्या अंतरंगातील गूज प्रकटविणारा ग्रंथ 'कृष्ण परमात्मा' २००८ मध्ये प्रकाशित झाला. या ग्रंथास मराठी साहित्य परिषद, पुणे यांचा 'मृत्युंजय' पुरस्कार प्राप्त झाला आहे. तसेच दत्तात्रेयांच्या अवतार मालिकेतील चरित्रांचे रहस्य प्रकट करणारा ग्रंथ 'दत्त हाचि अवधूत' २०१० साली प्रकाशित झाला असून, श्रीपरमानंदस्वामी यांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह 'आनंदाचे डोही' २०११ मध्ये प्रकाशित झाला आहे. 'दत्तात्रेय वामन भिडे - एक शोध आनंदाचा' ही आध्यात्मिक कादंबरी २०१४ साली प्रकाशित झाली, तर त्याच आध्यात्मिक कादंबरीचा पुढील भाग म्हणजे 'दत्तात्रेय वामन भिडे - एक प्रवास आनंदाचा' हा २०१५ मध्ये प्रकाशित झाला आहे. त्यापुढील भागाचे लेखन श्रीपरमानंदस्वामी यांचेकडून घडतच आहे.

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान आपल्या वाचकांसाठी कृष्णसखा माझा या सुंदर पुस्तकाचे पाच भाग आणत आहे. सौ. प्रतिमा प्रविण आठवले यांच्या अथक परिश्रमांतून हे साकार होत आहे. त्यातला हा दुसरा भाग. हा तुम्हाला कसा वाटला ते सांगा. पाचवा भाग कृष्णाष्टमी ला प्रसिद्ध होईल. याच दरम्यान महाभारत (मूळ “जय” हा ग्रंथ) येत आहे.

२०१६ हे वर्ष ई साहित्यासाठी फ़ारच उत्साहाने सुरू झाले. या वर्षाची सुरुवातच मुळी लिओ टॉलस्टॉय, पॉल ब्रन्टन, आणि मनुस्मृतीने झाली. धर्माकडे पहाण्याचे तीन विविध दृष्टीकोन यांत आहेत. २०१५ मध्ये ई साहित्य मधून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत बहिणाबाई, संत कान्होपात्रा, संत चोखामेळा, गीतारहस्य, भगवद्गीता, अशा अनेक मौल्यवान ग्रंथांची ई निर्मिती करण्याचा योग आला. २०१६ ची सुरुवात बायबल, मनुस्मृती पासून झाली आणि त्यात कुराण, बौद्धमत, जैनधर्म, ज्यू, पारशी, वेद, उपनिषदे अशा विविध धर्मशास्त्रांची भर पडावी असा योग दिसतो आहे. योग दिसतो असे यासाठी म्हणतो की ही पुस्तके गेल्यावर्षीही आम्ही कुठे मुद्दाम शोधायला गेलो नव्हतो. श्री विजय पांढरे, डॉ. श्री अशोक धांडे, श्री अविनाश नगरकर, श्री अरुण फ़डके, श्री रत्नाकर महाजन, श्री फ्रान्सिस आल्मेडा, श्री मधुकर सोनावणे, श्री अशोक कोठारे, श्री अरुण काकतकर या व इतर अनेक विद्वानांनी हे साहित्य मोठ्या विश्वासाने आमच्या हाती सोपवलं. आणि आम्ही फ़क्त पोस्टमनगिरी केली. आमच्या सुदैवाने प्रचंड मोठ्या वाचकवर्गाने या साहित्याचा आस्वाद घेतला. या महानुभावांच्या श्रमाचे काही प्रमाणात चीज झाले.

ई साहित्य प्रतिष्ठान निर्माण झाले नवीन साहित्यिकांसाठी एक व्यासपीठ म्हणून. ते तसेच आहे. आणि तसेच राहील. साधारण ८० टक्के पुस्तकं ही नवसाहित्यिकांचीच असतील. पण सुमारे वीस टक्के पुस्तकं नावाजलेली, वाचकप्रियही असावीत. म्हणजे वाचकांचा ओघ वाढता आणि वाहता रहातो.

मराठीतल्या महान प्रकाशकांच्या तुलनेत ई साहित्य अगदीच नगण्य आहे. आणि त्यांच्याशी तुलना वा स्पर्धा करण्याचा मानसही नाही. परंतू दर्जाच्या बाबतीत मात्र आम्ही तोडीस तोड राहू. हे वर्ष अत्यंत दर्जेदार कथा, कादंबऱ्या आणि काव्य-विनोद-शास्त्र पुस्तकांचे असेल याची आम्ही ग्वाही देतो.

आपण या साहित्य यज्ञात यथाशक्ती इंधन पुरवावे ही विनंती. आपल्या ओळखीच्या दहा किंवा अधिक मराठी साक्षरांचे ई मेल पत्ते आमच्याकडे पाठवा. आम्ही तुम्हाला आमचे VIP सभासद करू. याशिवाय या कामात इतर अनेक तर्हांनी आपण सहभागी होऊ शकता. वेबसाईटला भेट तर देतच रहा. खंबीरपणे पाठीशी उभे रहा. मग बघाच काय काय चमत्कार घडतील ते.

आपले विश्वासू

टीम ई साहित्य

